गोमंतक - इतिहास - दिग्दर्शन

— ना. भा. नायक

गोमंतक-इतिहास-दिग्दर्शन

लेखक

नारायण भास्कर नायक

साहित्यविशारद

संपादक : 'भारतमित्र'

रिवण (गोवा).

★

१९५७

Visado pela Censura

GOMANTAK - ITIHÁS- - DIGDARSHAN

(Separata de 'Bharatmitra')

•

Editor :

Dr. S. R. Quenim, Médico
RIBANDAR.

•

COMPOSTO E IMPRESSO NA
TIPOGRAFIA BORCAR
DE V. S. BORCAR, MARGAO.

प्रास्ताविक

गोमंतकाचा प्राचीन व अर्वाचीन सर्वांगपरिपूर्ण संपूर्ण इतिहास प्रकाशनांत येण्याची फार आवश्यकता आहे. असा मोठा इतिहास त्या क्षेत्रांतील तज्ज्ञ, इतिहास संशोधक श्री. डॉक्टर पांडुरंग सखाराम पिसुर्लेंकर यांकडून मराठींत किंवा पोर्तुगीज भाषेंत तरी लिहिला जाईल अशी आशा आहे. तसा संपूर्ण इतिहास प्रकाशनांत आल्यावर अभ्यासू वाचकांची ठीक सोय होईलच. तथापि सध्या कांहीं तसें योग्य साधन नसल्यानें आणि थोडक्यांत सर्व कांहीं समजून घेण्याची इच्छा करणाऱ्या बहुजनसमाजाला गोमंतकाच्या इतिहासाचें थोडक्यांत दिग्दर्शन व्हावें अशा इच्छेनें प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं सन्मित्र डॉ. पिसुर्लेंकर यांच्या अनेक पोर्तुगीज पुस्तकांचा व इतर साधनांचा प्रस्तुत लेखकानें मनसोक्त उपयोग करून घेतला आहे. तो त्यांनीं प्रेमानें करूं दिला या त्यांच्या थोर सौजन्याबद्दल आभार मानावे तितके थोडेच आहेत.

त्याचप्रमाणें इतर पोर्तुगीज, इंग्रजी वगैरे निरनिराळीं पुस्तकें, जुनीं कागदपत्रें व सनदा इत्यादि साधनें ज्यांच्याकडून उपयोगासाठीं मिळालीं त्यांचे व त्या त्या सन्मान्य लेखकांचे फार आभार आहेत.

दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास यांतील उणिवा भरून काढून माहितीहि जास्तींत जास्त (अर्थात थोडक्यांत फार) देण्याचा अवश्य विचार करूं.

— ना. भा. नायक
लेखक

विषयानुक्रम

गोमंतक-इतिहास-दिग्दर्शन

गोमंतक

परशुराम क्षेत्राच्या अथवा कोंकणपट्टीच्या ज्या भागास आज 'गोमंतक' किंवा 'गोवा' अशी संज्ञा आहे तें नांव कसें अस्तित्वांत आलें या संबंधीं संशोधक अनेक दृष्टींनें चर्चा करतात आणि आपापल्या मताप्रमाणें अनेक मुद्दे पुढें आणतात. ते लक्ष्यांत घेऊन विचार केला तर परशुरामक्षेत्रांतील हें 'गोवराष्ट्र' व महाभारतांत उल्लेख आलेलें 'गौराष्ट्र' (गोवराष्ट्र) हीं दोन्हीं एकच असून त्यालाच अति प्राचीन कालीं 'गोमंत' म्हणत असें स्पष्ट दिसतें.

सन १३९१ मधील एका ताम्रपटांत 'गोवापुरी' ही कोंकणची राजधानी असें म्हटलें आहे. अर्थात् त्या कालीं गोमंतकाच्या व दक्षिण कोंकणच्या सीमा एकच होत्या. प्राचीन गोमंतक असा हा विस्तीर्ण होता.

उपलब्ध माहितीचा विचारपूर्वक अभ्यास केला तर दिसून येतें कीं, प्राचीनकालीं गोप लोकांच्या गोव्यांतील वसतीमुळें हा भाग आर्यांनां गोधनानें संपन्न दिसला आणि त्यावरून त्याला आर्यांकडून 'गोमंत' असें नांव पडलें. पुढें 'गोमंत'चा 'गोमंतक' झाला आणि त्यावरूनच 'गौराष्ट्र-गोवराष्ट्र-गोवा' हे शब्द आले असें गृहित धरण्यास हरकत नाहीं.

ग्रामसंस्था

आज इतरत्र कुठेंच दिसत नसलेल्या ग्रामसंस्था गोव्यांत कधीं अस्तित्वांत आल्या याबद्दलहि अनेकांचे अनेक तर्क आहेत. या संस्था आर्यांच्या आहेत असें कित्येकांचें मत असून कांहीं अभ्यासू त्या द्रविडांच्या आहेत असेंहि म्हणतात.

मुंडा नांवाच्या अनार्य जातीनें पंचायत प्रथा भारतांत आणली असें डॉ. राघवेंद्र शर्मा, संशोधक शरद्कुमार रॉय वगैरेंचें मत असल्यानें गोव्यांत ही अनार्य जात आली तेव्हां त्यांच्या पंचायत पद्धतींतूनच येथील ग्रामसंस्थांचा उदय झाला असेंहि कांहीं म्हणतात.

तथापि सूक्ष्म रीतीनें पाहिलें तर त्या आर्यांच्याच आहेत यांत शंका दिसत नाहीं. ऋग्वेदांतील ग्रामसंस्थाविषयक माहितीवरून ऋग्वेदकालांतहि ग्रामसंस्था होत्या असें दिसून येतें. ऋग्वेदांत ग्रामसंस्थेस 'बहुपाय्य स्वराज्य' असें म्हटलें आहे. वसाहतीसाठीं करण्यांत यावयाचे सामुदायिक प्रयत्न आणि गांवच्या लोकांची सर्व प्रकारची व्यवस्था राखणें यांसाठीं या ग्रामसंस्था आर्यांकडून अस्तित्वांत आल्या.

ग्रामसंस्थांच्या मूळच्या पद्धतींत, हवाशीर जागेंत घरें बांधणें; गांवच्या सभोंवतीं गुरांसाठीं कुरणें राखणें; गांवच्या सीमेवर वड, पळस, औदुंबरादि झाडें लावणें; अवश्य तेथें पाणपोई ठेवणें; देवालयें, धर्मशाळा, विद्यालयें इ. बांधणें, जनतेच्या आरोग्याची, शिक्षणाची व शत्रूंपासून रक्षण करण्याची जबाबदारी घेणें वगैरे ग्रामसंस्थांचीं अनेक कार्यें होतीं.

ग्रामसंस्थेची ग्रामपंचायत ही सर्वाधिकारी असे. पंचायतीच्या ठरावावांचून व्यक्तिशः एखाद्या सदस्याला कांहीं करतां येत नसे. या पंचायतीची निवड वार्षिक असे. निवडणुकींत सारे रहिवासी भाग घेत. ग्रामाधिपति (गांव-

कर) ग्रामसंस्थेस पूर्णपणें जबाबदार असे.

ग्रामाधिपति हा गांवचा प्रमुख अधिकारी असून त्याकडे मुलकी व फौजदारी अधिकार असत. त्याच्या हाताखालीं ग्रामोद्धारक, ग्रामप्रतिनिधि, ग्रामपाल, ग्रामवैद्य, ग्रामाचार्य, ग्रामयाजक, ग्रामपोतदार, ग्रामकर्मार, ग्रामतक्ष, ग्रामकुलाल, ग्रामरजक, ग्रामनापित, ग्रामवैतालिक, ग्रामगोदह, ग्रामघोषिन्, ग्रामप्रेष्य वगैरे कामगार असत. लेखनकलेच्या उदयानंतर त्यांत ग्रामलेखकाचाहि समावेश झाला आणि पुढच्या कालांत हाच 'कुलकर्णी' म्हणून प्रसिद्धीस आला. सर्व कामगारांनां त्यांच्या कामगिरीप्रमाणें वंशपरंपरा इनाम जमिनी देत असत.

या ग्रामसंस्थांचा उल्लेख मनुस्मृति, हारितस्मृति इ. अनेक प्राचीन ग्रंथांतून मिळतो.

धार्मिक, सामाजिक, राष्ट्रीय इ. सर्व प्रश्नांची चर्चा व निकाल ग्रामसंस्थेची ग्रामपंचायत करी. पंचायतींतील पंच ज्ञानानें, वयानें व पराक्रमानें श्रेष्ठ व चारित्र्यवान् असण्याबद्दल निवडणुकीच्या वेळीं विशेष काळजी घेत. धर्मशास्त्र, न्यायशास्त्र जाणणारेच पंच पंचायतींत असत. पंचायतीचा निर्णय निःस्पृह, निर्दोष व सत्याला धरून होई व तो अखेरचा असे.

अशा रीतीनें आर्यांनीं प्राचीन कालीं आपल्या या ग्रामसंस्था ऊर्फ लोकनियुक्त राज्यसंस्था बराच कालपर्यंत गोमंतकांत चालवून येथील वसाहत यशस्वी केली होती. त्या कालीं गोव्यांत या संस्थांचें सुंदर संघराज्य होतें.

"या ग्रामसंस्था म्हणजे प्राचीन आर्यांचीं लोकसत्ताक राज्येंच होतीं." असें कर्नल मार्क्स यानें आपल्या Historical Sketches of the Sonth India या ग्रंथांत म्हटलें आहे. आजच्या येथील 'कोमुनिदादी' म्हणजे त्याच रूपांतरीत संस्था होत.

इ.स.१४६८ त भारतांत ज्या वेळीं ७ वर्षांचा दुर्गादेवीचा मोठा दुष्काळ पडला त्या वेळीं तिकडील कित्येक लोक सैरावैरा धांवूं लागले आणि आसरा मिळेल तेथें राहूं लागले. अशा प्रसंगीं अनेक जातींचे लोक कोंकणांत उतरले; अर्थात गोव्यांतहि आले आणि पुढें येथेंच स्थायिक झाले. त्या आणि पुढें निरनिराळ्या निमित्यानें येथें येऊन राहिलेल्या लोकांचा समावेश आजच्या गोमंतकीय जनतेंत झालेला आहे.

चालुक्य पूर्वकाल

इ. स.च्या ६ व्या शतकापासून गोमंतकाचा इतिहास सुसंबद्ध मिळतो. त्या पूर्वींचे कांहीं शिलालेख व ताम्रपट हल्लीच उपलब्ध झाले आहेत. ब्राह्मी लिपींतील एक शिलालेख हरवळेंच्या विहारांत आहे. त्याच्या अक्षर पद्धतीवरून तो पहिल्या शतकांतील असावा असें वाटतें. त्यांत 'सचिपूर' नांवाच्या शहराचा उल्लेख आहे.

'सचिपूर' म्हणजे सांप्रतचें कुडणें होय. हें गांव हरवळेंच्या जवळ असून तेथील कांहीं भागास अजून 'सेजो' असें म्हणतात. या ठिकाणीं कदंबकालीन सोन्याचीं नाणीं मिळालीं असून पूर्वकालीं हें स्थान महत्वाचें होतें असें दिसतें. चालुक्य राजा मंगलीश याच्या स. ५७८ च्या एका ताम्रपटांत या गांवाचा निर्देश 'कुंडिवाटक' असा केला आहे.

स. १९३० त रे. फादर हेरास यांनां बार्देसमधील कोलवाळ येथें बुद्धाची एक मूर्ति सांपडली. ती पहिल्या दुसऱ्या शतकांतील

असावी असें त्यांचें मत आहे. १६ व्या शतकाच्या अखेरीस फिरंग्यांनीं बार्देसमधील जीं देवळें मोडलीं त्यांत कांहीं गौतमाचीं देवळें होतीं. १२ व्या शतकांतील जैन आचार्य हेमचंद्र यांच्या 'द्व्याश्रय' काव्यावरूनहि गोव्यांत त्या कालीं देखील बुद्धधर्मीय लोक असल्याचें सिद्ध होतें. बुद्धाचे साथे विहार गोव्यांत रिवण, लामगांव, लोटली, आंकें, हरमल इत्यादि ठिकाणीं आहेत.

४ थ्या शतकांत चंद्रपूर (सांप्रतचें चांदर) राजधानींतून देवराज याच्या आज्ञेनें गोविंदस्वामी व इंद्रस्वामी या दोन ब्राह्मणांनां साष्टींतील कुठ्ठाळ येथील कांहीं जमीन दान दिल्याचा ताम्रपट शिरोडें येथें सांपडला आहे. हा देवराज मानपूरच्या राष्ट्रकूट घराण्यांतील असावा असें प्रा. वा. वि. मिराशी यांचें म्हणणें आहे. डॉ. मोरेश्वर गं. दीक्षित यांचेंहि असेंच मत आहे. तथापि डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनां हें मत ग्राह्य वाटत नाहीं. या ताम्रपटाचा काल केवळ त्याच्या अक्षराच्या वळणावरून ठरविला असल्यानें तो जरा पुढें मागें होणें अशक्य नाहीं.

पुराणवस्तु संशोधक कृष्णम चार्लू यांच्या मतें सदर देवराज हा 'गोमीन' नामक एका अज्ञात राजवंशांतील होता.

चंद्रवर्मा नामक राजानें शिवपूर येथील महाविहारास एक शेत जमीन दान दिल्याचा ताम्रपट स. १९४१त डॉ. मो. गं. दीक्षित यांनीं प्रसिद्ध केला. डॉ. दीक्षितांच्या वाचनांत कांहीं चुका झाल्यानें डॉ. दिनेश सरकार यांनीं तो लेख सुधारून पुनः छापला आहे. हा ताम्रपट त्याच्या अक्षर वळणावरून पांचव्या शतकांतील असावा. ह्या चंद्रवर्म्याचा संबंध कोकणांतील मौर्यांशीं होता. कारण सदर ताम्रपटाच्या पहिल्या ओळींत 'मार्य्य' हा शब्द आला आहे. चंद्रवर्म्याचें लांच्छन सिंहाचें असल्यानें प्रो. मोराइसच्या मतें चंद्रवर्मा राजा हा भरतपूर वंशांतील असावा. याची राजधानी रेवतीद्वीप (रेडी) येथें होती.

चंद्रपूरदेश व शिवपूर विषय तसेंच चंद्रपूर व शिवपूर हीं नांवें गोव्यांत सांपडलेल्या उत्तरकालीन ताम्रपटांत कित्येक वेळां आलीं आहेत. चंद्रपूर देश म्हणजे सांप्रतची चंद्रवाडी व चंद्रपूर म्हणजे साष्टींतील चांदर हें निश्चित आहे. शिवपूर हें शिरोडेचें प्राचीन नांव असून तेथील शिवनाथ डोंगरावर चंद्रवर्म्याच्या शासनामध्यें उल्लेख केलेला महाविहार असावा.

शिवपूर हा गांव पारोडें (परटहारग्राम) येथील पर्वताजवळहि असल्याचें 'भोज' नामक राजवंशांतील हल्लींच सांपडलेल्या ६ व्या शतकांतील कांहीं ताम्रपटांवरून दिसून येतें. या पर्वतावरील श्री चंद्रेश्वराचें देऊळ त्या कालींहि प्रसिद्ध होतें.. भोज वंशांतील पृथ्विमल्लवर्म्म या राजानें पर्वत येथून तें दान केलें. पंचमुखीच्या मतें चंद्रपुरचा देवराज हाहि भोज वंशांतीलच असावा.

बदामीचें चालुक्य घराणें

बदामीचा चालुक्य राजा पुलकेशी याचा पुत्र कीर्तिवर्मा हा इ. स. ५६६ च्या सुमारास गादीवर आला. या वेळीं कोंकणावर मौर्यांचें राज्य होतें. कीर्तिवर्म्यानें या मौर्यांनां आपलें वर्चस्व मान्य करावयास लावलें.

कीर्तिवर्म्यानंतर त्याचा धाकटा भाऊ मंगलीश स. ५९७त गादीवर आला. त्यानें रेवतीद्वीप (रेडी) काबीज केलें. त्याच्या मागून त्याचा पुतण्या पुलकेशी दुसरा हा स.

६१० त गादीवर बसला. याचा थोरला मुलगा चंद्रादित्य हा स. ६००च्या सुमारास गोव्यांत व आसमंतांतील भागांत सामंत नेमला गेला आणि कांहीं कालानंतर तो राजाप्रमाणेंच वागूं लागला. त्याची राजधानी रेवती (रेडी) येथें असावी.

पुलकेशीच्या पश्चात् त्याची गादी त्याचा थोरला मुलगा चंद्रादित्य याला न मिळतां दुसरा मुलगा विक्रमादित्य याला स. ६५४ त मिळाली. विक्रमादित्याच्या मागें त्याचा मुलगा विनयादित्य हा स. ६७८ त राज्यावर आला. त्यामागून ६९६ त त्याचा पुत्र विजयादित्य याकडे राज्यसूत्रें गेलीं. पुढें त्याचा पुत्र विक्रमादित्य दुसरा स. ७३३ त गादीवर आला. त्याच्या कारकिर्दीनंतर त्याचा मुलगा दुसरा कीर्तिवर्मा स. ७४३ त राज्यावर बसला. हाच चालुक्य घराण्यांतील शेवटचा मोठा राजा होय.

चालुक्य राजे सनातन धर्माचे अनुयायी असूनहि इतर धर्मांशीं सहिष्णुतेनें वागत असत.

राष्ट्रकूट घराणें

राष्ट्रकूट घराण्यांतील दन्तिदुर्ग नांवाचा दुसऱ्या कीर्तिवर्म्याचा एक अधिकारी होता. त्यानें स. ७५३ त साम्राज्यांतून निघून आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें.

प्राचीन भारतांत राष्ट्र किंवा मंडळ, विषय, भुक्ति इ. राज्याचे विभाग असत. त्यांवर जे सरकारी अधिकारी नेमले जात त्यांत राष्ट्राच्या अधिकाऱ्याला राष्ट्रकूट, राष्ट्रपति किंवा मंडलाधिपति आणि विषयावरील अधिकाऱ्याला विषयपति असें म्हणत. विषय आजच्या जिल्ह्याएवढा असे. विषयांत ७/८ भुक्ति असत. भुक्तीवरील अधिकाऱ्यास 'भोगपति' व गांवच्या पाटलास 'ग्रामकूट' म्हणत.

दन्तिदुर्गास मुलगा नव्हता. त्यामुळें त्याच्या मागून त्याचा चुलता कृष्णराज पहिला हा स. ७५८ त राज्यावर आला. त्यानें कीर्तिवर्म्याचा पूर्ण पराभव करून सर्व चालुक्य साम्राज्य स. ७६०च्या सुमारास आपल्या राज्यास जोडलें. दक्षिण कोंकणावरहि कृष्णराजानें आपली सत्ता प्रस्थापित केली.

पहिल्या कृष्णराजास गोविंद व ध्रुव असे दोन मुलगे होते. त्यांपैकीं बापानंतर स. ७७२ त गोविंदराज (दुसरा) गादीवर आला. पण त्यानें फार वर्षें राज्य केलें नाहीं. कारण त्याच्याविरुद्ध ध्रुवराजानें बंड करून स. ७८०च्या सुमारास त्याला पदच्युत केलें. ध्रुवराज स. ७९३ त मरण पावला.

ध्रुवराजास स्तंभ रणावलोक, कर्क सुवर्णवर्ष, गोविंदराज व इंद्रराज असे चार मुलगे होते. ध्रुवराजाच्या इच्छेप्रमाणे गोविंदराज तिसरा हा बापामागें गादीवर आला. हा महापराक्रमी होता. स. ८१४ च्या सुरवातीस याचा अंत झाला.

गोविंदराजाच्या पश्चात् राष्ट्रकूट साम्राज्यास उतरती कळा लागली. तिसऱ्या गोविंदराजामागून त्याचा सहा सात वर्षांचा पुत्र शर्व ऊर्फ पहिला अमोघवर्ष हा सिंहासनावर आला. त्याचा चुलतभाऊ कर्क सुवर्णवर्ष हा अमोघवर्षाच्या वतीनें त्याच्या बालपणांत राज्यकारभार चालवी. अमोघवर्षानें प्रश्नोत्तर रत्नमालिका व कविराजमार्ग हे संस्कृत ग्रंथ लिहिले. अमोघवर्ष स. ८८०च्या सुमारास मरण पावला. त्यानंतर त्याचा मुलगा दुसरा कृष्णराज गादीवर आला. यानें स. ८८० ते ९१४ पर्यंत राज्य चालविलें.

या कृष्णराजानंतर त्याचा नातू इंद्रराज तिसरा गादीवर आला. याची कारकिर्द स. ९१४ ते ९१७ पर्यंत चालली. याला अमोघवर्ष व गोविंद असे दोन मुलगे होते. इंद्रराजामागें दुसरा अमोघवर्ष यानें राज्य केलें; पण त्याला गोविंदराजानें स. ९१८च्या सुमारास पदच्युत करून राज्यसूत्रें आपल्याकडे घेतलीं. हा चौथा गोविंदराज होय. हा दुर्वर्तनी निघाल्यानें त्याला गादीवरून हांकलून लावून तिसऱ्या इंद्रराजाचा भाऊ अमोघवर्ष तिसरा याला गादीवर बसविण्यांत आलें. याची कारकिर्द ९३७ ते ९३९ पर्यंतच चालली.

तिसऱ्या अमोघवर्षामागें स.९४०च्या सुरवातीस त्याचा मुलगा कृष्णराज तिसरा हा गादीवर आला आणि त्याच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ खोट्टिग नित्यवर्ष हा राजा झाला. याच्या मागून स. ९७२त त्याचा पुतण्या दुसरा कर्कराज याकडे राज्यसूत्रें आलीं. राष्ट्रकूट वंशांतील हाच शेवटचा सम्राट होय. राष्ट्रकूटांची राजधानी मान्यखेट म्हणजे मालखेड येथें होती.

स.९७३त चालुक्य वंशाच्या तैलप नांवाच्या सामंतानें कर्कराजाविरुद्ध बंड उभारून त्याचें साम्राज्य धुळीस मिळविलें. राष्ट्रकुटांचें साम्राज्य सुमारें २२५ वर्षें टिकलें सर्व कोंकण प्रांतावर राष्ट्रकुटांची सत्ता असे.

राष्ट्रकूट हे मूळचे 'लत्तलूर' चे अधिकारी होते. डॉ. अळतेकरांच्या मतें हा गांव निजाम हद्दींतील 'लातूर' हा होय; पण प. वा. वामनराव वर्दे वालावलीकर यांनीं गोव्यांतील लोटली गांवाशीं त्याचें साम्य दाखविलें आहे.

कोंकणप्रांतावर शिलाहारानें मांडलीक घराणें राज्य करी. हे राजे राष्ट्रकुटांची सत्ता मानीत असत. त्यांच्या राज्यकारभारावर नजर ठेवण्यास साम्राज्य सरकारचा प्रतिनिधि त्यांच्या दरबारीं असे. त्यांचेकडून ठरलेला करभार ते साम्राज्य सरकारास पाठवीत.

खेडेगांवचा कारभार पाटील, कुलकर्णी व ग्रामपंचायत यांच्याकडे असे. त्यावेळीं पाटलास 'ग्रामपति' व कुलकर्ण्याला 'युक्त' किंवा 'उपयुक्त' म्हणत. हे दोघेहि वंशपरंपरेचे अधिकारी असत.

शिलाहार घराणें

राष्ट्रकूटकालीं कृष्णराज पहिला यानें स. ७६५च्या सुमारास दक्षिण कोंकण सणफुल्ल शिलाहार याकडे व्यवस्थेसाठीं दिलें. त्याची राजधानी वलिपट्टन येथें होती. सणफुल्लचा मुलगा धम्मयिर यानें वलिपट्टणाचा किल्ला बांधला. हें वलिपट्टण गोव्याच्या उत्तरेस असून तेथें बंदरहि होतें. हें सावंतवाडीकडील वालावली गांव असावें असें वाटतें.

स. १००८च्या खारेपाटण ताम्रपटांत दक्षिण कोंकणांतील शिलाहारांची वंशावळ मिळते. सणफुल्ल (स. ७६५–७९५), धम्मयिर (७९५–८२०), ऐयपराज (८२०–८४५), अवसर पहिला (८४५–८७०), आदित्यवर्मा (८७०–८९५), अवसर दुसरा ८९५–९२०, इंद्रराज (९२०–९४५), भीम (९४५–९७०) अवसर ३ रा (९७०–९९५), रट्टराज (९९५-१०२०) ज्ञातवर्ष (स. १००८) याप्रमाणें प्रत्येक पिढी सरासरी पंचवीस वर्षांची धरून डॉ. आळतेकरांनीं सदरील राजाचे काल दिलेले आहेत.

शिलाहार घराण्याच्या तीन शाखा होत्या. त्यांपैकीं सर्वांत प्राचीन शाखा दक्षिण कोंकणमध्यें सुमारें अडीचशें वर्षें राष्ट्रकूट सम्राटांचें मांडलिकत्व स्वीकारून राज्य करीत होती. सण-

फुलाचे वंशज अखेरपर्यंत राष्ट्रकुटांशीं राजनिष्ठ राहिले. तीनहि घराण्याच्या ध्वजावर गरुडाचें चिन्ह असे.

दक्षिण कोंकणचे शिलाहार आपण मूळचे लंकेचे आहोंत असें म्हणत. लंका हें नांव गोव्यास लावलेलें आहे. त्यावरून हे गोव्याचे असावे असें वालावलीकरांचें म्हणणें आहे.

सदरील खारेपाटणच्या ताम्रपटांत ऐयपराज यानें 'चंद्रपूर' गांवाजवळ नारळाच्या पाण्यानें स्नान केलें असा उल्लेख आहे. त्यावरून ऐयपराजानें चंद्रपूर म्हणजे चांदर येथील राजावर जय मिळविला असावा असें दिसतें.

दहाव्या शतकाच्या अखेरीस सणफुलाचा सातवा वंशज भीम यानें तर चंद्रपूरकरांचा पूर्ण पराभव केला. राहूप्रमाणें चंद्रमंडळाचा ग्रास केला असें त्याचें वर्णन केलेलें आढळतें.

भीमानंतर त्याचा पुत्र तिसरा अवसर हा राजा झाला. याच्यावेळीं राष्ट्रकूट साम्राज्य नष्ट झालें. कांहीं कालपर्यंत यानें तैलची सत्ता मान्य केली नाहीं, पण अखेरीस चालुक्यांनीं या शिलाहारांनां आपलें सार्वभौमत्व कबूल करण्यास भाग पाडलें.

तिसऱ्या अवसरामागून त्याचा पुत्र रट्टराज यानें राज्य केलें. तोच या घराण्यांतील शेवटचा राजा होय. रट्टराजानें स. १००८ सालीं चालुक्य सम्राट सत्याश्रय याचें मांडलिकत्व मान्य केलें होतें.

रट्टराजानंतर त्या घराण्याचे लेख मिळत नाहींत. शिवाय ठाण्याच्या अरिकेसरी ऊर्फ केशिराज नामक शिलाहार राजाच्या स. १०१८ च्या ताम्रपटावरून अरिकेसरी हा सबंध कोंकणचा राजा होता असें दिसतें. यावरून अरिकेसरीनें दक्षिण कोंकणांतील शिलाहारांचें राज्य खालसा करून आपल्या राज्यास जोडलें असावें असें अनुमान निघतें.

डॉ. आळतेकर यांच्या मतें दक्षिण कोंकणांतील शिलाहारांचें राज्य चालुक्य सम्राट जयसिंह तिसरा यानें खालसा केलें.

स. १०२४ च्या मिरज येथील ताम्रपटांत सदर चालुक्य राजानें दक्षिण कोंकण अर्थात् गोवेंहि जिंकल्याबद्दलचा उल्लेख आहे.

दक्षिण कोंकणच्या शिलाहारांनीं सुमारें अडीचशें वर्षें राज्य केलें.

कदंब घराणें

कदंबराजा षष्ठदेव दुसरा, आपण उत्तर व दक्षिण कोंकण काबीज केल्याचें आपल्या ता. ३-१-१०२० च्या ताम्रपटांत म्हणतो.

षष्ठदेवानें प्रथम दक्षिण कोंकण घेतलें व नंतर कवडीद्वीप म्हणजे उत्तर कोंकणहि जिंकलें. ह्यावेळीं अरिकेसरी व त्याचा पुतण्या छित्तराज मरण पावून छित्तराजाचा बंधु मुम्मुणी हा राज्यावर होता.

मुम्मुणी षष्ठदेवास शरण आला व त्यानें आपली सुंदर कन्या त्याला अर्पून त्याच्याशी नातें जोडलें. षष्ठदेवानें दक्षिण कोंकणचा प्रदेश आपल्या राज्यास जोडून उत्तर कोंकणचा मुम्मुणीकडे परत केला. षष्ठदेव हा चालुक्य सम्राट जयसिंह दुसरा याचा महामंडलेश्वर होता. तो स. १०५० च्या सुमारास मरण पावला. त्याच्यामागून त्याचा पुत्र जयकेशी पहिला हा राज्यावर आला. याची कारकिर्द १०५० ते १०८० पर्यंत चालली. यानें गोपकपट्टन म्हणजे थोरलें गोवें ही आपली राजधानी केली.

कदंब जयकेशी पहिला याचा ता. ५ जुलै १०५९ चा पणजी ताम्रपट डॉ. दीक्षित यांनीं हल्लींच प्रसिद्ध केला आहे.

जयकेशीला गुहल्ल नांवाचा एक थोरला भाऊ होता. त्याचाहि एक ताम्रपट उपलब्ध आहे. हा सावई वेरें ताम्रपट म्हणून ओळखतात. प्रस्तुत ताम्रपट हा गोवा-कदंबांत सर्वांत जुना असून त्याची तारीख २३ मार्च स. १०३८ ही आहे.

सदरील दोन ताम्रपटांखेरीज आणखी एक कदंब त्रिभुवनमल्लकालीन ताम्रपट हल्लीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत श्री. ग. ह. खरे यांनीं प्रसिद्ध केला आहे. त्याची तारीख ७ फेब्रुवारी ११०७ अशी आहे.

ह्या तीन ताम्रपटांवरून गोमंतकांतील कदंबांच्या राजवटीवर चांगला प्रकाश पडतो. प्रो. मोराइश यांच्या 'कदंबकूल' मध्यें या घराण्याचा सविस्तर इतिहास आला आहे.

जयकेशीच्या अमदानींत गोपकपट्टण फार भरभराटीस आलें. देगवें येथील एका लेखांत जयकेशीच्या कालांतील गोव्याचें वर्णन असें केलें आहे:—

"त्याच्या राजधानींतील मार्ग ज्यांत पंडित विराजमान झाले आहेत अशा पालख्यांनीं फुलून गेले होते. पालख्यांनां पेलून धरावयाच्या काठ्या रत्नखचित होत्या, व पंडितांच्या कानांत सुवर्णकुंडलें झळकत होतीं इ."

जयकेशीचा मुख्य मंत्रि 'च्छडम' नांवाचा अरब होता. त्यानें किंवा त्याच्या घराण्यांतील कोणी तरी कदंब गुहल्ल पहिला या राजास समुद्रांतून बुडतांनां वांचविलें म्हणून त्या कृतज्ञतेनें हें प्रधानपद त्याला दिलें असावें.

जयकेशी याच्या मागें त्याचा पुत्र गुहल्लदेव तिसरा हा राज्यपदावर आला. गुहल्लदेवामागून त्याचा भाऊ विजयादित्य याकडे राज्यसूत्रें आलीं. याला जयकेशी नांवाचा मुलगा होता. हा जयकेशी दुसरा स. ११०४ त बापाच्या पश्चात् राजा झाला. याच्या राजवटींत गोवेकर कदंबांची सत्ता कळसास पोंचली.

पुढें जयकेशी तिसरा यानें चालुक्याचें मांडलिकत्व झुगारून 'कोंकण चक्रवर्ती' अशी स्वातंत्र्यनिदर्शक पदवी घेतली; पण चालुक्य सम्राट विक्रमादित्य सहावा यानें त्याला जिंकून आपल्या सत्तेखालीं आणलें आणि मांडलिकत्वाच्या नात्यानें पुनः त्याकडे कारभार सोंपवला व कन्या देऊन जामाताचेंहि नातें जोडलें.

उत्तर कर्नाटकांतील वैजयंती (वनवासी) हेंच कदंबांचें मूळ गांव होय. तेथें पांचव्या शतकाच्या मध्यकालांत मयूरशर्मा नांवाचा कदंबवंशीय राजा राज्य चालवीत होता. हळशीकर कदंब व हनगलकर कदंब हे याच राजवंशांतील होत.

चंद्रपूरचे कदंब मूळचे हळशी प्रांताचे सत्ताधीश होते. हें हळशी गांव सध्याच्या खानापूर तालुक्यांत आहे. त्या वेळीं बारा हजार गांवांचा हळशी प्रांत कदंबांच्या ताब्यांत होता. शिलाहार वंशांतील शेवटचा राजा रट्टराज याला अकराव्या शतकाच्या पूर्वार्धांत हळशीकर कदंब षष्ठदेव पहिला यानें जिंकून दक्षिण कोंकण आपल्या राज्यास जोडलें.

वास्तविक शिलाहार व कदंब दोघेहि चालुक्यांचे मांडलीक; तथापि तत्कालीन मांडलिकांनां आधुनिक मांडलिकांसारखीं बंधनें नसून

बरेंच स्वातंत्र्य होतें. त्यामुळें हळशीकर कदंब मांडलीक असतांहि त्यानें गोव्यांतील शिलाहार राजा रट्टराज यावर जोराचा हल्ला चढवून त्याचें राज्य बळकावलें आणि सम्राट चालुक्यानें त्याबद्दल कांहींच तक्रार न केल्यानें तें राज्य साहजिक कदंबांच्या पचनीं पडलें.

बाराव्या शतकाच्या सुरवातीस कदंबांनीं आपल्या राज्यास पांचशें गांवांचा हैवे प्रांत आणि सत्तर गांवांचा वेळुग्राम (बेळगांव) हे भाग जोडले. हैवे प्रांत म्हणजे हल्लींचें उत्तर कर्नाटक होय. स. ११२३ च्या एका कानडी शिलालेखांत 'कोंकण देवीच्या हातांतील कंकण' असें या भागास म्हटलें आहे.

असें होतां होतां बेळगांव, खानापूर, संपगांव, धारवाड, दक्षिण कोंकण व उत्तर कर्नाटक अशा विस्तीर्ण क्षेत्रावर त्या वेळीं कदंबांची सत्ता चालू झाली.

कदंबांच्या राजवटींत गोमंतकीयांच्या बुद्धीस व शौर्यास फार चांगला वाव मिळाला. देशपांडे गुंजीकर, यार्दी, कुलकर्णी, नाडकर्णी, नाडगौडा दणायत वगैरे अनेक लोक कदंबांचे अधिकारी या नात्यानें त्या वेळीं गोमंतकांतून घाटावर गेले व पुढें तेथेंच स्थायिक झाले.

कदंबकालांत गोपकपूर किंवा गोपकपट्टण (थोरलें गोवें) हें अत्यंत महत्वाचें बंदर झालें होतें. मलाया, दल्लक, गोकर्ण, सौराष्ट्र, गुर्जर, लट्ट, स्थानक, कोंकण, वैमुल्य, अरबस्थान, आफ्रिका, ब्रह्मदेश, सिंहलद्विप, चीन, वगैरे अनेक देशांकडे या बंदरांतून गलबतांच्या सहाय्यानें मोठा व्यापार चाले असा उल्लेख मिळतो. पहिल्या जयकेशीच्या कालांत कदंबांचें आरमारहि चांगलें प्रबल होतें. हाच पश्चिम किनाऱ्यावरील आरमाराचा पहिला निर्माता होय.

गोव्याच्या कदंबांची वंशावली अशी मिळते:– कंटकाचार्य, नागवर्मा किंवा गुहलदेव १ ला, षष्ठदेव १ ला अथवा चतुर्भुज (सन ९६६ -९८०), २ गुहलदेव २ रा (९८०-१००५), ३ षष्ठदेव २ रा (१००५-१०५०), ४ जयकेशी १ ला (१०५०-१०८०), ५ गुहलदेव ३ रा (१०८०-११००), ६ विजयादित्य १ ला (११००-११०४), ७ जयकेशी २ रा (११०४ -११४८), ८ अ शिवचित्त उर्फ परमादी (११४८–११८१), ८ ब विष्णुचित्त उर्फ विजयादित्य २ रा (११८१-११८८), ९ जयकेशी ३ रा (११८८-१२१६), १० त्रिभुवनमल्ल उर्फ सोहंदेव (१२१६-१२३८), ११ षष्ठदेव ३ रा (१२४६-१२६०), १२ कामदेव (जांवई, १२६०-१३१०), १३ कामदेवाचा मुलगा (१३१०-१३२८), १४ कामदेवाचा नातू (१३२८-१३४०).

सोन्याचीं, चांदीचीं व तांब्याचीं अशीं तीन प्रकारच्या धातूंचीं कदंबांचीं नाणीं होतीं. हीं गोपकपट्टणच्या टांकशाळेंतच बनवीत असत. नाण्याच्या एका बाजूनें राजाचें नांव व बिरुदावली असून दुसऱ्या बाजूनें कदंबांचें सिंहाचें लांच्छन असे. सोन्याच्या नाण्यांपैकीं एका नाण्याचें वजन साडेतीन तोळे होतें. गद्यनाक द्राक्म, तैराव, निष्क वगैरे निरनिराळ्या नाण्यांचीं निरनिराळीं नांवें होतीं.

देवगिरीचे यादव

गोमंतकांत कदंब राजवट चालू असतांना उत्तरेस नर्मदा व दक्षिणेस गोदावरी यांच्यामध्यें यादवांचें स्वतंत्र राज्य होतें. यादवांची राजधानी देवगिरी येथें होती. देवगिरीच्या नमुनेदार किल्ल्यांत त्यांचा मजबूत व सुंदर राजवाडा होता. किल्ला इतका मजबूत कीं त्याला निरनिराळे सात तट होते. त्याचवेळीं उत्तरेस गोदावरी व दक्षिणेस भीमा-कृष्णा यांच्या दरम्यान वरंगळचें; उत्तरेस तुंगभद्रा-कृष्णा व दक्षिणेस कावेरी यांच्यामध्यें बल्लाळांचें द्वारसमुद्राचें आणि कावेरीच्या दक्षिणेस मदुरेचें अशीं स्वतंत्र राज्यें होतीं. देवगिरीचा महापराक्रमी यादव राजा सिंघणदेव याच्या अमदानींत त्याचा एक सरदार विचणणा यानें मोठ्या सैन्यानिशीं कदंबांवर स्वारी करून त्यांना यादवांचे मांडलिक बनवलें. अशा रीतीनें कदंब कांहीं काल यादवांचेहि मांडलिक होते.

मुसलमानी हल्ला

तेराव्या शतकापासून दिल्लीचें तख्त गुलाम वंशाकडे होतें. या वंशांतला शेवटचा बादशहा कैकुबाद याच्या मृत्यूनंतर त्याचा सरदार जलालुद्दीन खिलजी यानें तें बळकावलें. पुढें आपली मुलगी अल्लाउद्दीन या आपल्या पुतण्यासच देऊन गंगा व यमुना या नद्यांमधील प्रदेशाच्या ‘ कुरा ’ सुभ्यावर त्याला सुभेदार नेमलें. कुरा येथून देवगिरी (दौलताबाद) ७०० मैल दूर व वाट अवघड असतांहि यादवांवर हल्ला करण्याच्या हेतूनें अल्लाउद्दीन ससैन्य निघाला. चुलत्याशीं बेबनाव झाल्यानें तेलंगणाच्या राजापाशीं आपण नोकरी मागण्यास जातों अशी थाप दिल्यानें वाटेंत कोणत्याच राजानें त्याला अटकाव केला नाहीं. अशा रीतीनें तो देवगिरीच्या तटापाशीं येतांच राजे रामदेवराव देवदर्शनासाठीं बाहेर गेल्याची त्याला बातमी लागली. तो परत येतांना त्याच्यावर अचानक हल्ला करून त्याकडून त्यानें भरपूर द्रव्य उपटलें आणि तह करून वार्षिक खंडणी देण्याचेंहि कबूल करून घेतलें. हा तह स. १२९४ त झाला.

याच सालीं मुसलमानांना दक्षिणेचा प्रथम परिचय झाला आणि त्यांच्या तोंडाला पाणी सुटूं लागलें. देवगिरीप्रमाणेंच गोपकपट्टणहि फार श्रीमंत असल्याची बातमी अल्लाउद्दीनाला कळण्यास उशीर लागला नाहीं. त्यामुळेंच कदंबांवर चाल करून येण्याचे त्याचे विचार घोळूं लागले.

देवगिरीची लूट घेऊन आपला जांवई येत असल्याचें ऐकून सासरा जलालुद्दीन त्याला सामोरा गेला; पण प्रेमालिंगनाच्या वेळींच त्याचा त्यानें खून पाडून दिल्लीचें तख्त मोकळें केलें आणि गादीबद्दल चाललेल्या कारवायांचा मोड करून स. १२९६ सालीं अल्लाउद्दीन दिल्लीच्या तख्तावर आला. यादवांनीं यापूर्वींच त्याचें मांडलिकत्व झुगारलें होतें; पण दक्षिणेंतील कामगिरीवर दिल्ली सरकारकडून मलिक काफूरची नेमणूक होऊन तो स. १३०६ त देवगिरीवर आला आणि राजासह त्यानें तेथील अगणित संपत्ती लूटून नेली. पुनः रामदेवरावानें मांडलिकत्व पत्करून तो परत आला.

स. १३०९ त मलिक काफूर पुनः दक्षिणेंत येऊन त्यानें दोन तीन वर्षांतच वरंगळ, द्वारसमुद्र, व मदुरा हीं तिन्हीं राज्यें जिंकून मांडलिक बनवलीं. यानंतर खास बादशहाच्या आज्ञेनें

त्यानें कोंकणावर स्वारी केली. यावेळीं मलिक काफूरनें गोवें जिंकलें नाहीं; तथापि गोव्यांतील बरीच लूट घेऊन तो पसार झाला. स. १३१६ त अल्लाउद्दीनाच्या मृत्यूनंतर तख्ताच्या झगड्यांत त्याचा मुलगा मुबारिक यानें मलिक काफूरचा वध करून अडगळ दूर केली व आपण गादीवर चढला.

पहिला मुसलमानी अंमल

मुबारिकानें दक्षिणेच्या कारभारावर मलिक ऐनुल्मुल्क मुलतानी या सरदारास पाठविलें. मुबारिकाचा विश्वासू सरदार मलीक खुश्रू यानें स. १३१८ च्या सुमारास मलबारचा व दक्षिण कोंकणचा किनारा हस्तगत केला होता. मलिक मुलतानी या सरसुभेदाराच्या हाताखालीं मलिक तब्लघ हा सुभेदार गोव्याच्या कारभारावर आला होता. गोपकपट्टणला हा तब्लघ आल्यावर कदंब राजा चंद्रपुरास जाऊन राहिला.

यानंतर खुश्रू दिल्लीस जाऊन त्यानें गादीच्या अभिलाषानें मुबारिकाचा खून केला; पण गाजी बेग तघ्लकानें त्याच्यावर हल्ला करून त्याच्या सहाय्यास धांवलेले दक्षिणचा सरसुभेदार ऐनुल्मुल्क व गोव्याचा सुभेदार तब्लघ यांच्यासह त्याचा वध केला आणि 'ग्यासुद्दीन तघलक' असें नांव घेऊन तो तख्तनशीन झाला. स. १३२१ त मलिक तब्लघ गोव्यांतून गेल्यानंतर कदंब कामदेव याच्या मुलानें मुसलमानांनां पिटाळून लावून पुनः आपलें राज्य तो स्वतंत्रपणें चालवूं लागला आणि आपली राजधानीहि त्यानें चंद्रपुराहून पुनः गोपकपट्टण येथें आणली.

गोपकपट्टण येथें कदंबांच्या कारकिर्दींत सुखांत राहाणाऱ्या हिंदूंनां मलिक तब्लघ आल्यावर त्याकडून अनेक बाबतींत त्रास होऊं लागला होता आणि तो असह्य झाल्यानें एके दिवशीं तेथील हिंदु जनता गुप्तपणें गोवेश्वराच्या देवळांत जमून तब्लघचें संकट लवकर निवारण्याबद्दल त्यांनीं देवाची दीर्घ प्रार्थना आरंभली. दुसरा षष्ठदेव कदंब याच्या एका ताम्रपटावरून कळून येतें कीं, आज ज्या जागीं पिलार येथील कोंव्हेंत आहे त्याच जागीं प्राचीनकालीं श्रीगोवेश्वर देवाचें वैभवशाली देवालय होतें. थोरल्या गोव्यांतील एका शेताला 'गोवेश्वर शेत' असें नांव असून हल्लीं त्याला 'गोनेस्गोर शेत' असें म्हणतात. (प्रो. पिसुर्लेकर कृत — As Primitivas Capitais de Gôa).

दिल्लीच्या तख्तावर येऊन पुरतीं पांच वर्षेंहि झालीं नाहींत, तोंच स. १३२६ सालीं पूर्व हिंदुस्थानाकडील स्वारीवरून यशस्वी होऊन परत आल्यावर सत्कारार्थ उभारलेला मंडप अकस्मात् मोडून त्यांतच सुलतान ग्यासुद्दीन तघलक चिरडून मेला. यावेळीं उलुघखान हा 'महंमद तघलक' हें नांव घेऊन दिल्लीच्या गादीवर आला. हा बुद्धिमान पण महाक्रूर होता. त्यानें हिंदुस्थानचा बहुतेक भाग आपल्या राज्यास जोडला. दक्षिणेकडील श्रीमंतीचा लोभ त्यालाहि फार होताच. त्यामुळें ससैन्य दक्षिणेस येऊन त्यानें लुटालूट चालविली. आणि स.१३२७त तो स्वतःच गोव्यावर चाल करून आला. या वेळीं कदंबांची गोव्यांतील मूळ राजधानी चंद्रपूर उध्वस्त करून त्यानें बरीच लूट नेली. तीच अवस्था त्यानें गोपकपट्टणचीहि केली असावी असें दिसतें. इतक्यांत दिल्लींत मोठें बंड उद्भवल्याची बातमी लागून महंमद तघलख तिकडे धांवला.

इ. सं. फेरिस्ता लिहितो कीं — "महंमद

तघलख दिल्लीस गेल्यानंतर त्याच्या मागें त्यानें घेतलेला सारा प्रदेश स्वतंत्र झाला. या वेळीं कामदेवाचा नातू यानें गोव्याच्या स्वातंत्र्यासाठीं चांगला पराक्रम केला व तोहि स्वतंत्र झाला."

महंमद तघलख दिल्लीकडे जातांनां त्यानें अल्लाउद्दीन शहा ऊर्फ हसन गंगू या आपल्या सरदारास दक्षिणेच्या बंदोबस्तावर नेमलें. त्यालाहि राजा होण्याची हांव सुटल्यानें महंमद तघलखाचें कार्य पुढें चालविण्याचें सोडून त्यानें तघलखाच्या सैन्यावरच तरवार चालविली. त्याच्या दहशतीमुळें सुभेदार सरदार नासिरुद्दीन यानें आपण होऊनच दौलताबाद त्याच्या स्वाधीन केली. तत्काल त्यानें अल्लाउद्दीन हसन जाफरखान असें नांव घेऊन गुलबर्गा शहराला आपल्या राजधानीचा मान दिला आणि त्याचें हसनाबाद असें नांव ठेवलें. इतिहासांत बहामनी राज्य म्हणतात तें हेंच.

दक्षिणेंत त्या कालीं दोन नवीन सत्ता वाढत होत्या. एक बहामनी राज्याची व दुसरी विजयनगरची. हसन गंगूला स्वतंत्र राज्याची फारच तळमळ लागली होती व त्याप्रमाणें त्यानें बहामनी राज्याची स्थापनाहि केली; तथापि त्याला तितकीच महमद तघलकाची भीतीहि होती. इतक्यांत त्याच्या सुदैवानें स. १३५१त महंमद तघलक मृत्यु पावला व त्याची भीति दुरावली. लगेच त्यानें स्वैर संचारास आरंभ केला. त्यानें प्रथम मुधोळ घेऊन नंतर मिरजे-वरून तो खारेपाटणास गेला. त्याच्या अफाट सेनेकडे पाहूनच कित्येकांनी त्याचा अंमल कबूल केला. तथापि गोमंतकाची गोष्ट तितकी सोपी नव्हती, म्हणून त्यानें गोवा शहरास वेढा घातला व सतत सहा महिने तो तळ देऊनच राहिला. कदंबानें शिकस्तीचा प्रतिकार केला; तथापि तिसवाडी बेटांत कदंबाच्या लोकांचा कोंडमारा होऊन त्याला आपलें राज्य संभाळणें कठिण झालें. या वेळीं गोमंतकीय हिंदूंनीं कदंबांनां फार सहाय्य केलें. मुसलमानांच्या हातीं गोवा जाऊं नये म्हणून त्यांनीं नाना प्रकारचे प्रयत्न केले; तथापि त्यांनां यश आलें नाहीं. हसनगंगूचा हल्ला जसा जमिनीवरून, तसाच समुद्र मार्गानेंहि निकराचा झाल्यानें आणि त्याचें सैन्य अफाट असल्यानें कदंबांनां टिकाव धरणें अशक्य झालें. अशा रीतीनें सन १३५२ सालीं गोमंतक बहामनी राज्याचा संस्थापक हसन गंगू याच्या ताब्यांत गेला.

गोव्यांतील कदंबांची सत्ता दोनशें वर्षें चालली.

बहामनी सत्ता

सन १३५७त हसन जाफरखानानें आपलें राज्य चार सुभ्यांत विभागलें. गोव्याचा अंतर्भाव पहिल्या मुख्य सुभ्यांत केला होता. यावरून 'गोमंतकास' तो केवढें महत्व देई हें कळून येतें. हसन जाफरखान हा पुढच्याच वर्षीं म्हणजे स. १३५८ सालीं निधन पावला. त्याच्या मागें त्याचा मुलगा महंमद हा गादी-वर आला.

वास्तविक महंमद हा त्याचा धाकटा मुलगा असून थोरला दाऊद या नांवाचा होता. गादी-वर थोरल्या मुलाचा हक्क असला, तरी महंमद हाच विशेष हुशार दिसल्यानें बापानें गादीवर त्याची स्थापना व्हावी अशी आधींच तजवीज करून ठेवली होती.

महंमदानें सुनी पंथ स्वीकारून आपणांस 'गाजी' हा किताब घेतला. युद्धांत परधर्मीयांचा वध करून मुसलमानी धर्माचा प्रसार करणा-सच ही पदवी लावण्यांत येत असे. गोमंतकीय हिंदु प्रजेस त्यानें फार त्रास दिला. त्याहीपेक्षां जास्त त्यानें हिंदूनां छळलें असतें; पण विजय-नगरच्या हालचालींमुळें त्याला थोडी कदर वाटे. विजयनगरचा महाराज बुक्कराय याचें व मुसल-मानी सैन्याचें अनेक वेळां युद्ध झालें. स. १३६५ त, त्यांच्या लढाईला बराच रंग चढला. उभय बाजूंचे लक्षावधि लोक मेले आणि त्यामुळें पुढील नऊ दहा वर्षांत महंमदशहा मरून नवा राजा गादीवर येईपर्यंत पुनः युद्ध झालें नाहीं. या लढाईंत स. १३६६ सालीं गोमंतक, बेळ-गांव वगैरे बराच मुलूख विजयनगरच्या महा-राजानें मुसलमानांकडून घेतला. दक्षिण कोंकण घेण्याच्या कार्यांत माधव मंत्रि यांचाच प्रयत्न विशेष होता. १३६६ त घेतलेला प्रदेश पुढें १४७० पर्यंत विजयनगरच्या सत्तेंत राहिला.

यावेळीं गोमंतक बहामनी सत्तेंत फक्त चौदा वर्षें राहिला. हा अल्पकालहि हिंदूंनां युगां-सारखा वाटला. कारण मुसलमान राज्यकर्त्यांनीं त्यांचा फारच छळ केला. विशेषतः अखेरच्या आठ वर्षांतील त्यांची कारकीर्द प्रजेला अत्यंत जाचक झाली.

विजयनगर राजवट

तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर हंपी नांवा-चें जें गांव आहे त्याचा अंतर्भाव इतिहास-कालांत वरंगळच्या राज्यांत होई. स. १३२३ त वरंगळचा पाडाव झाल्यावर त्या सत्तेंतील दोघे सरदार हरिहरराय व बुक्कराय हे उभय बंधु अनागोंदी या वरंगळच्या मांडलिक राज्यांत आले. पुढें महंमद तघलखानें तेंहि काबीज केल्यावर उभय सरदार बंधूंनीं हंपी येथें येऊन माधवमंत्रि नांवाच्या एका अत्यंत बुद्धिमान व मुत्सद्दी पुरुषाच्या सल्ल्यानें विजयनगर राज्याची स्थापना केली. एकंदर हिंदु राजांचा प्रबल संघ बनवून दक्षिणेंतून आपणास त्रासणाऱ्या मुसल-मानांची हकालपट्टी करावी अशी त्यांची योजना होती. विजयनगरची स्थापना झाली आणि त्या राजवटीचें कार्य नेटांत सुरू झालें. जे हिंदु राजे सामोपचारानें या राजवटीच्या संघटनेंत सामील होण्यास तयार झाले नाहींत त्यांनां जिंकून कार्य पुढें जोरांत चाल-वावें असा क्रम हरिहरराव, बुक्कराय व माधव-मंत्रि यांनीं यशस्वीपणें चालू ठेवला. आणि असें होतां होतां बरेच हिंदु राजे या राज्य-संघांत सामील होऊन अल्पकालांतच विजयनगर साम्राज्य म्हणजे एक प्रबल साम्राज्य बनलें आणि त्याचा विस्तारहि चोहोंबाजूंनीं सारखा वाढत गेला.

मुसलमानी अंमलांतील अनेक लोक विजय-नगर राज्यांत येऊन स्थिर झाले. विद्या, कला, व्यापार यांनां तेथें प्रोत्साहन मिळूं लागलें. नगर पूर्व, दक्षिण आणि पश्चिम अशा तिन्हीं बाजूंनीं वाढत चाललें. आणि या नूतन साम्राज्याचा दरारा हिंदुस्थानच्या चारहि बाजूंनां सारखा बसला.

वैशाख पौर्णिमा शके १२५८ ता. २८ एप्रिल सन १३३६ ही विजयनगरच्या स्थापनेची मिति तेथील एका शिलालेखांत नमूद आहे. ही स्थापना श्रीशंकराचार्यांच्या आद्यपीठावर त्या कालीं विराजमान असलेल्या श्रीमाधवाचार्य ऊर्फ विद्यारण्यस्वामी यांच्या अत्याग्रही सूचनेनें, प्रोत्साहनानें आणि सक्रीय आशीर्वादानें झाली.

विजयनगरच्या सिंहासनावर एकंदर पंधरा राजपुरुष अधिष्ठित होऊन गेले.

हरिहरराय — हा विजयनगरचा पहिला महाराजा होय. यानें स. १३३६ पासून स. १३४३ पर्यंतच राज्य केलें.

बुक्कराय — हा हरिहररायाचा बंधु असून याची राजवट स. १३४३ पासून १३७९ पर्यंत म्हणजे ३६ वर्षें चालली. हा मोठा पराक्रमी व धाडसी असून सारा दक्षिण हिंदुस्थान यानेंच आपल्या छत्राखालीं आणला.

दुसरा हरिहरराय — हा बुक्करायाचा मुलगा बापाच्या पश्चात गादीवर आला. 'महाराजाधिराज' अशी पदवी आपल्या नांवामागें तो लावीत असे. याच्या राजवटींतील शिलालेख व ताम्रपट धारवाड, म्हैसूर, कांजीवरम्, त्रिचनापल्ली इ. ठिकाणीं दिसतात त्यांवरून त्याच्या राज्यविस्ताराची माहिती मिळते.

दुसरा बुक्कराय — दुसऱ्या हरिहररायाचा हा मुलगा होता. विजयनगर राजधानीच्या भोंवतालचा तट, बुरूज वगैरेमुळें यानें नगराची उत्तम तटबंदी केली. तुंगभद्रा नदीचें पाणी धरण बांधून कालव्याच्या सहाय्यानें 'कमल' तलावांत सांठविण्याचें व जिकडे तिकडे विजयनगरांत खेळविण्याचें कार्य यांकडूनच झालें.

देवराय — हा महाराज दुसरा बुक्कराय याचा मुलगा. याला फक्त सहा वर्षेंच गादीचा लाभ मिळाला.

वीर विजय — हा देवरायाचा मुलगा असून यानेंहि बापाप्रमाणेंच अवघींच म्हणजे सात वर्षें राज्य केलें.

दुसरा देवराय — वीर विजयाच्या या मुलानें पहिला देवराय याच्यावेळीं गेलेला मुलुख परत मिळविण्याची फार खटपट केली; तथापि सुलतानाच्या अफाट सैन्यापुढें त्याचे प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. याच्याच कारकिर्दीत स. १४२० सालीं निकोलो हा इटालियन प्रवासी व इराणी वकील रझक हे विजयनगरला आले होते. त्यांच्या प्रवासवृत्तांत महाराजाच्या कारकिर्दीची बरीच माहिती मिळते. याच्या मृत्यूनंतर राज्यांत अंदाधुंदी माजून राजवटीचा दरारा कमी झाला.

मल्लिकार्जुन विरुपाक्ष — याची राजवटहि साधारणपैकींच झाली.

राजशेखर — याला तडफ होती; पण साहस नसल्यानें याची कारकिर्द साधीच होऊन गेली.

दुसरा विरुपाक्ष — हा दुर्बल व व्यसनी निपजल्यानें याची कारकिर्द जनतेस व त्याला स्वतःलाहि पुढें जाचकच झाली!

नरसिंहराय — स. १४९० त हा गादीवर आला. या राजापासून विजयनगरच्या राजवटींतील दुसरा राजवंश सुरू झाला. हा मूळ विजयनगर साम्राज्याचा मुख्य सेनापति

होता. परिस्थितीमुळें दरबारी मंडळींनें यालाच गादीवर बसवलें. गेलेलें राज्य परत मिळविण्याचा यानें आटोकाट प्रयत्न केला. तथापि तो साध्य झाला नाहीं.

नरस नायक — नरसिंहरायामागें हा गादीवर आला. हा नरसिंहरायाचा सेनापति होता. गादीवर येतांनां यानें वीर नरसिंह असें नांव घेतलें.

कृष्णदेवराय — हा नरसनायकाचा मुलगा असून सन १५०९ सालीं राज्यारूढ झाला. यानें शौर्यानें विजयनगरचें गेलेलें वैभव पुनः मिळवून बरेच नवीन देशहि आपल्या छत्राखालीं आणले. मुसलमान राज्यकर्त्यांवर यानें चांगली दहशत बसवून शिवसमुद्रम, श्रीरंगपट्टण वगैरे किल्ले व राजमहेंद्रीपर्यंतचा प्रदेश कौशल्यानें काबीज केला. हजारीराम, कृष्णस्वामी, विरूपाक्ष हीं मंदिरें यानेंच बांधलीं. याच्या वेळीं नगरचा घेर ६० मैल असून १ लक्ष घरें व ५ लक्ष लोकसंख्या होती.

अच्युतराय — हा कृष्णदेवरायाचा भाऊ १५३० त गादीवर आला; पण याची कारकिर्द प्रजेस व स्वतः त्यालाहि त्रासदायकच गेली.

सदाशिवराय—विजयनगरचा हा १५वा राजा होय. हा अगदींच अनभिज्ञ असल्यानें त्याचा कारभार त्याचे मेहुणे चालवीत असत. राजा नुसतें बाहुलें असल्याचें पाहून मुसलमान सत्ताधिशांनीं जोराचे हल्ले करून राजधानीच उध्वस्त केली. या गडबडींत मेहुणा तिरुमल्ल यानें सदाशिवरायाला ठार करून 'पेनुकोंडा' येथें 'विजयनगर' नांवाचें छोटें राज्य स्थापन केलें व तेथेंच तो राहूं लागला. आणि अशा रीतीनें हिंदूंच्या या वैभवसंपन्न साम्राज्याचा शेवट झाला. विलीन होण्यापूर्वी पेनुकोंडा येथील विजयनगर संस्थान अगदीं छोट्या स्वरूपांत अस्तित्वांत होतें.

विजयनगर राजवटीचा दुसरा राजा बुक्कराय याच्या कारकिर्दींत सन १३६६ सालीं गोमंतक विजयनगर साम्राज्यांत आला. विजयनगरचें सैन्य गोव्याची राजधानी गोपकपट्टण ऊर्फ थोरलें गोवें येथें शिरून गोमंतक सर केल्याचें आपलें विजयी निशाण सेनापतीनें राजधानीवर लावलें त्या वेळीं तेथील सारी प्रजा समाधानीचे सुस्कारे सोडूं लागली. १३६६ पासून १४७० पर्यंत या हिंदु राजवटीचा विस्तार व वैभव गोव्यांत बरेंच वाढलें. या १०४ वर्षांच्या कालांत गोमंतक-राज्यकारभारावर निरनिराळे हिंदु प्रतिहस्त आले आणि त्यांनीं अनेक दृष्टीनें प्रजेकडून धन्यवाद मिळवले.

वसंत माधव व माईं शेणै वागळे या तत्कालीन दोघां गोमंतकीय राजकारणी पुरुषांनीं गोमंतक मुसलमानाच्या कचाटींतून मुक्त करून विजयनगर साम्राज्यांत सामील करण्याच्या कार्यांत विजयनगरचे शूर प्रधान माधव मंत्रि यांनां फार सहाय्य केलें. विजयनगरच्या येथील इतिहासांत त्यांचें नांव ठळकपणें झळकत आहे. हे उभय राजकारणी पुढें गोव्याच्या प्रतिहस्तपदावरहि येऊन गेले. पैकीं वसंत माधव हा सन १३७९ सालीं व माईं शेणै हा सन १४०३ सालीं कारभारावर आला.

विजय नगरच्या राजवटींतील गोव्याचे प्रतिहस्त व सर सुभेदार (व्हॉइसरॉय व गव्हर्नर जनरल):—

१ वसंत माधव (सन १३७९ ते १३८७).
२ मल्लप्पा वडियार (१३८७ ते १३९१).
३ नरहरी (१३९१ ते १३९६).
४ बचाप्पा वडियार (१३९६ ते १३९९).
५ बचण्णा (१३९९ ते १४०३).
६ माई शेणै वागळे (१४०३ ते १४०७).
७ विठ्ठण्णा वडियार (१४०७ ते १४१२).
८ सवाण्णा (१४१२ ते १४१३).
९ नंजण्णा गोसावी (१४१३ ते १४१७).
१० विरुप्पा दण्णायक (१४१७ ते १४१९).
११ मल्लाप्पा वडियार (१४१९ ते १४२४).
१२ त्रिंबक देव (१४२४ ते १४३०).
१३ हंडियराय (१४३० ते १४३५).
१४ मल्लराज वडियार (१४३५ ते १४४३).
१५ इरुगप्पा वडियार (१४४३ ते १४५०).
१६ अनंतराय (१४५० ते १४५५).
१७ गोविंद देव (१४५५ ते १४६०).
१८ वल्लभ राय (१४६० ते १४६५)
१९ अमराजी (१४६५ ते १४७०).

असे एकंदर १९ प्रतिहस्त बृहद्गोमंतकाच्या या राज्यकारभारावर आले त्यावेळीं सबंध कोंकणच्या राज्यकारभाराची सूत्रें येथूनच हलत असत.

विजय नगरच्या राजवटींत गोव्यांत हिंदूंचें, विशेषतः ब्राह्मणांचें फार मोठें वर्चस्व होतें. बहुतेक प्रतिहस्तहि ब्राह्मणच येत. हिंदु सर्व बाबतींत सुखी होते. मुसलमानांनीं उध्वस्त केलेल्या अनेक हिंदु देवालयांचा या कालांत जीर्णोद्धार झाला. कदंबांचा कुलदेव दिवाडीच्या नांवें येथील, श्रीसप्तकोटेश्वर या प्रसिद्ध दैवतांचें मुसलमानांनीं पहिल्याच धडाक्यांत निष्ठुरतेनें मोडलेलें देऊळ मोठ्या व नमुनेदार स्वरुपांत पुनः बांधून त्या देवस्थानाला पूर्वींपेक्षांहि जास्त वैभव विजयनगर राजवटीनें प्राप्त करून दिलें. याचें श्रेय तत्कालीन गोमंतकीय हिंदूंपेक्षां प्रधान माधवमंत्रि यांनांच प्रामुख्यानें आहे.

त्यावेळच्या कागदपत्रांत गोपक-पट्टण किंवा थोरलें गोवें या शहराला 'गोवापूर' असें म्हटलेलें आढळतें.

सन १३९१ च्या एका दाखल्यांत 'गोवा' ही कोंकणची राजधानी असा उल्लेख केला आहे.

बहामनी अंमलांच्या आरंभापासून गोपक-पट्टण किंवा थोरलें गोवें या शहराचें महत्व कमी होत जाऊन जुनें गोवें उदयाला येऊं पाहात होतेंच, तें विजयनगरच्या राजवटींत अधिकाअधिक पुढें आलें आणि जुन्या गोव्याला बृहद्गोमंतकाच्या राजधानीचा मान मिळाला. विजयनगर साम्राज्याचे प्रतिहस्त तेथेंच राहात. मोठ मोठ्या अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या, व्यापार उदीम व इतर दृष्टीनेंहि त्या शहराची मोठी भरभराट झाली.

जुनें गोवें येथें ज्या जागीं आज सां. त्रिनदादचें मंदिर आहे तेथें विजयनगरकालीन एक सुंदर शिवालय होतें. गोपकपट्टण येथून विजयनगर सरकारची राजधानी जुनें गोवें येथें आली, त्यावेळीं गोमंतकाचे प्रतिहस्त मल्लप्पा वडियार नांवाचे एक मुत्सद्दी होते. आणि अनेक राजकारणी कार्यासाठीं प्रधान माधवमंत्रि यांचेंहि वास्तव्य तेथेंच होतें. जुनें गोवें येथें त्यावेळीं दुसरें शिवालय नसल्यानें प्रधान माधवमंत्रि यांनीं सन १३९१ सालीं तेथें एका शिवालयाची

व 'ब्रह्मपुरी' तीर्थाची स्थापना केली व या क्षेत्राच्या पूजा अर्चा इ. व्यवस्थेसाठीं गोआली व मौळा अशीं दोन गांवें असलेला 'मंचलपूर' नांवाचा अग्रहार दिला असा उल्लेख बांदिवडें येथील एका ताम्रपटांत आहे. (प्रो. पिसुर्लेकर-कृत As Primitivas Capitais de Gôa).

ब्रह्मपुरी तीर्थ अनेक दृष्टीनें महत्वाचें असल्यानें अनेक हिंदुलोक तेथें तीर्थस्नान करण्यास येत असत. (पुढें पोर्तुगीज कालांत ती जागा बंदच करून टाकली. मध्यंतरीं सन १७७५ त ती एकदांच फक्त उघडण्यांत आली होती.)

दर्यावर्दीपणांत तरबेज होऊन आपलें आरमार सुसज्ज असल्यावांचून आपला कोंकण किनारा सुरक्षित राहाणें शक्य नाहीं आणि वेळीं अवेळीं समुद्रमार्गें येणाऱ्या दर्यावर्दी लोकांनां शह देण्यास, तसेंच आपल्या प्रगतीस आपलें आरमारी दल तयार असणें अत्यावश्यक आहे याची जाणीव विजयनगरच्या सम्राटांनांहि होऊं लागली आणि त्या दृष्टीनें प्रयत्न सुरू करण्याचेंहि ठरलें होतें; तथापि राजकारणी अडचणी कोणत्या वेळीं कशा येतात याची कल्पनाहि करवत नसल्यानें अशाच एका अपरिहार्य अडचणींत गुंतल्यानें आरमाराचा त्यांचा विचार त्वरित अंमलांत येऊं शकला नाहीं. आणि त्याचा परिणाम त्यांनां पुढें भोगावाहि लागला.

त्यावेळीं घाटमाथ्यावरील सारा व्यापार गोमंतक शहरामार्फत चालत होता. चीन, जपान, जावा, सुमात्रा, आफ्रिका वगैरे देशांतील; तसेंच कोंकण मलबार इत्यादि भागांतीलहि अनेक व्यापारी जहाजें गोव्याच्या बंदरांत येत. आपला व्यापार येथें विकून गोव्यांतील व घाटावरून इकडे येणारा माल घेऊन तीं तीं जहाजें आपापल्या देशाकडे रवाना होत. अशा रीतीनें गोव्यांत नाना प्रकारचा व्यापार मोठ्या प्रमाणांत चाले. या हालचालीमुळें गोमंतक बंदर त्यावेळीं फार प्रसिद्धीस आलें होतें.

असें हें प्रसिद्ध नगर ज्याच्या त्याच्या डोळ्यांत भरूं लागल्यास नवल कसलें ? बहामनी राजवटींतील अकरावा राजा दुसरा महमदशहा गादीवर असतांनां त्याचा वजीर महमद गवान याचा डोळा विजयनगरच्या साम्राज्यावर फार होता. विजयनगरच्या सत्तेंतील एकापेक्षां दुसरा अधिक चांगला असे निरनिराळे भाग पाहून त्याला कसेंसेंच होत होतें. विजयनगरच्या सत्तेंतील बृहद्गोमंतकावर तर त्याची विशेष नजर आकर्षिली जात होती. तो काकदृष्टीनें संधीची वाट बघत होता. त्यावेळीं विजयनगरच्या सिंहासनावर आलेला विरुपाक्षराय हा दुर्बल असा होता. त्याचा गोव्यांतील प्रतिहस्तहि अमराजी नांवाचा साधारणच इसम होता. ही संधि साधून काकदृष्टि महंमद गवानानें सन १४७० सालीं जमिनीवरून व समुद्र मार्गानें गोमंतकावर एकदम हल्ला चढवला व तें घेतलें. या यशाबद्दल गुलबर्गा येथें आठवडाभर विजयोत्सव चालला होता.

पुनः बहामनी कारकीर्द

महमद गवान हा बहामनी राजवटींतील अकरावा बादशहा महंमदशहा याचा वजीर होता. हा एक शूर व धाडसी इराणी होता. त्यानें १०८ गलबतांतून नाविकदल आणि जमिनीवरून हजारों सैनिक आणून मोठ्या धाडसानें गोव्यावर स्वारी केली. ता. ११ फेब्रुवारी सन १४७१ रोजीं गोव्याचा कारभार त्याच्या हातीं आला असा ऐतिहासिक कागदपत्रांतून उल्लेख मिळतो.

बहामनी सत्तेच्या सबंध १८० वर्षांच्या कालांत एकंदर चौदा बादशहा गादीवर येऊन गेले. त्या सर्वांत विजयनगरच्या सत्तेंतील गोमंतकच्या प्राप्तीमुळें महंमदशहा स्वतःला विशेष धन्य समजत होता. गोमंतक घेतल्याबद्दल महंमदशहानें वजीर महंमद गवानाचा फार मोठा गौरव केला. गुलबर्गा राजधानींत त्याबद्दल सबंध आठवडा विविध कार्यक्रमांनीं आनंदोत्सव चालला होता. या यशामुळें महंमद गवानाचा दरबारांतील दर्जा बराच वाढला आणि पराक्रमी वजीर म्हणून त्याचें नांव सर्वत्र गाजलें.

दिवस जाऊं लागले तसतसें वजिराचें वाढतें प्रस्थ दरबारी मंडळीला असह्य होत चाललें. त्यामुळें त्या लोकांनीं त्याच्यावर अनेक कारस्थानें रचण्याचा सपाटा चालविला आणि एके दिवशीं खोट्या पत्राच्या एका कारवाईमुळें दारूच्या निशेंत बादशहा महंमदशहाचें डोकें भणाणून जाऊन त्यानेंच त्याचा एका मारेकऱ्याकडून खून करविला! त्या नंतर त्याच पश्चात्तापानें बरोबर एकाच वर्षानें महंमदशहाहि कालवश झाला.

महंमदशहाच्या मागें गादीवर आलेला वारस महमुदशहा हा अल्पवयी व सरदार मंडळींतहि कोणी कणखर वृत्तीचा व गादीचा अभिमानी पुरुष नसल्यानें जो तो सरदार स्वतंत्र होण्याची संधि पाहूं लागला. त्यांत सरदार बहादूर खिलजी हा प्रमुख असून तो वृत्तीनेंहि महा नीच व उन्मत्त होता

सन १४८६ च्या सुमारास सरदार बहादूर खिलजीनें बंड पुकारून गोमंतकच्या बहामनी सर सुभेदाराला ठार केलें व आपण गोमंतकाचा राजा असल्याची द्वाही फिरवली. ही बातमी राजधानींत कळतांच सेनापतीनें बरेंच सैन्य गोमंतकांत पाठवून बहादूर खिलजीला यमसदन दाखविलें आणि गोमंतकच्या कारभारावर नवीन सुभेदाराची नेमणूक केली. हा दोन वर्षांनीं मरण पावला व त्याच्या पश्चात त्याचा मुलगा सुभेदार झाला. हा स्वतंत्र वृत्तीचा व राज्यपदाचा फार लोभी होता. विजापूरचा सुभा स्वतंत्र झालला पाहून यानेंहि बहामनी सत्ता झुगारून तो स्वतः गोमंतकाचा राजा झाला. तथापि सैन्यबल कमी असल्यानें विजापूरकरांनीं जरब दाखवितांच त्यानें तत्काल नमतें घेऊन विजापुरकराची सत्ता कबूल केली आणि अशा रीतीनें सन १४८९ त गोमंतक आदिलशाही सत्तेंत गेला. दुसऱ्या खेपेच्या बहामनी कारकिर्दींत गोमंतक फक्त १९ वर्षें राहिला.

बहामनी राजवटींत गोपकपट्टण ऊर्फ थोरलें गोवें याचा विध्वंस झाल्यानें त्या शहराचें सौंदर्य अजिबात नष्ट झालें आणि जुन्या गोव्याच्या प्रगतीस सुरवात झाली. तेथें व्यापारी व इतर भरभराट झाल्यानें निरनिराळ्या भागांतील

अनेक मुसलमान प्रवासी निरनिराळ्या व्यवहारासाठीं येऊं लागले.

आदिलशाही

अबुल मुझफर हा मूळ तुर्कस्थानच्या राजघराण्यांतला होता. तो कांहीं कारणानें पळून रोमला गेला व तेथून इराणला येऊन स. १४५९ त हिंदुस्थानांत आला आणि महंमद गवानाच्या शिफारशीनें बहामनी राज्यांत अधिकारी झाला. पुढें तो सरदार होऊन विजापुरच्या सुभ्यावर सुभेदार म्हणून आल्यावर त्याच्या मनांत स्वतंत्र राज्याच्या कल्पना वारंवार येऊं लागल्या. बहामनी बादशहा बालवयी पाहून संधिसाधु अबुल मुझफरनें स्वातंत्र्याची घोषणा केली आणि युसुफ आदिलशहा या नांवानें विजापूरच्या नवीन तक्तावर तो आरूढ झाला. बहामनी राज्यांतून निघालेली बेदरची बेरीदशाही, अहमदनगरची निजामशाही, वऱ्हाडची इमादशाही, गोवळ कोंड्याची कुतुबशाही या सर्वांत विजापूरची आदिलशाही युसुफ आदिलशहाच्या पराक्रमामुळें जास्त प्रबल होती.

आदिलशाहींत राजधानीचें शहर वियापूर ऊर्फ विजापूर हें समृद्ध होतें. त्या वेळीं त्या शहराची लोकसंख्या दहा लाख होती. युसूफकालीन तटबंदी राजवाडा, महंमद आदिलशहानें बांधलेला गोलघुमट, जुम्मा मशीद इ. विजापूरच्या इमारती महत्वाच्या होत. गोलघुमट तर जगप्रसिद्धच आहे. गोल घुमटाची उंची १९८ फूट ६ इंच आहे. आजहि अस्तित्वांत असलेली पश्चिम तटावरील पंचधातूची मुलुख मैदान तोफ त्या कालीं फार प्रसिद्ध होती.

युसूफ आदिलशहानें गोमंतक घेतल्यावर जुनें गोवें येथेंच आपली गोमंतकची राजधानी थाटली. त्यामुळें जुन्या गोव्याची अधिकाधिक भरभराट होत चालली. त्यावेळीं जुना गोवा शहराची रचना सुंदर असून त्याची लांबी पाऊण मैल व रुंदी पाव मैलपेक्षां थोडी कमी होती.

शहराभोंवतीं मोठा तट असून त्याच्या बाहेर चारहि बाजूंनीं पाण्यानें भरलेले खंदक होते. फक्त चार बाजूंनीं चार दरवाजे होते. आजच्या व्हिसिरै कमानीच्या जागीं पहिला प्रमुख दरवाजा असून दुसरा सां. कातारीन मंदिरच्या जागीं, तिसरा नो. सिं. सेन्ह मंदिराच्या व चौथा गतकालीन कस्टम कचेरीच्या जागीं होता.

पहिल्या दरवाज्यांतून आदिलशहाच्या वाड्यांत जातां येई. वाडा मजबूत व सुंदर होता. मोठ्या अधिकाऱ्यांसाठीं निरनिराळीं मजबूत घरें होतीं. रस्त्याजवळच एक मोठी मशिद होती. त्या मशिदीवर मागाहून सां. पाउल कॉलेजची उभारणी झाली.

विजापुरकर युसूफ आदिलशहा यानें एका मराठ्याच्या मुलीकडे लग्न केलेलें असून हिंदूंशीं तो सहानुभूतीनेंच वागत होता. तसाच तो राजकारणांतहि धूर्त असल्यानें त्यानें गोमंतकीय हिंदूंनां बरेंच जवळ केलें होतें. कित्येक हिंदु त्याच्या मोठ मोठ्या हुद्दयाच्या जागीं होते. वेर्णे येथील इतिहास प्रसिद्ध म्हाळ पै हा विजापुरकराचा एक प्रमुख सरदेसाई होता. गोव्याच्या निरनिराळ्या भागांत असलेले सरदेसाई व देसाई आदिलशाहीचेच अधिकारी होते. देशप्रभु हे मात्र कदंबकालीन असावेत असें दिसतें. असें जरी असलें तरी हिंदु संस्कृति व इस्लामी

संस्कृति यांच्यांत जी साहजिक तेढ होती त्यामुळें हिंदूंच्या सांस्कृतिक आकांक्षा मुसलमान सत्ताधाऱ्यांकडून पूर्ण होणें अशक्य होई. शिवाय जुनी राजवट जाऊन तिच्या जागीं निराळ्या संस्कृतीची नवी राजवट आल्यानें गोव्यांतील खानदानी हिंदु घराण्यांवर मुसलमानी आक्रमणाचा परिणाम घडलाच. आदिलशाही सैन्यांतील रूमी, तुर्क, आफाफी लोकांकडून प्रजेवर होणारा जुलूमहि कांहीं कमी नव्हता.

विजयनगरच्या राजवटींतील सवलती, सुख व आपुलकी मुसलमानी अमदानींत मिळणें शक्य नसल्यानें आदिलशाही सत्ता प्रजेला जाचत होती. त्याचप्रमाणें ग्रामसंस्थांकडून कराची जी रक्कम पूर्वी वसूल करीत ती आदिलशाहींत दुप्पट करण्यांत आल्यानेंहि लोकांत असंतोष पसरला होता. एकंदरींत तत्कालीन हिंदूंना मुसलमानी राजवटीचा कंटाळा आला होता. आणि त्यासाठींच पुढें त्यांनीं मुसलमानांविरुद्ध पोर्तुगीज लोकांनां गोवें घेण्याच्या कामीं फार सहाय्य केलें

आदिलशाहींत गादीवर आलेले राजे :—

१ युसुफ आदिलशहा (१४८९–१५१०)
२ इस्माईल आदिलशहा (१५१६–१५३४)
३ मल्लू आदिलशहा (१५३४–१५३५)
४ इब्राहिम आदिलशहा (१५३५–१५५७)
५ अल्ली आदिलशहा (१५५८–१५८०)
६ इब्राहिम शहा २ रा (१५८०–१६२६)
७ महंमद आदिलशहा (१६२७–१६५६)
८ अल्ली आदिलशहा २रा (१६५६–१६७२)
९ शिकंदर आदिलशहा (१६७२–१६८६)

(प्रो. पिसुर्लेंकरकृत Inscriçōes Pre-Portuguesas de Gôa).

आदिलशाहीची गादी विजापूरला स. १६८६ पर्यंत टिकली असली; तरी गोव्यांत, गोवें बेट व इतर भाग गेल्यानंतर अंत्रूज (फोंडें) महाल व जांबावली पंचमहाल हे शिवाजीनें घेईपर्यंत म्हणजे सन १६७४ पर्यंतच आदिलशाही सत्ता होती. (मिर्झा इब्राहिम कृत Basatinús–Salatin)

इतिहास संशोधक प्रो. पिसुर्लेंकर यांनीं आपल्या Inscriçōes Pre–Portuguesas de Gôa या पुस्तकाच्या शेवटीं दिलेल्या सन १६६७ च्या मोडी लिपींतील एका मराठी दाखल्यावरून त्या कालीं फोंडें येथें आदिलशाहीचे कोणकोणते अधिकारी होते हें कळून देतें. सदर दाखल्यांतील अधिकाऱ्यांचीं नांवें :

सुभेदार, हवालदार, ठाणेदार, मुजुमदार, नार्जार, सरसामंत, डबीर, सरनौबत, सबनीस, सरगुरो, सरनाईकवाडी, नाईकवाडी, सरदेसाई, प्रतापराव सरदेसाई, द्यानतराव सरदेसाई, पंडित.

राजकारणी तिमोज

सन १४९० सालीं विजयनगरच्या गादीवर आलेल्या महाराजानें आपल्या आरमारांत सुधारणा करून जीं ठाणीं सज्ज ठेवलीं त्यांत होनावरच्या आरमारी ठाण्यावर तिमोज याची नेमणूक झाली होती. तिमोज हा आरमारी हालचालींत हुशार तसाच राजकारणांतहि प्रवीण होता.

विजयनगरच्या आरमारावरील मुख्याधिकारी सरदार तिमोज हा प्रमुख राजकारणी हिंदु होय असा पोर्तुगीज कागदपत्रांत उल्लेख मिळतो.

सोळाव्या शतकांतील पोर्तुगीज ग्रंथकार म्हणतात — "तिमोज हा विजयनगरचा सरदार असून तो विजयनगर आरमारावरील मुख्य होय. त्याच्या कक्षेंत दहा बारा मोठीं लढाऊ गलबतें आहेत. त्याचें ठाणें होनावर हें विजयनगर राज्यांतीलच एक बंदर होय."

आल्बुकेर्कच्या एका पत्रांत तिमोजचा उल्लेख 'Capitão do Rei de Bisnaga' (विजयनगरच्या राजाचा कॅप्टन) असा केला आहे.

तिमोजचे कित्येक नातलग व इष्टमित्र गोव्यांत होते. त्याची बहिण गोव्यांतील माय नाईक यास दिली होती. पुढें गोवें घेण्याच्या-वेळीं यानें आल्बुकेर्क यास मोठें सहाय्य केलें.

आदिलशहाकडून गोवें घेण्याच्या बाबतींत तिमोजनें पुढें आल्बुकेर्कला फार मोठी मदत केली. त्याचा व फिरंग्यांचा संबंध व्हास्कु द गामाच्या हिंदुस्थानांतील दुसऱ्या खेपेच्या सफरीपासून म्हणजे स. १५०२ पासून आला, व तो पुढें पुढें चांगला दृढावत चालला.

विजापुरकराचें बस्तान गोव्यांत ठीक बसलेलें असून सैन्यहि प्रबल असल्यानें आणि विजयनगरला निरनिराळ्या शत्रूंना शह देण्यासाठीं आपल्या सैन्याची विभागणी करण्याची जरूरी असल्यानें गोव्याच्या आदिलशाही सत्तेवर आपण हल्ला करण्यापेक्षां पोर्तुगिजांनांच तो करण्यास भाग पाडून मागाहून गोमंतकची जहागिरी ठराविक खंडणीनें आपण घ्यावी आणि पोर्तुगीज येथून गेल्यावर विजयनगरच्या अधिसत्तेंत सामील होऊन आपण गोमंतकचा मांडलीक म्हणून राज्यकारभार करावा असा तिमोजचा अंतस्थ विचार होता. या विचाराबद्दलची माहिती विजयनगरच्या राजकारणी गोटांतून फुटल्यानें त्या वेळीं विजयनगरला असलेला पोर्तुगिजांचा वकील Frey Luiz याला ती ओझरती समजली आणि आल्बुकेर्कला लिहिलेल्या एका पत्रांतून त्यानें त्याबद्दलची सूचना दिल्याचें Comentario वरून कळून येतें. (तिमोज — ले. प्रो. पिसुर्लेकर, भारतमित्र, जून १९४५).

पोर्तुगिजांचा प्रवेश

व्हास्कु द गाम— आपल्या बापामागें स. १४९५ त दों मानुयेल पोर्तुगालच्या गादीवर येतांच हिंदुस्थानचा जलमार्ग शोधण्याचें काम त्यानें नेटानें चालविलें. या कार्यासाठीं खास व्यवस्थेचीं त्यानें तीन गलबतें बांधविलीं आणि या कामगिरीवर आपला हुशार दर्यावर्दी इसम म्हणून वास्कु द गामाची नेमणूक केली. गामाचा भाऊ पाऊल व इतर खलाशी मिळून त्याच्या हाताखालीं एकंदर २०० लोक होते. शनिवार ता. ८ जुलै स. १४९७ रोजीं गामाचीं गलबतें पोर्तुगालच्या किनाऱ्यावरून निघालीं.

ऑक्टोबरच्या अखेरीस त्यांनीं आफ्रिकेचें दक्षिण टोंक ओलांडलें. तेथें तुफानाचा त्यांनां फार त्रास झाला व लोकांचें धाबें दणाणून त्यांनीं गलबतें पुढें नेण्याचेंहि नाकारलें. तथापि वेळ पाहून गामानें त्यांनां जरब दाखवून व कित्येकांनां कैदेंत ठेवून तीं पुढें नेलींच. कित्येक दिवसांनंतर ता. २५ डिसेंबर रोजीं त्यांनां किनारा दिसला. तो दिवस क्रिस्तजयंतीचा अर्थात नाताळचा असल्यानें त्या प्रदेशास त्या लोकांनीं "नाताळ" हेंच नांव दिलें व तेंच अजून चालत आहे. थोडा विसावा घेऊन नंतर त्यांचीं तारवें पुढें निघालीं व स. १४९८ च्या मार्च महिन्यांत तीं मोसांबिक येथें पोंचलीं. वाटेंत त्यांनीं मुसलमानांचें जें एक तारूं पकडलें त्यांत त्यांनां दमणचा एक मुसलमान दलाल सांपडला. त्याला हिंदुस्थानच्या जलमार्गाची व व्यापाराची माहिती असल्यामुळें गामानें त्याला कांहीं सोन्याचीं नाणीं देऊं करून आपल्यासोबत आणलें. पुढें त्याचा त्याला फार उपयोग झाला. त्याचें नांव 'दवणें' असें होतें.

आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील अरब अधिकाऱ्यांनां, पोर्तुगीजांपासून पुढें आपणास नुकसान होण्याचा संभव दिसल्यानें त्यांनीं गलबतांसकट गामांचा नाश करण्याचे अनेक प्रयत्न केले; तथापि त्या त्या वेळीं हिंदुस्थानच्या लोकांनीं गामास सावध व सहाय्य केल्यामुळें त्याचा बचाव झाला. मोसांबिक, मोंबासा इ. करून २७ ऑगस्टला गामाचीं जहाजें कालिकत बंदराजवळ आलीं.

त्यावेळीं कालिकत, ओर्मझ, एडन, मलाका हीं व्यापाराचीं मोठीं बंदरें होतीं. आरब लोक या बंदरांतून इकडचे जिन्नस आपल्या जहाजांतून नेऊन युरोपला विकीत व तिकडचे इकडे आणीत.

वास्कु द गाम कालिकतला पोंचला त्यावेळीं तें शहर बरेंच भरभराटींत होतें. तेथील राजाला झामोरीन (सामुद्री) म्हणत. कालिकतचा व्यापार सहाशें वर्षांपासून आरब लोकांच्या ताब्यांत होता. मक्का व कायरो ह्या शहरांतील श्रीमंत आरब व्यापाऱ्यांचीं मोठमोठीं गलबतें आरबी समुद्रांतून नेहमींच सफरी करीत. पोर्तुगीज लोक आपल्या व्यापारास धक्का देतील व भरपूर पैसा मिळविण्याचा हा आपला धंदा ते करूं लागतील या भीतीनें त्यांनीं गामावर अनेक संकटें आणलीं पण गाम त्यांतून बचावला.

कालिकत येथें गामाच्या जहाजांजवळ अनेक लोक व्यापार नेण्यासाठीं होड्या घेऊन येत. त्यांनां ते मागतील त्या दरानें सामान द्यावें असा गामानें इशारा दिला. त्यामुळें पोर्तुगीजांच्या औदार्याविषयीं अल्पावधींत बराच बोलबाला झाला. दोनतीन दिवसांनंतर कालिकतच्या राजानें मुद्दाम आपला मनुष्य पाठवून गामाची चवकशी केली.

"आम्हां पोर्तुगिजांचें एक मोठें आरमार

सफरीस निघालें आहे. त्यांतीलच हीं आमचीं जहाजें आहेत. आमच्या इतर बेपत्ता जहाजांच्या शोधार्थ आम्हीं इथपर्यंत आलों. आतां मसाले इ. कांहीं माल विकत घेऊन परत जाऊं." असा राजाकडून आलेल्या दूतातर्फे त्यानें राजास निरोप पाठविला. त्यामुळें वाटेल तो माल विकत घेण्याची राजाकडून त्याला परवानगी मिळाली.

झामोरीनच्या सदर हुकुमानें आरब व्यापारी थक्क झाले! राजानें आपला हुकुम परत घ्यावा याबद्दल त्यांनीं अनेक प्रयत्न केले. पण त्यांत त्यांनां यश आलें नाहीं.

कांहीं दिवसांनीं राजानें गामास भेटीस बोलावलें व वास्कु द गाम ऐटदार पोषाखांत राजाच्या भेटीस गेला. सोबत त्यानें अनेक दुर्मिळ व महत्वाच्या वस्तु नेऊन राजास नजर केल्या. राजानेंहि त्याचा सन्मान केला. अशा रीतीनें कांहीं दिवस तेथें घालवून गामानें जहाजांसह परत निघण्याची तयारी केली आणि तेथील राजाचा निरोप घेऊन आपलीं जहाजें हांकारलीं.

कालिकतहून गाम कानानूरला गेला. कानानूरच्या राजानें पोर्तुगिजांशीं सख्य करण्याचें ठरवून बंदरांत येतांच गामाला आपल्याकडे बोलावून घेतलें. इतकेंच नव्हे तर पोर्तुगिजांशीं त्यानें व्यापारी तह केला व गामाला नजराणेहि दिले. गामानें राजाच्या भेटीला तर बऱ्याच बहुमूल्य वस्तु नेल्या होत्या. कानानूरला निरनिराळ्या जिन्नसानें सारीं जहाजें भरून घेऊन गाम तेथून ता. २० नोव्हेंबर १४९८ रोजीं युरोपकडे जाण्यास परतला.

वाटेंत त्याला तुफान वारा सांपडल्यानें आपल्या गलबतांसह गामनें आंजेद्वीपला मुक्काम केला. वारा ओसरल्यानंतर त्यानें आपलीं गलबतें पुढें चालू केलीं आणि वाटेंत चार पांच ठिकाणीं मुक्काम करीत करीत ता. १८ सप्टेंबर १४९९ रोजीं तो परत पोर्तुगालास आला. त्याचा भाऊ पाऊल मात्र वाटेंतच मरण पावला.

पोर्तुगालला पोंचल्यावर दों मानुयेल राजानें व्हास्कु द गामाचा अपूर्व सत्कार केला. दरबार भरवून त्याला 'दों' ही पदवी व सरदारकी दिली. गामानें जो माल आपल्या जहाजांतून पोर्तुगालला नेला होता तो विकल्यावर त्याच्या सफरीसाठीं लागलेल्या खर्चाच्या साठपट पैसा उभा झाला. त्यावेळीं पोर्तुगालला मसाल्याच्या जिनसा फार महाग विकल्या जात.

हिंदुस्थानांत जाण्याचा जलमार्ग पोर्तुगिजांनां सांपल्यामुळें पुढें जगाच्या इतिहासांत मोठी क्रांति घडून आली व युरोपांत पोर्तुगालचें महत्त्व फार वाढलें.

पेद्रु आल्व्हारिश काब्राल — व्हास्कु द गाम परत आल्यावर त्यानें दरबारांत सांगून टाकलें कीं, "हिंदुस्थानचा व्यापार ताब्यांत घेणें आपणास अनेक दृष्टीनें आवश्यक आहे आणि तसें करणें असल्यास आपण आरबांशीं युद्धच चालविलें पाहिजे." या भाषणाचा योग्य परिणाम होऊन पोर्तुगिजांची दुसरी सफर निघाली.

मोठ्या तोफा व निरनिराळी युद्धसामुग्री घेऊन तेरा गलबतें सज्ज केलीं व सन १५०० सालीं पोर्तुगालच्या राजानें पेद्रु आल्वारिश काब्राल यास कालिकतकडे पाठविलें. सोबतीला बार्तोलोमेव दीअस् हाहि होता. या समुद्रांत एकंदर १२०० माणसें व पाद्रीहि बरेच होते. स. १५०० सालीं मार्चच्या ९ तारखेस हीं जहाजें पोर्तुगालहून निघालीं तीं काबु व्हेर्दि

जवळ येतांच वाऱ्याच्या जोरानें नैऋत्येच्या बाजूस जाऊन बऱ्याच दिवसांनीं त्यांनां दक्षिण अमेरिकेच्या पूर्वकिनाऱ्यावरील ब्राझील देश लागला. ही बातमी पोर्तुगालला कळवून काब्राल आग्नेयीकडे वळला.

जातां जातां वाटेंत त्यांनां एक मोठें तुफान सांपडून त्यांची चार गलबतें अजिबात व त्यांतील बरेच लोक बेपत्ता झाले. पुढें आणखीहि दोन तशींच गेलीं आणि अशा स्थितींत वाट कापीत कापीत ३० ऑगस्टला काब्राल कालिकतला आला.

त्यानें दरबारांत जाऊन झामोरीनची भेट घेतली व त्याला अनेक नजराणे दिले. दोस्तीचा तहहि झाला. आणि राजाच्या परवानगीनें त्यानें लगेच तेथें एक वखार उघडली. तथापि मुसलमान त्यांनां सामान मिळूं देईनात. दोन तीन महिने गेले तरी दोन गलबतांचीहि भरती होईना. त्यामुळें चिडून दोघांत हातघाई सुरू झाली व त्या चकमकींत ५०–६० पोर्तुगीज मारले गेले. या रागानें मुसलमानांचीं दहा जहाजें बुडवून काब्राल कालिकतहून निघाला व तडक कोचीन येथें आला. त्यानें दरबारांत अनेक नजराणे नेले व राजाची भेट घेतली. राजानें त्याचें स्वागत करून त्याला जिन्नस घेण्याची परवानगी दिली. लगेच काब्रालनें कोचीनला वखार घातली आणि त्या वखारीवर 'बार्बोज' नांवाचा मुख्याधिकारी नेमला. पुढें या बार्बोजनें एक पुस्तक लिहून त्यांत हिंदुस्थानविषयक तत्कालीन माहिती संग्रहित केली आहे. ह्या पुस्तकाचें इंग्रजींतहि भाषांतर झालें आहे.

कोचीन येथून काब्राल कानानूरला गेला व तेथील राजाकडे सख्य करून ता. १६ जानेवारी स. १५०१ रोजीं तो परत पोर्तुगालकडे जाण्यास निघाला. परत जातांनांहि वाटेंत त्यांचें आणखी एक गलबत बुडून कित्येक लोक मेले. अशा रीतीनें संकटांतून वाट काढीत ता. २१ जुलै स. १५०१ रोजीं काब्राल पोर्तुगालला पोंचला.

व्हास्कु द गामची दुसरी खेप— काब्रालच्या सांगणीवरून हिंदुस्थानास पाठविण्याचें एक मोठें लढाऊ आरमार तयार करून पोर्तुगालच्या राजानें त्यावर व्हास्कु द गामाला मुख्य नेमलें. या आरमारांत वीस जहाजें, बरेच खलाशी व आठशें सैनिक होते. हें आरमार स. १५०२ सालीं मार्च महिन्यांत पोर्तुगालहून निघालें. निरनिराळीं बंदरें मागें टाकीत व्हास्कु द गाम आपल्या या जहाजांसह दाभोळजवळ आला व तेथून आंजेद्वीपवरून कानानूरकडे येत असतां होनावरच्या खाडींत विजयनगरचा सरदार तिमोज याच्याशीं त्याची गांठ पडली. त्याच्याशीं दोन हात करून गामानें त्याचें जहाज बुडविलें. दुसऱ्या दिवशीं तो भटकळला आला. भटकळला त्यावेळीं मोठा व्यापार चाले. तें बंदर विजयनगरच्या ताब्यांत होतें. तेथील अधिकाऱ्यास तंबी देऊन गाम कानानूरकडे गेला.

कानानूरला उतरल्यावर गामानें दरबारांत जाऊन राजाची भेट घतली. नजराणेहि दिले. नंतर मालाची देवघेव करण्याची व्यवस्था लावून कालिकतकडे जाण्याचा तो विचार करूं लागला.

गाम आपल्या फौजेसह कालिकतला आला, ही बातमी राजास समजतांच त्यानें आपला वकील गामाकडे सलोख्यासाठीं पाठविला व त्याकडून सांगणी पाठविली कीं, "तुम्हांला त्रासणारे प्रमुख दहा अरब मी तुमच्या हवालीं करतों आणि नुकसान भरपाई म्हणून वीस हजार रुपये देतों." हें म्हणणें गामानें मान्य

केलें. त्या आरबांनीं आपल्या मुक्ततेबद्दल वीस हजार रुपये देऊं केले; पण तें न ऐकतां गामानें त्यांनां कैदेंत ठेवलें व आरमार कालिकतच्या जवळ आणून एकदम शहरावर तोफांचा मारा सुरू केला. त्यामुळें तेथें मोठा आकांत उडाला. याचवेळीं दोन मोठीं जहाजें व बावीस बोटी बाहेरून सामान घेऊन कालिकत बंदरांत येत होत्या. त्या गामानें पकडल्या. त्यांतील सामान काढून घेतलें व त्यांवरील निरपराधी माणसांचे हात, पाय, कान, नाक असे अवयव कापून टाकले. कालिकतच्या राजाकडून आलेल्या वकिलाचीहि त्यानें तीच गत केली. अशा आठशें लोकांनां एका जहाजावर भरून त्याला आग लावली. त्यामुळें कालिकतचे लोक खवळले व सूड घेण्याच्या तयारीस लागले.

गामा तेथून निघाला तो कोचीनला आला. तेथें त्याचें राजानें चांगलें स्वागत केलें. आणलेला माल घेऊन नवीन भरून दिला. इतक्यांत राजाला बातमी लागली कीं, कालिकतहून झामोरीनचें एक मोठें आरमार पोर्तुगिजांवर चाल करून येत आहे. ही बातमी त्यानें त्वरेनें गामास कळविली, गामाचीं सारीं जहाजें सामानानें भरून झालींच होतीं; तीं घेऊन तो परत जाण्यास निघाला व ता. २८ डिसेंबर १५०२ रोजीं पोर्तुगालच्या रस्त्यास लागला. अनेक संकटांनां धडाडीनें तोंड देत १ सप्टेंबर १५०३ रोजीं तो पोर्तुगालास पोंचला. या खेपेस त्यानें बरेंच द्रव्य व माल आणला होता. राजानें त्याचा सन्मान करून बक्षीसहि दिलें.

पोर्तुगीज राजानें पुनः एक मोठें आरमार तयार करून तें हिंदुस्थानांत पाठविण्याचा विचार केला. या आरमारांत मोठ मोठीं नऊ जहाजें होतीं. हें आरमार पोर्तुगीज सरदार आफोंस द आल्बुकेर्क यांच्या नेतृत्वाखालीं दिलें होतें. मोठ्या थाटानें तें पोर्तुगालहून निघालें व सन १५०३च्या अखेरीस हिंदुस्थानांत कोचीनजवळ पोंचलें.

तें आल्याची बातमी लागतांच कोचीनचें राज्य रागानें बळकावून बसलेली झामोरीनची फौज निघून गेली. पोर्तुगीज लोक कालिकतला उतरून त्यांनीं झामोरीनचा पराभव केला आणि कोचीनच्या राजास कालिकतच्या गादीवर बसवल्याचा जाहीरनामा काढला.

फ्रांसिस्कु द आल्मैद — पोर्तुगिजांच्या कित्येक सफरींनीं हिंदुस्थानच्या अंतःस्थितीची त्यांनां बरीच माहिती मिळाली होती. हिंदुस्थानचा व्यापार आतां पोर्तुगिजांच्या हातांत येणें शक्य दिसतच होतें; पण प्रयत्न केल्यास आपलें राज्यहि तेथें स्थापन करतां येईल असा पोर्तुगालच्या राजास विचार आला. निदान व्यापाराच्या सुरक्षितेकरतां तरी मुसलमानाशीं दोन हात केल्यावांचून भागत नाहीं व त्यासाठीं एक मोठें सजबूत आरमार व बलाढ्य फौज हिंदुस्थानांत कायमची ठेवल्यावांचून भागत नाहीं अशा विचारानें दों मानुयेल राजानें मोठी तयारी केली व त्या आरमारावर फ्रांसिस्कु द आल्मैद या वजनदार मनुष्याची नेमणूक करून राजानें त्याला हिंदुस्थानांत रवाना केलें. सन १५०५च्या सप्टेंबर महिन्यांत तो हिंदुस्थानांत पोंचला. येथें येतांच त्यानें कालिकत, कोचीन, कानानूर येथील आपण पोर्तुगीज व्हॉइस रॉय आहें अशी प्रसिद्धी केली.

किल्ले, तट वगैरे बांधून आपल्या वसाहतींनां संरक्षण द्यावयाचें व मुसलमानांनां शह देऊन आरबी समुद्रावर व हिंदी महासागरावर आपलें वर्चस्व राखावयाचें हें काम राजाज्ञेप्रमाणें आल्मैदनें हातीं घेतलें.

पोर्तुगालहून येतांनां मोंबासाच्या अधिपतीस त्यानें पोर्तुगिजांचे मांडलीक बनवलें. आल्मैदच्या ताब्यांत बावीस जहाजें व दीड हजार सैन्य होतें. त्यानें प्रथमतःच होनावर व कानानूर येथील राजांवर हल्ला करून तीं हस्तगत केलीं व त्यांकडून खंडणी घेतली कोचीन येथें आपलें मुख्य ठाणें केलें. पोर्तुगीज तोफांच्या माऱ्यापुढें हिंदी जहाजांचा व तोफांचा इलाज चालत नव्हता. पोर्तुगीज बंदुकाहि तशाच उत्तम होत्या.

पोर्तुगिजांच्या प्रयत्नानें अरबांचा व्यापार बसल्यानें इजिप्तच्या सुलतानानें एक मोठें आरमार तयार करून पोर्तुगिजांवर पाठविलें. स. १५०८ त तें तांबड्या समुद्रांतून गुजरातच्या किनाऱ्यावर येतांच अहमदाबादचा सुलतान व दीव येथील नबाब मलिक अयाझ या दोघांनीं त्याला बरीच मदत दिली. हें मोठें आरमार चौल बंदरांत आलें तेव्हां त्यावर आल्मैदच्या मुलानें निकराचा हल्ला केला. एकसारखे दोन दिवस तुंबळ युद्ध चालून अखेरीस आल्मैदच्या जहाजांस मुसलमानांनीं वेढा दिला. इतकेंच नव्हे तर एका तोफेच्या गोळ्यानें आल्मैदचा मुलगाहि गतप्राण झाला.

मुलाच्या मृत्यूचें आल्मैदला फार दुःख झालें आणि मुसलमानांचा अत्यंत संताप आला. त्या संतापानें आल्मैद मुसनमानांवर निकरानें चालून गेला. सन १५०९ सालीं दीव जवळ उभयतांची मोठी लढाई झाली. त्या लढाईंत तीन हजार मुसलमान सैनिक कामीं आले. या वेळीं मलिक अयाझचा पराभव होऊन दीव पडलें.

अधिकाराचीं तीन वर्षें पुरीं झाल्यावर नवीन व्हॉइसरॉयकडे आपले अधिकार देऊन सन १५०९ च्या नोव्हेंबरांत आल्मैद पोर्तुगालला जाण्यास निघाला. पोर्तुगालच्या रस्त्यांत असतांच आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील एका आकस्मिक चकमकींत तो कालवश झाला. फ्रांसिस्कु द आल्मैद हा पोर्तुगिजांचा हिंदुस्थानचा पहिला व्हॉइसरॉय होय. त्याचें धोरण हिंदुस्थानमध्यें साम्राज्य स्थापण्याचें नसून केवळ आरमाराद्वारें समुद्रावर सत्ता ठेऊन व्यापार वाढविण्याचें होतें.

आफोंस द आल्बुकेर्क — आफोंस द आल्बुकेर्क याचा जन्म एका पोर्तुगीज उच्च घराण्यांत झाला होता. पांचव्या दों आफोंस राजानें मोठ्या कौतुकानें आपल्या पुत्राबरोबर त्याला विविध शिक्षण दिलें. वीर वृत्तीनें फौजेतील एखादी महत्वाची कामगिरी बजावून, युद्धांत जय मिळवून किंवा एखाद्या साहसानें लौकिक मिळवावा अशी त्याला फार हौस असे. सन १४७१ त पोर्तुगिजांनीं जी मोरक्कोवर स्वारी केली त्या सैन्यांत त्यानें उत्साहानें काम केलें. तेथील दहा वर्षांच्या कालांत त्यानें चांगला अनुभव मिळविला. सन १४८१ सालीं परत पोर्तुगालला आल्यावर त्याला पोर्तुगीज घोडदळांत प्रमुख जागा मिळाली.

राजा दुसरा दों झ्युआंव याचीहि आल्बुकेर्कवर प्रीति होति, तथापि सन १५९५ त तो कालवश झाल्यावर त्याचा मुलगा दों मानुयेल याचा कांहीं कारणानें आल्बुकेर्कवर रोष झाला व पुनः त्याची मोरक्कोच्या कामगिरीवर नेमणूक झाली. तेथें प्रत्यक्ष पाहिलेल्या अनेक दृश्यांवरून मुसलमानांविषयीं त्याच्या मनांत अत्यंत वैर उत्पन्न झालें. मोरक्कोहून परत येतांच सन १५०३ मध्यें हिंदुस्थानकडे जाणाऱ्या जहाजावर त्याची नेमणूक झाली. ही त्याची हिंदुस्थानची पहिलीच खेप होती. या वेळीं त्याकडून विशेष जरी कांहीं घडलें नसलें; तरी त्याला हिंदुस्थान-

विषयक बरीच माहिती मिळाली. त्या सफरींतून तो १५०४ सालीं पोर्तुगालला परत आला.

तांबडा समुद्र व इराणी आखात यांमधून चालणाऱ्या मुसलमानांच्या येरझारा पोर्तुगिजांच्या हितासाठीं बंद करणें इष्ट असल्याची त्यानें राजाकडे तक्रार केली. राजानें त्या कामगिरीवर त्याचीच नेमणूक करून स. १५०६ त त्याला तिकडे पाठवून दिलें.

कॉन्स्टांटिनोपलच्या सुलतानानें पूर्वेकडील मुसलमानांस मदत करूं नये म्हणून दों मानुयेल राजानें भूमध्यसमुद्रांतून एक आरमार तुर्कस्थानवर पाठविलें. त्या वेळीं तुर्कस्थान व इजिप्त यांच्यांत बरेंच वैमनस्य होतें हें पोर्तुगिजांनां माहीत नसल्यानें ते कदाचित् एक होऊन आपणास दगा देतील अशी त्याला शंका वाटे. सोकोट्रा घेऊन आल्बुकेर्कनें मलबार किनाऱ्याकडे जावें आणि आल्मैदची मुदत संपल्यावर व्हॉइसरॉयचा अधिकार घ्यावा अशी त्याला राजाज्ञा झाली होती.

आल्बुकेर्क आपल्या कामगिरीवर निघाला. वाटेंत मोंबासा, अंगोजा इ. राजांस जिंकून त्यांकडून त्यानें खंडणी घेतली. मग तो सोकोट्रावर आला व तो भाग त्यानें काबीज करून त्यावर आपले लोक ठेवून दिले. नंतर त्यानें मस्कत घेऊन ओर्मूजकडे कूच केलें. तेथील दिवाणाकडे मागणी करून त्यानें किल्ला बांधण्याची तयारी केली; पण सोबतच्या लोकांची फार कुरकुर चालल्यानें तें काम अर्धवट टाकून तो मलबारकडे जाण्यास निघाला.

आफ्रिकेच्या दक्षिण टोंकापासून मलाकापर्यंतचा किनारा, बेटें व बंदरें सतत पोर्तुगिजांच्या ताब्यांत राहावीं, ठिकठिकाणीं किल्ले बांधून तेथें पोर्तुगीज सैन्य ठेवावें म्हणजे मुसलमानी व्यापार बंद पडून पोर्तुगिजांचा ठीक चालेल असें त्याचें मत होतें. सत्तेचा पसारा आपल्याला नको आहे असें आल्मैद म्हणत होता. हा उभयतांत वाद माजून त्याबद्दल व्हॉइसरॉय आल्मैद यानें आल्बुकेर्क यास कांहीं दिवस कैदेंतहि ठेवलें. यानंतर वरिष्ठ हुकुमान्वयें आपले व्हॉइसरॉयचे अधिकार आल्बुकेर्ककडे सुपूर्द करून आल्मैद पोर्तुगालकडे जाण्यास निघाला.

नोव्हेंबर १५०९ पासून आफोंस द आल्बुकेर्क हा पोर्तुगिजांचा हिंदुस्थानचा व्हॉइसरॉय झाला.

त्यावेळीं दक्षिण हिंदुस्थानांत जीं हिंदु राज्यें होतीं तेथील लोकांवर मुसलमानी राज्यांतील लोकांकडून अत्याचार होत असल्यानें हिंदु मुसलमानांचें बरेंच वांकडें होतें. आफ्रिकेचा पूर्व किनारा, मलबार किनारा व अरबी समुद्र यांवर मुसलमानांचा संचार असून त्यांच्याशीं पोर्तुगिजांची स्पर्धा चालू होती. हे अरब किनाऱ्यावरील हिंदु रयतेस व राजांस अतिशय त्रासीत असत अशा स्थितींत परभारें एखाद्या सत्तेकडून मुसलमानांचें पारिपत्य झाल्यास हिंदु लोकांनां इष्टच वाटणारें होतें. व्यापारांतहि मुसलमानांपेक्षां पोर्तुगीज लोक लोकांनां भरपूर फायदा देत. त्यामुळें हिंदु लोक साहजिक पोर्तुगिजांचे दोस्त बनले.

मुसलमानांचे पोर्तुगिजांशीं युरोपांत अनेक वर्षें झगडे चालल्यानें पोर्तुगिजांनांहि साहजिक मुसलमानांचा तिटकारा वाटे व हिंदूंशीं ते प्रेमानें वागत. कालिकतच्या लढाईनंतर कांहीं दिवसांनीं आल्बुकेर्क मोठ्या फौजेनिशीं सोकोट्रावरच्या स्वारीवर निघाला असतां वाटेंत आंजेदीवजवळ आल्बुकेर्क याची तिमोजशीं भेट

झाली आणि तिमोजनें त्याला गोवा घेण्याची युक्ति सांगितली.

गोवा हें पश्चिम किनाऱ्यावरील एक बरेंच महत्वाचें व्यापारी ठिकाण असून तेथें गलबतें राहाण्यास उत्तम बंदर आहे. अशा प्रकारची उत्तम जागा स्वतःच्या सत्तेत असल्यावर व्यापारास मोठा वाव मिळेल हें तिमोजचें म्हणणें आल्बुकेर्कला पटलें. कोचीन, कालिकत वगैरे-कडील पोर्तुगिजांच्या वखारी तेथील राजांच्या मर्जीप्रमाणें चालवाव्या लागत. सत्ता स्वतःची असली म्हणजे मग तेथील व्यापार आपल्या मर्जीप्रमाणें चालविणें ठीक असतें हेंहि त्याच्या लक्षांत आलें. आफ्रिकेहून कोचीनपेक्षां गोवा जवळ. तो काबिज करण्यास हिंदूंशीं वैर करण्याचीहि जरूर नव्हती; कारण तो विजापूरकरांच्या सत्तेत होता. हें लक्षांत घेऊन आल्बुकेर्कनें तिमोजचें म्हणणें मान्य केलें व गोवा घेण्याचा निश्चय केला.

आल्बुकेर्क गोव्यास आला तेव्हां मलीक युसूफगुर्गी नांवाचा आदिलशाही सुभेदार गोव्याची व्यवस्था पहात होता. अनेक गोष्टींमुळें हिंदूंनां तो नकोसा झाला होता. स्वतः आदिलशाहा विजापूराकडील एका महत्वाच्या राजकारणांत गुंतला होता. सर्व प्रजा मुसलमानांविरुद्ध पोर्तुगीजांस सहाय्य करण्यास सज्ज होती.

पोर्तुगीज अंमल

पणजीच्या बंदराच्या नाक्याजवळच आदिलशहाचा किल्ला होता. (तीच हल्लीची पॅलेस होय.) आफोंस आल्बुकेर्कनें त्यावर चाल करून तो ता. १ मार्च सन १५१० रोजीं काबिज करून हिंदुस्थानांतील पोर्तुगीज सत्तेची त्यानें स्थापना केली. दोन दिवसांत सबंध गोवा शहर पोर्तुगिजांच्या हातीं आलें. सारे मुसलमान अधिकारी पळून गेले. कित्येक मृत्युमुखीं पडले. प्रजेसहि आनंद झाला. यावेळीं गोमंतकची क्षेत्रमर्यादा उत्तरेस कुडाळपासून, दक्षिणेस सदाशिवगडापर्यंत होती, आणि त्याला 'तळकोंकण' असें म्हणत.

आदिलशहाकडून गोवा गेल्याची बातमी चहूंकडे पसरली. कित्येकांनीं पोर्तुगिजांचें अभिनंदन केलें तर कांहीं मुसलमानांनीं आदिलशहाकडे दुःखप्रदर्शन केलें. शहरांत हिंदु लोकांनीं मोठा आनंद व्यक्त केला. आल्बुकेर्कनें आंगठी वगैरे देऊन तिमोजचा सन्मान केला.

गोवा गेल्याची बातमी ऐकून विजापूरच्या दरबारांत मोठी गडबड उडाली. साठ हजार सैनिकांसह इस्माईल आदिलशहा धांवत आला आणि त्यानें २३ मे रोजीं गोवा सोडवून घेतला. इस्माईल आदिलशहा बरेच दिवस सैन्यासह तेथें राहिला आणि त्यानंतर एका महत्वाच्या कामासाठीं विजापुराकडे निघून गेला.

"कॅप्टन रसलखान याकडे व्यवस्था संपवून इस्माईल आदिलशहा निघून गेला असून गोवा येथील व तिसवाडींतील लोकांनीं आदिलहाविरुद्ध बंड पुकारलें आहे. त्यांनीं मुसलमान ठाणेदारालाहि ठार केलें आहे. अशी तिमोज-

कडून आल्बुकेर्कला बातमी मिळाली" (डॉ. पिसुर्लेंकरकृत Colaboradores Hindús de Afonso de Albuquerque पृ. १२).

इस्माइलनें गोवा ताब्यांत घेतल्यावर आल्बुकेर्क आपल्या लोकांसह व कित्येक प्रमुख हिंदु पुढाऱ्यांसह जहाजांतून समुद्रांत जाऊन राहिला, आणि पुढें कोचीन-कानानूरकडे गेला. त्याला तिमोजकडून सदर माहिती मिळाली आणि गोव्यावर पुनः हल्ला करण्याचाहि तिमोजनें आग्रह धरला. या हल्ल्याच्या कामीं आपण आपल्या लोकांसह पोर्तुगिजांनां सहाय्य करण्याचेंहि त्यानें अभिवचन दिलें. इतक्यांत पोर्तुगालहूनहि आणखी सैन्याची कुमक आली. त्यामुळे आल्बुकेर्क पुनः गोव्यावर चाल करून गेला आणि सोमवार ता. २५ नोव्हेंबर सन १५१० रोजीं आदिलशहाचे कॅप्टन रसलखान व पुलातखान यांकडे निकराची लढाई देऊन त्यानें पुनः गोवा घेतला. यावेळीं तिमोज गेरसप्पाच्या राजासह आल्बुकेर्कच्या सहाय्यास आला होता.

सदर लढाईंत व नंतर तिमोज, म्हाड पै, मल्लराव, मन नाईक, मांग दळवी, रवळू कामत वगैरे अनेक लोकांचें आपणास सहाय्य झाल्याचें आल्बुकेर्कनें पोर्तुगालच्या राजास पाठविलेल्या पत्रांत लिहिलें आहे.

वरील लढाईंत फिरंग्यांनीं सबंध मुसलमान जातीस कापून काढलें. आल्बुकेर्कला त्यांचा फारच राग आला होता. त्यानें गोव्यांत मुसलमान जिवंत न ठेवण्याबद्दलची प्रतिज्ञा केली होती. आणि ब्राह्मणांस व शेतकऱ्यांस, हात न लावण्याबद्दल आल्बुकेर्कनें फर्मान काढलें होतें.

गोवा घेतल्यानंतर आल्बुकेर्क तो जहागिरीच्या नात्यानें आपल्या ताब्यांत देईल हा तिमोजचा हेतु सफल झाला नसला; तरी स. १५१० च्या एप्रिलमध्यें मुख्य ठाणेदार (Tanador mór) म्हणून त्यानें तिमोजची नेमणूक केली.

आल्बुकर्कनें गोव्याची तटबंदी केली, सर्व व्यवस्था लावून दिली आणि स्थिरस्थावर झाल्यावर आल्बुकेर्क मलाकाकडे जाण्यास निघाला. ही बातमी विजापूरकरास कळून त्यानें आपला कॅप्टन मल्लिकाजी यास गोवा घेण्यासाठीं ससैन्य पुनः पाठविला; तथापि या वेळीं त्याची डाळ शिजली नाहीं; आणि गोवा शहरासह सगळें तळकोंकण पोर्तुगिजांच्या सत्तेखालीं राहिलें.

पुढें सन १५२४ सालीं बऱ्याच फौजेनिशीं विजापूरकरानें गोवा प्रांतावर पुनः स्वारी केली. त्या स्वारीमुळें गोवा बेटाखेरीज तळकोंकणचा सर्व भाग पुनः विजापूरकराच्या सत्तेंत आला. फक्त गोवा बेट तेवढें पोर्तुगिजांकडे राहिलें. सन १५४३ पर्यंत हाच (तिसवाडी) भाग तेवढा पोर्तुगिजांकडे होता. त्याच सालीं म्हणजे १५४३ त त्यांनां साष्ट व बार्देज हे भाग आदिलशहाकडून मिळाले व तेव्हांपासून वरील तिन्हीं महालांवर (जुन्या काबिजादीवर) पोर्तुगिजांची सत्ता चालू झाली.

साष्ट बार्देजचा राजकारणी

तिमोज व म्हाडपै प्रभृति हिंदूंनीं जसें पोर्तुगिजांस तिसवाडी बेट मिळवून दिलें, तसेंच कृष्ण शेणवी यानें त्यांनां साष्ट व बार्देज हे भाग आदिलशहाकडे मोठें राजकारण करून मिळवून दिले. स. १५४२ च्या सुमारास आदिलशहा व पोर्तुगीज यांच्यांत मियालखानासंबंधानें जें राजकारण झालें तें सर्व कृष्ण शेणवी यांतर्फेच झालें असें Gospar Correia यानें लिहून ठेवलें आहे. त्यासाठीं कृष्ण यास विजापूरास पाठविण्यांत आलें होतें. तेथें त्याला आदिलशहानें नंतर कैदेंतहि टाकलें. ता. ६ डिसेंबर १५४६ रोजीं कृष्ण यानें विजापूरच्या तुरुंगांतून जें पत्र पोर्तुगालच्या राजास लिहिलें त्याची नक्कल डॉ. पिसुर्लेकर यांनीं Boletim do Instituto मध्यें प्रसिद्ध केली आहे. त्या पत्रावरून कृष्ण शेणवी यानें साष्ट व बार्देज पोर्तुगिजांस मिळण्यासाठीं विजापूरकरांकडे केवढें मोठें राजकारण केलें हें स्पष्ट कळून येतें.

Damião de Goes हा १६ व्या शतकांतील पोर्तुगीज इतिहासकार म्हणतो कीं — "आल्बुकेर्क यानें गोवें शहर घेतल्यावर दुसऱ्याच दिवशीं कृष्ण त्याला भेटला, आणि तिसवाडी बेटांतील व इतर रहिवाशांबद्दल त्यानें कौल मागितला." कृष्ण शेणवी यानें आल्बुकेर्क यास गोव्यांतील सर्व प्रकारच्या उत्पन्नाच्या बाबी व स्थानिक राज्यपद्धति यांची माहिती दिल्यामुळें गोव्याचें महत्व आल्बुकेर्कच्या लक्षांत येऊन गोव्याचा कारभार खंडणी इ. रूपानें दुसऱ्याकडे न देतां स्वतःच चालविण्याचा त्यानें निश्चय केला. स्नेहामुळें व हुशारी पाहून कृष्ण यास फिरंग्यांनीं स. १५१२ त व १५१४ त गोव्यांतील हिंदु सैन्याचा कॅप्टन नेमलें होतें. पुढें मुख्य ठाणेदार म्हणूनहि त्याची नेमणूक झाली.

गोव्याचें ख्रिस्तीकरण १

फिरंगी लोकांचा गोव्यांत प्रवेश होतांच आफोंस द आल्बुकेर्क यानें एक जाहीरनामा काढून प्रजाजनांनां आपापल्या धर्माप्रमाणें व चालीरीतींप्रमाणें वागण्यास पूर्ण मुभा असल्याचें जाहीर केलें; तथापि थोड्याच दिवसांत आल्बुकेर्क व इतर पोर्तुगीज अधिकारी यांनां गोव्यांत ख्रिस्ती लोकसंख्या वाढविण्याची अनेक दृष्टीनें जरूरी वाटूं लागली आणि लगेच त्यांनीं एक कॅथेड्रल उघडलें. गोव्यांतील लोकांचें ख्रिस्तीकरण जितक्या लवकर होईल तितक्या तांतडीनें करण्याच्या तयारींत पोर्तुगीज अधिकारी होते; व त्यांनीं त्या कार्यास सुरवातहि केली होती. खुद्द आल्बुकेर्क तर बाटविलेल्या स्त्री पुरुषांस बक्षिसें वगैरे देऊन त्यांनां सहाय्य करी व प्रोत्साहन देई.

सन १५३४ त पोर्तुगीज सरकारनें गोव्यांत बिशपची गादी स्थापन केली. सुरवातीस बिशपला विशेष काम नव्हतें. कारण त्यावेळीं ख्रिस्ती लोकांची संख्या पोर्तुगालहून आलेल्या शिपाई लोकांपुरतीच मर्यादित होती. तथापि त्यानंतरच्या कालांत गोव्यांतील बिशपला झपाट्यानें काम मिळूं लागलें.

सन १५३८ त धर्मकार्यासाठीं मिगेल व्हाज नांवाचा एक पाद्री व्हिगारियु जेराल म्हणून पोर्तुगालहून गोव्यांत आला. तो हिंदुधर्माचा महान् द्वेष्टा होता. त्यानें तिसवाडींत ख्रिस्तीकरणाच्या कार्यास हौसेनें सुरवात केली आणि तेथील सारीं देवळें मोडून टाकलीं.

"पाद्री मिगेल व्हाज यानें स. १५४० सालीं

तिसवाडींतील सारीं हिंदू देवळें मोडलीं." (Tombo Geral— Francisco Pais, Boletim do Instituto— डॉ. पिसुर्लेकरांचा लेख.)

देवळें मोडण्याचा आरंभ सन १५०५ सालीं दों फ्रांसिस्क द आल्मैद याकडूनच झाला होता. " सन १५०५ त दों फ्रांसिस्क द आल्मैद यानें अंजनीद्वीप (आंज्येदीव) येथील हिंदु देवालय मोडण्याची वर्दी दिली. (Gaspar Correia, Lendas da India; 1,562). त्याचप्रमाणें दिवाडी येथील सप्तकोटीश्वर हें सुप्रसिद्ध देवालयहि त्यावेळीं फिरंग्यांनीं मोडलें. असें इटालियन प्रवासी Manucby यानें लिहिलें आहे.

ख्रिस्तीकरणाचें कार्य गोव्यांत नेटानें चालविण्यासाठीं पोपचे खास प्रतिनिधि म्हणून ७ एप्रिल सन १५४१ रोजीं सां. फ्रांसिस्कु शाव्हियेर याला गोव्यांत पाठवून दिलें आणि तो ६ मे १५४२ रोजीं सोबतच्या पाद्रिमंडळासह गोव्यांत पोचला. त्यानें ख्रिस्तीकरणाच्या कार्यास नेटानें आरंभ केला; तथापि त्याच्या अपेक्षेप्रमाणें त्याला यश दिसलें नाहीं त्यामुळें तो बराच चरफडला. त्याला समजून आलें कीं, केवळ सामोपचारानें इकडील ब्राह्मण मंडळी ख्रिस्ती होणें शक्य नाहीं. म्हणून त्यानें यासंबंधीं कडक उपाय योजना आंखण्याच्या बाबतींत राजाची परवानगी मिळविण्यास पाद्रि मिगेल व्हाज याला पोर्तुगालला पाठविलें.

त्यानें सन १५४५ त पोर्तुगालचे राजे दों झ्युआंव ३ रा यांनां जो अर्ज सादर केला तो असा— " गोवें बेटांत शेणवी ब्राह्मण नांवाची एक जात असून ते लोक ख्रिस्ती धर्माच्या विरुद्ध आहेत. ते स्वतः ख्रिस्तीधर्म स्वीकारीत नाहींत; उलट दुसऱ्यांनांहि विरोध करतात. ते आमच्या राजवटीस त्रासदायक असून त्यांकडून इमानीपणाची अपेक्षा करणें चुकीचें आहे. तरी त्यांबद्दल विशेष खबरदारी घेणें इष्ट आहे." त्यासाठीं गोव्यांतील प्रमुख ब्राह्मणांस हद्दपार करण्यास पाद्रि व्हाज यानें पोर्तुगालच्या राजाकडे परवानगी मागितली. मिगेल व्हाज याची दुष्ट नजर विशेषतः कृष्ण शेणवी यांवर होती. त्यानें राजांनां सांगितलें कीं, कृष्ण हा पोर्तुगीजांमध्यें फार दिवसांपासून इतका मिसळत असूनांहि त्याचा आपल्या हिंदुधर्मावर अजून फार विश्वास आहे. कैदेंत असलेल्या हिंदूंसाठीं प्रत्येक दिवशीं शिजविलेलें अन्न तो मुद्दाम पाठवून देतो. (पोर्तुगीज अमदानींतील राजकारणी हिंदु-कृष्ण शेणै— ले. डॉ. पां. स. पिसुर्लेकर, भारतमित्र व. १७, अंक ७).

त्या वेळीं बाटविण्याचा सोपा उपाय म्हणजे हिंदु लोकांस ख्रिस्ती अन्न घालणें हा होता; व त्यासाठींच कृष्ण शेणै हिंदु कैद्यांकरतां स्वतः अन्न पाठविण्याची दक्षता घेई.

चोडण येथील लखू या गोव्यांतील कृष्णामागच्या पुढाऱ्यानें प्रसंग पाहून निरुपायानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला व 'लूकस द सा' हें नांव घेऊन कृष्णाच्या जागेवर तो गोव्यांतील मुख्य ठाणेदार झाला. (कृष्ण शेणै — ले. डॉ. पिसुर्लेकर, भा. मित्र वर्ष १७, अंक ७).

'लखूनें खुषीनें धर्मांतर केलें' असें जरी Oriente Conquistado मध्यें लिहिलें असलें, तरी ख्रिस्ती धर्म स्वीकारला नसता तर त्याला इतरांप्रमाणें हद्दपार व्हावें लागलें असतें असें तत्कालीन परिस्थितीवरून अनुमान करतां येतें. त्यावेळीं ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास राजी नसल्यामुळें हद्दपार केलेल्या ज्या इसमांचीं नांवें

गोवें दप्तरांत मिळतात तीं अशीं :—

रामू नाईक, अनू शेणवीं व त्याचा मुलगा, रामू नाईक व त्याचा मुलगा, विठ्ठल नाईक व त्याचा मुलगा, लखू नेवगी, नारू नाईक, लखू भांडारी, लखू शेणवीं व त्याचा बंधु, रामण्णा शेणवीं, नारायण, विठू शेणवीं, गोविंद नाईक, पित्रो नेवगी व त्याचा मुलगा, लखू कृष्ण शेणवीं चिमूलकर व बंधु, अजू नाईक, गणपति नाईक रामू शेणवीं वागळे, विठू शेणवीं, लखू शेणवीं, नरसू शेणवीं, पेत्रो शेणवीं, अंता शेणवीं, मलाप्पा नाईक, लखू शेणवीं चुलीतकर, मंगू शेणवीं चांदरभट, गोर्का शेणवीं, नारायण शेणवीं केंकरे, नारायण कामती, सांतु शेणवीं तिसवाडकर, लखू श्रीधर शेणवीं, अंता शेणवीं मोने. (लखूचें धर्मांतर — डॉ. पिसुर्लेकर, भारतमित्र वर्ष ११, अंक १).

पाद्रि मिगेल व्हाज पोर्तुगालच्या राजाकडून अपेक्षित फर्मान घेऊन गोव्यांत आला. तें त्यानें सां. फ्रांसिस्ककडे दिलें आणि धर्मप्रसारासाठीं तो चौल येथें गेला असतां तेथेंच वारला. त्याचा हिंदु धर्मद्वेष असह्य होऊन एका ब्राह्मणानें त्याच्यावर विषप्रयोग केला असेंहि वृत्त आहे.

पोर्तुगालच्या राजाच्या सदर फर्मानांत असा आशय होता — "गोव्यांतील पाखंड मत नष्ट करा. त्यांतील सारीं देवळें व मशिदी जमीनदोस्त करा. पाखंडी व ब्राह्मणी उत्सवास मनाई करा आणि लांकूड, माती, किंवा धातूची मूर्ति करणारास कडक शासन करा." (गोमंतकीय हिंदु व पोर्तुगीज रिपब्लीक — दों. आंतोनियु द नॉरोंज्य पृ. ९).

या फर्मानाची अंमलबजावणी जारीनें होऊं लागली. दों फ्रै जुआंव द आल्बुकेर्क या बिशपनें तर स. १५४८त हिंदूंचीं मिळतील तीं पुस्तकें एकत्र करून जाळून टाकलीं (सदर ग्रंथ पृ. १२)

सन १५५९ सालीं असा हुकूम जारी झाला. —"हिंदूंचीं कोणतींहि सरकारी कामें अंमलदारानीं करूं नयेत. मृत हिंदूंच्या विधवा किंवा मुली ख्रिस्ती धर्मांत आल्यास त्यांनां मृताची संपत्ति विभागून द्यावी. त्या ख्रिस्ती न झाल्यास मृताचा कोणताहि संबंधी ख्रिस्ती होईल त्याला ती संपत्ति द्यावी. पालक नसणाऱ्या हिंदु मुलांनां सरकारनें ताब्यांत घेऊन त्यांनां सां. पावलच्या कॉलेजांत बाप्तिजमा द्यावा, आणि ख्रिस्ती होणारास करमाफी द्यावी." (सदर ग्रंथ पृ. १५, १६, १७).

सन १५६० हें साल गोव्यांतील ख्रिस्तीकरणाच्या इतिहासांत विशेष महत्वाचें आहे. या वर्षीं तिसवाडींत सामुदायिक बाप्तिजमाचे सत्तावीस उत्सव होऊन त्यांत १२९६७ हिंदूंनां ख्रिस्ती करण्यांत आलें. (फिरंग्यांनीं उध्वस्त केलेलीं गोव्यांतील देवालयें.— ले. डॉ. पिसुर्लेकर, भारतमित्र व. १७, अंक १ला).

या पूर्वीं म्हणजे स. १५४१ पासून १५५८ पर्यंतच्या कालांत तिसवाडी महालांत ख्रिस्ती केलेल्या हिंदूंची जी यादी डॉ. पिसुर्लेकर, यांनीं Tombo da Ilha de Gôa e das Terras de Salcête e Bardez या ग्रंथांत दिली आहे त्या यादींत २०८ इसमांचीं नांवें असून तिसवाडींतील साऱ्या गांवांचा समावेश झाला आहे. (पहा—भारत-

मित्र व. २७, अं. ९ पृ. २१५).

सन १५४० त ख्रिस्तीकरणाच्यावेळीं पाद्रि मिगेल व्हाज यानें तिसवाडींतील खालील देवळें मोडून टाकलीं: —

आगशी — सोमनाथ क्षेत्रपाल.

आजोशी — महालक्ष्मी, सप्तनाथ, रवळनाथ, नारायण, सटी, भूमिदेवता, वनदेवता, ग्रामपुरुष, ईश्वर.

बांबोळी — शांतेरी, रवळनाथ.

बांगेणी — शांतेरी.

भाटी — बावकादेवी, रवळनाथ, शांतेरी, नारायण, रामनाथ, बेताळ, ब्राह्मणपुरुष, भैरव.

कालापूर — शांतेरी, केळबादेवी, माया, बेताळ, रामनाथ, रवळनाथ, पुरुष, पंचदेवता.

करमळी — बेताळ, सिद्धनाथ, ग्रामपुरुष, क्षेत्रपाल, रवळनाथ, शांतेरी, गणेश, वनदेवता, भूतपिडाधार, गांवस-पुरुष, कुळंबी-पुरुष, ब्राह्मण-पुरुष, निर्वंश-पुरुष.

चिंबल — भगवती.

धावजी — रवळनाथ, नरसिंह, सत्पुरुष, बाराजण, मुख्य.

चोडण — गणेश, रवळनाथ, बावकादेवी, मल्लनाथ, भगवती, देवकी, संतपुरुष, बाराजण, नारायण, कांतेश्वर, चंडेश्वर, दाडसांकळ.

कारय — रवळनाथ, वनदेवता.

खोर्ली — सिद्धनाथ, रवळनाथ, शांतेरी.

कुजरा — रवळनाथ, रामनाथ, तोरणवीर.

कूर्क — शांतेरी, रवळनाथ.

दिवाडी — ग्रामपुरुष, नारायण, भैरव, रवळनाथ, देवता, सप्तनाथ, सटी, भगवती, बावकादेवी, वंशनाथ, वीर, खापरदेव, ग्रामपुरुष, रवळनाथ, शांतेरी, रवळनाथ, गणेश, भैरव, मस्कानाशनी, मोका, निर्गुण.

दिग्वारी — क्षेत्रपाळ, रवळनाथ.

येळ्ळा — दुर्गादेवी, गणेश, रवळनाथ.

गांवशी — नारायण, दुर्गादेवी, भावनाथ.

गोआली-मौळा — क्षेत्रपाल, रवळनाथ, शांतेरी.

थोरलें गोवें — कालभैरव, चंडेश्वरी, रवळनाथ, गोवनाथ ऊर्फ गोवेश्वर, गडगेश्वर.

जुवें — देवता, रवळनाथ, शांतेरी, क्षेत्रपाल, ग्रामपुरुष, मल्लनाथ.

मंडूर — रवळनाथ दुर्गादेवी, नारायण, ग्रामपुरुष.

मुकोंडी — क्षेत्रपाल, भूतनाथ.

मोरंबी (मोठी) — महादेव, शांतेरी, महालक्ष्मी, रवळनाथ, बेताळ, सटी.

मोरंबी (छोटी) — रवळनाथ, क्षेत्रपाल, वनदेवता.

मुर्डी — क्षेत्रपाल, ब्रह्मा.

नेवरें (मोठें) — शांतेरी, ईश्वर, रवळनाथ, बावकादेवी, मायाकर, भवनाथ, महादेव, ग्रामपुरुष.

नेवरें (छोटें) — रवळनाथ, शांतेरी ग्रामपुरुष.

ओडार — रवळनाथ.

पानवेली — भवानी, शांतेरी, बाराजण.

श्रीधन — पुरुष, रामनाथ.

तळावली — ग्रामपुरुष, रवळनाथ, शांतेरी, भवनाथ, ईश्वर, नारायण.

ताळगांव — रवळनाथ, शांतेरी, बेताळ, रामनाथ.

वान्सी — बावकादेवी.

ख्रिस्तीकरण २

सन १५६० सालीं गोवा बेटांत ज्यावेळीं ख्रिस्ती धर्माच्या प्रसारास नेट चढला त्यावेळीं साष्ट व बार्देजमध्यें ख्रिस्ती अगदींच अल्प होते. त्याच वर्षी हद्दपारीचा एक हुकूम सुटला तो असा —

"आपली चीजवस्त व स्थावर मिळकत ख्रिस्त्यांनां विकून एक महिन्याच्या अवकाशांत ब्राह्मणांनीं व सुवर्णकारागिरांनीं गोवा सोडावा; नसल्यास आजन्म गुलामगिरी व मिळकतीची जप्ती ही शिक्षा देण्यांत येईल. (Os Hindus de Gôa e a República Portuguesa, Pg. 16.)

सन १५६० त साष्टमध्यें ख्रिस्तीकरणाच्या कार्यास जेजुइटांकडून जोरांत सुरवात झाली. या पेद्रु मास्कारेंज्यस् यानें कुठ्ठाळ येथें जाऊन 'मखजी'चें देऊळ मोडून तेथें करुसाची स्थापना केली. पुढें ४ वर्षांनीं पाद्रि पेरु कुलास यानें कुठ्ठाळ येथील मरणाच्या पंथास लागलेल्या एका हिंदु इसमास सक्तीनें बाप्तिजमा देण्यासाठीं भेट दिली. त्या वेळीं तेथील हिंदु लोक त्यावर उलटले व त्यांनीं त्याला तेथून घालवून दिलें. चवताळलेल्या लोकांनीं त्या पाद्रीच्या एका पोर्तुगीज नोकराचा खून करून ख्रिस्त्यांचें तेथील नवीनच बांधलेलें चर्च जाळून टाकलें. फिरंग्यांनीं त्याबद्दलचा सूड घेण्यासाठीं कुठ्ठाळ येथील हिंदूंचीं सर्व देवालयें मोडून टाकलीं. मंगनाथ (मंगेश) चें देवालयहि जमीनदोस्त करण्यांत आलें. याच जागेवर पुढें १५६६ त एक चर्च बांधलें.

केळशी येथील 'सांतेरी' (शांतादुर्गा) या देवीचें देऊळहि सन १५६६ त जाळण्यांत आलें. हें देवालय जुना गोवा येथील अनू शेणवीं नांवाच्या एका श्रीमान् व्यापाऱ्यानें थोड्याच वर्षांपूर्वी स्वखर्चानें बांधलें होतें. या देवालयाची जागा सरकारजमा करण्यांत आली व पुढें १५६७ त ती आंतोनियु फेऱ्हांव यास बहाल केली.

सदरील अनू शेणवीं हा ख्रिस्तीधर्माच्या विरुद्ध असल्याचें पाद्रि मिगेल व्हाज यानें सन १५४५ त पोर्तुगालच्या राजास सादर केलेल्या अहवालांत लिहिलें आहे. अनू शेणवीं याचें आडनांव समजत नाहीं; पण तो केळशीकर असावा असेंच वाटतें. (फिरंग्यांनीं उध्वस्त केलेलीं गोव्यांतील देवालयें — ले. डॉ. पिसुर्लेंकर, भारतमित्र व. १७, अंक १)

स. १५६० मध्येंच गोव्यांत इंकिझिसांव (धर्मसमीक्षण न्याय सभा) या संस्थेचा उदय झाला होता व तिचें कार्यहि नेटांत सुरू झालें होतें.

सन १५६३ सालीं हद्दपारीचा कायदा सगळ्याच हिंदूंनां लागू करण्यांत आला. १५६६त तर हद्दपारीचा अधिकार आर्चबिशपच्याच हातीं आला आणि त्यानें हिंदूंच्या गांवकी हक्कांवर गदा आणून ख्रिस्ती होण्यास कबूल न झालेल्यांचे ग्रामसंस्थांमधील हक्कहि रद्द केले. (Os Hindus de Gôa e a República Portuguesa पृ. २१).

सन १५६६ सालीं साष्टमध्यें ख्रिस्तीकरणाच्या कार्यास मोठा ऊत आला. रायतुरचा किल्लेदार Diogo Rodrigues (Diogo do Forte) यानें लोटलीच्या गांवकऱ्यांनां किल्ल्यांत हजर होण्याचा हुकुम केला होता; पण ख्रिस्तीकरणाच्या भयानें तो त्यांनीं पाळला नाहीं. त्यामुळें चिडून जाऊन त्यानें लोटली येथील मुख्य श्रीरामनाथ देवालयाचा विध्वंस केला. लोटलीकरांनीं त्याबद्दल न्यायालयांत तक्रार केली आणि 'तें देऊळ पूर्वीप्रमा-

णेंच किल्लेदारानें बांधून द्यावें ' असा न्याया-धिशानें निकालहि दिला. तथापि गोव्यांतील जेजुइटांच्या मुख्याधिकाऱ्यानें व आर्चबिशप यानें त्या हुकुमाविरुद्ध जोराची तक्रार केल्यामुळें व्हॉइसरॉय D. Antão de Noronha यानें तो रद्द करून उलट किल्लेदाराला साष्टींतील सारींच देवळें मोडून टाकण्याचा खास हुकूम दिला. किल्लेदारानें मग मोठ्या आनंदानें स. १५६७ त साष्टींतील शिल्लक राहिलेलीं सर्व देवळें उध्वस्त केलीं.

पोर्तुगीज इतिहास संशोधक प्रो. पाद्रि सिल्व्ह रेगु यानें Documentação para a História das Missões do Padroado Português do Oriente या ग्रंथाच्या दहाव्या भागांत साष्टींतील देवळें फिरंग्यांनीं कशीं मोडलीं याबद्दलचा समकालीन पोर्तुगीज पत्रव्यवहार दिला आहे. त्यांत वेर्णेच्या जुन्या म्हाडदोळ-च्या म्हाळसादेवीसंबंधीं बरीच माहिती मिळते.

ता. ७ मार्च सन १५६७ रोजीं रायतुरचा किल्लेदार कॅप्टन Diogo Rodrigues हा वेर्णे येथील म्हाडदोळला गेला. त्यापूर्वीं एक जेजुइत पाद्री आपल्या लवाजम्यासह तेथें हजर झाला होता. त्या वेळीं पुजारी देवीला दागिने घालीत होते. ते सर्व दागिने पाद्र्यांनीं त्यांकडून घेतले, आणि मग म्हाळसादेवीची मूर्ति फोडण्यांत आली. देवळाचें छप्पर उड-विण्यांत आलें व मागाहून देऊळ जमीनदोस्त करून टाकलें. अशा रीतीनें रायतुरचा कॅप्टन Diogo Rodrigues यानें साष्टींतील सारीं देवळें मोडण्याच्या कामांत फार मोठा पराक्रम केला. (फिरंग्यांनीं. उ. के. सा. दे.— श्रीम्हाळसा देवालय — ले.- डॉ. पिसुर्लेकर, भारतमित्र व. २६, अंक ६).

Tombo da Ilha de Gôa e das Terras de Salcete e Bardez या ग्रंथाच्या शेवटीं इ. सं. डॉ. पिसुर्लेकर यांनीं त्यावेळीं साष्टमध्यें ख्रिस्ती केलेल्या हिंदूंची जी नोंद दिली आहे तींत साष्टींतील सर्व गांवांचा समावेश झाला असून बाटविलेल्यांची संख्या हजारावर आहे.

सदर ग्रंथांतील उध्वस्त देवालयांच्या यादी-वरून पाहातां ख्रिस्तीकरणाच्यावेळीं दियोग रुद्रीगिस् यानें साष्टींतील खालील देवळें मोडून टाकलीं :—

अडसुली — क्षेत्रपाल.

आंबेली — महादेव, दुर्गादेवी, भैरांव, पुरुष.

आंके — सिद्धनाथ, मर्कदेव, वीर, पुरुष.

आरशी — भोगेश्वर, महादेव, सातजणी, बेताळ, पुरुष.

असोळणें — सांतेर, बेताळ, पुरुष.

वाणावली — वाणेश्वर, संकेश्वर, नारायण भैरव, कात्यायनी, सांतेरी.

बेताळभाटी — आग्यावेताळ, गोरख, महादेव, गणेश, शांतेरी, ग्रामपुरुष, केळवीर, बाराजण.

कालात — सांतेरी, महादेवी.

कामुर्ली — कामाक्षा, भैरव, कमळेश्वर.

काना — क्षेत्रपाल.

कांसावली — नागनाथ, सांतेर, पुरुष.

करमणें — महादेव, आग्यावेताळ, पुरुष.

केळशी — कपिलेश्वर, क्षेत्रपाल, ननवाय.

कवडी — नागनाथ, विश्वनाथ.

चांदर — बसवराज.

चिखली — नारायण, ईश्वर, सांतेर, ग्रामपुरुष, चौवीसवीर, बोडकदेव.

चिकळण — सांतेर.

चिंचोणें — सांतेर, वेताळ, बावकादेवी.

कुवेली — वजनेश्वर, महादेव, सांतेर, वैजारी.

कोलवें — महालक्ष्मी, बालेश्वर, नारायण, वेताळ, भैरव, रवळनाथ, मकुलेश्वर.

कुट्टाळी — मंगेश, शांतेरी, वीर, कपिलेश्वर, नारायण, भगवती, गोपीनाथ, चंद्रनाथ.

कुरतरी — सांतेर, नारायण, चंद्रेश्वरी, क्षेत्रपाल, रवळनाथ, चंद्रनाथ, दुर्गादेवी इ.

कुंकळ्ळी — शांतेरी (शांतादुर्गा), महादेव.

दाबोली -- सांतेरी, ईश्वर, ग्रामपुरुष, क्षेत्रपाल, भगवती, बाराजण.

धर्मापूर -- महादेव, नारायण, बेताळ, भैरव, क्षेत्रपाल, दुर्गादेवी, सांतेर, पुरुष.

दाऊरली -- भगवती, बाराजण, कोंती.

देवसूअ -- चिंचणनाथ, लोकनाथ, भैरव, पुरुष.

दिकरपाल -- सांतेर, बाराजण.

दुंकोली — महादेव, बेताळ.

गंवडाळी — दुर्गादेवी.

गंवसूअ -- गौतमेश्वर.

गिरदोली -- रवळनाथ, नारायण, क्षेत्रपाल.

इसर्सी — सांतेर, बाराजण.

लोटली — रामनाथ, वेताळ, भगवती, सांतेर, नारायण, कार्यसांतेर, सिद्धनाथ, वामनदेव, पुरुष.

माकजन -- रवळनाथ, दुर्गादेवी, नारायण, ईश्वर, क्षेत्रपाल.

माजोर्डें — दुर्गादेवी, सोनेश्वर, वीर, महामाया.

मडगांव -- दामोदर, चंद्रनाथ, नारायण, चामुंडेश्वरी, सांतेर, मकाजी, मूळवीर, भगवती, गोवेश्वर, महालक्ष्मी, भूतनाथ, ईश्वर, ग्रामपुरुष.

मुर्गांव — वागनाथ, बाराजण.

नागवें — सांतेर, भगवी, ईश्वर, नारायण, रवळनाथ, ग्रामपुरुष, बाराजण.

ओंडली — गौतमेश्वर, पुरुष, कुकुंभ, व्यंकदेव, नारायण.

पाली — दुर्गादेवी, ईश्वर, ग्रामपुरुष, आद्यपुरुष, धारेश्वर इ.

केळोशी -- सांतेर, नारायण, ईश्वर, ग्रामपुरुष, गणेश, भगवती.

राय -- रायेश्वर, कामाक्षा, भगवती, नारायण, वाटंबी.

रासय — त्रिविक्रम, नारायण, ईश्वर.

सांकवाळ — सांतेर, ईश्वर, ग्रामपुरुष, विजयदुर्गा, नारायण, भगवती, परममेद, नरसिंह.

सोलदडें — नागनाथ, बेताळ, सांतेर, दुर्गादेवी, कालपुरुष.

सुरावली — सांतेर, महादेव, पावनदेवी.

सरनाभाटी -- सांतेर, सिद्धनाथ.

तळावली—सिद्धनाथ, बेताळ, सांतेर इ.

वार्डें—सांतेर, नारायण, ईश्वर, चौवीसवीर.

वानेली -- गोरेश्वर.

वांकें -- महादेव, भैरव, सांतेर, वीर, पुरुष.

वेळसांव -- महादेव, देवी, ग्रामपुरुष.

वेळ्ळी -- सांतेर, बेताळ, बैरागी.

वेर्णें--म्हाळसा, सांतेर, नारायण, भगवती, वेर्णादेवी, ग्रामपुरुष, लंबेश्वर.

उतडें-- बेताळ, पुरुष, वाम्रो, महादेव इ.

वेर्डें -- महादेव, दुर्गादेवी.

सन १५६७ सालीं फ्रांसिस्कान पाद्रींनीं सरकारी आज्ञेनें बार्देजवर ख्रिस्तीकरणाचा पहिला मोर्चा नेला. त्या वेळीं व नंतर मिळून

तेथें बऱ्याच हिंदूंचें ख्रिस्तीकरण करण्यांत आलें. तथापि पुढें स. १५७३ सालीं बार्देजच्या ख्रिस्तीकरणास विशेष जोम आला. Tombo da Ilha de Gôa e das Terras de Salcete e Bardez या ग्रंथाच्या शेवटीं इ. सं. डॉ. पिसुर्लेकर यांनीं दिलेल्या यादींत बार्देजमध्यें ख्रिस्ती केलेल्यांचीं सव्वाशें नांवें आहेत. आणि ख्रिस्तीकरणाच्यावेळीं मोडून टाकलेल्या बार्देजच्या देवालयांच्या यादींत खालील नांवें आहेत :—

हळदोणें— भगवती, रवळनाथ, नारायण, सांतेरी, सिद्धनाथ, भूतनाथ, सटी, फुलनाथ.

हणजूण — वेताळ, सांतेरी, भगवती.

अडफडें — सांतेरी, वेताळ, वनदेवी, चौरंगी.

आसगांव — भूमिका, भगवती, रवळनाथ, सटी, सांतेरी, क्षेत्रपाल, मल्लिकार्जुन, लिंग इ.

असनोडें — सांतेरी, रवळनाथ, क्षेत्रपाल, वनदेवता, पूर्वाचारी.

बस्तोडें — सत्भा, नारायण, मल्हारदेव, शांतेर.

कळंगूट — सांतेरी, सीतलनाथ, सप्तनाथ, ब्रह्मनाथ, वेताळ.

कामुर्ली — वेताळ, अजादेवी, माहुली.

कांदोळें — नारायण, सांतेर, भैरव, गडगेश्वर, रवळनाथ.

काणकें — नारायण, क्षेत्रपाल.

कोलवाळ — भैरव, रवळनाथ, रामनाथ, गौतम, दाड.

कुचेली- बाराजण. **साळगांव**- वेताळ.

खोर्ली — सांतेरी, अजनाथ.

गिर्दोली — भगवती, नारायण, वनदेवता, सटी, सांतेरी.

म्हापशें — सांतेरी, गणेश.

मारन — वेताळ, सांतेर, रवळनाथ.

मयडें — रवळनाथ, सांतेरी, महादेव, रामपुरुष, वंतिपुरुष, सत्पुरुष, दाड.

नाचनोडें — रामनाथ, महालक्ष्मी, ग्रामपुरुष, रवळनाथ, गोपीनाथ, वेताळ.

नांदोडें — क्षेत्रपाल, भूतनाथ, दाड, घोव्ये.

नागवें — वेताळ, रवळनाथ, नारायण.

नेरूल — सांतेरी, क्षेत्रपाल, रवळनाथ इ.

ओलावली —नारायण, सोमनाथ, सांतेर, गणेश, रवळनाथ.

ओरडें—भैरव. **पऱ्हा**—रामपुरुष, देव.

ओशेल—सांतेरी. **रेव्होडें**—केळबादेवी.

पालियें -- सांतेर, रामनाथ, पुरुष.

पिळर्ण — सांतेर, रवळनाथ, रामनाथ, भैरव, बावकादेवी, हेसनाथ, वेताळ.

पिर्ण -- सांतेर, रवळनाथ, कालिकादेवी.

पोंबुर्पे— मल्लिकार्जुन, रवळनाथ, सांतेर इ.

पुनाळें — गणेश, कपिलेश्वर, रवळनाथ इ.

सांगोळडें — सांतेर, नारायण, गणेश, सटी इ.

सिंकेरी— गाडगेश्वर. **उसकै**-रवळनाथ.

शिवोली — सांतेर, गणेश, रवळनाथ, देवी इ.

सिर्सई — महालक्ष्मी, सांतेर, वेताळ, देवी इ.

सिर्ली – वेताळ, नारायण, वनदेवता इ.१९

थिये — रवळनाथ, सोमनाथ, वेताळ इ.

वेर्लें — सांतेर, नारायण, नागनाथ इ.

ख्रिस्तीकरण ३

ख्रिस्तीकरणाच्या वाढत्या व्यापामुळें तिसवाडी साष्ट व बार्देज येथील हिंदु जनता आपली चीजवस्त, घरेंदारें, जमीनजुमले व अत्यंत आवडीचे ग्रामसंस्थांचे गांवकी हक्क यांवर पाणी सोडून आपापल्या कुलदेवतांसह सैरावैरा पळत सुटले. त्यांनां याप्रसंगीं तेथें कोणीच त्राता दिसला नाहीं. त्यांतील बहुतेकांनीं जवळच्या विजापूरकराच्या हद्दींत प्रवेश केला व तेथें त्यांनां आश्रय मिळाला. त्यांच्यामागें त्यांच्या व देवालयांच्या जमिनी आणि इतर उत्पन्न सरकारजमा करण्यांत आलें. शेतांतील भाताचें पीक घेण्याच्यावेळीं चौकशी झाली आणि त्यावेळीं अधिकाऱ्यांनां दिसून आलें कीं बहुतेक शेतें पडीत स्थितींत असून कित्येक ठिकाणची जमीन देखील नासून गेली आहे. कुठ्ठाळ, लोटली या गांवांत व खाऱ्या नदीकांठच्या इतर ठिकाणीं तर शेतांत खारें पाणी भरलें आहे.

या परिस्थितीमुळें सरकारचा नवीन हुकूम सुटला कीं — "हिंदूंवर होणाऱ्या जुलुमांची चवकशी करावी. त्यांनां गुलाम बनविलें गेलें असल्यास, त्यांची जिंदगी जबरीनें घेतली असल्यास, त्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांकडून पैसे घेतले असल्यास त्याचा निवाडा करावा आणि त्यांनां आपला पुरावा सादर करण्याबद्दलची असतील तेथें आग्रहाची सूचना द्यावी."

या हुकुमामुळें आतां आपल्याला योग्य न्याय मिळेल अशी हिंदूंनां जबर आशा वाटली; आणि त्या आशेनें कित्येक इसम पुनः आपल्या गांवांत येऊन व भग्न देवालयांच्या तलावांत स्नानें उरकून देवांकडे त्यांनीं नवसहि फेडले. तथापि त्यांची आशा मात्र किमपीहि सफल झाली नाहीं; आणि त्यामुळें त्यांनां पुनः गांव सोडावें लागलें.

सन १५७३ त खोल येथील गांवकऱ्यांनीं कायमधारा दिला नाहीं म्हणून तें गांव सरकारजमा करण्यांत आलें. १५७४ त ब्राह्मण पंडितांनां व वैद्यांनां घोड्यावरून, डोलींतून, पालखींतून फिरण्याची बंदी झाली. १५७५ त ब्राह्मणांप्रमाणेंच इतरांनांहि तो कायदा लागू झाला.

सन १५८७ त गोव्यांत तिसरी ख्रिस्ती कौन्सिल भरली व तीमध्यें मंजूर झालेल्या ठरावान्वयें हिंदूंनां जानवें वापरण्याची व विवाहविधीची बंदी होऊन हिंदूंनां हद्दपार करण्यास सुरवात झाली. (Os Indús de Gôa e a República Portuguesa पृ.४२)

इतिहासकार फ्रांसिस्क पाइस हा स. १५९५ मध्यें आपल्या Tombo Geral या पुस्तकांत लिहितो कीं, "साष्टींतील शेतजमिनी म्हणजे अख्या कोंकणांतील उत्तमोत्तम जमिनी आहेत; तथापि तूर्त लोकवस्तीच्या अभावीं त्या साऱ्या पडीत स्थितींत आहेत. देवळांचा विध्वंस व ख्रिस्तीकरणाचा प्रसंग, या गोष्टीला लढाईइतकाच कारणीभूत झाला आहे."

अशा आणीबाणीच्या प्रसंगींहि जन्मभूमीचा मोह न सुटल्यामुळें बरेच लोक फार कष्टानें आपल्या गांवांतच राहिले होते. एका गोवा शहरांतच त्यांची संख्या वीस हजारांवर होती असा उल्लेख मिळतो.

सन १५८७ पासून पोर्तुगीज हद्दींत हिंदूंनां धार्मिक संस्कार करण्याची बंदी झाल्यामुळें ते दुसऱ्या हद्दींत आपले विवाहादि विधि उरकीत. हें पाहून जेजुईटांनीं त्यांच्यावर कर बसविण्याची क्लृप्ति काढली व तो वसूलहि होऊं लागला. पोर्तुगीज हद्दींतून दुसऱ्या हद्दींत जाणाऱ्या प्रत्येक माणसाकडून हा कर घेतला जाई.

स. १६१३ त व्हॉइसरॉय आझेव्हेदु यानें हुकुम दिला कीं— "ख्रिस्तीधर्मात निषिद्ध मानलेल्या व इतर दिवसांतहि हिंदूंनीं विवाहविधि करूं नये. करणारास हजार असफ्यां दंड करण्यांत यावा. दंड भरण्याची ऐपत नसलेल्यास तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा द्यावी."

सन १६३१ सालीं हिंदूंनां हिंदु म्हणून ओळखण्यासाठीं उभ्या पिवळट टोप्या वापरण्याची सक्ति झाली.

ता. ६ डिसेंबर सन १६३० च्या पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या एका पत्रांत गोव्याचा तत्कालीन व्हॉइसरॉय Conde de Linhares म्हणतो कीं— "धर्मसमितीनें हिंदूंनां कपाळाला गंध व तांदुळ लावण्यास सक्त मनाई केली आहे. मला वाटतें, पोर्तुगाल व कास्तेल (स्पेन) येथें ज्यू लोक वापरतात त्याप्रमाणें हिंदु म्हणून ओळखण्यासाठीं त्यांनां पिवळट टोपी वापरण्यास भाग पाडावें."

व्हाइसरॉयच्या इच्छेप्रमाणें सन १६३१ पासून ही टोपी वापरण्यास सुरवात झाली व पुढें दोन तीन वर्षांनंतर रंगांत फरक करून हिंदु लोकांनीं तांबडी टोपी वापरण्याचें आरंभलें. (तांबड्या टोपीचा इतिहास– ले. डॉ. पिसुर्लेकर भारतमित्र व. १७, अंक ३ रा).

सन १६३३ सालच्या जानुआरींत साष्टींत इकडे तिकडे कांहीं शिल्लक राहिलेल्या हिंदु लोकांस व्हॉइसरॉय कोंदि द लिंज्यारिस् याच्या खटपटीनें बाटविण्यांत आलें. त्यांतील जे ख्रिस्तीधर्म स्वीकारण्यास तयार नव्हते ते पैलतीरीं अंत्रूज वगैरेकडे विजापुरकराच्या राज्यांत गेले. बाटलेल्या शेंकडों हिंदूंनीं प्रायश्चित घेऊन ते परत आपल्या आवडत्या हिंदुधर्मात आले असा पोर्तुगीज ऐतिहासिक साधनांत उल्लेख मिळतो. (पहा — डॉ. पिसुर्लेकरकृत Tombo Geral पृ. १८४ व Assentos भाग ३ रा, पृ. ४७५).

असें असलें तरी कित्येक हिंदु आपल्या घरांची व जमिनीची पाहाणी करण्यासाठीं आणि ग्रामसंस्थेंतील हकाचे पैसे घेण्यासाठीं पोर्तुगीज हद्दींत वरचेवर येतच असत. पुढें त्यांनां त्याबद्दलचीहि बंदी झाली.

धर्मप्रसारासाठीं देशी भाषेचा उपयोग होत असल्यानें पाद्री लोकांनीं देशभाषा शिकावी असा प्रयत्न सां. पात्रूलच्या कॉलेजांत करण्यांत आला होता. त्यामुळेंच एका जेजुईट पाद्रीनें कोंकणी भाषेचें व्याकरणहि तयार केलें होतें. फादर स्टीफन्सचें ख्रिस्तपुराण देखील याच प्रयत्नाचा परिणाम होता. तथापि सन १६८१ ते १६८६च्या सुमारास हा क्रम बदलण्यांत येऊन पोर्तुगीज मुलखांत वावरणाऱ्या एकंदर इसमांनीं मग ते कोणत्याहि धर्माचे व कोणत्याहि राष्ट्राचे का असेनात पोर्तुगीज भाषाच बोलली पाहिजे असें ठरविण्यांत आलें. यासाठीं तीन वर्षांची मुदत देण्यांत आली. या मुदतीनंतर देशभाषेचा उपयोग करणारास वाटेल ती शिक्षा देण्यांत येईल असा हुकूम सुटला. याच सुमारास गायक समाजांतील कलावंत स्त्रियांनां पोर्तुगीज अमलांत राहाण्याची बंदी झाली होती; आणि हा हुकूम मोडणारास देशांत शिक्षेची सजा ठरविली होती.

सन १७०५च्या अखेरीस शेंडीवर (म्हणजे हिंदूंवर) माणसीं सुमारें आठ रुपये कर बसविण्यांत आला आणि १७०६ सालीं त्याची वसुली सुरू झाली.

सन १७१५ सालीं जेजुइटांच्या प्रमुखानें गुलदस्त्यांतील एक नवीन ठराव जारीनें अंमलांत आणला. ता. ४ डिसेंबर १५६७च्या ख्रिस्ती कौन्सिलच्या हुकुमनाम्यांतच तो नमूद झालेला

होता. त्या हुकुमान्वयें हिंदूंच्या घरांत शिरून, आंतील माणसांनां खेंचीत बायबलचें प्रवचन चालत असलेल्या ठिकाणीं नेऊन उभें करण्यांत येऊं लागलें. आणि त्यासाठीं म्हातान्या कोतान्यांवर; बायकामुलांवर व पंगू, आजाऱ्यांवरहि जुल्म होऊं लागले. न्या. मू. नोरोंज्य आपल्या os Indús de Gôa e a República Portuguesa या ग्रंथांत लिहितात कीं — "देवळें उध्वस्त झालीं; उत्पन्नें व जमिनी जप्त झाल्या; संस्कारांची बंदी झाली; भाषा गेली; मातामुलांची ताटातूट झाली; वाहनांची बंदी झाली; आणि अशा अनेक संकटांनां तोंड देत हिंदूंनीं परसत्तेंत देवळें नेलीं; घरेंदारें तिकडे बांधलीं; उदीम व्यापारहि ते करूं लागले त्यांनीं जमिनी पुनः मिळविल्या किंवा न मिळविल्या तरी ते भुकेनें तडफडून मेले नाहींत. आणि त्यानंतर तर अशा या हुकुमाची कडक अंमलबजावणी!"

इंकिझिसांवनें किंवा धर्मसमीक्षण सभेनें गोव्यांत जी कामगिरी केली तिच्या समग्र माहितीसाठीं गोमंतकीय हायकोर्टाचे माजी सरन्यायाधीश न्या. मू. डॉ. आंतोनियु द नोरोंज्य यांचा Os Indús de Gôa e a República Portuguesa हा सरकारनें प्रसिद्ध केलेला ग्रंथच अवश्य वाचावा.

पाद्रि आंतोनियु व्हियैर हा एक गतकालीन जेजुईट कंपनींतील सभासद असून मोठा राजकारणी, लेखक व वक्ता होता. सन १८९७ सालीं लिजबोअ येथें त्याचा त्रिशत सांवत्सरिक उत्सव सरकारतर्फे साजरा झाला. त्या उत्सवांत पाद्रि व्हियैर विषयीं बोलण्याचा मुख्य मान यॅव्होर येथील आर्चबिशपला मिळाला. त्या प्रसंगीं त्यानें आपल्या व्याख्यानांतून पुढील उद्गार काढले: —

"इंकिझिसांवचा सर्वच ठिकाणचा कारभार जरी लज्जास्पद व बेअब्रुकारक होता, तरी ऐहिक फायद्यासाठीं करण्यांत येणाऱ्या त्यांच्या हलकटपणास व निंदास्पदतेस गोव्यांत जसा ऊत आला तसा तो इतरत्र आला नाहीं." (सदर ग्रंथ पृ. ५३).

ख्रिस्तीकरणाच्यावेळीं स्थलांतर झालेल्या कांहीं देवतांची माहिती Tombo Geral मध्यें डॉ. पिसुर्लेकर यांनीं खालीलप्रमाणें दिली आहे:—

तिसवाडींतील आजोशीच्या लक्ष्मीनारायणाची मूर्ति कुंडई येथें नेऊन स्थापन केली. चिंबलची भगवती माशेलला नेण्यांत आली. चोडण येथील देवकीकृष्ण प्रथम मयें येथें व नंतर माशेलला नेण्यांत आला. नावेली येथील गणपतीची मूर्ति प्रथम खांडेपार येथें नेण्यांत आली व नंतर ती फोंडें येथें नेली. येळ्ळा येथील गणेशाची मूर्ति खंडोळें येथें नेण्यांत आली. गांवशी येथील दुर्गादेवी मडकईला नेण्यांत येऊन तिला नवदुर्गा असें नांव दिलें.

थोरलें गोवें येथील चामुंडेश्वरी, गोवेश्वर, कालभैरव, क्षेत्रपाल व निरंकार या मूर्ति ओरगांव (पिळगांव) येथें स्थापन झाल्या. जुवें येथील सांतेरी, क्षेत्रपाल व रवळनाथ या मूर्ति खंडोळ्याला नेल्या. तळावली येथील शांतेरी व रवळनाथ या देवता माशेलला स्थापन झाल्या. शांतादुर्गा तळावलीकरीण हीच ती शांतेरी होय.

साष्टींतील आरशीच्या भोगेश्वराची व कोलवें येथील रवळनाथाची या मूर्ति तळावली (फोंडें) येथें नेल्या. बाणावली येथील बाणेश्वरादि साऱ्या मूर्ति अउर्से (कारवार) येथें नेण्यांत आल्या. कुठ्ठाळी येथील मंगेश व इतर मूर्ति मंगेशीं (प्रियोळ) येथें स्थापन झाल्या. कुंकळ्ळीची शांतेरी शांतादुर्गा या नावानें फातर्पेला स्थाईक झाली. कुतरीच्या शांतेरी व चंडेश्वरी या मूर्ति

घुडा (अवेडें) येथें आणल्या.

लोटली येथील लक्ष्मीनारायण, रामनाथ, शांतेरी, कामाक्षी, बेताळ इ. मूर्ति रामनाथीं--बांदिवडें येथें नेऊन स्थापन करण्यांत आल्या. वामनीयांची मूर्ति मात्र धवळी येथें नेली. रामनाथाची मूर्ति लोटली येथें 'रामनाथाच्या देवळाचें कुळागर' या जागीं होती. मडगांव येथील रामनाथ, दामोदर, चामुंडेश्वरी इ. मूर्ति जांबावली रिवण येथें नेऊन स्थापन केल्या. रामनाथाचें देऊळ मडगांवला बर्डे येथें होतें (याच जागीं आज चर्च आहे). दामोदराचें देऊळ तेथून जवळच पण म्हाड्ड या वाडीत होतें. चामुंडेश्वरीचें कोम वाडींत व लक्ष्मीनारायणाचें फातर्डे येथें होतें.

"मडगांव येथील देवालय मोठें व फार मजबूत होतें," असें इ. ले. Gaspar Correia यानें लिहिलें आहे. (Lendas III पृ. ६४६).

नागवें येथील भगवती माशेलला आणि शांतेरी, ईश्वर, नारायण या देवता अंकोला येथें नेल्या. केळोशीची शांतेरी, नारायण, ईश्वर, भगवती इ. देवतांची कवळें येथें स्थापना झाली. आजची शांतादुर्गा हीच मूळची शांतेरी होय. या देवता केळोशी येथें 'देवळाचें भाट' या वाडींत होत्या. राय येथील कामाक्षा, रायेश्वर इ. मूर्ति शिरोडें येथें नेऊन स्थापन केल्या. सांकवाळची विजयदुर्गा केरी येथें स्थापन झाली व नरसिंह वगैरेंची वेलिंगला स्थापना करण्यांत आली. वेर्णेच्या म्हाळसा देवीला व शांतेरीला म्हाडदोळला नेण्यांत आलें. "वेर्णेचें चर्च शांतेरीच्याच देवालयाच्या जागीं उभारण्यांत आलें." असें Oriente Conquistado मध्यें लिहिलें आहे.

बार्देज मधील हळदोणेच्या भगवतीची मूर्ति खंडोळ्याला आणि नारायण, शांतेरी, सिद्धनाथ इ. मूर्ति माशेलला स्थापन झाल्या. भूमिका, भगवती, सटी, शांतेरी, मल्लिकार्जून वगैरे आसगांवच्या देवता मांद्रें (पेडणें) येथें नेण्यांत आल्या. कांदोळीची शांतादुर्गा व इतर देवता नांदोडें येथें नेल्या. मात्र येथील वेताळाला पाल गांवीं नेलें. मळडें येथील देवतांच्या कांहीं मूर्ति मूळगांवला नेऊन स्थापन केल्या. नेरूल येथील शांतेरीची (श्रीशांतादुर्गेची) मूर्ति ख्रिस्तीकरणाच्यावेळीं मांद्रें येथे नेण्यांत आली होती, ती १९१० सालीं पुनः नेरूलला आणण्यांत आली. शांतादुर्गेच्या मुळच्या देवालयाच्या जागीं सन १५६९ सालीं पाद्रीलोकांकडून चर्च उभारण्यांत आलें.

ओशेलची शांतेरी चोपडें येथें व पर्‍हीचा देव अडवलपाल येथें स्थापन झाला. पिळर्ण येथील शांतेरीची मूर्ति नार्वेला स्थापन करण्यांत आली. पोंबुर्पे येथील रवळनाथाला मूळगांव येथें नेण्यांत आलें. सांगोळडें येथील शांतादुर्गा इ. देवतांची बर्डे (डिचोली) येथें स्थापना झाली. शिवोलीची शांतेरी मोर्जीला नेण्यांत आली, व त्या जागीं चर्च उभारलें गेलें. सिरसई येथील महालक्ष्मीची मूर्ति धारगळ येथें नेण्यांत आली; आणि सिरला येथील देवांच्या मूर्ति मूळगांवला नेऊन तेथें त्यांची स्थापना करण्यांत आली.

साष्टींतील भग्न देवालयांच्या सरकारजमा झालेल्या जमिनीपैकीं कांहीं, देवळांचा विध्वंसक दियोग रुद्रीगिस् यास बक्षिसादाखल देण्याचें ठरलें; पण तो त्याच सालीं म्हणजे १५६७ तच वारल्यानें त्या त्याच्या बायकोस मिळाल्या. तिनें त्या एका ख्रिस्त्यास व त्यानें पुढें मिझेरीकोर्द संस्थेस दिल्या.

जुन्या गोव्याचा उत्कर्ष व ऱ्हास

इतिहासकालांत राजधानीचा मान मिळाल्यामुळें ज्या शहरांची विशेष भरभराट झाली त्यांत पहिलें चंद्रपूर म्हणजे तूर्तचें साष्टींतील चांदर, दुसरें कदंबांची नवीन राजधानी गोपकपट्टण म्हणजे तिसवाडींतील हल्लींचें थोरलें गोवें (Goa Velha) आणि तिसरें गोवें म्हणजे हल्लींचें जुनें गोवें (Velha Gôa) होय.

गोवें नगरच्या वसाहतीस कधीं आरंभ झाला हें निश्चितपणें सांगतां येणें शक्य नसलें; तरी चौदाव्या शतकांत पहिल्या मुसलमानी राजवटींत तेथें बरींच मुसलमान कुटुंबें राहात होतीं. (As Primitivas Capitais de Gôa—डॉ. पां स. पिसुर्लेकर).

मुसलमानी हल्ल्यामुळें गोपकपट्टणचें महत्व कमी होत चाललेंच होतें; त्यांत बहामनी कारकिर्दीत मलीक हुसेननें जहाजांच्या रहदारीस योग्य अशी सोय गोवें बंदरांत केल्यापासून गोवें नगरलाच विशेष महत्व येऊं लागून त्या शहराच्या प्रगतीस आरंभ झाला.

ज्या नदीच्या तीरावर गोवें शहर वसलें, त्या नदीला मुसलमान कालांतहि मांडवी हेंच नांव असून तेथें त्यांचें एक जकात नाकेंहि होतें असा उल्लेख मिळतो. बहामनी सत्तेनंतर युसूफ आदिलशहानें गोमंतक घेतल्यावर गोवें शहर हीच या प्रांताची आपली राजधानी केली. आदिलशाहींत जुन्या गोव्याची रचना व्यवस्थित व सुंदर असून शहराची लांबी पाऊण मैल व रुंदी पाव मैलापेक्षां थोडी कमी होती. शहराभोंवतीं मोठा तट असून त्याला चार दरवाजे होते. तटाच्या आंतील आदिलशहाचा वाडाहि प्रशस्त व सुंदर होता.

आदिलशाहींत या शहरांत मुसलमानांची मोठी रहदारी सुरू झाली. अनेक मुसलमान कुटुंबें येथें येऊन स्थायिक झालीं. नाविक हालचालीमुळें तर व्यापारहि बराच वाढत चालला. त्यावेळीं "गोवें शहराचें उत्पन्न आदिलशहाला एक लक्ष पार्दाव येई" असें इतिहासकार जुआंव द बार्‍हुस् म्हणतो. पार्दाव याला प्रताप असेंहि म्हणत. हें नाणें सोन्याचें व गोल आकाराचें होतें.

सन १५१० सालापासून गोवें ही पोर्तुगिजांची हिंदुस्थानची राजधानी झाली. त्यावेळेपासून तर त्या शहराची विशेष भरभराट होत गेली. (Oriente Português no. I, Serie II).

पोर्तुगिजांनीं पोर्तुगाल येथून मोठे कुशल शिल्पकार येथें आणून फार मजबूत व सुंदर अशा अनेक इमारती बांधल्या. सांत कायतान, बों जेजूस, सांत आगोस्तीन, सां. फ्रांसिस्क द आसीज, से पात्रिआर्काल, पालासिअ द इंकिझिसांव, (धर्मसमिक्षण सभेचा वाडा. या वाड्यास तत्कालीन गांवठी लोक दरार्‍यामुळें 'थोरलें घर' असें म्हणत.), आर्सेनाल, पालासिअ द व्हिसिरै (व्हाइसरॉय वाडा) वगैरे इमारती फार प्रसिद्ध होत्या. आजहि ज्या उभ्या आहेत त्यांतील चार पांच बर्‍याच प्रेक्षणीय दिसतात. पैकीं सांत कायतानची इमारत रोमच्या सेंट पिटरच्या धर्तीवर बांधलेली असून सुंदर दिसते. बोंजेजूसची इमारतहि पाहाण्यासारखीच असून तिच्यांतच सां. फ्रांसिस्क शाव्हियेरची शवपेटी आहे.

गोवें शहरांत त्या वेळीं अंदाजें चार लाख लोकवस्ती होती. शहराचा कांहीं भाग सपाट व कांहीं भाग टेंकडीवर वसलेला होता त्यामुळें, घरांच्या सुंदर रचनेमुळें आणि मोहकता व

संपन्नता यांमुळेंहि पोर्तुगिजांनां तें शहर आपल्या लिजबोअ शहरासारखें वाटे. 'Quem viu Gôa escusa de ver Lisboa' (ज्यानें गोवें पाहिलें, त्याला लिजबोअ पाहण्याची आवश्यकता नाहीं) ही म्हण त्याच वेळीं पडली.

आदिलशहाच्या अमदानींत गोवें येथें सरकारी गोदींत व्यापारी व लढाऊ जहाजें बांधण्यांत येत असत. पोर्तुगिजांनीं त्या गोदीची सुधारणा व वाढ करून तेथें शेंकडों लढाऊ जहाजें बांधलीं. दारूगोळा, तोफा इत्यादि बनविण्याचा मोठा कारखाना सुरू करून त्याचा फार मोठा व्यापार केला.

सां. पाउल कॉलेजमध्यें पाद्री तयार करण्याची जेजुइतांनीं व्यवस्था केली होती. त्यांत पाद्री होऊं इच्छिणारे सुमारें आठशें ख्रिस्ती विद्यार्थी शिक्षण घेत असत. पुढें या पाठशाळेंतून लॅटिन भाषा, तत्त्वज्ञान, नीतितत्त्वें, ईश्वरविषयक ज्ञान (Teologia) असें शिक्षण मिळूं लागलें आणि दिवसेंदिवस कॉलेजची मोठी भरभराट होत गेली!

सतराव्या शतकाच्या प्रथम दशकांत गोव्यांत आलेला प्रसिद्ध फ्रेंच प्रवासी पिरार्द लाव्हाल म्हणतो कीं, "सां पाउल कॉलेजमध्यें तीन हजारांवर विद्यार्थी शिक्षण घेतांना पाहिलें."

या कॉलेजमध्यें सन १५५६ च्या अखेरीस आणलेला छापखाना हाच गोव्यांतील पहिला छापखाना होय. हा छापखाना सन १५५७ त जेजुइतांनीं सुरू केला. त्याचसालीं पहिल्या प्रथम त्यांनीं Conclusiones Philosophicas या ग्रंथाचें मुद्रण केलें. आरंभीं या मुद्रणालयांतील छपाईचें काम Juan Bustamante या स्पॅनिश व L. Fernandes या पोर्तुगीज अशा दोघां इसमांकडून होई. पुढें सन १६५४ सालीं याच छापखान्यांतून फादर स्टिफन्सचें ख्रिस्तपुराण व इतर पुष्कळ ग्रंथ छापून निघाले.

गोवें शहरांतील रुग्णालयाची कीर्ति तर जगभर पसरली होती. आपल्या कामांत हुशार असा डॉक्टर वर्ग, उत्कृष्ट औषधें, सुधारलेली साधनसामुग्री यांमुळें रुग्णालयाची फार प्रशंसा झाली होती. सदर फ्रेंच प्रवासी पिरार्द यानें त्या हॉस्पिटलचें आपल्या इतिहासग्रंथांत फार चांगलें वर्णन केलें आहे.

पोर्तुगीज आल्यापासून गोवें बंदराचाहि पूर्वींपेक्षां बराच जास्त उत्कर्ष झाला. त्या बंदरांतून विविध प्रकारचा व्यापार मोठ्या प्रमाणांत होऊं लागला. त्या व्यापाराबद्दल Padre Manuel Godinho या सन १६६३ मध्यें गोव्यांत आलेल्या प्रवाशानें आपल्या पुस्तकांत विस्तृत माहिती दिली आहे. तो म्हणतो— "गोवें बंदरांत जपानहून चांदीनें भरलेलीं जहाजें येत. चीन येथून सोनें, रेशीम वगैरे माल येई. मलाकाहून लवंग, सोंद्याहून अक्रोड, बंगालहून सर्व प्रकारचा उंची कपडा, पेगू येथून जवाहीर, सिलोनहून दालचिनी, मसुलीपट्टणचीं वस्त्रें, मायनर येथून मोतीं, जाफनापट्टणहून हत्ती, कोचीनकडील सागादि इमारती लांकूड, मलबारहून मिरची व सुंठ, बोर्निओ येथून कापूर, अरबी घोडे वगैरे माल येई. मदुरा, खंबायत, चौल, पर्शिया, आफ्रिका ओर्मुज, दिव, मलाका इत्यादि भागांतूनहि मोठा व्यापार चाले."

Fr. João dos Santos हा आपल्या Ethiopia Oriental या सन १६०८ मध्यें प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत लिहितो— "गोवें बंदरांत जवळ जवळ अर्ध्या जगांतील व्यापारी जहाजांची फार मोठी रहदारी असे. त्या जहाजां-

तून सोनें, चांदी, मोतीं, जवाहीर, तलम कपडा, औषधें वगैरे विविध प्रकारचा माल भरून येई."

गोव्यांतून वर घांट वगैरेकडेहि निरनिराळा माल मोठ्या प्रमाणांत रवाना होई. विजयनगरकडे जाणाऱ्या जिन्नसाचें प्रमाण तर औरच होतें. अरबी घोडे, दारूगोळा, मसाल्याचे जिन्नस वगैरेसाठीं विजयनगर हें गोव्याचें मोठें गिऱ्हाईक होतें. तिकडूनहि कित्येक माल गोव्यांत येई.

अशीं जीं गोवें नगरचीं तत्कालीन अनेक वर्णनें उपलब्ध आहेत त्यांवरून पाहातां हें शहर म्हणजे एक युरोपियन शहरासारखेंच होतें. व्हॉइसरॉय वगैरे अधिकाऱ्यांचा थाट तर डोळे दिपण्याखारखा होता. शहररचना सुंदर असून घरापुढील बागा मनोहर होत्या. त्या बागांतून आशिया, युरोप, आफ्रिका, ब्राझील इ. देशांतून आणलेलीं अनेक प्रकारचीं फुलझाडें व फळझाडेंहि लावलेलीं होतीं.

अननस, काजू, आंबा-कलमें, तंबाकू, पपई वगैरे झाडें पोर्तुगिजांनींच गोव्यांत आणलीं. काजूचें झाड व कॉफीचें झाड त्यांनीं ब्राझिल येथून सन १५४५ च्या सुमारास आणलें. करमर (करंवल), बिंबल, दुधभोपळा (कोंकणदुदी), निरफणस हीं त्यांनीं मलाका येथून गोव्यांत आणलीं. रातंबें (कोकम), बटाटा, रताळें, मुळा, छोटे जांभ, सुरण, कांटेकणंग, तांबडा कांदा, डाळिंब, नारिंग, पपनस, राजआंवळी, फारिंग, लवंगी मिरची वगैरे पोर्तुगिजांनींच गोव्यांत आणली. आबोली, सफेत चांफा, रोजीण, इत्यादि अनेक फुलझाडेंहि त्यांनीं आणलीं.

अननसचें झाड D. Constantino de Bragança या व्हॉइसरॉयनें सोळाव्या शतकाच्या मध्यार्धात ब्राझीलहून इकडे आणलें.

पाश्चात्य वैद्यक, कलमें करण्याची कला, खुर्ची, टेबल, आलमार, इ. फर्निचरपद्धत, पाव-बिस्किटें बनविण्याची माहिती इ. फिरंग्यांचेंच आहे.

पोर्तुगिजांनीं गोव्यांत तयार केलेलीं कलमी आंब्याचीं झाडें तर उत्कृष्ट होत. इकडील जमीन त्या कलमी झाडांना इतकी मानवली कीं, गोव्याइतका रुचकर कलमी आंबा फार करून दुसरीकडे दिसत नाहीं. कलमें करण्याची त्यांची पद्धतहि छान होती. त्यांनीं विविध प्रकारचीं कलमें तयार केलीं, व त्यांच्याच नांवानें पुढें त्या त्या आंब्याची जात ओळखूं लागले. कुलास, फुर्ताद, शाव्हियेर, आफोंस वगैरे कित्येक आंब्यांचीं नांवें त्या त्या कलमवाल्यांचींच उपनांवें होत.

फिरंग्यांच्या शिल्पकलेचा नमुना तर जुन्या गोव्यांत आज उभ्या असलेल्या इमारतींवरूनच अजमावतां येतो. त्यांचे इंजिनियर गोव्यांतच नव्हे; तर विजयनगर येथेंहि अनेक शिल्पकामांत प्रमुखत्वानें वावरत. विजयनगरच्या राजवटींत तुंगभद्रा नदीला धरण बांधून तिचें पाणी कालव्यानें कुशलतेनें नगरभर खेळविलें त्या कामाचे इंजिनियर पोर्तुगीजच होते.

फिरंग्यांनीं शिक्षणाचीहि सोय केली; पण त्याचा योग्य फायदा मात्र सर्वसाधारण जनतेला मिळूं शकला नाहीं. त्याचें कारण एक तर तें पोर्तुगीजमधून होतें व दुसरें म्हणजे शिक्षण व्यवस्था त्यांनीं धर्माध्यक्षांच्याच ताब्यांत दिली होती. त्यामुळें विद्यालयांतून देखील धर्मप्रसाराचे पेंचप्रसंग उद्भवण्याचे संभव जनतेला दिसत. Seminário de Santa Fé हें विद्यालय तर मिशनरी व धर्मप्रसारक तयार करण्यासाठींच सुरू केलें होतें.

मुसलमान कालापासून राजधानीचें वैभव प्राप्त झालेल्या; व्यापारी रहदारींत प्रसिद्धी मिळविलेल्या आणि फिरंग्यांच्या आगमनापासून विशेष भरभराटत चाललेल्या त्या गोवें शहराचा त्यांच्याच अंमदानींत ऱ्हासहि झाला! त्याचीं अनेक कारणें इतिहासकार देतात. Sasseti या तत्कालीन इटालियन प्रवाशानें जीं कारणें दिलीं आहेत त्यांतील प्रमुख म्हणजे ख्रिस्तीकरणाचा प्रताप हें होय. खरोखरच ख्रिस्तीकरणाच्या धुमाळीमुळें हजारों हिंदु लोक परागंदा झाले. हिंदु जमीनदार गेले; हिंदु व्यापारी गेले; हिंदु शेतकरी गेले; हिंदु कारागिर गेले; हिंदु नावाडी गेले; मच्छिमारी धंद्यांतील हिंदु लोक पळाले आणि त्यामुळें सबंध गोवा बेटालाच ओसाड स्वरूप प्राप्त झालें.

"विजयनगरचें राज्य मोडकळीस आल्यानें गोव्याच्या व्यवहारास ओहोटी लागली" असें Diogo do Conto यानें लिहिलें आहे. विजयनगरकडे गोव्याचा फार मोठा व्यापार चालत होता हें तर प्रसिद्धच आहे.

गोवें नगरचा अशा रीतीनें झपाट्यानें ऱ्हास होत चालला असतांनाच तेथें एका भयंकर सांसर्गिक रोगाची सांथ आली आणि लोक हैराण होऊं लागले. त्यामुळें प्रमुख अधिकाऱ्यांनीं आपला मुक्काम पणजी येथें बदलला. सन १७५९ सालच्या डिसेंबरच्या १ ल्या तारखेस गोवें सरकारची राजधानीहि पणजी येथें नेण्यांत आली. त्या वेळेपासून पणजीला 'नवा-गोवा' आणि या गोवें शहराला 'जुना-गोवा' अशीं नांवें मिळालीं. आदिलशहाच्या पणजीच्या सुंदर व मजबूत किल्ल्याचें योग्य सुधारणेनें राजवाड्यांत रूपांतर करून तीच गव्हर्नर जनरलची पॅलेस थाटली. सध्याची पॅलेस ती हीच.

पुढें सन १७७४ त जुन्या गोव्यांतून ठळक ठळक कुटुंबेंहि नगर सोडून दुसरीकडे गेलीं. त्यांच्यामागून सर्वसाधारण धंदेवाले व इतर लोकहि गेले, आणि मग शहर बसतच चाललें.

सरकारनें पुनः शहर वसविण्याचा प्रयत्न केला. ग्रामसंस्थांनां (Comunidades) त्यासाठीं आठ लाख असर्फ्या म्हणजे चार लाख रुपये खर्च करण्यासहि भाग पाडलें; तथापि तो उपक्रम फलप्रद न होतां जुनें गोवें शहराचा ऱ्हासच होत गेला.

सन १७५९ पासून पणजीच्या पॅलेसमध्यें गव्हर्नर जनरलची कचेरी व निवासस्थान झालें. काबच्या पॅलेसची व्यवथा त्यानंतरची आहे. १६ व्या शतकांत काब येथील इमारत फ्रांसिस्कान पाद्रींनीं आपणासाठीं Convento म्हणून बांधली होती. तिच्या भोंवतीं तटबंदीहि होती. पुढें १७ व्या शतकांत आर्चबिशपनें तें आपलें उन्हाळ्यांतील हवेचें स्थान बनवलें. सन १८१६ च्या दरम्यान Conde de Rio Pardo या गव्हर्नरनें ती इमारत सुधारून स्वतःच्या निवासस्थानाची तेथें व्यवस्था केली. तथापि आर्चबिशपचा तिजवर ताबा होताच. सन १८५५ त सरकारी खर्चानें दुरुस्ती करून त्या इमारतीला वाड्याचें स्वरूप दिलें. तेव्हांपासून गव्हर्नर जनरलचें तें उन्हाळ्यांतील मुक्कामाचें ठिकाण बनलें होतें; आतां त्यांचें तें नेहमींचेंच निवासस्थान झालें आहे.

श्रीशिवाजींची सत्ता

आदिलशाही सत्तेंतील कुडाळ प्रांत श्रीशिवाजींनीं घेतल्यावर कुडाळचे देसाई लखम सावंत यानें मराठ्यांशीं दोस्ती करून आपलें देसाईपद कायम टिकविण्यासाठीं सन १६५९ सालीं तह केला. तथापि अवघ्याच महिन्यांनंतर विजापूरकरांस मिळून तो श्रीशिवाजींवर पुनः उलटला. या कारणामुळें श्रीशिवाजींनीं सन १६६० च्या फेब्रुवारींत कुडाळ किल्ल्याचा ताबा घेतला.

दुसऱ्या माहेच्या मध्यावर लखम सावंत यानें पुनः कारस्थान करून विजापूरकराचा सरदार रुस्तुमजूम याच्या सहाय्यानें तो किल्ला परत मिळविला.

सन १६५८ पासून कुडाळ, मणेरी, पेडणें, डिचोली, सांखळी व फोंडें हे भाग श्रीशिवाजींच्या ताब्यांत होते; पण पुढें रुस्तुमजूमच्या विजयामुळें ते आदिलशाही सत्तेंत आले.

लखम सावंताजवळ बारा हजार लोक होते (सभासद बखर); शिवाय त्याला आदिलशहाचें सहाय्य होतें. असें जरी असलें, तरी श्रीशिवाजींचें त्याला फार भय वाटे. त्यामुळें सन १६६१ सालीं त्यानें फिरंग्यांशीं सख्य सुरू केलें आणि मराठ्यांनी कुडाळवर पुनः हल्ला केल्यास गोव्यांत आपणास आश्रय मिळावा अशी विनंति केली.

त्या विनंतीप्रमाणें फिरंगी सावंताला जरी सहाय्य करी, तरी ज्या पेडणें व बतग्राम भागाची वहिवाट अनुक्रमें केशव नाईक, केशव प्रभु व रवळू शेणवीं हे पाहात त्या प्रांतांचा ताबा घेण्यास सावंतास फिरंग्यांकडून संमति मिळाली नाहीं.

सन १६६३ च्या जून माहेच्या सुरवातीस श्रीशिवाजींनीं पुनः कुडाळवर स्वारी करून तो प्रांत घेतला. त्यामुळें वेंगुर्लें येथील लोक व सांखळी, डिचोलीचे आदिलशहाचे सुभेदार मराठ्यांच्या भीतीनें पळून गेले.

लखम सावंतहि आपल्या ६०० शिपायांनिशीं घाटाच्या आसमंतांतील अरण्यांत वास्तव्य करूं लागला.

त्यावेळीं फक्त फोंडें वगळून आदिलशहाचे कोंकणच्या दक्षिणेकडील सर्व प्रांत श्रीशिवाजींनीं पादाक्रांत केले होते.

रावजी पंडित या आपल्या विश्वासू अधिकाऱ्याला कुडाळचा सुभेदार नेमून श्रीशिवाजी राइरीस निघून गेला.

कांहीं दिवसांनंतर त्र्यंबक काळो या आपल्या फोंडें येथील अधिकाऱ्याला आदिलशहाकडून असा हुकूम आला कीं— "लखम सावंत (कुडाळ), केशव नाईक, केशव प्रभु (पेडणें), रवळू शेणवीं (डिचोली) व चंदा राग (सांखळी) यांच्या सहाय्यानें शिवाजींकडील प्रांत परत मिळवावे." तथापि त्र्यंबक काळोला धीर झाला नाही.

सन १६६४ सालीं जूनच्या सुरवातीस आदिलशहाकडून कोंकणचा सुभेदार म्हणून फोंडें येथें सिद्दी सरवार (शेरूर) याची नेमणूक झाली व तो पुढें मराठ्यांच्या चकमकींत कामास आला.

श्रीशिवाजींचा मुक्काम ससैन्य कुडाळ प्रांतांतच होता. अशा वेळीं मोठा धीर करून लखम सावंतानें विजापूर दरबारांत कळविलें कीं— "दरबारचें लष्करी सहाय्य आल्यास मी माझ्या बारा हजार सैन्यासह श्रीशिवाजींवर चाल करून कोंकण सोडवितों." (सभासद बखर). त्याच्या विनंतीप्रमाणें दहा हजार पायदळ व पांच हजार घोडदळ यांसह आदिलशाही सरदार खवासखान श्रीशिवाजींवर चाल करून आला.

सावंतहि त्यांत सामील झाला. दोन्हीं सैन्यांत मोठी चकमक उडाली. सुरवातीस जयाचें पारडें खवासखानाकडे कललें; तथापि अवघ्याच दिवसांत श्रीशिवाजींच्या सैन्यानें जो नेटाचा सामना दिला त्यांत खवासखानाचा पूर्ण पराभव झाला. सावंत पळाला आणि खवासखाननेंहि कोंकणांतून पळ काढून ता. १३-१२-१६६४ रोजीं विजापूर गांठलें. शिवाजीनें विजापुराजवळपर्यंत त्याचा पाठलाग केला. खवासखानच्या मदतीस आलेल्या बाजी घोरपडे यासहि श्रीशिवाजींनीं चांगलें पाणी पाजलें.

मराठी कागदपत्रांतून व आंतोनियु द् मेलु द कास्त्र या पोर्तुगीज व्हिसिरैकडूनहि वर्णन करण्यांत आलेला त्या मराठ्यांच्या राजांचा हा पराक्रम सुप्रसिद्ध आहे (Antigualhas—Shivaji no Concão, पृ. ११४— डॉ. पिसुर्लेकर).

खवासखानच्या पराभवामुळें फोंडेंखेरीज विजापूरकराचा सारा कोंकणप्रांत परत श्रीशिवाजींच्या सत्तेंत आला.

सन १६६५ च्या मध्यकालांत श्रीशिवाजी जयसिंगाशीं युद्धांत गुंतला असतां खवासखानाचा भाऊ महंमद इकलासखान या सेनापतीच्या नेतृत्वाखालीं विजापूरकराची फौज दक्षिण कोंकणांत उतरली व कोंकणचा बराच भाग ताब्यांत घेतला. तथापि ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत फिरून चढाई करून श्रीशिवाजींनीं तो परत मिळविला. फक्त वेंगुर्लें व कुडाळ हे भाग मात्र आदिलशाही सत्तेंत राहिले.

सन १६६६ च्या फेब्रुवारी व मार्च महिन्यांत आदिलशाहींत असलेल्या फोंडें येथील किल्ल्यास श्रीशिवाजींनीं वेढा दिला. व्हिसिरै मेलु द कास्त्रु ८ मार्च १६६६ च्या आपल्या पत्रांत चौल येथील कॅप्टनास लिहितो कीं —

" रुस्तुमजूम फोंड्याच्या मदतीस आला... (शिवाजीस) चांगलाच धोका पोंचला. तो तूर्तचें ठाणें व सबंध कोंकणप्रांत सोडून जाईल असें वाटतें.''

आणि खरोखरच रुस्तुमजूमनें त्यावेळीं फोंडें, कुडाळ, बांदा, सांखळी डिचोली हीं कोंकणचीं प्रमुख पांच शहरें परत मिळविलीं. फोंडेंचा किल्ला तर आदिलशहाकडेच होता.

गोव्यांत आश्रयार्थ आलेले देसाई फोंडेंच्या किल्ल्यांतील लोकांस येऊन मिळाले. व्हिसि रै कास्त्रु यानें ९ ऑक्टोबर १६६६ च्या आदिलशहास लिहिलेल्या आपल्या पत्रांत या गोष्टीचा उल्लेख केला आहे.

सन १६६६ च्या अखेरीस विजापूरकरानें श्रीपतराव याला कोंकण प्रांताचा सुभेदार नेमून श्रीशिवाजींकडून इतर भाग परत मिळविण्याची त्याला खास कामगिरी सांगितली आणि त्याच्या मदतीसाठीं मियां अब्दुल महंमद या सेनापतीची नेमणूक केली.

स. १६६६ च्या मार्चच्या उत्तरार्धात श्रीशिवाजी आग्रा येथें मोंगलांच्या दरबारांत गेला होता; तो त्याच सालीं नोव्हेंबरच्या अखेरीस परत आला. मोंगलांच्या कैदेंतून शिवाजी ज्या युक्तीनें सुटूं शकला ती हकीगत रोमांचकारीच आहे. (पहा— House of Shivaji— सर जदुनाथ सरकार).

श्रीशिवाजी व त्याचा मुलगा संभाजी हे दोघे करंडींत बसून आग्र्याहून निसटले आणि रायगडावर परत आले. श्रीशिवाजींचें नशीब नेहमींच बलवत्तर असे. ते मोठे चाणाक्ष, धोरणी व शूर होते. कोंदि द सां व्हिसेंत या व्हिसिरैनें त्या संबंधीं पोर्तुगालच्या राजास लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे. त्यावर तारीख

नाहीं; तथापि तें १६६७ च्या आरंभीं लिहिलें असावें असें वाटतें.

शिवाजी रायगडावरून इकडे परत आल्यानंतर अवघ्याच दिवसांत पोर्तुगिजांच्या ताब्यांतील गोवें (जुनी काबिजाद) व आदिलशहाचें फोंडें हे भाग खेरीज करून दक्षिण कोंकणचा सर्व मुलुख त्यानें काबीज केला. फोंडें किल्ल्याच्या कक्षेतील कांहीं गांवेंहि त्यावेळीं शिवाजीच्या ताब्यांत आलीं असावींत असें वाटतें.

या कालापर्यंत डिचोलीचे देसाई पनवेल येथें, पेडणेचे कोलवें येथें व कुडाळचे कांदोळी येथें असे फिरंगी हद्दींत आश्रयार्थ वास्तव्य करीत होते. पेडणेकर देसाई कित्येक वेळां पेडण्याकडे जाऊन आपल्या शत्रूंना भंडावीत होते.

पोर्तुगीज हद्दींत आश्रयार्थ असलेल्या व पुनः पुनः आपल्या लोकांस त्रासणाऱ्या त्या देसायांनां पकडण्यासाठीं १६६७ च्या नोव्हेंबरच्या १९ ते २० तारखेच्या रात्रीं पांच हजार पायदळ व एक हजार घोडदळ अशा फौजेनिशीं श्रीशिवाजी बार्देसवर चाल करून आले. ता. २० ते २२ पर्यंतच्या तीन दिवसांत मराठ्यांनीं बार्देसमधील कित्येक गांवें काबीज केलीं व १६०० लोकांनां पकडून नेलें. तीन पाद्री व कांहीं ख्रिस्ती यांनां धडावेगळें केलें.

व्हिसिरै कोंदि द सां व्हिसेंत याला १५ नोव्हेंबर रोजीं शिवाजी बार्देसवर चाल करून येत असल्याची बातमी लागल्यामुळें त्यानें आपल्या सेक्रेटरीस त्याच दिवशीं पत्र लिहिलें कीं—" शिवाजीचे लोक व आरमार येत असल्याची मला आतांच बातमी मिळाली आहे. तरी शापोरा (कायसूअ) व तिव्हि (थिये) येथील किल्लेदारांस सज्ज राहाण्याची सूचना द्यावी. अशीच सूचना रेवोडें व नांदोडें येथील राण्यांनां द्यावी. कारण ते प्रतिकारासाठीं तयार राहिले पाहिजेत. ज्यांचे लढाऊ लोक असतील अशा देसायांनांहि ही सूचना देणें योग्य. फेर्नांव व्हाज द सिकैर याला शिवाजीच्या आरमाराशीं टक्कर देण्यास आपलें आरमार सज्ज ठेवण्यास सांगावें." (Livro dos Reis Visinhos 1662-8, P. 64).

मराठ्यांशीं सामना देण्यासाठीं स्वतः व्हिसिरै २२ नोव्हेंबरला बार्देस येथें गेला. तो आपल्या २९-१२-१६६७ च्या पत्रांत म्हणतो —" जेव्हां मी बार्देसला पोंचलों, तेव्हां शहर न सोडण्याबद्दलचीं किती तरी कारणें उपस्थित झालीं. शत्रूशीं सामना दिला त्यावेळीं मजपाशीं सैनिक व इतर मिळून अवघे ८४ लोक होते. आम्हांला अपूर्व यश मिळावें अशी परमेश्वराचीच इच्छा होती इ." (Livro dos Reis Visinhos).

फिरंग्यांच्या आश्रयास असलेले लखम सावंत व त्याचा पुतण्या नारबा हे त्यांच्या चिथावणीवरून १५-९-१६६७ रोजीं वेंगुर्लें येथें गेले व तिकडे त्यांनीं डच व्यापाऱ्यांस त्रास दिला, त्यामुळें वेंगुर्लेच्या डच फॅक्टरीच्या वहिवाटदारानें इकडे व्हिसिरैकडे तक्रार केली व तिकडे शिवाजींनां बार्देसवर जाण्यास दारू व बंदुका पुरविल्या.

जोसेफ हिमर्सन आपल्या २ एप्रिल १६६८ च्या एका पत्रांत म्हणतो कीं – " गोव्याच्या व्हिसिरैनें जेव्हां मराठ्यांच्या राजाच्या सर्व अटी मान्य केल्या तेव्हांच त्यानें बार्देसमधील गडबड बंद केली" (English Records, P. 122).

सन १६७५ च्या एप्रिलमध्यें श्रीशिवाजींनीं विजापूरकराच्या फोंडें येथील किल्ल्याला वेढा देऊन तो काबीज केला.

बसातीन-इ-सलातीन या पर्शियन इतिहासांत फोंडा शिवाजीनें घेतल्याची तारीख १५ सफर १०८६ म्हणजे १० मे १६७५ ही आहे.

श्रीशिवाजी व पोर्तुगीज यांमध्यें ६ डिसेंबर सन १६६७ रोजीं तह झाला. त्या तहान्वयें मराठ्यांनीं बार्देसमधील कैद करून नेलेले लोक पोर्तुगीजांकडे परत केले. पोर्तुगिजांनीं लखम सावंत सरदेसाई (कुडाळ), केशव नाईक देसाई, केशव प्रभु देसाई (पेडणें), रवळू शेणवी, मल शेणवीं (भतग्राम) वगैरे कोंकणांतील देसाई गोव्यांत (फिरंग्यांच्या जुन्या काबिजादींत) राहात होते त्यांचा बंदोबस्त करण्याची हमी देऊन सन १६६८ च्या जूनच्या सुरवातीस त्यांनां गोव्याच्या हद्दीबाहेर घातलें. (Portugueses e Maratas— Shivaji p. 25. मराठ्यांच्या गोव्याकडील स्वाऱ्या, पृ. १९ —डॉ. पां. स. पिसुर्लेकर).

त्या कालांत पोर्तुगिजांचा अंमल चालू असलेल्या तिसवाडी, साष्ट, बार्देश या फक्त जुन्या काबिजादीच्या मुलखालाच 'गोवा' असें म्हणत असत.

फोंडें येथील किल्ला व त्याच्या कक्षेतील सारा मुलख श्रीशिवाजींनीं काबीज केल्यामुळें सबंध दक्षिण कोंकण म्हणजे कुडाळ, मणेरी, पेडणें, डिचोली, सांखळी, फोंडें व जांबावली पंचमहाल एवढा प्रदेश मराठ्यांच्या सत्तेखालीं आला. नवीन काबिजादीच्या इतिहासांत हा दिवस महत्वाचा गणला पाहिजे.

पुढील कालांत शिवाजींचा गोव्याला फारसा उपद्रव झाला नाहीं. ते शूर व मुत्सद्दी असल्यामुळें विजापूरकर व मोंगल यांच्याशीं लढत असतां गोवेकरांचें शत्रुत्व पत्करण्यास ते तयार नव्हते. ही गोष्ट खुद्द पोर्तुगीज व्हिसिरै António Melo de Castro यांसहि माहित होती. (Shivaji p. 7 —Dr. P. Pissurlencar).

पोर्तुगिजांनां शिवाजींची योग्यता मात्र पूर्णपणें कळून चुकली होती. प्रत्यक्ष व्हिसिरै Conde de S. Vicente यानें एका पत्रांत लिहिलें आहे कीं—"शिवाजींचीं धूर्तता शौर्य, चपळाई व शहाणपणा पाहातां त्याची सीझरशीं व अलेक्झांडरशीं अवश्य तुलना करतां येईल. (Oriente Partuguese, nos. 7, 8; 9, P. 309).

पुढें लखम सावंत यानें शिवाजी राजांची सपशेल माफी मागितल्यामुळें त्याची नेमणूक पुनः कुडाळ प्रांताच्या देसायाच्या जागीं करण्यांत आली असें सभासद बखरींत लिहिलें आहे. डिचोलीच्या ज्या देसायांनीं श्रीशिवाजी राजांकडे सलोखा केला त्यांनां मिळालेली मराठ्यांची सनदहि त्याच काळची असावी.

सदर लखम सावंत यांचे वंशज म्हणजे आजचे सावंतवाडीचे राजे होत. पेडणें येथील केशव नाईक यांचे वारस आरोबेकर देसाई हे असून डिचोलीचे रवळू शेणवीं यांचे वंशज लामगांव येथील विश्वासराव देसाई, वेरें (फोंडें) येथील सूर्यराव देसाई आणि नारवें व डिचोली येथील देसाई हे आहेत. (Shivaji — Dr. Pissurlencar पृ. १३).

श्रीशिवाजी राजे व पोर्तुगीज सरकार यांच्यांत सख्य होऊन ता. ६-१२-१६६७ रोजीं जो दोस्तीचा तह लिहिण्यांत आला तो पांच कलमी आहे. त्या तहाच्या अग्रभागीं **शर्तनामा सलाह व दोस्ती राजे शिवाजीराजे व कोंदि विजुरई**' अशीं अक्षरें आहेत. मागच्या बाजूनें "प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥ या मजकुराचा श्रीशिवाजी महाराजांचा शिक्का असून उजवीकडे "मर्यादेयं विराजते" अशा अक्षरांचा लेखनसीमेचा वाटोळा दुसरा शिक्का आहे.

संभाजीचा अंमल १

महाप्रतापी छत्रपति श्रीशिवाजी महाराज हे असाध्य आजारानें कांहीं दिवस अंथरुणावरच होते. आपला अंतसमय समीप आल्याचें पाहून त्यांनीं आपल्या प्रधानमंडळाला बोलावून आणून पुढच्या राज्यव्यवस्थेबद्दल सांगितलें. महाराज म्हणाले — "आमच्या आयुष्याची मर्यादा आतां संपली. महत्प्रयासानें संस्थापन केलेल्या या हिंदवी स्वराज्याचें हिंमतीनें व सुबुद्धीनें संरक्षण करणारा पराक्रमी पुत्र नाहीं! संभाजी वडील मुलगा राज्याचा अधिकारी, धाडसी व शूर पण त्याची बुद्धि ठीक नाहीं. महाकपटी अवरंगजेब त्याचा कसा नाश करील कळत नाहीं. कैफी मनुष्य नाश पावण्यास विलंबहि नसतो. राजाराम अल्पवयी, तो वांचला तर तो एक हें राज्य संभाळून वाढवील अशी आशा. नेता कोणीहि असला, तरी हें राज्य हिंदूंचें, हिंदूंनींच संभाळलें पाहिजे. कोणताच दगा फटका न करतां प्राणापलीकडे जपा या हिंदवी स्वराज्याला."

अखेरीस ता. ५ एप्रिल सन १६८० रोजीं चैत्र शुद्ध पौर्णिमेस रविवारीं दोन प्रहरीं 'श्रीराम' हे शब्द उच्चारून महाराज्यांनीं शांतपणें देह ठेवला. (छत्रपति श्रीशिवाजी-महाराज, ले. कृ. अ. केळूसकर).

महाराजांच्या अंतःकालीं संभाजी पन्हाळगडावर होता. शितलागौरी पूजेदिवशीं हळदी-कुंकवाच्या समारंभास राजवाड्यांत आलेल्या एका तरुण सुंदर ब्राह्मण स्त्रीला महालांत नेऊन तिजवर बलात्कार केल्याच्या अपराधाबद्दल श्रीशिवाजी महाराजांनीं संभाजीला पन्हाळगडावर स्थानबद्ध केलें होतें.

श्रीशिवाजींनां सईबाई, सोयराबाई, पुतळाबाई, सकवारबाई, सगुणाबाई, लक्ष्मीबाई व गुणवंताबाई अशा सात बायका होत्या पैकीं सईबाईचा संभाजी व सोयराबाईचा राजाराम. महाराजांच्या मृत्यूनंतर ज्येष्ठ पुत्र या नात्यानें गादीचा वारसा संभाजीकडे यावयाचा; तथापि तो गादीवर आल्यास मराठी राज्यास धोका उत्पन्न होईल असा प्रधान मंडळाला समज देऊन आपल्या राजारामास रायगड येथें गादीवर बसवण्याचें कारस्थान ता. २१ एप्रिल स. १६८० रोजीं सोयराबाईनें बेमालूम रचलें.

ही बातमी ऐकून संभाजीला साहजिक संताप आला आणि त्यानें ता. १८ जून स. १६८० रोजीं तरवारीच्या जोरावर सोयराबाईतर्फेच्या प्रमुख दोनशें लोकांचें पारिपत्य करून रायगड ताब्यांत घेतला. पुढें शुभ दिवस पाहून ता. १६ जानेवारी स. १६८१ रोजीं स्वतःला पद्धतशीर अभिषेक करून घेऊन संभाजी मराठी राज्याचा राजा झाला.

आधीं पन्हाळा येथूनच गोवा सरकारकडे त्याचा मित्रत्वाचा संबंध जुळला होता. तत्कालीन गव्हर्नर Antonio Paes de Sande याला एक पत्र लिहून तें रामोजी नाईक ठाकुर नांवाच्या आपल्या वकिलाकडे देऊन संभाजीनें त्याला गोव्याकडे पाठविलें स. १६८० सालीं मे महिन्यांत तो गोव्यांत आला आणि त्यानें मराठे व पोर्तुगीज यांमधील मैत्रीच्या तहाचीं कलमें गव्हर्नरला निवेदन केलीं. ठाकुर याला कांहीं कारणानें जास्त दिवस गोव्यांत राहातां आलें नाहीं. तहाचें काम पुरें होण्यापूर्वींच तो सरदार रायाजी पंडित यासह निघून गेला. परत जातानां पोर्तुगीजांनीं संभाजी राजांसाठीं आदरपूर्वक नजर केलेली सुवर्णकटी युरोपियन बंदूक व जरी रेशमी कापडाचीं चार बंडलें त्यानें नेलीं.

सदर कारणानें श्रीशिवाजींच्या मृत्यूनंतरहि पोर्तुगीज गव्हर्नरनें मराठ्यांच्या फोंडें प्रांतावर चढाई न करण्याची साष्टीच्या कॅप्टन जनरला वर्दी दिली.

स. १६७५त श्रीशिवाजींनीं फोंडें प्रांत घेतल्यावर फोंडें किल्ल्यावर सुभेदार म्हणून त्रिंबक पंडिताची नेमणूक केली होती. त्यामागून धर्माजी नागनाथ हा सर सुभेदार म्हणून त्या जागेवर आला. हा तेथें ता. ४ डिसेंबर सन १६८८ पर्यंत राहिला.

ता. २ ऑगष्ट स. १६८० रोजीं डिचोलीचे कांहीं मराठी सैनिक शिवोली गांवांत शिरून त्यांनीं तीन इसमांनां कैद करून नेलें; तसेंच दुसऱ्या सालच्या सुरवातीस डिचोलीचे मराठी सुभेदार मोरो दादाजी यानें गोवा शहरांत माल नेणाऱ्या कांहीं व्यापाऱ्यांनां पकडून नेलें, या कारणानें पोर्तुगीजांनीं मराठ्यांकडील संबंध तोडून त्यांकडील व्यापारी रहदारी बंद केली.

स. १६८१ च्या सुरवातीस छत्रपति संभाजी डिचोली येथें होता. आपल्या डिचोलीच्या मुक्कामांतहि संभाजीनें तहाविषयीं पुढील बोलणें केलें नाहीं. त्या संबंधीं फिरंगी गव्हर्नरानें संभाजीला लिहिलेलें ता. ४ जून स. १६८१ चें एक पत्र गोवा दप्तरांत आहे. त्याच दिवशीं गव्हर्नर António Paes de Sande यानें संभाजीचा प्रधान अनाजी पंडित यालाहि तहासंबंधीं विशेष विवेचन करून एक पत्र लिहिलें आणि स. १६८१त जून मध्यें येसाजी गंभीरराव याला संभाजीनें तहाच्या पूर्ततेसाठीं पोर्तुगीजांकडे पाठविलें. तथापि त्यानें तहासाठीं अवश्य असे संपूर्ण अधिकार आणले नव्हते. (Sambhaji—Dr. Pissurlencar)

स. १६८१ मधील जूलैच्या दुसऱ्या पंधरवड्यांत मराठ्यांचा मुख्य मंत्री अनाजी पंडित डिचोलीस आल्याचें कळून सांदि गव्हर्नरनें आपला दुभाषी नारायण शेणवी याला तहाचें काम पुरें करण्याच्या विचारार्थ त्याकडे नजराण्यासह पाठविलें; पण तहाचें बोलणें बाजूलाच राहून इतर किरकोळ प्रश्नांचीच चर्चा झाली. तथापि त्यानंतर कांहीं दिवसांनीं डिचोलीचा सुभेदार मोरो दादाजी याच्या जागीं संभाजी राजानें जिवाजी विनायक याला डिचोली व बांदा प्रांताचा सुभेदार नेमलें.

स. १६८२ च्या सुरवातीस संभाजी राजानें कारवार जवळचें अंजनद्वीप (आंजेदीव) बेट घेऊन तेथें लष्करी बंदोबस्त करण्याचें ठरविलें आणि त्या कामावर मराठा सरदार येसाजी गंभीरराव व अंकोल्याचा सुभेदार यांची योजना केली. तथापि हेरांकडून ही बातमी कळून येतांच व्हॉइसरॉय कोंदि द आल्व्होर यानें गोव्याच्या संरक्षणास अत्यावश्यक असलेलें तें महत्वाचें ठाणें हातचें गमावलें जाऊं नये म्हणून मराठ्यांचें सैन्य त्या बेटांत शिरण्यापूर्वीच सर्व सामुग्रीसह आपलें बरेंच सैन्य तेथें रवाना करून विशेष बंदोबस्त केला. त्यामुळें मराठ्यांनीं त्या बेटावर चाल करून जाण्याचा आपला विचार रहित केला.

ता. १९ एप्रिल स. १६८२ या दिवशीं डिचोलीचा सुभेदार जिवाजी विनायक हा कांहीं फौजेनिशीं अकस्मात् फिरंग्यांच्या चोडण बेटांत प्रवेशला. यावेळीं मराठे व पोर्तुगीज यांचे मैत्रीचे संबंध न तोडतां कोंदि द आल्व्होर यानें ता. २८ जुलै स. १६८२ रोजीं संभाजी राजाला सलोख्याचा एक खलिता लिहून त्यांत शाहूच्या जन्माबद्दल अभिनंदन करण्याचाच मजकूर विशेष लिहिला; आणि जिवाजी विनायकाच्या आगळिकीबद्दल ओझरताच उलेख केला.

सदर सालच्या नोव्हेंबर महिन्यांत संभाजी राजानें सुभेदार जिवाजी विनायक याला कैद करून त्याच्या जागीं मोरो दादाजी याला पाठविलें, आणि त्याला पोर्तुगिजांकडे सलोखा राखण्यास बजावलें.

स. १६८२ सालच्या डिसेंबर महिन्यांत पोर्तुगिजांनीं आपल्या उत्तरेकडील मुलखांतून मराठी हद्दींत जाण्यास मोंगलांनां वाट दिल्याचें कारण पुढें करून संभाजीनें पोर्तुगिजांविरुद्ध लढाई पुकारली आणि ता. १५ एप्रिल १६८३ रोजीं डहाणू, असेरी, सायबन व तारापूर यांवर हल्ला चढवला. मराठ्यांचा शूर सेनापति पिंगळे यानें दोन हजार घोडेस्वार व सहा हजार पायदळ अशा फौजेनिशीं चौल शहरालाहि वेढा दिला. मराठे गोव्यावरहि येतील अशा विचारानें व्हॉइसरॉयनें योग्य काळजी घेतली होती; तथापि मराठ्यांचें बरेंच सैन्य गोव्याजवळ येऊन सज्ज झालें. आणि अशा रीतीनें फिरंगी-मराठ्यांच्या मोठ्या युद्धास सुरवात झाली.

संभाजीजवळ त्यावेळीं ताज्या दमाचें बरेंच सैन्य असल्यानें पोर्तुगीजांचा मुलुख घेणें त्याला सहजसाध्य होतें. मराठ्यांच्या प्रतिकारासाठीं चौलकडे पाठविण्यास पोर्तुगीजांकडे गोव्यांत विशेष सैन्य नव्हतें. मोंगल सरदार सिद्दी याकुतखान व त्याचा बंधु कैरतखान यांनीं चौल येथें आपापलें सैन्य पाठवून फिरंग्यांनां सहाय्य दिलें; पण मराठ्यांच्या सैन्यापुढें तें अगदींच अपुरें पडलें.

संभाजीस चौलचा वेढा उठविण्यास भाग पडावें या हेतूनें व्हाइसरॉय कोंदि द आल्व्होर यानें दुर्भाटमार्गें पोर्तुगीज सैन्य फोंड्यावर पाठविलें आणि त्यानें फोंडा किल्ल्यावर अचानक छापा घातला. तथापि नऊ दिवसपर्यंत जोराचा पाऊस लागल्यानें फिरंगी सैन्यास कांहींच करतां आलें नाहीं. आणि पाऊस थांबून चढाई सुरू झाली तोंच संभाजीराजा स्वतः अफाट फौजेनिशीं किल्ल्याच्या मदतीस धांवून आल्यानें पोर्तुगीज व्हॉइसरॉयला आपलें सैन्य घेऊन परतणें भाग झालें.

यानंतर संभाजी पन्हाळगडावर जाण्याऐवजीं मोठ्या सैन्यानिशीं पोर्तुगिजांवरच चाल करून आला. त्याचा विचार साष्ट, बार्देस काबीज करून एकदमच गोवा बेटहि घेण्याचा होता. पण नदीच्या प्रचंड पुरामुळें त्याला तें साधलें नाहीं. व त्यानें जुवें येथील किल्ल्यालाच वेढा दिला. एक महाराष्ट्रीय ज्योतिषी याबद्दल लिहितो कीं—"फिरंग्यांनां त्यांच्या नशिबानेंच त्यावेळीं संभाळलें."

ता. २६ नोव्हेंबर रोजीं मराठ्यांनीं जुवेंचा वेढा उठविला; कारण शहा अलमच्या नेतृत्वाखालीं मोगल सैन्य गोव्यावर चाल करून येत असल्याची बातमी लागल्यानें ... नां यावेळीं फिरंग्यांशीं तह करणें प्रशस्त वाटलें. तहाच्या वाटाघाटीस मराठ्यांचा वकील राय कीर्तिसिंग हा फिरंग्यांकडे गेला; पण तहाबद्दलचें छत्रपती संभाजीचें खास पत्र न आणल्याच्या सबबीवर व्हॉईसरॉयनें तहाचें बोलणें सुरू करणेंच नाकारलें.

तहाची बाब बंद पडल्यानें शहा अलमचें सैन्य गोव्यांत उतरण्यापूर्वींच गोवा (तिसवाडी, साष्ट, बार्देश) हस्तगत करून एक कटकट कायमची बंद करावी असा संभाजीचा विचार झाला.

सन १६८३च्या डिसेंबरच्या ११ तारखेस मराठ्यांचे एक हजार घोडेस्वार व तीन हजार पायदळ साष्टींत घुसून एकेक गांव घेत त्यांनीं

सारा साष्ट महाल काबीज केला. त्याच दिवशीं कांहीं सैन्य बार्देसवर चाल करून जाऊन तो भागहि त्यांनीं घेतला. मराठे तब्बल महिनाभर साष्ट व बार्देसमध्यें होते. त्यावेळीं त्यांना फिरंग्यांकडून फारसा विरोध झाला नाहीं. साष्टींतील रायरतुरचा व बार्देसचे आग्वाद व रेइजमाग हे किल्ले आणि गोवा बेट इतकेंच फिरंग्यांकडे राहिलें. अखेर मराठ्यांनी बार्देसचे किल्ले घेऊन रायतुर किल्ल्यासहि वेढा दिला आणि गोवा देखील मराठ्यांच्या ताब्यांत आतां खात्रीनें जाणार असें खुद्द फिरंगी व्हिसरै कोंदि द आल्व्होर यास वाटूं लागलें. याबद्दल एका समकालीन पोर्तुगीज ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं — " संभाजीच्या सैन्यापुढें आपलें आतां कांहीं चालत नाहीं हें पाहून कोंदि द आल्व्होर यानें जुनें गोवें येथील सां. फ्रां. शाव्हियर याची शवपेटी उघडून त्याच्या हातांत आपला राजदंड दिला व यापुढें गोव्याचें रक्षण करण्याचें आपणांत सामर्थ्य राहिलें नसल्यानें सां. फ्रां. शाव्हियरनेंच त्याचें संरक्षण करावें अशी प्रार्थना केली " (Sambaji पृ. ५२ व Tumulo de S. Francisco Xavier पृ. ७, ले.–डॉ. पां. स. पिसुर्लेकर).

मूळचे आदिलशाहींतील व नंतरचे मराठ्यांचे अंकित असे तळ कोंकणचे देसाई यांनीं मात्र या लढाईंत फिरंग्यांची बाजू धरली !

' देसाई ता॥ तळकोंकण ' या मथळ्याखालीं त्या देसायांची यादी 'आझ्यूद' येथील ग्रंथसंग्रहालयांतील एका ऐतिहासिक कागदपत्रांच्या संच्यास आहे. त्या यादीचें छायाचित्र डॉक्टर पां. स. पिसुर्लेकर यांनीं Tentativas dos Portugueses para a ocupação do Concão या आपल्या पुस्तकांत दिलें आहे. तींत फोंडें, बतग्राम, पेडणें, कुडाळ, सत्तर वगैरेकडील बहुतेक सर्व देसायांचा समावेश आहे. " या सहाय्यामुळें कुडाळकर देसाई व दुलबा नाईक प्रभृति फोंडेंकर देसाई यांना फिरंग्यांच्या शिफारशीनें पुढें स. १६८८त मोंगलांच्या नोकऱ्या मिळाल्या." (मराठ्यांच्या गोव्याकडील स्वाऱ्या — डॉ. पिसुर्लेकर).

मोंगल बादशहा अवरंगजेब यानें पोर्तुगीज व्हॉइसरॉय Conde de Alvôr याला एक पत्र लिहून त्यांत संभाजीविरूद्ध आपणाकडे मैत्रीचा तह करण्याची मागणी केली होती. त्यावेळीं गोव्यांत असलेला इटालियन प्रवासी Manuchi आपल्या Storia do Mogor (II pg. 259) यांत लिहितो कीं — " या मैत्रीबद्दल मराठ्यांचा गोव्याजवळचा सारा मुलुख मोंगल बादशहानें पोर्तुगीजांस देऊं केला होता."

" गोवा दप्तरांत सदर मुलुखाबद्दलचे कागदपत्र आढळत नाहींत, तथापि व्हिसरै कोंदि द आल्व्होर याच्या १५ एप्रिल स. १६८३ च्या एका टांचणांत मोंगलांस सहाय्य केल्याच्या मोबदल्याबद्दल कोंकणचा मुलुख मागितल्याचा उल्लेख मिळतो. हें टांचण पोर्तुगालमधील आझ्यूदच्या पुस्तकालयांत Cartas do Secretário do Estado Luiz Gonçalves da Cota (51-IX-I) या संच्यास आहे. त्यालाच Conde de Alvôr याच्या अक्षराचें दुसरें जें एक टांचण आहे त्यांत इतर गोष्टींशिवाय " Pedir o Concão q nos pertence, duas vezes por conquista e hua por doação असाहि मजकूर आहे. त्यावरून कोंदि द आल्व्होरचा हेतु दिसून येतो. (Tentativas dos P. para a O. do Concão — डॉ. पिसुर्लेकर).

संभाजीचा अंमल २

मराठ्यांची सरशी व पराक्रम पाहून इकडे फिरंग्यांनां संभाजीकडे तह करणें अत्यावश्यक वाटूं लागलें आणि तिकडे शहाअलमच्या नेतृत्वाखालीं मोंगल सैन्य घाट उतरून तळ-कोंकणमधील मराठ्यांच्या मुलखावर येण्याच्या रोंखानें जवळ पोंचल्याची हेराकडून बातमी लागल्यानें मराठ्यांनांहि पोर्तुगीजांकडे लवकर तह करणें जरूरीचें वाटलें. छत्रपति संभाजीनें फिरंग्यांकडे तह करण्याचें निश्चित करून आपला प्रधान कविकलश याला त्यांकडे पाठविलें. या मराठे-पोर्तुगीजांच्या तहाचा आराखडा ता ७ जानेवारी सन १६८४ रोजीं भीमगड येथें होऊन पक्का तह फोंडें येथें लिहिण्यांत आला. तहाचा करारनामा लिहिल्यानंतरच मराठ्यांनीं रायतूर किल्ल्याचा वेढा उठवून साष्टीमधून आणि बार्देस भागांतूनहि आपलें सैन्य बाहेर काढलें. या तहांत इतर कलमांशिवाय दोन विशिष्ट कलमें होतीं. त्यांपैकीं एक मराठी अंमलांतील जे देसाई मराठ्यांविरूद्ध वागले होते त्यांनां माफी देणें व मराठ्यांनीं फिरंगी हद्दीवर किल्ले बांधूं नयेत हें दुसरें होय.

संभाजीच्या गोव्यावरील स्वारीचा दरारा इतका मोठा बसला कीं, तत्कालीन ख्रिस्ती लोक त्या स्वारीस 'व्हडलें राजीक' म्हणजे थोरली स्वारी असें म्हणूं लागले. (म. गो. स्वाऱ्या — डॉ. पिसुर्लेकर).

ता. १५ जानेवारी स. १६८४ रोजीं मोंगल सैन्य डिचोली येथें पोंचलें. या सैन्याचा सेना-पति मोंगल बादशहाचा मुलगा शहाअलम हा होता. त्या सैन्यात ४० घोडेस्वार, ६० हजार पायदळ, १९०० हत्ती आणि २० हजार उंट होते. त्यांच्या मागोमाग तीन दिवसांनीं म्हणजे ता. १८ रोजीं सैन्याची सामुग्री घेऊन दुसरी तुकडी आली.

मोंगल सैन्य टोळधाडीसारखें कोंकणांत घुसलें व डिचोली येथें पोंचतांच त्यानें छत्रपति संभाजीचा तेथील वाडा लुटला, ठिकठिकाणीं जाळपोळ आणि इतरहि बरीच नासधूस केली. डिचोलीच्या धिंगाण्यानंतर तेथून निघून तें नावें नदीतीरानें मार्गस्थ झालें.

अवरंगजेबाचा वकील शेख महंमद आपल्या बादशहाचा दुसरा एक खलिता घेऊन फिरंगी व्हिसिरैकडे आला व म्हणाला—"संभाजीच्या पारिपत्यासाठीं मोंगल सैन्य इकडे आलें असून फिरंग्यांकडे मैत्रीचा तह करावा अशी आमच्या बादशहाची फार इच्छा आहे. हा वकील कांहीं दिवस गोव्यांत राहून ता. २९ मार्च स. १६८४ रोजीं व्हिसिरैचें उत्तर घेऊन मोंगल राजधानी-कडे जाण्यास निघाला.

याच वेळीं व्हाइसरॉय कोंदि द आल्व्होर यानें एक पत्र व नजराणा देऊन मादाजी नाईक नांवाच्या आपल्या एका अधिकाऱ्यास संभाजी राजाकडेहि पाठविलें. त्या पत्रांत तहाप्रमाणें मराठा व फिरंगी यांच्या उभय राजवटींनां स्वास्थ्य लाभावें व व्यापारधंद्यास हरकत होऊं नये अशी त्यानें इच्छा प्रदर्शित केली.

व्हॉइसरॅय कोंद द आल्व्होर यानें आपण मराठ्यांचा मित्र आहें याबद्दल त्यांची खात्री करण्याचे अनेक प्रयत्न केले आणि शेवटीं संभाजीच्या दरबारांत रायगड येथें आपली वकिलात पाठविण्याचेंहि ठरविलें.

सां. आगोस्तिनु मठांतील एक पाद्रि फ्रै आंतोनियु द सां जोजेफ याची वकील म्हणून व्हॉइसरॉयनें नेमणूक केली आणि पाद्रि फ्रै व्हेरिसिमु द कोंसैसांव व आंतोनियु आल्व्हरिस् तेमुदु यांसोबत तो तिकडे गेला. त्या मंडळांत

रामकृष्ण नाईक बर्वे नांवाचा एक हिंदु ब्राह्मणहि होता. त्याच्यासंबंधीं सदर पाद्रि आं. द सां जोझफ याला २४ मार्च १६८४ रोजीं लिहिलेल्या पत्रांत तत्कालीन सरकारी मुख्य चिटणीस म्हणतो —

" रामकृष्ण नाईक हा व्हाइसरॉय यांचा विश्वासू असून त्यानें फार दक्षतेनें सरकारी कामगिरी बजावलेली आहे. राजपुत्र अकबर, कविकालेर्जा (कलुषा) व छत्रपति राजे संभाजी यांचा खासगी कारभारी गंगाधर पंडित यांनां व्याइसरॉयनें जी पत्रें लिहिलीं त्यांत त्याला 'छत्रपतींकडील आपला वकील' असें संबोधलें आहे. राय कीर्तिसिंग व रंगाजी लक्ष्मीधर यांकडून त्यानें महत्वाच्या पत्रांचीं उत्तरें आणलीं होतीं. आतां व्हिसिरै यांनीं मुद्दाम त्याला आपणाबरोबर जाण्याची आज्ञा केली. उभय सरकारांत वेळोवेळीं झालेल्या तहांची याला चांगली माहिती असून तो राजकारणांतहि चांगला मुरलेला आहे. ज्या कामगिरीवर आपली योजना झाली आहे, तींमध्यें त्याचें चातुर्य आपल्याला फार उपयोगी येईल. कालेजीच्या घरांत त्याला पूर्ण सलगी असून त्याचें सांगणें तो सहज मनावर घेत असतो. त्या प्रधानापुढें तो आपणास नेईल व आपण जी कामगिरी कराल तिची माहिती घेऊन इकडे येईल. आपलीं इतर पत्रेंहि तो आणील."

हें फिरंगी वकील मंडळ स. १६८४ सालच्या मार्चच्या अखेरीस गोव्याहून निघालें. तें प्रथम पाटगांवला गेलें व त्यानंतर रायगडास पोंचलें. छत्रपति संभाजीचा मुक्काम त्यावेळीं रायगडासच होता.

आपल्या कामगिरीचा शेवट यशस्वी व्हावा यासाठीं कोंदि आल्व्होर यानें पाद्रि फ्रे आंतोनियु याला कांहीं उपयुक्त सूचनाहि केल्या.

जुन्या गोव्याच्या सां. आगोस्तिनच्या मठांतील कागदपत्रांतून पा. फ्रे आंतोनियु याच्या कामगिरीसंबंधाचे जे दाखले मिळाले त्यांवरून असा निष्कर्ष निघतो कीं, उभय सत्तांमध्यें होऊं घातलेल्या तहाच्या कलमास संभाजीनें मान्यता न देण्यास पुढील दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. त्यांपैकीं एक म्हणजे मानुयेल सा. द आल्बुकेर्क यानें पोर्तुगीजांकडून आंजेदीव बेट सोडविण्याचें अभिवचन दिलें होतें. आणि दुसरें व्हॉइसरॉयनें आपल्या वकिलाकडून मराठ्यांच्या राजास एक मूल्यवान नजराणा पाठविण्याचें ठरवलें होतें. या दोन्हीं गोष्टी अंमलांत आल्या नाहींत. (रायगड येथील पोर्तुगीज वकिलात, भारतमित्र व. १४ अंक ४, — ले. पां. स. पिसुर्लेकर, अनु. — वासुदेव भास्कर नाईक).

सदर नजराण्याची किंमत एक लाख होनांपेक्षां म्हणजे साडेतीन लाख रुपयांपेक्षां कमी नसावी असा उल्लेख मिळतो.

प्रधान कविकलश मराठे — पोर्तुगीजांच्या या तहास अनुकूल होता. आपले राजे मोंगलांकडील लढायांत गुंतलेले आहेत. अशावेळीं फिरंग्यांशीं सख्य ठेवणें इष्ट असें त्याला वाटे. याच्या उलट मुख्य प्रधान पेशवे व इतर यांचें मत होतें.

फिरंगी सरकारनें पुढें केलेलीं विधानें संभाजीची खात्री करूं शकलीं नाहींत; तथापि सदर दोन मुद्यांचें व्हॉइसरॉयकडून उत्तर येईपर्यंत म्हणजे उभय बाजूंचे वकील गोव्यास जाऊन परत रायगडावर येईपर्यंत सुरू असलेली लढाई तात्पुरती बंद करण्याचें त्यानें ठरविलें आणि पाद्रि वकिलानें ता. ६ सप्टेंबर १६८४ रोजीं तहावर सही केली. हा वकील दुसऱ्या महिन्यांत तेथून गोव्याकडे येण्यास निघाला व नोव्हेंबरच्या सुरवातीस गोव्यांत आला. त्यासोबत संभाजीचे वकील न येतां ते डिसेंबरमध्यें फोंडें येथें आले व

ता. २ जानेवारी १६८५ रोजीं गोव्यांत येण्याच्या विचारांत असतां व्हॉइसरॉयनें त्यांनां भेटण्याचें नाकारून कैदेंत टाकलें आणि अशा रीतीनें हा तह फिसकटला गेला. त्या वकिलांपैकीं एकाचें नांव सिदोजी फर्जंद व दुसऱ्याचें रंगाजी लक्ष्मीधर असें होतें.

पुढें संभाजी व मोंगल यांच्या बऱ्याच लढाया झाल्या. मराठे व पोर्तुगीज यांच्यांतहि अधून मधून कटकटी चालूच होत्या. अखेरीस संभाजी महाराष्ट्रांत एका महत्वाच्या राजकारणांत गुंतला असतां सन १६८९ च्या जानेवारीच्या सुरवातीस मोंगल बादशहानें मोठ्या धूर्ततेनें फिरंग्यांच्या संगनमतानें मराठ्यांचा कोंकणांतील सारा मुलुख काबीज केला आणि अर्थातच कुडाळ, पेडणें, डिचोली, फोंडें, जांबावली पंचमहाल, काणकोण इत्यादि भागावर आपली सत्ता प्रस्थापित केली.

ता. १७ जानेवारी स. १६८९ च्या गोव्यांतून पोर्तुगालला पाठविलेल्या एका सरकारी पत्रांत अशी नवी बातमी लिहिली होती कीं— " संभाजीच्या वाईट शेजारसत्तेपासून आम्हीं आतां सुरक्षित आहोंत. कारण मोंगलांनीं मराठ्यांचें सर्व कोंकण व गोव्याजवळचें प्रसिद्ध फोंडें शहरहि घेतलें." (Tentativas dos Portuguesas para a Ocupação do Concão — Dr. P. S. Pissurlencar)

या नंतर त्याच सालच्या फेब्रुवारी महिन्यांत ता. १ रोजीं कोंकणांत विशाळगडाच्या आसमंतांत संगमेश्वर येथें संभाजी व त्याचा सोबती कविकलश असे दोघे बादशहाच्या फौजांकडून बेसावध स्थितींत भलत्याच रीतीनें पकडले गेले. बादशहा औरंगजेब याचा मुक्काम त्या वेळीं पुण्याच्या पूर्वेस बहादुरगड येथें होता. त्याला ही बातमी कळतांच कोरेगांव येथें त्यांनां आपल्यासमोर आणून हजर करण्याचा त्यानें हुकूम सोडला.

हुकुमाप्रमाणें गाढवावर बसवून आणलेले सदर कैदी बादशहाचे छावणींत ता. १५ फेब्रुवारी रोजीं दाखल झाले. अवरंगजेबास धन्यता वाटली पण अपमानामुळें संभाजीचा जळफळाट झाला.

दुसऱ्या दिवशीं दरबार भरवून त्या कैद्यांनां बादशहानें आपल्यासमोर आणलें. सिंहासनावरून उतरून खासगी कारभारी रुहुल्लाखान याच्या खांद्यावर हात टेकीत तो कैद्यांजवळ आला आणि दोघांचेंहि निरीक्षण केल्यावर त्यानें त्यांनां मुक्कामावर घेऊन जाण्यास सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं त्यानें रुहुल्लाखानास कैद्यांसमोर पाठवून त्यांनां पुढील प्रश्न करण्यास बजावलें— " तुम्हीं महान गुन्हेगार आहांत. तथापि मुसलमानी धर्म स्वीकारून आमच्या आज्ञेत राहिल्यास जिवंत ठेवून पुढें हित करूं."

खानानें संभाजीची भेट घेऊन औरंगजेबाचें म्हणणें सांगितलें. संभाजी चवताळून ओरडला आणि रागानें त्यानें बादशहाची व त्याच्या धर्माची हजेरी घेतली. तो म्हणाला—"संभाजीचा देह आतां इहलोकांत नाहींच! काय करायचें तें अवश्य कर! जा सांगा असेंच औरंगजेबाला!"

खानानें निरुपायानें संभाजीच्या बोलण्याचा सारांश बादशहाला सांगितला. तो ऐकून त्याला संताप आला आणि त्यानें जीभ कापून व डोळे काढून नंतर त्याचा शिरच्छेद करण्याचा हुकूम दिला.

अशा रीतीनें फाल्गुन व. ३०, ता. ११ मार्च स. १६८९ रोजीं छत्रपति संभाजींचा शेवट झाल्याचें इतिहासांत नमूद आहे.

औरंगजेब बादशहानें, निःशस्त्र व बांधलेल्या स्थितींत संभाजीचा जो छळ व प्राणघात केला त्यामुळें सारे मराठे खवळले. महाराष्ट्रांतील प्रत्येक हिंदूचें रक्त सळसळूं लागलें. छत्रपति शिवाजी महाराजांच्या पुत्राच्या अप्रतिष्ठेचें हें लांच्छन सबंध महाराष्ट्रास लागणारें आहे. प्रत्येक मराठ्याच्या तोंडास हा कायमचा डाग लागणारा आहे अशा भावनेनें सबंध मराठी राष्ट्र औरंगजेब बादशहावर उलटलें. चिडलेल्या मधमाशांप्रमाणें सर्व लोक बादशाही फौजांवर चारहि बाजूंनीं तुटून पडले.

वर्षानुवर्षे वर्षे गेलीं तरी खवळलेल्या मराठ्यांच्या पराक्रमाला बंधन घालणें बादशहाला शक्य झालें नाहीं. संभाजीच्या क्रूर वधाचा परिणाम लागलाच त्याच्या अनुभवास आला.

औरंगजेब कारस्थानी व पाताळयंत्री असला, तरी तो कपटी, क्रूर व धर्मवेडा असल्यामुळें खऱ्या राजकारणांत पुढें आला नाहीं.

मोंगल बादशहांचीं वंशावळ अशी मिळते: — १ बाबर (पाहिल्या प्रथम दिल्लीच्या मोंगल सिंहासनावर बसणारा हा मूळचा काबूलचा राजा होता. याचा काल स. १५२७-१५३० आहे.) २ हुमायुन (१५३०-१५५६), ३ अकबर (१५५६-१५९२), ४ जहांगीर (१५९२--१६२७), ५ शहाजहान (१६२७-१६५८), ६ औरंगजेब (१६५९-१७०७), ७ बहादूरशहा (१७०७-१७१२), ८ सय्यदबंधु (१७१२-१९), ९ महमदशहा (१७१९-१७४८), १० अहमदशहा (१७४८-१७५४), ११ अलमगीर (१७५४-१७५९), १२ शहा अलम (१७६०-१८०६), १३ अकबरशहा (१८०६-१८३७), १४ दुसरा बहादूरशहा (१८३७-१८५७). स. १८५७त मोंगल बादशाही नष्ट झाली.

स. १६८३त फिरंग्यांनीं फोंडें किल्ल्यास वेढा दिला त्या वेळीं किल्ल्यांतील अधिकाऱ्यांनीं केलेला नवस फेडण्यासाठीं छत्रपति संभाजीनें आपल्या प्रधानातर्फे दिलेल्या एका सनदेंतील मजकूर—

"श. १६०५ पौष्य व. ११, स. १६८४ जाने. २ — राजश्री धर्माजी नागनाथ सरसुबेदार प्रांत फोंडें गोसावी यांसी — स्नेहपूर्वक कांवकलश आसीर्वाद सुहुरसन आरबा समानैन व आलफ हजरत पीर अबदुलखान कोट फोंडा बहुत जागृत स्थल फिरंगीयानी गनीमाई करून कोटास वेढा घातला कोट बहुत जेर केला तेव्हां कोट मजकूरच्या हवालदार व सरनोबत व शबनिवीस व नाईकवाडी लोकी प्रार्थना केली की गनिमाचा पराभव करणें राजश्री छत्रपती स्वामी विनती करून उर्जा चालेसारखी पोख्ती सरंजाम करून घेऊन राजश्री स्वामीची फतेबाजी होऊं देणें म्हणौनु नियत केला त्यावरी राजश्री छत्रपती स्वामीचे स्वारी कोट मजकुरी होउनु फिरंगी गनीम मारून काहाडले राजश्री स्वामीस जये आले फते जाहाली अैसी पिराची करामती आहे म्हणौनु कितेक तुम्ही व कोटकरी याहीं राजश्री छत्रपती स्वामीसी विनती केली कीं पिराचा उरूस उर्जा व पिराचा मुजावर सेवक आहे त्यास वेतन नवे ऐसे मख्ता करून साल-ब-साल देउनु पीर संतुष्ट होये ते केले पाहिजे म्हणौनु विनती केली त्यावरून राजश्री छत्रपती स्वामीनें दरसाल द्यावयाचे नियेत केला तेणे प्रमाणें धर्मादाये देविला असे दर सालिना नव होन ५० पनास होन.— येणें प्रमाणें सुबे मजकुरी सदरहु ऐवज देविला असे साल दरसाल देत जाणे इ."

———

राजारामाची राजवट

छत्रपति संभाजींच्या निधनानंतर मराठी राज्यावर बरीच आपत्ति ओढवली. विजापूर व गोवळकोंडा यांचा पूर्वीच निकाल लागल्यानें औरंगजेबानें आपल्या शक्तीचा मारा मराठ्यांवरच चालविला. संभाजींच्या निष्काळजीपणानें खजिना रिकामा पडून कित्येक किल्ल्यांचाहि नीट बंदोबस्त नव्हता. राज्याचा मालक संभाजींचा मुलगा शाहू हा केवळ नऊ वर्षांचा होता. तो व त्याची आई येसूबाई संभाजींच्या अंत्य समयीं रायगडावर असून राजारामहि तेथेंच कैदेंत होता. त्या उभयतांशीं राजारामाचा पूर्वीपासून स्नेह असल्यानें त्यांनीं प्रमुख मराठी सरदारांनां रायगडावर बोलावून विचार विनिमय केला. त्यांत येसूबाई व प्रल्हाद निराजी यांची सल्ला पसंत पडून असा बेत ठरला कीं, सर्वांनीं एकत्र न राहातां फुटून निघावें. येसूबाईनें मुलासह रायगडावर राहावें व राजारामानें एकाच जागीं न राहातां रायगड व विशाळगड यांमध्यें फिरतें राहावें.

त्या प्रमाणें व्यवस्था झाली; पण मोंगलांनीं संधि साधून एके दिवशीं अकस्मात् रायगडास वेढा दिला. या किल्ल्याच्या संरक्षणाची तरतूद उत्तम असल्यानें कित्येक महिनेपर्यंत तेथील लोकांनीं शत्रूस दाद दिली नाहीं. अखेरीस सूर्याजी पिसाळ या घरभेदी मराठ्यानें मोंगलांस वश होऊन किल्ल्यांत त्यांचा प्रवेश होऊं दिला आणि येसूबाई व शाहू मोंगलांच्या कैदेंत सांपडलीं.

कैद्यांनां औरंगजेबाकडे नेतांच तो खुश झाला. त्याला वाटलें, आतां मराठी राज्य आटोक्यांत आलें. तथापि संभाजीच्या वधानें मोंगलांचा सूड घेण्यास टपलेल्या मराठ्यांच्या क्रोधांत या नवीन प्रसंगाची भर पडली आणि त्यामुळें त्यांचे प्रयत्न अधिक नेटानें सुरू झाले.

या वेळीं महाराष्ट्रांत मोंगलांचा जोर असल्यानें राजारामानें कर्नाटकांत जिंजी येथें जाऊन कांहीं काल राहावें आणि महाराष्ट्रांतील बंदोबस्त रामचंद्रपंत अमात्य यानें पहावा असें ठरलें. संताजी घोरपडे यांनां मुख्य सेनापति नेमण्यांत येऊन धनाजी जाधव याला त्याचा दुय्यम नेमला. रामचंद्रपंतानें महाराष्ट्रीय किल्ल्यांची उत्तम व्यवस्था केली आणि ठरल्याप्रमाणें राजाराम जिंजीस जाण्यास निघाला.

राजाराम जिंजीस जात असतां त्याला पकडण्यासाठीं मोंगलांचीं फर्मानें जिकडे तिकडे सुटलीं. नबाब बहादूरखान याकडून फिरंगी सरकारलाहि त्यासंबंधीं पत्र आलें. कुडाळकर देसाई या वेळीं गोव्यांत राहात होता. मोंगल सैन्य कुडाळ येथें जाणार आहे त्यावेळीं त्याला मदत देण्यास तयार राहाण्यासाठीं खेम सावंत यासहि त्याच पत्रीं लिहिलें होतें.

बहादूरखान याच्या पत्राप्रमाणें फिरंग्यांनीं खेम सावंतास ससैन्य मोंगलांच्या मदतीस कुडाळला जाण्यास सांगितलें. तथापि सावंताची आई वारून बारा दिवस न झाल्यानें खेम सावंतानें बाबू देसाई व शांबा सावंत यांनां आपल्या सैन्यासह पुढें पाठविलें व त्यानंतर कुडाळ मराठ्यांकडून सोडविण्याकरतां तो स्वतः जाऊन मोंगलांस मिळाला. (Rajaram— डॉ. पिसुर्लेकर).

राजारामास पकडण्यासाठीं मोंगलांनीं फार खटपट केली, तरी त्यानें सुखरूप जिंजी गांठली आणि तेथें अष्टप्रधानांच्या नेमणुका करून कारभार चालविला.

राजारामाची सत्ता जिंजीला प्रस्थापित झाल्यानें मोंगलांचें बरेंच सैन्य कोंकणांतून गेलें. त्यामुळें इकडील लोकांनां मोंगलांविरुद्ध लढण्यास जास्त जोम आला. त्यावेळीं मणेरी, सांखळी, सत्तर, फोंडें, चंद्रवाडी येथील देसाई 'स्वामीचें राज्य देव ब्राह्मणाचें विश्रामस्थान' असें मानून मराठ्यांच्या सैन्यांत दाखल झाले. (डॉ. पिसुर्लेकरकृत मराठ्यांच्या गोव्याकडील स्वाऱ्या).

मोंगल आणि मराठे यांच्या सदर लढ्यांत फिरंग्यांचें राजकारण दुटप्पी होतें. एका बाजूनें मराठ्यांविरुद्ध मोगलांस मदत करण्यास सज्ज असल्याचें मोंगलांस भासवावें आणि दुसऱ्या बाजूनें मोंगलांपेक्षां मराठे जास्त प्रिय म्हणून मराठ्यांनां सांगावें अशी त्यांची वृत्ति होती. इतकें खरें कीं, मोगलांकडील कटकटीपेक्षां राजारामाचें राज्य शेजारीं असणें त्यांनां हितावह वाटे. (Rajaram).

संभाजीच्या काळापासून मराठ्यांनां फिरंग्यांचा राग होताच; त्यामुळें त्या गडबडींत रावजी शामराज याची एक तुकडी बार्देसमध्यें घुसून तेथील लोकांकडून त्यांनीं कर वसूल केला. दुसऱ्या बाजूनें आणखी एक तुकडी साष्टींत शिरून कुंकळ्ळी, वेर्डें व मडगांव अशीं त्यांनीं तीन गांवें लुटलीं. (Como se perdeu Baçaim — डॉ. पिसुर्लेकर).

राजारामानें जिंजीस जाऊन कारभार सुरू केल्याचें औरंगजेबास समजतांच त्यानें प्रसिद्ध सरदार झुल्फिकरखान याला जिंजीकडे पाठविलें आणि त्यानें जिंजीच्या किल्ल्यास वेढा दिला. इतक्यांत वेढा घालणाऱ्या फौजेवर संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनीं महाराष्ट्रांतून जाऊन छापे घालण्यास सुरवात करून मोंगल सैन्यास बराच त्रास दिला. पण नव्या दमाचें आणखी सैन्य आल्यानें व औरंगजेबाच्या तांतडीच्या हुकुमामुळें तटास शिड्या लावून सन १६९८त मोंगलांनीं किल्ला काबीज केला. तथापि राजाराम त्या पूर्वींच महाराष्ट्रांत गेला होता.

सन १६९१ ते १६९८ दरम्यानच्या सात वर्षांच्या कालांत रामचंद्रपंत अमात्य, संताजी व धनाजी या त्रयीनें आपल्या पराक्रमाची शर्थ केली. संताजी व धनाजी यांनीं दक्षिणेंत जिंजीपासून उत्तरेंत नर्मदा नदीपर्यंत धुमाकूळ उडवून दिला. मोठमोठे मोंगल सरदार त्यांच्यापुढें जाण्यास भिऊं लागले; कारण जे जे त्यांच्यावर जात ते ते अपेशीच ठरत.

जिंजीकडे मोंगली सेनेचा विशेष जोर दिसल्यानें तेथून निघणें राजारामाला क्रमप्राप्तच होतें; आणि रामचंद्रपंतानें संताजी व धनाजी यांच्या मदतीनें महाराष्ट्रांतील बराच मुलुख मोंगलांकडून परत मिळविल्यानें तर विशेष चांगलें झालें होतें. म्हणून जिंजीहून परत आल्यावर राजारामानें रामचंद्रपंताच्या सल्लयानें सातारा येथेंच मराठी राज्याची राजधानी थाटली. राजाराम स्वभावानें शांत, धिम्या वृत्तीचा व करारी असून शाहूचा प्रतिनिधि असें समजूनच त्यानें राज्यकारभार चालविला. यानंतर कांहीं कालानें म्हणजे ता. २ मार्च स. १७०० रोजीं एका आजारानें राजाराम मरण पावला.

राजारामाच्या मृत्यूनंतर दोन वर्षेपर्यंत मराठे व पोर्तुगीज यांचे संबंध मैत्रीचे होते, असें पोर्तुगीज कागदपत्रांवरून कळून येतें.

डॉ. पां. स. पिसुर्लेकर यांनी आपल्या Rajaram या पोर्तुगीज पुस्तकाच्या शेवटीं

राजारामकालीन जीं दोन पत्रें दिलीं आहेत तीं वाचनीय असल्यानें त्यांचे उतारे पुढें दिले आहेत.

" स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १८ प्रजापतीनाम संवत्सरे मार्गशिर्ष शुद्ध सप्तमी इंदुवासरे क्षत्रीयकुलावतंस श्रीराजाराम छत्रपती याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांसी आज्ञा केली ऐसिजे. अंताजी सूर्याजी देसाई तपे डिचोली हे हुजूर चंचीचे मुकामी स्वामी सनिध येऊन विदित केलें जें त॥ मजकुर पहिले कैलासवासी स्वामी सलाबत जाहाले ते समयीं महालींचें वर्तमान मनास आणिलें आणि तह करून दिधला. देसमुखीचा हक वतन बहूतच होता त्यास दरबार दंडक प्रमाणें देसमुखीस हक सालीना होन निशाणी च्यारी हजार मोईन करून दिल्ही.

त्यामध्यें आपले आजे सूर्यराऊ देसाई यांस तिघी स्त्रियांचें संतान होतें. वडील स्त्रिचें संतान गणबाराऊ, दुसरे स्त्रिचें संतान नारबा रवल सेणवीं तिसरे स्त्रिचें संतान आपला बाप नारबाराऊ यांस तीन तक्षिमा करून देविले तेणेंप्रमाणें च्यार पांच वर्षे बिलाकुसूर चालिले त्यावरी नारबा रवल शेणवी याची वर्तणुक स्वामीच्या पायासी विरुध प्रकार देखिली. या करतां राजश्री आनाजी पंत सचीव यानीं त्यास दस्त केलें घरदार नागवून सहकुटुंब प्रसिद्धगडीं ठेविलें. गणबाराऊ व आपला बाप नारबाराऊ महालीं असेत. त्यांस दिवाणांतून जुजबी हक पावत असे त्या उपर नारबा रवल सेणवीं यास पांच हजार होन निशाणी खंड बांधोन सोडिले तो माहालास आला हक मोइनी प्रमाणें तिघांस विभागें पावावा त्यास त्याणें आपणास खंड पडिला आहे त्याचा निर्वाह करणें आहे या करितां विभागाप्रमाणें न घ्यावें जुजबी वेचा पुरतें पावेल ते पावेल वरकड खंडाचे निर्वाहास घ्यावें खंड झाडा झालियावरी विभागप्रमाणें घ्यावें ऐसें माहाली कारकुनाचा निशा करून केलें उभयेतांस जुजबीवेचास पावूं लागले..................

मोंगलांची धामधुम जहाली अबदुलखान फणी यास तो देश जागीर जाहला त्यास रामजीराऊ भेटोन देशमुखीचा कार्यभाग चालवूं लागला तेव्हां गणबाराऊहि जाऊन जागिरदारास भेटोन त्याच प्र॥". आपुली विले करून घेतली तिसरा आपला बाप नारबा सूर्यराऊ याणीं विचार केला—माहाराज स्वामी कर्णाटक प्रांतीं आहेति फौजा पाठवून मोगलांस मारून काडीत आहेति स्वामीचे राज्य देव ब्राह्मणाचें विश्रामस्तान म्हणून आपण स्वामीचे पायांपासीं येकनिष्ट होऊन जाऊन स्वामीस विनंती करोन आपले वतनाचे विले करून घेऊन स्वामी सेवा करून दाखवून ऐसा विचार करून स्वामीच्या पायांपासीं यावयास निघाले इतकेयांत त्यास देवाज्ञा जाहाले सेवक स्वामीचे सेवेसीं आलों आहेत स्वामीनें कृपाल होऊन त्या प्रांतीं राजश्री रामचंद्र आमात्य आहेत व देशाधिकारी आहेत त्यांस आज्ञापत्र दिलें पाहिजे कीं—

गणबाराऊ व रामाजीराऊ देसाई मोंगलांसी मिळाले आहेति त्याणि मोंगलांचें राजकारण तोडोन तुम्हांस भेटतील म्हाल कबाज करायास सामील होतील तर त्यास व अंताजीराऊ यांस देशमुखीचा हक विभाग वाटून घेऊन त्यांचे हातें देशमुखीचा कार्यभाग घेणें रामाजीराऊ व गणबाराऊ मोगलासी सुलुखें राखून वर्ततील तर अंताजी सूर्यराऊ स्वामीसनिध ठेवून एकनिष्टपणें वर्ततो यासच हातीं धरोन देशमुखीचा हक

वतना यासच देऊन याचे हातीं कार्यभाग घेत जाणें असें आज्ञापत्र देविलें पाहिजे.

आपण स्वामीचे फौजेबरोबर जाऊन म्हाल कबाज करायाचा ईलाज करूं म्हणोन विनंती केली तें सविस्तर अंतकर्णास आणिलें. एका पुरुषाचे तिगे पुत्र त्यांस वतनाचा हक तिघांस घ्यावा तिघांपासून सेवा घ्यावी स्वामीचे पायांसी रुजवात असिले तर. त्यामधें कोणही गनिमाचे सुलखें असतील स्वामीसीं विरोध करतील त्याला वतने चालवावे हें गैर हिशेबी आहे. अशास तुम्हीं त्या प्रांतें आहां म्हणवून हें आज्ञापत्र सादर केलें आहे तरी सदरहू वर्तमान मनास आणून गणबाराऊ व रामजीराऊ देशमुख त॥ॅ डिचोली हे मोगलाचे सुलुखें तोडून आपल्याकडे येतील म्हाल कबाज करावया जमाव मिळऊन शेवा करितील तर ते दोघे व त्यांचा तक्षिमदार अंताजीराऊ स्वामी सनिध आला होता त्यास पाठविले असे. हा तिसरा असे तिघजणयांपासून सेवा घेत जाणें. देशमुखीचा हक वतन मोईन प्र॥ॅ हक तक्षिमा करून देविले होते त्या॥ॅ सारोधार चालवीत जाणें. गणबाराऊ व रामजीराऊ मोगलासी मिलोन असतील तर अंताजीराऊ यासच देशमुखीचें हक मोईन प्र॥ॅ हक तक्षिमा करून देविले होतें तैसेंच चालवीत जाणें स्वामींनीं मोईन करून दिली आहे तो सारोत्धारा चालवून याचे हातीं देशमुखीचा कार्यभाग घेत जाणें वतनदार आहे येकनिष्टेनें स्वामीसनिध आला या करितां सदरहू प्र॥ॅ चालवणें जाणीजे अनमान न करणे बहूत काय लिहिणे तूमी सूज्ञ असो निदेश समक्ष."

॥ श्रीराम ॥

"रा. कृष्णाजी अनंत ना. म॥ॅ. फोंडा गोसावी यांसि...

रामचंद्र निळकंठ अमात्य, हुकुमतपन्हां न... रा. हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यांहि लिहिलें जें मामले मजकूर हस्तगत करावयानिमित्य रा. केदारजी सूर्यवंसींयां बराबरी फौज देऊन रवान केले त्या प्रसंगीं रा. विठोजी राम नाईक सरदेसाई मामले मजकूर यांणीं स्वामीच्या पायांसीं येकनिष्ठा धरून माशारनिलेस सामील जहाले त्या प्रांतींचा कितेक दुवी पालत सांगोन फौज घेऊन फोंडेच्या कोटा जवली गेले कोट हस्तवश करावयानिमित्य सामा सुमा सर्वही अनकुलता करून आपल्या जमावानसीं गनिमांस जूज दिल्हें कोट हस्तगत जाहाला तेव्हां पुढेंही कित्येक स्वामीकार्यविसीं बहुतच उमेद धरीत आहेत. तरी मौजे वेतगी तर्फ अंतरूज हा गाऊं अजरा मन्हामत इनाम करून दिल्हा पाहिजे म्हणून लिहिलें त्यावरून मनास आणतां वतनदार पुरातन या राज्यासी येकनिष्ठपणें शेवा करून दाखवून आपलें उर्जीत करून घ्यावें हे उमेद धरीत आहेत यास गांव इनाम देऊन याजपासून पुढें स्वामीशेवा घ्यावी हें उचित आहे या करितां मौजे मजकूर कुलबाब कुलकानु बालिपटी व पेस्तरपटी खेरीज हकदार करून इनाम अजरा मन्हामत करून दिल्हा असे तरी दुमाला करून पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवीत जाणें. प्रतिवर्षीं नूतन पत्राचा आक्षेप न करणे इ."

दुसरा शिवाजी

राजारामाच्या दोन बायकांपैकीं ताराबाई-पासून शिवाजी व राजसबाईपासून संभाजी असे त्याला दोन पुत्र झाले होते. त्यांत शिवाजी ज्येष्ठ असून स. १७०० सालीं तो दहा वर्षे वयाचा होता. राज्याचा खरा वारस संभाजीचा पुत्र शाहू अजून अटकेंत होता. त्याची सुटका होईपर्यंत कारभार मंत्रिमंडळानें चालवावा आणि शाहू येतांच त्याला साताऱ्याच्या गादीवर बसवावें असें अमात्य याचें म्हणणें होतें. तथापि ताराबाईनें आपला पुत्र शिवाजी १७००-१७०८ यालाच गादीवर बसवलें आणि परशुराम त्रिंबक यास प्रतिनिधिपद दिलें. मोंगलांविरुद्ध चाललेलें मराठ्यांचें युद्धहि जोमांत पुढें सुरू झालें, आणि तें इतकें दक्षतेनें चाललें कीं, पुढें स. १७०७मध्यें औरंगजेबाला त्यांनीं बेजार करून सोडलें. त्याच सालच्या फेब्रुवारी महिन्यांत औरंगजेब अहमदनगर येथें मरण पावला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याच्या पुत्रांत गादीबद्दल यादवी माजली आणि त्याच वेळीं येसूबाई व शाहू यांचीहि सुटका झाली. शाहूनें आपल्या सुटकेची वार्ता कळवून राज्य आपल्या स्वाधीन करण्याबद्दल ताराबाईस निरोप पाठविला; पण ताराबाईनें ती गोष्ट नाकारून युद्धास आव्हान दिलें. ताराबाई व शाहू यांचें हें युद्ध पुण्या-जवळच्या खेड येथें झालें. तेथून पुढें साताऱ्यावर चाल करून शाहूनें राजधानी हस्तगत केली आणि स्वतःस पद्धतशीर राज्याभिषेक करून घेतला. या राज्याभिषेकाचा सन १७०८ असा इतिहासांत नमूद आहे.

छत्रपति शाहू

शाहूचा पक्ष विजयी करण्यांत धनाजी जाधव, खंडो बल्लाळ, बाळाजी विश्वनाथ हे प्रमुख होते. सातारा शाहूच्या ताब्यांत गेल्यावर ताराबाईनें कोल्हापूर येथें जाऊन नवीन गादी स्थापन केली आणि त्या गादीवर आपला मुलगा शिवाजी याला राज्याभिषेक केला. आजच्या कोल्हापूरच्या गादीचे हेंच मूळ पुरुष.

पुढें शाहूच्या बाजूचेहि कांहीं सरदार ताराबाईला मिळाले आणि अशा प्रसंगीं बाळाजी विश्वनाथानें नवीन सैन्य उभारून शाहूची बाजू सांवरली. त्यामुळें खुश होऊन शाहूनें बाळाजीस 'सेनाकर्ते' ही पदवी दिली व पुढें स. १७१३ सालीं त्याला पेशवेपद देऊन त्याच्या मतानें इतर प्रधानांच्या नेमणुका केल्या. साताऱ्याच्या गादीवर शाहू छत्रपति (१७०८-१७४८) या राजानंतर रामराजा, दुसरा शाहू, प्रतापसिंह, शहाजी असे राजे आले; पण ते नांवाचेच होते. मुख्य राज्यकारभार शाहूच्या कारकिर्दींतच पेशव्यांकडे गेला होता. आणि पुढें स. १८१८ पासून तर छत्रपति प्रतापसिंह हा कंपनी सरकारचा मांडलिक बनला. त्याच्यानंतर गादीवर आलेल्या शहाजीचा दत्तक पुत्र कंपनी सरकारनें नामंजूर करून साताऱ्याचें राज्य स. १८४८त खालसा केलें.

पेशवाई १

बाळाजी विश्वनाथ (स. १७१३-१७२०) हाच पेशवाईचा मूळ पुरुष होय. स. १६९९ पासून याचा मराठेशाहींत प्रवेश झाला. शाहू छत्रपतीनें त्याचे गुण, पराक्रम, वेळोवेळीं आपणास केलेलें बहुमूल्य सहाय्य हें लक्षांत आणून त्याला सन १७१३त पेशवे ऊर्फ प्रंतप्रधान नेमलें. पुढें पुढें तर त्याच्या अधिकारांत वाढ होऊन मराठी राज्याचें सर्वाधिकारित्वच त्याकडे आलें. बाळाजी विश्वनाथानंतर पहिला बाजी-

राव (१७२०-१७४०), बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब (१७४०-१७६१), माधवराव (१७६१-७२), नारायणराव (१७७२-७३), सवाई माधवराव (१७७४-९५), दुसरा बाजीराव (१७९५-१८१८) असे पेशवे झाले. या दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत इंग्रजांनीं पेशवाई खालसा केली. पेशव्यांची राजधानी पुणें ही असून शनिवारवाडा हाच राजवाडा होता. स. १८१८ नंतर दुसऱ्या बाजीरावाला ब्रह्मावर्त येथें इंग्रजांनीं स्थानबद्ध करून त्याला ८ लक्ष रुपये वार्षिक वेतन ठरविलें व तें १८५२ पर्यंत त्याला मिळालें. त्याचा दत्तक पुत्र नानासाहेब याला दत्तकाची परवानगी न देतां फक्त २८ लक्ष रुपयांची मालमत्ता तेवढी मिळाली.

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्या कारकिर्दीत उत्तरेकडील महत्वाच्या राजकारणामुळें मराठ्यांची पोर्तुगिजांशी कोणतीच तक्रार आली नव्हती; पण पुढें दुसरे पेशवे पहिले बाजीराव यांच्या अंमदानींत उभयतांमध्यें हालचाली सुरू झाल्या.

सन १७३७ मध्यें उत्तर कोंकणांत पेशव्यांनीं पोर्तुगीजांशीं लढाई सुरू केली आणि गोव्यांतून जाणारी रसद तोडण्यासाठीं गोव्यावरहि हल्ला केला. (Como se Perdeu Baçaim — लें. डॉ पिसुर्लेकर).

"वसईपेक्षां गोवें आगा बंका यैसा कित्येकांचा निशा होत. तेथें फौजा गेल्यानें कांहीं येक येत्न नाहीं. फिरंगी लोक येक पैसा कांहीं देणार नाहींत. याबद्दल गोवेस फौजा रवाना केल्या नव्हत्या. वसईचा बहुत जोर पाहिला. गोवेची मदत वरचेवरी पोंहचली याबद्दल सावंताच्या मुलकांत कानडे याच्या मुलकांत फौजांनीं राहून शाहा मात्र द्यावयाबद्दल अजम वेंकटराऊ वगैरे सरदार निकामी केला असें पाहून पाठविलें. त्याणी जाऊन येका येकांच जेव्हां तंबी पोंहचहून साष्टी बारदेशची खंडणी बसविली असें यैकोन माहाराज छत्रपतीस्वामी आदी करून अवघे सरदार लोक वगैरे यांसी अपूर्व वाटलें. वसई पेक्षां गोवें हलका यैसें दिसोन आलें त्यामुळें सर्वांस उमेद जाहली...."

अशी माहिती छत्रपति शाहूच्या दरबारांतील एक सरदार रामकृष्ण चिमणाजी याच्या पत्रांत आहे. पत्रावर मिती नाहीं. पण त्याचें पोर्तुगीज भाषांतर २८अक्टोबर स.१७३९ रोजीं झालें. त्या वरून स. १७३९ मधील पेशव्यांनीं केलेल्या गोव्यावरील स्वारीचें कारण स्पष्ट कळून येतें. (म. गो. स्वाऱ्या- डॉ. पिसुर्लेकर)

"गोव्यांतील साष्टीवर हल्ला करण्यास निघालेलें मराठ्यांचें सैन्य खानापुरास पोंचलें त्या वेळेपासून आपण वेळोवेळ त्याची हालचाल फिरंगी सरकारास कळवीत आहों."

अशा मजकुराचें २३ जानेवारी १७३९ रोजीं सौंदेकरांचा फोंडें येथील सर सबनीस नरसिंगराव यानें फिरंगी सरकारास लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे. त्यावरून मराठ्यांच्या गोव्यावरील हल्ल्याची जाणीव पोर्तुगिजांनां पूर्वींच होती असें अनुमान करतां येतें. (म. गो. स्वाऱ्या—डॉ. पिसुर्लेकर).

मराठ्यांचें सैन्य ता. २३ जानेवारी स. १७३९ रोजीं दिगी घाटांतून उतरून कुंकळ्ळीच्या बाजूनें रात्रौ साष्टींत शिरलें. बिनविरोध मराठे मडगांवजवळ पोंचले व त्यांनीं तेथें तळ दिला. त्यांच्या सैन्यांत चार हजार घोडेस्वार, सहा हजार पायदळ व दोनेक हजार पेंढारी लोक इतके होते. या फौजेचे मुख्य सरदार

बाजीरावाचा मेहुणा व्यंकटराव घोरपडे व दादाजीराव भावे नरगुंदकर हे होते.

मराठ्यांच्या या सैन्यानें २६ जानेवारी रोजी मडगांव शहर घेतलें व साष्टींत आपला अंमल बसविला. या वेळीं पोर्तुगिजांकडे रायतूर व मुरगांव हे फक्त दोन किल्ले राहिले. त्याच सालीं मार्चच्या २ तारखेस मराठ्यांनीं सौंदेकरांकडून फोंडे किल्ला घेतला.

ता. ५ मार्चला श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या आज्ञेवरून सावंतवाडीकर भोंसले यानें बार्देसवर स्वारी करून तो महाल घेतला.

या घटनेवरून पोर्तुगिजांची खात्रीच झाली कीं, मराठे आतां राजधानीवर हल्ला करून गोवें बेटहि काबीज केल्यावांचून राहात नाहींत. या विचारानें फिरंग्यांनीं मोठ्या घाईनें आपली संपत्ति व बायकामुलें यांनां मुरगांव येथें पाठवून दिलें.

"आतां गोवें बहुतेक आमच्या ताब्यांत आलें असून राजधानीचें शहर घेण्यास मुळींच उशीर नाही. तरी ज्यांनां स्वदेशीं जाणें असेल त्यानीं फिरंगी किंवा इंग्रजी जहाजांतून अवश्य निघावें; आणि ज्यांनां राहाणें असेल त्यांनीं बिनहरकत राहावें. पेशवे सरकार त्यांनां चांगल्या रीतीनें वागवील." असा सरदार व्यंकटरावाचा निरोप त्याचा कारभारी ठाकुर यानें फिरंग्यांनां सांगितला.

आपण आतां फिरंग्यांस पूर्णपणें जिंकून आपणास वाटेल तसा तह करण्यास त्यांस भाग पाडूं असें व्यंकटरावास वाटत होतें; पण दादाजीरावास फिरंग्यांशीं जास्त कटकट न करतां गुपचूप आपला लांचाचा कार्यभाग साधून घेण्याचा होता.

आपण फिरंग्यांचा शेजारी, तेव्हां त्यांच्याशी वैर करणें इष्ट नव्हे असें वाडकरांचें मत होतें. त्याच्यातर्फे देवबा शेणवीं, जिवाजी शेणवीं सबनीस, यसू शेणवी हवालदार व जिवाजी पुंडलीक यांनीं गोवा सरकारास सांगितलें कीं— "पेशव्यांची फौज केव्हां परत निघून जाते याची आपण वाट पाहातों."

जयराम सावंत व रामचंद्र सावंत हे पोर्तुगीजांनां लिहिलेल्या १३-४-१७३९च्या पत्रांत म्हणतात – "इस्तादाचा व इजानेबाचा पुरातन स्नेह. त्यास बार्देस घेऊंस कारण मराठ्यांची सबलता. संवदेकरांचीं ठाणीं घेतलीं पुढां बार्देसवर आले तेव्हां इजानेबास दिसोन आलें कीं, बार्देस मराठ्यांच्या हातीं पडलेंने इस्तादास बरें नव्हे. यैसें समजोन बार्देस घ्यावा लागला.... बार्देस मराठ्यांस सहसा देणार नाहीं हा मोहिबांचा खातरनिशा असों द्यावा. परंतु खासगत फौज ठेवून बार्देस राखावा लागला. तेव्हां फौजेस खर्च लागला तो या विसींचा भावाथ पूर्वपत्रीं मोहिबांस लिहून गेलेंच आहे. तेणेंप्रमाणें कार्य केलेंने मोहिबाचा व रा॥ व्यंकटराऊ याचा तह होऊन त्यांची फौज वर घांटी जाई पावेतों बार्देस आम्हांकडे असावा. तदनंतर तुमचे स्वाधीन करूं." (म. गो. स्वाऱ्या).

शाहू छत्रपतीच्या दरबारमधील नारो राम मंत्रि, रामकृष्ण चिमणाजी इ. मुत्सद्यांचा कल फिरंग्यांकडे होता. "गोवें बंदर फार उत्तम. नासूं नये. बंदर नासलेमुळें साहेबास फाईदा आहे यैसें नाहीं. फिरंगी यांसच असलेमुळें फाइदा आहे आणि बंदरी चिजवस्त मिळती... असें स्वतः छत्रपति शाहूचेंहि म्हणणें होतें. (Como se Perdeu Baçaim — डॉ. पिसुर्लेकर).

एकंदरींत मराठ्यांच्या बाजूचे कित्येक मुत्सद्दी व अधिकारी फिरंग्यांशीं फार सहानुभूतीनें वागत हें दिसून येतें. या लढाईच्या वेळीं व नंतरच्या तहाच्या वाटाघाटीच्या वेळीं गोव्यांतील कित्येक हिंदु पुढारी फिरंग्यांच्या बाजूनें वावरत. विठोजी शेणवीं धुमे, बहुगुण कामत वाग, वेंकट कामत, उपी कामत, बाबुलो शेणवीं सुखटणकर, सांतू शेणवीं डांगी, बाबूराव देसाई प्रभृति गोवेकर हिंदु, फिरंग्यांच्या हितार्थ मराठ्यांकडे राजकारणें करीत. तथापि त्यांची मात्र हिंदूंविषयीं सहानुभूति नव्हती. सदर स्वारीच्या वेळीं देखील हिंदूंनां गोव्याबाहेर हांकलून लावून त्यांची संपत्ति जप्त करावी अशा मताचा एक वर्ग फिरंगी अधिकाऱ्यांत होता. (Como Se Perdeu Baçaim —डॉ. पिसुर्लेकर)

गोमंतकांतील जुन्या काबिजादींचें बहुतेक ख्रिस्तीकरण शिवशाहीपूर्वींच झालें असलें; तरी त्या प्रदेशांत धंद्यानिमित्त अनेक हिंदु होते असें डच प्रवासी बालदेउस् याच्या स. १६६२ च्या प्रवासवर्णनावरून कळून येतें.

ता. १९ जानेवारी स. १७०३ च्या एका पोर्तुगीज लेखावरून कळतें कीं, त्यावेळीं गोवा बेटांत ३० ते ४० हजार लोकांची वसती होती. (A Incurção de Shivaji em Bardez — डॉ. पिसुर्लेकर).

हिंदूंनां त्यावेळींहि आपला धर्म उघड आचरण्यास मनाई होती. देवळें पूर्वींच पाडलीं होतीं व नवीन बांधण्यास परवानगी नव्हती. लग्नविधि करतां येत नव्हते. पोरक्या मुलांस सक्तीनें ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली जाई. याबद्दलच्या तक्रारीहि करण्यांत येत; पण धर्मसमीक्षण सभेपुढें कोणाचें कांहीं चालत नसे.

व्यंकटरावानें फिरंग्यांवर जय मिळविल्यावर तहाच्यावेळीं हिंदु लोकांस स्वधर्माचरणास स्वातंत्र्य असावें. गोवा शहरांत हिंदूंचें एक देऊळ असावें. धर्मसमीक्षण सभा आटपावी. शेंडीकर रद्द करावा इ. गोमंतकीय हिंदूंच्या हिताचे कांहीं प्रश्न व्यंकटरावाच्या कारभाऱ्याकडून पुढें आले. तथापि तहाचेप्रसंगीं त्या प्रश्नास फिरंग्यांनीं बगल दिली.

सदर कारभारी गोविंदराव ठाकूर हा सावंतवाडीचा असल्यानें त्याला गोमंतकीय हिंदूंचे त्रास माहीत होते. तथापि दादाजीस व पेशव्यांनांहि गोमंतकासारख्या दूरच्या प्रदेशांतील हिंदूंबद्दल विशेष लक्ष देण्याची आवश्यकता भासत नव्हती. ही गोष्ट पोर्तुगीज व्हॉइसरॉयलाहि पूर्णपणें ठाऊक होती.

पोर्तुगीज व्हिसिरै कोंदि द सांदोमील यानें लिहिलें आहे कीं – " गोव्यांतील हिंदूंनां धर्मस्वातंत्र्य असावें या प्रश्नावर मराठे भर देतील असें वाटत नाहीं. गतसालच्या व्यंकटरावाच्या तहनाम्यांत यासंबंधीं कोणतेंच कलम घातलें नाहीं. सांतू शेणवीकडून बाजीरावानें पाठविलेल्या खर्ड्यांतहि त्याबद्दल शब्द नव्हता. भोंसल्याच्या तहाच्यावेळीं बाजीराव व चिमणाजी अप्पा यांनीं या मुद्याची आठवण काढली. तरी पुढें दुर्लक्ष केलें यावरून केवळ धर्मस्वातंत्र्याच्या प्रश्नाकरत मराठ्यांस फायदेशीर असलेल्या या तहास त्यांकडून विरोध होईल असें दिसत नाहीं. (A Restauração de Bardez e Salcete — डॉ. पिसुर्लेकर).

पेशवाई २

मराठे व पोर्तुगीज यांच्यांत घडून यावयाचा तह मराठ्यांना फायदेशीर असल्यामुळें असेल, अगर त्यांच्यांतील कांहीं अंतस्थ कारणामुळें धार्मिक प्रश्नाकडे दुर्लक्ष करणें त्यांनां जरूरीचें वाटलें असेल; पण व्हिसिरै सांदोमील यानें लिहिल्याप्रमाणें खरोखरच गोव्यांतील धर्मस्वातंत्र्याच्या प्रश्नावर मराठ्यांकडून भर देण्यांत आला नाहीं. तथापि इतकें खरें कीं, दादाजीरावानें चिमणाजी अप्पास लिहिलेल्या पत्रांत गोमंतकांत 'हिंदुधर्म चालवावा' असा ठराव झाल्याचें वृत्त कळविलें होतें (पेशवे दप्तर भा. १६, पृ. ११५). सदर तहनाम्यांत मात्र त्याविषयींचा एकहि शब्द आढळत नाहीं. (Como se Perdeu Baçaim—Dr. Pissurlencar).

इंचबर्ड याच्या मध्यस्थीनें तहाच्या वाटाघाटीस जेव्हां पुनः सुरवात झाली त्यावेळीं पेशव्यांनीं "साष्टी बारदेशांत महाराष्ट्र धर्म ज्यांचा ते करितील त्यांस फिरंगीयानें चालवावें देखील गोवियांत महाराष्ट्र धर्म चालवावा" असें एक कलम तहाच्या खर्ड्यांत घातलें होतें; पण तेंहि तहाच्या प्रसंगीं गाळण्यांत आलें. (Restauração de Bardez e Salcete — डॉ. पिसुर्लेंकर)

व्यंकटराव व दादाजीराव यांनीं २ मे सन १७३९ रोजीं जो तह केला त्यांत "फिरंगीयांच्या मुलकामधें फौजा मुकाम जाहल्या आहेत त्या उठोन जाण्याच्या खर्चास फिरंगी यांहीं सध्यां द्यावे रुपये लाख सात" असा ठराव केला होता.

या तहान्वयें मराठ्यांच्या सैन्यानें साष्ट व बार्देज हे महाल फिरंग्यांच्या स्वाधीन केले. फिरंग्यांकडून खंडणीचे सर्व पैसे वेळेवर न मिळाल्यानें पेशव्यांचे सरदार व्यंकटराव यानें कुंकळ्ळी व असोळणें हे दोन गांव आपल्या ताब्यांत ठेवले. हे दोन्हीं गांव नंतर ता. २३ नोव्हेंबर सन १७४० या दिवशीं फिरंग्यांनां दिले.

पेशवे व फिरंगी यांच्यांतील सदर तहान्वयें वाडकर भोंसले मात्र आपल्या ताब्यांतील बार्देज सोडण्यास तयार झाला नाहीं; त्यामुळें फिरंगी सरकारला वाडकराकडे निराळा तह करावा लागला.

फिरंगी व वाडकर भोंसले यांच्यांतील हा तह २८ फेब्रुवारी १७४० या दिवशीं डिचोली येथें विठोजी शेणवी धुमे व बहुगुण कामत वाघ यांतर्फे होऊन त्या तहाप्रमाणें बार्देज फिरंग्यांच्या स्वाधीन झाला.

हाहि तह वाडकरानें थोड्याच दिवसांनीं मोडून बार्देज पूर्ववत आपल्या ताब्यांत घेतला. वाडकराच्या बार्देजवरील या हल्ल्याची तारीख २१ फेब्रुवारी १७४१ अशी इतिहासांत नमूद आहे. वाडकरानें हा हल्ला केला खरा; पण त्यामुळें फार दिवस कांहीं बार्देज त्याला आपल्या ताब्यांत ठेवतां आला नाहीं. रेईसमाग व आग्वाद हे दोन किल्ले तर फिरंग्यांकडेच होते.

सदर सालच्या मे महिन्यांत मार्केज द लौरिसाल हा व्हॉईसराय पोर्तुगाल येथून गोव्यांत आला. त्यानें येतांनां ताज्या दमाचें सैन्य व बरीच युद्धसामुग्री आणली होती. त्यांत दर मिनिटास वीस बार उडविणाऱ्या सोळा तोफा होत्या. आरमारांतहि सहा मोठीं लढाऊ जहाजें होतीं.

बार्देस वाडकरानें व्यापलेला पाहून व्हॉईसरॉय लौरिसाल यानें १३ जून १७४१ रोजीं

बार्देसवर हल्ला चढविला Frederico Weinholtz या डॅनिश कॅप्टनच्या अनुभवानें नुकत्याच बनवलेल्या व आपणासोबत गोव्यांत आणलेल्या सदरील नवीन तोफांचाहि या लढाईंत उपयोग करण्याचें त्यानें ठरवलें. तोफखान्याचा कॅप्टन सां मार्त या नांवाचा फ्रेंच इसम होता. त्यानें तोफांचा भडिमार सुरू करतांच आगीचे लोळ उसळले व त्यामुळें वाडकर सावंतांचें धाबें दणाणलें. त्याला बार्देस ताब्यांत ठेवणें आतां अशक्य झालें; आणि अशा रीतीनें एकाच दिवसांत फिरंग्यांनीं बार्देस प्रांत घेतला.

या आणीबाणीच्या प्रसंगीं वाडकर पेशव्यांकडे धांवला आणि सहाय्य मागूं लागला; तथापि पेशव्यांनीं फिरंग्यांकडे झालेल्या आपल्या नवीन तहाकडे नजर देऊन त्यांचीच बाजू घेतली. (Portugueses e Maratas V. 5 — डॉ. पिसुर्लेंकर.)

अखेर वाडकरानें ११ सप्टेंबरला फिरंगी सरकारकडे तह केला

पोर्तुगीजांनीं सदर लढाईंत मिळविलेल्या यशाबद्दल नाग सावंत भोंसले या वाडकराच्या घराण्यांतीलच एका इसमानें त्यांचें अभिनंदन केलें. फिरंगी सरकारचा सेक्रेटरी लुईज आफोंस दांत याला पाठविलेल्या एका पत्रांत नाग सावंत लिहितो कीं— "आलिकडे वर्तमान आईकितों जे गनिमांस सजा पोंहचऊन खोरजुवेचा कोट बारदेसचीं ठाणीं हस्तगत केलीं हें आइकोन बहूत खुशहाली हासील जाहाली. बहूत उत्तम जाहालें... कोणहि प्रकारें इस्तादाचें कल्याण तेंच आम्हांस पाहिजे."

सदर पत्र गोतेदसरांत उपलब्ध आहे. (पोर्तुगीज वाडकरांशीं सामना डॉ. पसुर्लेकर, भारतमित्र रौप्य महोत्सव अंक).

व्यंकटरावातर्फे फिरंगी व मराठे यांच्यांत झालेल्या तहामध्यें अशी एक अट होती कीं, साष्ट व बार्देश या प्रदेशांत जो गावगन्ना दिवाणी वसूल येईल त्यांपैकीं चाळीस टक्के वसूल बाजीरावास मिळावा. पण ही अट फिरंग्यांनीं पाळली नाहीं या कारणावरून पेशव्यांचा सरदार गोविंदपंत ठाकूर १२ मे १७४२ रोजी तीनेक हजार घोडेस्वार व तितकेंच पायदळ घेऊन साष्टींत शिरला व तेथें सक्तीनें खंडणी वसूल करूं लागला त्यानें तब्बल पंधरवडा साष्टींत लुटालुट केली आणि नंतर सांगें येथें जाऊन तेथील किल्ल्यास वेढा दिला.

सांगें किल्ल्यांत त्यावेळीं अणाजी प्रभु नांवाचा सौंदेकराचा प्रधान होता. गोविंदपंतानें हा किल्ला काबीज करून अणाजी प्रभूस कैद केलें सांगें किल्ल्याप्रमाणेंच फोंडें किल्लाहि गोविंदपंतानें सर केला.

सांगें व फोंडें येथील किल्ले मराठ्यांकडे गेले हें योग्य झालें नाहीं असें फिरंग्यांना वाटलें आणि त्यांनीं सैन्याची तयारी करून त्याच सालच्या ८ जून रोजीं सांगें किल्ल्यावर हल्ला चढवला व तो ताब्यांत घेतला. किल्ला तेथें राहूं देणें धोक्याचें वाटून दुसऱ्याच दिवशीं त्यांनीं तो मोडूनहि टाकला.

फिरंगी सैन्यांत ६०० युरोपियन व १५०० एतद्देशीय शिपायी, नवीनपैकीं २ तोफा व कांहीं घोडेस्वार अशी व्यवस्था असून सैन्याचे मुख्याधिकार जनरल मानुयेल सोआरिस व्हेल्यु याकडे होते. तथापि सांगेची कामगिरी त्यानें आपल्या हाताखालील दुसऱ्या अधिकाऱ्यावर सोंपविलेली होती.

लगेच ११ जून रोजीं फिरंगी सैन्य फोंडें येथें जाऊन त्यानें तेथील किल्ल्यास वेढा दिला व तो स्वाधीन करून घेतला. सांगें किल्ल्याप्रमाणेंच हा देखील मोडून टाकावा असें फिरंग्यांच्या मनांत होतें; तथापि सौंदेकराच्या आग्रहामुळें त्यांनीं तो किल्ला पूर्ववत त्याच्या स्वाधीन केला.

फोंडें किल्ला सौंदेकराकडे असणें फिरंग्यांनां अगत्याचें वाटे, कारण त्यामुळें गोव्याजवळचा प्रांत आपल्या कक्षेंत राहील अशी त्यांची दृढ समजूत होती.

स. १७४४ सालीं दों मिगेल द आल्मैद हा इसम गोव्याच्या व्हॉइसरॉयच्या अधिकारावर आला. त्यानें वाडकर भोंसल्यावर स्वारी करून ५ मे स. १७४६ रोजीं हळर्णे किल्ला व १८ मे रोजीं डिचोली किल्ला असे दोन किल्ले घेतले. त्याच सालीं नोव्हेंबरच्या १६ तारखेस व्हॉइसरॉय आपल्या आरमारानिशीं कायसुवला आला. तेथून सातव्या दिवशीं म्हणजे ता. २३ रोजीं त्यानें तेरेखोलच्या किल्ल्यावर चाल करून तो हस्तगत केला. या वेळीं वाडकराचें सारें आरमार फिरंग्यांनीं पकडलें.

वाडकराच्या आरमारांत १५ ते २० तोफवालीं दहा पाल, १७ गलबतें, ३ बतेले, १ मचवा, चार पारंग व कित्येक होड्या होत्या.

स. १७४६ च्या डिसेंबरच्या ३ तारखेस फिरंग्यांनीं रेडीचा किल्ला घेतला. वाडकराविरुद्ध चाललेल्या सदर लढाईत फिरंग्यांनां सौंदेकरानें आपलें सैन्य पाठवून सहाय्य केलें.

फिरंग्यांच्या वाडकर सावंतावरील चढाईमुळें व त्यांनीं मिळविलेल्या विजयामुळें सावंताच्या बाजूनें फिरंग्यांकडे मध्यस्थी करण्याची पेशव्यांनां आवश्यकता भासूं लागल्यानें त्यांनीं त्या कामी आपला वकील महिपतराव चंदा याला फिरंग्यांकडे पाठवला. तो गोव्यांत येऊन बरेच दवस झाले, तरी तहाचें चिन्ह न दिसल्यानें पेशव्यांनीं सदाशीवराव भाऊकडे ही कामगिरी संपवली. तो मोठ्या सैन्यानिशीं कर्नाटकांत आला.

पेशव्यांनीं पिलाजी जाधवरावास लिहिलेल्या ता. १२ डिसेंबर १७४६ च्या पत्रांत सदाशीवराव भाऊच्या पहिल्या स्वारीचा असा उल्लेख मिळतो — "सावंताचीं दोन तीन ठाणीं फिरंग्यानें घेतलीं. सावंत पहिल्यापासून पदरचे, त्यांणीं चाकरी केली. त्यांचें साहित्य करावें जरूर आहे. यास्तव फौज रवाना करावयाची तजवीज केली आहे. चिरंजीव राजश्री सदोबा यास निरोप देऊन त्या प्रांतें रवाना करावें ऐसा विचार केला... तिकडे सावंतावर फिरंगीयानें हाट केली तरी तिकडे दोन हजार फौज पाठविणें तिकडे पाठवून, त्याचेंहि साहित्य करावें...." (ऐतिहासिक पत्रव्यवहार पृ. ४१ सं. रि.- गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुलकर्णी, या. मा. काळे).

सहाशिवराव भाऊच्या सदर स्वारीचें जें वर्णन गोवें दप्तरांत मिळतें त्यावरून फिरंगी लोकांत त्या स्वारीबद्दल बरीच घबराट उडाल्याचें दिसून येतें. यासंबंधीं व्हॉइसरॉय मार्केज द आलोर्न यानें पोर्तुगालच्या राजास ३० डिसेंबर १७४७ रोजीं जें पत्र पाठविलें त्यांत तो लिहितो — "तीस हजार घोडेस्वार व अगणित पायदळ असलेलें नानाचें सैन्य गोव्यावर येत असल्याचें समजून आलें... हें सैन्य साष्टीपासून जवळ येत आहे असें कळल्यावर घाटांतील सर्व खिंडी मी व्यापून टाकल्या आणि झाडें पाडून वाटेंत टाकलीं. हेतु हा कीं, त्यामुळें शत्रूस घाटाखालीं उतरतांनां अडचण व्हावी.

मराठ्यांचें नांव ऐकतांच एशियन लोकांच्या पोटांत धडकी भरते. त्यामुळें सुपें येथें सदोबाचें सैन्य पोंचल्याचें ऐकतांच साष्टींतील लोक घरें-दारें सोडून पळाले. ज्यांनीं घाटांतील वाटा रोखून धरल्या होत्या असे सौंदेकर व राणे यांचे शिपाई देखील फरारी झाले. आमचे सैनिकहि असेंच करणार होते; पण मी सर्व सरदारांनां ताकीद दिली कीं, जे शिपाई पळून जाण्याचा प्रयत्न करतील त्यांचीं डोकीं उडविण्यास मागें-पुढें पाहूं नये..."

कांहीं महिन्यांपूर्वी नानानें महिपतराव चंदा यास आपला वकील म्हणून मजकडे पाठविलें होतें व सावंताशीं तह करण्याचें कळविलें होतें. त्याला मी उत्तर दिलें नाहीं; त्यामुळें उत्तराची वाट पाहात तो येथेंच राहिला... पुढें कांही दिवसांनीं महिपतरावास परत पाठविण्यास सदोबानें लिहिलें व मराठ्यांचें सैन्य इकडे येण्याचें कारण फिरंग्यांनीं वाडकराशी तह करावा हेंच होय असेंहि सुचविलें. या शिवाय उत्तर कोंकणावर स्वारी करण्याचा आमचा उद्देश आहे कीं काय हेंहि सदोबाला समजून घ्यावयाचें होतें. भोंसले हे पेशव्यांचे अंकित असल्यानें त्यांचा प्रदेश व किल्ले त्यांनां परत करून त्यांच्या-शीं योग्य तह करावा असेंहि त्यानें लिहिलें. तथापि त्या सदोबाच्या पत्रास मी उत्तर केलें नाहीं."

"मराठ्यांच्या दराऱ्यामुळें अनेक राजे व नबाब त्यांनां खंडणी देण्यास तयार झाले; तथापि सदोबाचें अगणित सैन्य गोव्याच्या सीमेवर येऊन भिडलें असतांहि आपण त्याकडे वकील पाठविला नाहीं, कीं त्याच्या पत्रास उत्तरहि दिलें नाहीं. (Livro das Monções n.° 120, म. गो. स्वाऱ्या — डॉ. पिसुर्लेकर).

दुसरीकडील महत्वाच्या कामगिरीमुळें या वेळीं पेशव्यांनां गोव्यांत फिरंग्यांशीं लढाई करण्यास सवड नव्हती. तथापि फारशी लढाई न करतां गोवें मिळाल्यास पेशव्यांस पाहिजे होतें. त्यासाठींच त्यांनीं राणे, देसाई वगैरे फिरंग्यांच्या हस्तकांशीं अंतस्थ सूत्र हि ठेवलें होतें.

पेशव्यांचा सरदार दादाजीराव भावे नरगुंद कर याचा मुलगा सरदार भास्करराव नरगुंदकर पेशव्यांच्या सैन्यांत चांगल्या अधिकारावर होता. त्यानें गुप्त रीतीनें फिरंगी सरकारास लिहिलेल्या ता. ११ मे १७४८ च्या पत्रांत सदर मुद्यासंबंधीं बरीच माहिती मिळते.

हा भास्करराव नरगुंदकर पेशवे सरकारांत मोठा शहाणपणा व पराक्रम दाखवून वरिष्ठांची मर्जी एका बाजूनें संपादन करी; तर मोठ्या कारस्थानीपणानें आपल्या पेशवे सरकारांतील महत्वाच्या गुप्त बातम्या दुसऱ्या बाजूनें गुपचूप रीतीनें शत्रूला कळवून शत्रूकडून मोठा लांच उपटण्याचें निंद्य कृत्यहि सफाईनें करी. पेशवे सरकारांतील अनेक गुप्त बातम्या त्यानें फिरंगी सरकारास कळवून आपला स्वार्थ साधला होता.

पेशवाई ३

सरदार भास्करराव नरगुंदकर यांच्या ११-५-१७४८च्या पत्रांतील मजकूरः —

"अजम लुईस आफोंस दांत सकडतार दे इस्ताद दाम शफखतहू

सलाम बाहदज सलाम महवल मकसुद आकी दिगर कुली हकीकत मुख्य पत्रावरून मालूम होईल परी अयाम इस्तादास तिकडील नवे काबेजात जाहाले. मुलकांचे जमियेतदार सामील जाहाले आहेत. त्यास इस्तादानें आपले पदरीं घेतले आहेत. परंतु त्यांचे राजकारणाचे दोरे चहूंकडे खेलतात. गत वर्षी अजम सदाशिवपंत यांची मोहीम दक्षण प्रांते जाहाली त्या त्यागायेत जमेदारांचे राजकारणाचा दोरा आहे. त्यास सामत आहा तों राजकारण दाटसे जबरसे पडले. सत्रोजी राणेकडील व झालबा राणे याकडे राजकारण खेतले. राणे मजकुराचे कारकून रुद्राजी सेणवीं व दत सेणवीं उभयेतां दोघा राणेपासी आहेत. त्यांचीं पत्रें घेऊन त्याकडील कारकुणास पाठविल्हे होते आणि मजकूर लिहिला कीं आपले निसबतीचे गोवेंत हजार माणूस आहे. बारदेसच्या मूर (किल्ल्याची भिंत) व तरीच्या पाईवाट आहेत. त्या आपणासाधीन आहेत. आपले बंधु पाचसे लोकांनिसी बारदेसी आहेत. कुळी मूर व तारीचे पास (पायवाट) आपणासाधीन आहेत. येसे कितेक अजम पंतप्रधान यांकडे राजकारण चालते. पंतप्रधान याकडून पैका कापड आणितात. हें वर्तमान इजानेबांस सांप्रत दाखल जाहालें. हें कसें आहे कलत नाहीं., इस्तादांची तव बदोबस्ती राजकारणांत व सेणवी मजकूर या प्रकारची करितात. तर मोहिबी सावंतांचे निसबतीचे लोक व जमेदार व कारकून घरेदारे जंजिरेआत असतील त्यास एकंदर बाहीर घालावे व मुरास व जंजिरेचे चौकीस लोक असतील त्यास जंजिरेबाहेर ठेवावे. त्याकडील लोक जंजिरेत येता जातां वाजपुसीनें कार्याकारण घेत जावे.

पंतप्रधान यांस गोमांतक घेऊन देऊं म्हणोन कबलात केली आहे असें राजकारण घोलतें. इजानेबास दाखल जाहाले ते येकबालपन्हास व मोहिबांस दखल व्हावे म्हणोन लिहिलें आहे. इस्तादाचे पुण्य समर्थ असतां कोणती गोष्ट घडणार नाहीं परंतु इजानेबास दखल जाहालेले इस्तादास कलावे म्हणोन लि॥ आहे. पेसजी याचप्रकारें वसेस व साष्टी कलवेस राजकारण दोन च्यार वर्षे करून मोहीम केली. त्याचप्रकारें तिकडेही राजकारण चालते. मागें अंताजीपंत पलशा म्हणोन साष्टीमध्यें देसक होता त्याणें वाट दाखवून कलवेचे वाटेने नेले हें मोहिबास दखल आहे. तर वाडी प्रांतांतील कारकून मोहिबानजीक असतील तर कोणाचा इतबार न धरावा व राणेकडील दोघे कारकून आहेत त्यांस कैदींत ठेवावें हे कुली हकीकत पंत म॥ निल्हेस जबानी सांगितलें आहे. हें सांगितील तीं वचनें इजानेबाचीं समजणें. इजानेबानें लिहिले हे न दर्शवावें. मोहिबास व येकबालपन्हास व कोणी जिवाळेचा नकल लिहिणार असेल त्यास दखल करावे. सोंधेवाले यांणीं पंतप्रधान यासी राजकारण लावलें आहे मर्दनगड पंतप्रधानासी द्यावा असा मजकूर होत आहे तर बेगीकरून मर्दनगडास इस्तादांचे ठाणे पडेसे करावे. हे कुली विस्तार पेग म॥ निल्हेस सांगितलें आहे जे इस्तादांच्या प्रयोजनाचे असेल तें घ्यावें. प्रयोजनाचे नसेल तें सोडावें. जमेदारांस नजरते राखावे. कारकून असतील त्यास जबरदस्तीनें कैदीत ठेवावें.

इजानेबाचा लोकीक न होये ते करावे. इजानेबाने लिहावेस न सरे परंतु इस्तादाहून थोर दुसरें नव्हे. याकरितां कलमी केले हे कितावत."

भास्करराव दादाजी हा कोण आहे याचा उलगडा होत नसल्यानें रियासतकारांनी 'ऐतिहासिक पत्रव्यवहार' या पुस्तकांत पृ. ७७ मध्यें ज्याबद्दल लिहिलें आहे तो हाच सरदार भास्करराव! (गो. म. खाऱ्या).

फोंडेंचा मर्दनगड किल्ला आपल्या सत्तेंत असावा अशी पेशव्यांस फार इच्छा होती. हा किल्ला ताब्यांत असला म्हणजे पुढें मागें फिरंग्यांशीं लढाई देण्यास फार सोयीस्कर हेंच त्याचें कारण होतें.

पुढें सन १७५६ सालीं सोंदेकरांनीं मर्दनगड किल्ला पेशवे सरकारकडे गहाण ठेवला. लगेच ही बातमी फिरंग्यांना कळली व व्हिसिरै कोंदि द आल्व्ह हा बऱ्याच सैन्यानिशीं फोंड्यावर चाल करून गेला. फिरंगी सैन्यानें किल्ल्यास वेढा दिला; पण ऐन वेळीं किल्ल्यांतील लोकांनां जादा फौजेची कुमक आल्यानें फिरंग्यांचा उद्देश सिद्धीस गेला नाहीं. इतकेंच नव्हे तर ज्याच्या नेतृत्वाखालीं हा हल्ला झाला त्या व्हिसिरैलाच मराठ्यांनीं ठार केलें. या लढाईत फिरंग्यांचे १४ सरदार व ८७ लष्करी लोक मेले. २८ जून १७५६ अशी या लढाईची तारीख ऐतिहासिक कागद पत्रांत नमूद आहे. (O Enigma da morte do Vici-Rei Conde de Alva) डॉ. पिसुर्लेकर.

सदर लढाईत मेलेल्या व्हिसिरैचें प्रेत पेशव्यांच्या फोंडेच्या किल्लेदारानें आदरानें गोवें येथें पाठवून दिलें हें लक्षांत घेण्यासारखें आहे. (गो. म. खाऱ्या.)

फोंडेंचा मर्दनगड किल्ला पेशव्यांच्या ताब्यांत आल्यावर लगेच त्याची काळजीपूर्वक दुरुस्ती करण्याचें काम सुरू झालें. स. १७५७ च्या सुरवातीचे दोन महिने दुरुस्तीचें काम पुरें करून नीट बंदोबस्त लावण्यासाठीं त्रिंबकराव विश्वनाथ फोंडें येथें येऊन राहिला होता. (म. गो. खाऱ्या — डॉ. पिसुर्लेकर).

फोंडें किल्ला घेण्याचा फिरंग्यांचा १७५६ चा प्रयत्न फसला व व्हिसिरै पडल्यानें तर त्यांनां तें शल्य बरेंच बोंचूं लागलें. गोव्याचा सुरक्षितसाठीं आणि अपयश डावलून नुकसान भरून काढण्यासाठीं फिरंग्यांचा त्या किल्ल्यावर डोळा होताच. संधि पाहून १७६३ त फिरंग्यांनीं त्या किल्ल्यावर पुनः स्वारी केली आणि १ जून १७६३ रोजीं व्हिसिरै कोंदि द योग यानें तो काबीज केला. या कामांत फोंडें महालांतील सरदेसाई नारबा नाईक, इतर कांहीं इसम आणि खुद्द किल्ल्यांतील अधिकाऱ्यांपैकीं बापूजीपंत मुजुमदार व सरदार रघू सावंत हे फिरंग्यांनां फितूर झाले. (Livro das monções नं. १३६, पृ. ३३९). मराठ्यांनां पुनः संधि सांपडूं नये या हेतूनें थोड्याच दिवसांनंतर फिरंगी व्हिसिरैनें फोंडें किल्ला पाडून टाकला.

फोंडें किल्ल्याच्या कक्षेंतील प्रदेश फिरंग्यांकडून परत मिळविण्याचा श्रीमंत माधवराव पेशवे यांचा विचार होता आणि त्या दृष्टीनें ते संधीची वाट पाहात होते. स. १७७१ च्या जानेवारी महिन्यांत पेशव्यांचें सैन्य कर्नाटकांत हैदरअल्लीवर जाण्यास निघालें होतें. त्यावेळीं सैन्यास फोंडें महालांतून जाण्यास फिरंग्यांनीं वाट द्यावी अशी पेशव्यांनीं खटपट सुरू केली. पेशव्यांचा याबद्दलचा अंतस्थ हेतु, जातां जातां फोंडें प्रांतहि काबीज करावा असा होता. या

सैन्यांत दहा हजार फौज असून सैन्याचें नेतृत्व सरदार विसाजीपंत केशव लेले याकडे होतें. त्या खेरीज एक मराठा आरमार मसुरेंच्या जवळ येऊन राहिलें होतें. त्या आरमारांत १७ पाल व ८५ गलबतें होतीं. सदर सैन्यास वाडकर सावंतांचेंहि सैन्य मिळून साऱ्या सैन्याचा डिचोली येथें तळ पडला होता.

पेशवे सरकारच्या सूचनेप्रमाणें फोंडें महालांतून जाण्यास फिरंग्यांनीं खुशीनें वाट दिली नाहीं, तर जबरदस्तीनें तिकडून सैन्य न्यावें असें सेनानी विसाजीपंत याच्या मनांत आलें आणि त्यानें त्या दृष्टीनें फिरंगी सरकारला एक खलिता पाठवून त्यांतून असाहि स्पष्ट इशारा दिला कीं — "हैदरआलीची मसलत राहून गोवेंचे रयेतीवर पडेल. पडल्यानंतर दुतर्फा नाश होईल. इकडून कबूल असे....."

खलिता मिळाल्यावर फिरंगी विचारांत पडला. फिरंगी मुत्सद्यांनां मराठ्यांचा स्वभाव माहीत होता. ते अमूक एक गोष्ट करूं म्हटल्यावर केल्याशिवाय राहात नाहींत याची त्यांनां जाणीव होती. त्यांनीं मोठ्या धैर्यानें लढाईची तयारी चालविली व शत्रूच्या साऱ्या वाटा रोखून धरल्या.

सरदार विसाजीपंताच्या सैन्यापुढें फिरंग्यांचा निभाव लागणें कठिण होतें. याची फिरंगी अधिकाऱ्यांनांही भरपूर जाणीव होती आणि म्हणूनच त्यांनीं दुसऱ्या बाजूनें सामोपचाराचाहि प्रयत्न सुरू केला. विठ्ठलराव वर्दे वालावलीकर या कुशल मुत्सद्याची त्या कामी नेमणूक होऊन सहाय्यक म्हणून श्रोती यासहि त्यासोबत पाठविलें. विठ्ठलराव पेशव्यांकडे जाऊन त्यानें फिरंगी सरकारतर्फे फार चांगली वकिली केली. फोंडें महालांतून पेशव्यांच्या सैन्यास वाट दिली तर हैदरअल्लीशीं लढण्याचा फिरंग्यांवर प्रसंग येईल याची त्यानें पेशव्यांनां गोड शब्दांत कुशलतेनें जाणीव करून दिली.

दुसऱ्या बाजूनें पाद्री डॉ. फ्रेई लेयांद्र द माद्रि द देउस् याकडून खुद्द श्रीमंत माधवराव पेशव्यांकडे फिरंग्यांनीं अनुसंधान लावलें. श्रीमंतांनां या फिरंगी पाद्री डॉक्टरच्या औषधानें गुण येत चालल्यासारखें वाटल्यानें त्याच्यावर त्यांची बहाल मर्जी जडली होती. मोठ्या आर्जवीपणानें पुनः पुनः प्रश्न काढून त्यानें श्रीमंतांकडून असें आज्ञापत्र मिळविलें कीं — "विसाजीपंतानें फिरंग्यांच्या वाटेस जाऊं नये." हें आज्ञापत्र विसाजीपंतांकडे पोंचतांच त्याचा हिरमोड झाला. त्याला अत्यंत वाईट वाटलें. त्याचे विचार असे होते कीं, फोंडें घेऊन गोवेकरांनां हां हां म्हणतां आपण गोव्यांत आणूं. सरदार व्यंकटराव घोरपडे यांच्यासारखेंच आपणालाहि फिरंग्यांस नामोहरण करण्याचें श्रेय लाभेल. तथापि त्याचे ते मनांतले विचार मनांतच राहिले; आणि गोव्याचें संरक्षण व संपन्नता यांच्यासाठीं गोवेकरांनां आवश्यक वाटणाऱ्या भोवतालच्या सत्तावाढीच्या कार्यातील अल्पभाग तरी पुरा झाल्याचें त्यांनां समाधान वाटूं लागलें. (Contribution à l'Etude de l'Histoire de la médecine portugaise dans l'Inde, 1927 डॉ. पिसुर्लेकर.)

व्हिसिरें मार्केज द ताव्होर हा या सत्तावाढीच्या प्रकरणांत फारच गुंगला होता. तो येथें अधिकारावर असतांनां ७ फेब्रुवारी १७५३च्या पत्रांतून त्यानें पोर्तुगालच्या राजास लिहिलें होतें कीं — "अंकोल्यापासून भोंसले आणि आंग्रे यांच्या सरहद्दीमधील 'मसुरें'

नदीपर्यंत फिरंगी सत्तेची हद्द वाढविणें फार अगत्याचें आहे. कारण त्यामुळें या कोंकणचें क्षेत्र व संपन्नताहि वाढेल. बालाघाटाकडील व्यापाराला ठीक होईल. घांटी वाटा सोयीच्या मिळतील. . .'' (Teutativas dos Portugueses para a ocupação do Concão—डॉ. पिसुर्लेकर).

श्रीमंत माधवराव पेशवे व त्यांचा चुलता राघोबादादा यांच्यांत वैमनस्य उत्पन्न झाल्याची संधि साधून हैदरअल्लीनें पेशव्यांचा दक्षिणेंतील बराच मुलुख बळकावला होता. त्यांच्या अंतस्थ गडबडींत तो आपल्या पचनी पडेल असा त्याचा कयास होता; तथापि माधवरावांच्या स्वारीनें तो फोल झाला. मराठ्यांच्या या स्वारीमुळें हैदरवर बरीच आपत्ति आली. त्यानें त्यांचा सारा प्रदेश परत केला आणि लढाईच्या ३२ लक्ष रुपये व सावनूरसह तेथील जादा मुलुख देऊन तह केला. तथापि त्या १७६४ सालापासून त्यांच्यांत विरोध उत्पन्न झाला.

पुढें सन १७६६-त म्हैसूरचा राजा चिक्कृष्णराज निधन पावला. त्याच्या मागें त्याचा वडिल मुलगा नंदराज याला हैदरनें गादीवर बसवलें. नंदराज हैदरचें जबरी सार्वभौमत्व मानण्यास तयार नसल्यानें त्याला त्यानें बंदींत टाकलें व त्याचें राज्य, मालमत्ता इ. तो आपण बळकावून बसला. याचा पेशव्यांना राग आला. त्यांनीं किल्येक दिवसपर्यंत सामोपचारांनीं हैदर जाग्यावर येतो का पाहिलें आणि ज्यावेळीं निरुपाय झाला त्यावेळीं म्हणजे सन १७७१ सालच्या जानेवारी महिन्यांत मराठ्यांनीं हैदरवर स्वारी केली याचवेळीं या सैन्याला फोंडें महालांतून जाण्यास वाट द्यावी अशी फिरंग्यांकडे मराठ्यांची मागणी होती.

श्रीमंतांच्या आज्ञापत्रामुळें विसाजीपंतानें आपलें सैन्य दुसऱ्या बाजूनें कर्नाटकांत नेलें आणि हैदरवर स्वारी केली. हैदर लढतां लढतां हतबल झाला व मागें हटूं लागला. त्यावेळीं त्यानें मुलुख उजाड करून विहिरी तलावांत विष घातलें व किल्येक इमारतींना आगीहि लावल्या. अखेरीस निरुपायानें आप्पाजीराव वकिलास मराठ्यांकडे पाठवून तो शरण आला. यावेळीं हैदरनें ३६ लक्ष रुपये लढाईचा खर्च व दरसाल १४ लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केल्यावर पेशव्यांनीं त्यांच्याशीं तह केला.

कोणत्याहि कारणानें का असेना; पण त्यावेळीं फोंडें प्रांत परत मिळविण्याच्या बाबतींत खुद्द पेशव्यांची कांहीं दृढ इच्छा दिसली नाहीं आणि अशा रीतीनें तो प्रांत फिरंग्यांकडेच राहून त्यांतील अंत्रूज; जांबावली-पंचमहाल, काणकोण, रामाचें भूशीर (काबु द राम) इ. प्रदेश त्यांच्या सत्तेंत आला.

सौंदेकर

उत्तर कर्नाटकच्या सिर्सी तालुक्यांतील ' सौंदें ' हेंच सौंदेकरांचें मूळ ठिकाण होय.

विजयनगरचा शेवटचा सम्राट सदाशिवराय यांच्या राजवटींत त्यांचा प्रधान रामराय यांच्या बहाल मर्जीवरून सौंदेकरांचा मूळ पुरुष इमोडी आरसप्पा राजेंद्र वडियार यांनां सन १५५५ सालीं विजयनगर साम्राज्याच्या अधिसत्तेखालील ' सौंदें ' ही जहागिरी मिळाली. इमोडी आरसप्पा राजेंद्र हे सन १५५० पासूनच विजयनगरच्या सैन्यांत अधिकारावर होते.

कित्येक वर्षे भरभराटींत चाललेल्या विजयनगर साम्राज्याचा उत्कर्ष दक्षिणेंतील सुलतानांस सहन न होऊन त्यांनीं विजयनगरवर हल्ला करण्याचा कट केला. आदिलशहा, कुतुबशहा व निजामशहा यांनीं आपआपल्या फौजा जमवून एके दिवशीं विजयनगरकडे कुच केलें. विजयनगरचा प्रधान रामराय याला ही बातमी कळतांच तो आपल्या फौजेसह प्रतिकारास पुढें झाला. तालिकोटपासून तीस मैलांवर मंगळवार ता. २३ जानेवारी सन १५६५ रोजीं लढाई जुंपली आरंभीं विजयनगरच्या सरदारांनीं आपापल्या सैन्यासह कुशलतेच्या हल्ल्यांनीं शत्रूला बराच मार दिला व यशाचें चिन्ह दिसूं लागलें; पण शत्रूंनीं गनिमीपणानें प्रधान रामराय याच्यावर हल्ला चढवून त्याचा वध केला आणि पारडें फिरलें. शत्रूंनीं प्रधानाचें डोकें भाल्याच्या टोंकावरून सैन्यांत फिरवलेलें पाहातांच हिंदु सैरावैरा धांवूं लागले आणि मुसलमानांनीं कत्तलीस सुरवात करून एक लाख लोक मारले.

शत्रुसैन्य शहराच्या रोंखानें चाल करून आलें. निरुपायानें लढाईवरून परतलेले सरदार आपापलें जडजवाहीर घेऊन शहरांतून निघून गेले. शत्रुसैन्यानें सारें शहर उध्वस्त केलें. तब्बल पांच महिनेपर्यंत लूट चालली होती. त्यावेळीं तेथून निघालेले सरदार आपापल्या जहागिरीच्या गांवीं जाऊन स्थायिक झाले. त्याचप्रमाणें इमोडी आरसप्पा राजेंद्र हेहि ' सौंदा ' या आपल्या जहागिरींत आले.

इतर ठिकाणच्या प्रमाणें उत्तर कर्नाटकांतहि मिरजन, होनावर, गेरसप्पा अशीं कित्येक संस्थानें विजयनगर साम्राज्याच्या अंतानंतर जशीं स्वतंत्र झालीं, तसेंच ' सौंदें ' संस्थानहि स्वतंत्र होऊन आपला राज्यकारभार स्वतंत्र राज्याच्या पद्धतीनें चालवूं लागलें.

' सौंदें ' या शहराचें प्राचीन नांव ' सुधापूर ' असें असून तें सुंदर होतें. (Buchanan journey III पृ. २११).

राजे आरसप्पा राजेंद्र वडियार यांनीं मोठ्या कुशलतेनें सन १५५५ पासून १५९८ पर्यंत आपल्या या राज्याचा राज्यकारभार कुशलतेनें चालविला. त्या वेळीं सौंदा राज्यांत कारवारपर्यंतचा प्रदेश येत होता. त्याचप्रमाणें कालीनदीच्या अलीकडचा भाग देखील सौंदा राज्यांत संभवत असून त्या प्रदेशाला ' शिवेश्वर महाल ' असें म्हणत. कारवार व शिवेश्वर येथें सौंदेकरांचे किल्ले होते. ' सदाशिवगड ' हाहि किल्ला सन १५६० च्या सुमारास राजे आरसप्पा वडियार यांनी बांधला.

सन १५९८ सालांत एका असाध्य दुखण्यानें राजे आरसप्पा निधन पावले. त्यांच्यामागें त्यांचा चिरंजीव (२) रामचंद्र राजेंद्र वडियार हा गादीवर आला. याचा काल स. १५९८ ते

१६१८ हा आहे. याच्या मृत्यूनंतर गादीवर आलल्या राजाचें नांव (३) रघुनाथ राजेंद्र वडियार असें आहे सन १६१८ पासून १६३८ पर्यंतचा वीस वर्षांचा काल त्याच्या कारकिर्दीचा आहे.

सौंदेकरांच्या गादीवर आलेल्या चौथ्या राजाचें नांव मधुलिंग राजेंद्र वडियार असें आहे. याच्या राज्यकारभाराचा काल स. १६३८ ते १६७४ आहे. याच्या मागें (५) सदाशिव राजेंद्र वडियार याकडे राज्यसुत्रें आलीं. त्यानें स. १६७४ पासून १६९७ पर्यंत राज्यकारभार पाहिला. याच्याच राजवटींत सौंदेकरांनां मोंगलांकडून फोंडें किल्ला व त्याच्या कक्षेंतील सारा प्रदेश वार्षिक ८० हजार रुपये खंडणी देण्याच्या अटीवर कायम मिळाला. (Agentes da Diplomacia Portuguesa — डॉ. पिसुर्लेकर.)

सहावा सौंदेकर राजा बसवलिंग राजेंद्र वडियार हा होय. हा स. १६९७ सालीं गादीवर आला आणि १७४५ सालीं वारला.

त्याच्या मागून (७) सवाई इमोडी सदाशिवराव राजेंद्र वडियार यांनां राज्याभिषेक झाला. यांचा काल स. १७४५ ते १७७५ आहे. यांच्या कारकिर्दीचा सुरवातीचा काल जरी ठीक गेला; तरी पुढें त्यांच्या आयुष्यांत अस्वास्थ्यच विशेष आलें. उत्पन्न कमी व खर्च जास्त झाल्यानें फोंडें किल्ल्याबद्दल मराठ्यांना देण्याची खंडणी थकली आणि त्यामुळें त्या किल्ल्यासह फोंडें प्रांत त्याला मराठ्यांकडे गहाण ठेवावा लागला. ही थकलेली बाकी आठ लाख रुपये होती असें ऐतिहासिक कागदपत्रांत नमूद आहे. सौंदेकरांना हैदरअलीच्या राज्यविस्ताराचा उपद्रव तर विशेष बाधला !

या हैदरअलीखानाचा जन्म वास्तविक एका गरीब घराण्यांत झाला. म्हैसूरचा दलवैकालीन काराकुरी नंदराजय्या याच्या हाताखालीं त्यानें लष्करी नोकरी धरली. लष्करांत बरीच हुशारी दाखवून तो पुढें येतां येतां लष्करी अंमलदार झाला. देवणहळ्ळीच्या वेढ्यांत आणि अर्काट व त्रिचनापल्ली येथील लढाईंत त्यानें 'उत्तम सेनानी' अशी वरिष्ठांकडून शाबासकी मिळविली. सन १७६१ सालीं लष्करी गव्हर्नर म्हणून दिंडिगल येथें त्याची नेमणूक झाली. होतां होतां त्याला स्वतंत्र राज्याची अनावर इच्छा झाली आणि त्यानें त्या दिशेनें प्रयत्न आरंभिले. म्हैसूर, श्रीरंगपट्टण वगैरे घेऊन त्यानें आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्यावेळीं म्हैसूर, काडूर, श्रीरंगपट्टण, बेंगलोर, तुमकूर, कोइमतूर, सालेम, मदुरा, दिंडिगल इत्यादि प्रदेश त्याच्या राज्यांत आला होता. हैदरअली हा एक अक्षरशत्रु मनुष्य; त्याला सहीदेखील व्यवस्थित करतां येत नसे. तथापि केवळ तरवारीच्या व जन्मजात हुशारीच्या जोरावर त्यानें कित्येक लढाया मारल्या आणि स्वतंत्र राज्याचीहि स्थापना केली. कर्नाटकच्या खाणींत त्यानें जशीं कित्येक लहान लहान राज्यें बळकावलीं त्याचप्रमाणें तो सौंदें राज्यावरहि आला.

आरंभीं सौंदेकरांनीं त्याला बराच प्रतिकार केला; पण त्याच्या कडव्या सैन्यापुढें सौंदेकरांचा निभाव न लागून आपल्या राजधानीची सौंदें नगरी सोडून त्यांना शिवेश्वरच्या किल्ल्यांत येणें भाग झालें. अशा रीतीनें सौंदें राज्य हैदरच्या घशांत गेलें.

त्यावेळीं फिरंगी हे नवीन शस्त्रास्त्रांनीं युक्त असून त्यांचें आरमारहि चांगलें प्रभावी असल्याची प्रसिद्धी होती. शिवाय शेजारचें मित्र

राष्ट्र असल्यानें गोवेकर फिरंग्यांशीं सौंदेकरांनीं हैदरकडून आपलें राज्य सोडविण्यासाठीं लष्करी मदत मागितली. या मागणीचा विचार होतो न होतो इतक्यांत शिवेश्वर किल्ल्यावर हैदरची धाड येत असल्याचें आणि आपला फोंडें प्रांतहि सुरक्षित नाहीं असें पाहून सौंदेकर राजे सवाई इमोडी सदाशिवराव ता. २३ जानेवारी सन १७६४ रोजीं सहकुटुंब गोवेकरांकडे आले. त्यावेळीं कोंदि द येग हा व्हिसिरै होता. त्यानें त्यांचें स्वागत करून त्यांना गोव्यांत निर्भय राहाण्याचें अभिवचन दिलें.

पहिल्या प्रथम त्यांचा मुक्काम गोआळी-मौळें येथील वाड्यांत झाला, आणि त्यानंतर ते बांदिवडें येथें आपल्या वाड्यांत राहाण्यास आले. या बांदिवडें (फोंडें) येथील राजवाड्यांतच आज त्यांचे वंशज राहात आहेत.

बांदिवडें येथें गेल्यानंतर त्यांना सालीना बारा हजार असर्फ्या आर्थिक भेट म्हणून देण्याचें फिरंगी सरकारकडून मंजूर झाल्याचें ता. ९ एप्रिल सन १७६५ च्या एका पत्रावरून कळून येतें.

सवाई इमोडी सदाशिवराव राजेंद्र वडियार हे ता. १० फेब्रुवारी सन १७७५ रोजीं कालवश झाले. त्यांच्यामागें त्यांचा पुत्र सवाई बसवलिंग सदाशिव राजेंद्र वडियार यांकडे सौंदेकर राजघराण्याची मुखत्यारी आली. यांचा क्रमांक आठवा आहे.

"पोर्तुगाल राष्ट्राशीं निगडीत झालेले सौंदेकर राजे यांची व्यवस्था ठीक चालण्यासाठीं त्यांनां द्यावयाच्या वार्षिक रकमेंत वाढ होणें इष्ट आहे" अशा आशयाच्या पोर्तुगालच्या राजाच्या ता. २ एप्रिल १७७८ च्या खास पत्रावरून आठ हजारांची वाढ करून पुढें ती रक्कम वीस हजार असर्फ्या करण्यांत आली. आणि आवश्यकतेमुळें ता. ११ फेब्रुवारी सन १७८५ पासून सदर रकमेंत आणखीहि वाढ होऊन ती २३ हजार असर्फ्या झाली. तथापि आजला राजे सौंदेकरांच्या वंशजांनां फक्त सालीना रु. ५६६१-११-०० एवढीच रक्कम गोवा सरकारकडून दिली जाते.

मराठ्यांनां द्यावयाच्या आठ लाख रुपये खंडणीच्या तगाईसाठीं राजे सौंदेकरांनीं मराठ्यांकडे गहाण ठेवलेल्या फोंडें किल्ल्यावर हल्ला करून तो जरी परस्पर फिरंग्यांनीं घेतला असला; तरी त्यावरील राजे सौंदेकरांच्या मूळ सत्तेची जाणीव फिरंग्यांनां होतीच. आणि त्या साठींच त्यांनीं फोंडें किल्ला व किल्ल्याच्या कक्षेंतील सर्व प्रदेश यांचे जुने सत्ताधारी या नात्यानें राजे सौंदेकर यांकडील ता. १७ जानेवारी सन १७९१ च्या तहानें तो सारा प्रदेश आपल्या राज्यास जोडला. तो प्रदेश म्हणजेच आजचे फोंडें, सांगें, केपें व काणकोण हे तालुके होत.

मराठ्यांकडून फोंडें किल्ला घेतला त्यावेळीं लगेच चारच दिवसांनी फिरंगी सरकारनें आपल्या **ता. ५ जून सन १७६३ च्या जाहीरनाम्यानें फोंडें प्रांतांतील साऱ्या प्रजेला त्यांचा धर्म व चालीरीति यांचें संपूर्ण संरक्षण दिलें.** याच संरक्षणाबद्दलचा उल्लेख पुनः सौंदेकरांकडील १७ जानेवारी १७९१ च्या तहांतहि केला आहे.

गोव्यांतील ख्रिस्तीकरणाच्या धामधुमीचे प्रकार डोक्यांत स्थिरावल्यामुळें फोंडें किल्ला फिरंग्यांनीं घेतला हें ऐकतांच त्या किल्ल्याच्या

कक्षेतील अंत्रूज, जांबावली-पंचमहाल, काण-कोण इ. प्रदेशांतील साऱ्या लोकांत भयंकर चुळबूळ चालली; तथापि '५ जूनचा जाहीरनामा निघाल्यानें आणि त्या जाहीरनाम्याचा इत्यर्थ दवंडी पिटून घरोघरीं कळविल्यानें लोक शांत झाले.

या नंतरच्या कालांत राजे सौंदेकरांची गादी केवळ नामधारीच राहिली. राजे सवाई बसवलिंग सदाशिव राजेंद्र वडियार यांच्या देहावसानानंतर त्यांचा पुत्र (९) वीर राजेंद्र वडियार हा गादी-वर आला. यांच्या कारकिर्दीत विशेष कांहीं घडून आलें नाहीं. त्यांच्यामागें (१०) रामचंद्र राजेंद्र वडियार, (११) सवाई बसवलिंग राजेंद्र वडियार, (१२) सवाई वीर सदाशिव राजेंद्र वडियार बहादूर असे क्रमाक्रमानें गादीवर आले. राजे सवाई वीर सदाशिव राजेंद्र हे फार प्रेमळ असून सध्याच्या राजांचे ते आजोबा होत. त्यांच्यामागें त्यांचे थोरले चिरंजीव (१३) राजे बसवलिंग राजेंद्र वडियार हे अधिकारावर आले. हे मोठे हुशार होते; तथापि दुर्दैवानें त्यांनां अकालीं व अपघाती मृत्यू आला! त्यांचेच एकुलते एक चिरंजीव राजे सवाई वीर सदाशिव बसवलिंग राजेंद्र वडियार हे आजला गादीवर आहेत.

सौंदेकर राज्य संस्थापक इमोडी आरसप्पा राजेंद्र वडियार यांपासून आजच्या राजांचा क्रमांक चौदावा आहे.

दक्षिणेंत आदिलशाही सत्ता प्रस्थापित झाल्यावर इतरांप्रमाणें राजे सौंदेकरांनांहि विजा-पूरकराची आधिसत्ता मान्य करावी लागली होती. त्यानंतर श्रीशिवाजी अर्थात मराठे व मराठ्यांनंतर मोंगल आले. फोंडें प्रांत मोंगली सत्तेकडे आल्यावर सन १६९९ च्या पूर्वीं कांहीं वर्षें त्या प्रदेशाचा करवसुलीचा मक्ता सौंदेकरांकडे आला. सारा कर वसूल करून त्याबद्दलची ठरलेली बार्षिक खंडणी मोंगल सरकारांत भरावी म्हणजे त्यांची जबाबदारी संपली. या वार्षिक खंडणीबद्दल दरसाल ऐंशीं हजार रुपये सौंदेकरांनीं मोंगलांस देण्याचें कबूल केलें होतें. मोंगल व मराठे यांच्या संघर्षांत सौंदेकरांनीं मराठ्यांनांहि तीच ८०००० रुपयां-ची खंडणी देण्याचें मान्य केल्याचें दिसतें. (Agentes da Diplomacia Portuguesa पृ. २९२ — डॉ. पां. स. पिसुर्लेंकर).

सन १६९९ सालीं Gemelli Careri या नांवाचा जो एक प्रवासी गोव्यांत आला होता, त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत असें लिहिलें आहे कीं—"फोंडें येथील किल्ल्यांत मोंगल सरकारचा अधिकारी राहात असून त्या किल्ल्याच्या कक्षेतील प्रदेशांत सौंदेकरांची सत्ता सुरू आहे"

मराठे व औरंगजेब यांच्यांतील अखेरच्या लढाईत मराठ्यांचे तडाखे खात खात स. १७०७ मध्यें वृद्ध औरंगजेब कसा तरी एकदां अहमद-नगरला येऊन पोंचला व त्याच सालीं फेब्रुवारी महिन्यांत तो तेथेंच मृत्यू पावला. अवरंगजेबा-च्या मृत्यूनंतरच्या गडबडींत मोंगलांची फोंडें प्रांतावरील सत्ता अजिबाद नष्ट होऊन सौंदेकरां-ची सत्ता तेथें प्रस्थापित झाली आणि पुढें ता. १७ जानेवारी सन १७९१ च्या तहानें ती त्यांनीं कायमची फिरंग्यांनां दिली. अशा रीतीनें नवीन काबिजादींतील आजच्या फोंडें, सांगें, केंपें व काणकोण या महालांतील सारा प्रदेश पोर्तुगीजांकडे आला.

वाडकर सावंत १

फिरंग्यांनां फोंडें प्रांत जसा सौंदेकरांकडून मिळाला, त्याचप्रमाणें पेडणें, बतग्राम व सत्तर हा प्रदेश वाडकर सावंत यांकडून फिरंग्यांकडे आला.

सावंत हे मूळचे उदेपूरचे राजपूत. अजून तेथें त्यांचे वंशज आहेत. त्यांचें घराणें मूळचेंच साहसी व शूर. त्या घराण्यांतील एक वीर पुरुष भाम सावंत उर्फ मांग सावंत भोंसले, मुलुखगिरीच्या हेतूनें आपल्या कांहीं चार चौघ लोकांसह दक्षिणेंत आला व कोंकणांत स्थायिक झाला

पुढें दक्षिण कोंकणची सत्ता आदिलशहाकडे आल्यावर युसूफ आदिलशहानें राज्यकारभाराच्या सोयीसाठीं निरनिराळे सुभे करून त्यांत परगणे केले. तळकोंकणच्या सुभ्यांत जे कित्येक परगणे होते त्यांपैकीं 'भीमगड' परगण्याची देशमुखी सावंत घराण्यानें मिळविली. ही देशमुखी मिळाल्यापासून त्यांनां देसाई असेंहि उपनांव प्राप्त झालें.

कुडाळची देशमुखी प्रभु सामंत यांकडे होती ती तशीच चालू ठेवण्यांत आली. कुडाळकर सामंतांची वंशावळ अशी आहे :— राम प्रभु, गोम प्रभु, गणेश प्रभु, भानजी प्रभु, कानें प्रभु, दादाजी प्रभु, नारायण प्रभु, जोगण प्रभु, इ. (कोंकणच्या इतिहासाचीं साधनें).

कांहीं कालानंतर सामंत व सावंत यांच्यांत वितुष्ट आलें. होतां होतां द्वेष वाढत जाऊन एकमेकांवर हल्ले करण्यापर्यंत त्यांची मजल पोंचली. पुढें सामंतांचें बळ कमी पडलेलें पाहून सावंतानें कुडाळ परगण्याचीहि देशमुखी वसूल करण्यास सुरवात केली. या कारणामुळें उभयतांमध्यें वरचेवर लढाया होऊं लागल्या. त्यांच्या शेवटच्या लढाईंत जोगण प्रभु सामंत हा नारायण प्रभु सामंत देसाई याचा मुलगा मृत्यु पावला आणि नारायण प्रभु बेपत्ता झाल्यानें कुडाळचा देशमुखी हक्क राजरोस सावंत बळकावून बसला.

सावंतांचा मूळ पुरुष मांग सावंत यांच्यापासून सातवा खेम सावंत होय. या खेम सावंतानें आपलें मुख्य ठाणें 'चराठें' येथें केलें. या चराठें गांवाला पुढें 'सुंदरवाडी' असें नांव देण्यांत आलें आणि सुंदरवाडीलाच पुढें 'सावंतवाडी' म्हणूं लागले. खेम सावंताचा काल सन १६२७ ते १६४० आहे. यालाच सावंतवाडीच्या गादीचा संस्थापक मानतात.

सन १६४० सालीं खेम सावंत वारल्यावर त्याचा वडिल मुलगा सोम सावंत हा देशमुखी करूं लागला. सन १६४१ त तो कालवश झाला व त्याचा बंधु लखम सावंत हा देशमुखीच्या अधिकारावर आला. कुडाळ भाग आदिलशहाकडून श्रीशिवाजीनें घेतल्यावर लखम सावंत त्यांनां सामोरा जाऊन मराठा सरकारशीं त्यानें दोस्ती केली व आपला अधिकार कायम राखला. मराठे व लखम सावंत यांच्यांतील हा दोस्तीचा तह सन १६५९ सालीं झाला.

लखम सावंत मोठा कारस्थानी होता. त्यानें निरुपायानें जरी मराठ्यांकडे तह केला, तरी त्याचा अंतस्थ हेतु निराळाच होता. त्यामुळें त्यानें विजापुकरांकडे संगनमत करून तो श्रीशिवाजीवर उलटला. सावंताच्या या कृत्याचा राग येऊन मराठ्यांनीं सन १६६० च्या फेब्रुवारींत कुडाळ किल्ल्याचा ताबा घेतला.

दुसऱ्या महिन्यांत लगेच आदिलशाही सरदार रुस्तुमजान याच्या सहाय्यानें तो किल्ला सावंतानें परत मिळविला.

लखम सावंताजवळ बारा हजार फौज असून तो लढवय्या होता; तथापि त्याला शिवाजीचें भय वाटे. शिवाजी पुनः कुडाळवर आल्यास आपलें गत्यंतर नाहीं असें पाहून आणि मराठ्यांचें सामर्थ्य लक्षांत आणून त्यानें आपला एक खास वकिल पाठवून मराठ्यांशीं दोस्तीची विनंति केली आणि लागलेंच दोस्तीच्या तहाचें कार्य त्यानें कुशलतेनें उरकून घेतलें. या तहानें कुडाळच्या देशमुखीची सनद व मराठ्यांच्या सरदारीचाहि त्यानें मान मिळवला. सावंतानें तीन हजार फौज जवळ ठेवावी व श्रीशिवाजी बोलावतील त्यावेळीं त्यांच्या सहाय्यास यावें असें ठरलें. या वेळीं कुडाळभागाची वार्षिक खंडणी म्हणून सावंत मराठ्यांना पांच हजार एक होन देत असे.

पुनः लखम सावंत विजापुरकराकडे वळला व मराठ्यांकडे शत्रुत्वानें पाहूं लागला आणि त्याचवेळीं मराठ्यांच्या भीतीनें त्यानें फिरंग्यांकडे दोस्ती केली.

सावंत व मराठे यांच्यांतील वैमनस्यामुळें स. १६६३ च्या जून महिन्यांत श्रीशिवाजीनें पुनः कुडाळभाग घेतल्यानें लखमसावंत आपल्या शिल्लक राहिलेल्या ६०० लोकांनिशीं घाटाच्या जंगलांत वास्तव्य करूं लागला.

असेच कांहीं दिवस गेले आणि स. १६६४ त विजापुरकराच्या मोठ्या फौजेसह लखम सावंत पुनः मराठ्यांवर आला; पण श्रीशिवाजीनें यावेळीं त्याची बरीच फौज ठार करून त्याला उधळून लावलें.

लखम सावंताच्या मृत्यूनंतर त्याचा बंधु फोंड सावंत हा अधिकारावर आला आणि थोड्याच अवधींत तो मृत्यु पावला. त्याच्या निधनानंतर त्याचा मुलगा खेम सावंत याकडे सन १६७५ सालीं देशमुखी आली.

आदिलशाही सत्ता संपुष्टांत येत चालली, आणि छत्रपति संभाजी महाराष्ट्रांत एका महत्वाच्या राजकारणांत गुंतला असतां स. १६८९ च्या जानेवारींत फिरंग्यांच्या संगनमतानें मराठ्यांच्या अधिसत्तेखालील सारें दक्षिणकोंकण मोंगलांनीं काबीज केलें. मराठे व विजापूरकर यांच्यापेक्षां मोंगल अधिक दूरचे असल्यानें आपला कार्यभाग ठीक साधेल असा विचार करून मोंगल बादशहा अवरंगजेब याच्याशीं खेम सावंत यानें सख्य जोडलें व मोंगल सैन्यानें मराठ्यांविरुद्ध चालविलेल्या सदर लढ्यांत मोठ्या उत्साहानें भाग घेतला.

सदर कामगिरीमुळें खेम सावंतानें मोंगलांच्या सरदारीचाहि मान मिळविला.

पुढें कांहीं कालानें मोंगल सत्ता नष्ट होण्याच्या पंथास लागल्यावर सन १६९७ सालीं खेम सावंत स्वतंत्र होऊन त्यानें आपणास 'राजा' अशी पदवी घेतली आणि चराठें येथेंच आपली राजधानी करून त्या राजधानीस 'सुंदरवाडी' असें नांव दिलें. याच सुंदरवाडीला पुढें 'सावंतवाडी' असें नामाभिदान प्राप्त झालें.

करवीरकर छत्रपतींकडून सावंतांनां जी सरदेशमुखीची सनद मिळाली होती ती सरदेशमुखी त्यांनीं हरप्रयत्नानें मोंगली सत्तेतहि राखून मोंगली राजवटीच्या उतरत्या काळांत तेंच क्षेत्र बळकावून आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें.

करवीरकरांकडून सरदेशमुखीची सनद मिळाल्यापासून सावंत आपल्या नांवापुढें 'सरदेसाई' असें जें उपनांव लावीत तेंच पुढें कायम राहिलें.

सन १७०० सालीं सावंतांनीं आमोणें येथें जो एक किल्ला बांधला होता, तो लगेच स. १७०३ सालीं कांहीं कारणामुळें पोर्तुगीजांनीं हल्ला करून नष्ट केला.

पुढें दोन वर्षांनीं म्हणजे स. १७०५ सालीं सांखळी व डिचोली हे भाग सावंताकडे लढाई करून फिरंग्यांनी घेतले.

लढाया मारीत, प्रसंगीं बाजू अंगावर घेत, संधि पाहून कौशल्यानें राजकारणी डाव खेळत असा कांहीं काल घालवून अखेरीस सन १७०९ सालीं खेम सावंत सरदेसाई यानें देह ठेवला.

त्याच्यामागून दुसरा फोंड सावंत सरदेसाई हा गादीवर आला. सन १७१२ सालीं त्यानें पोर्तुगीजांकडे दोस्तीचा तह केला. यानेंच आपल्या राजवटींत हनुमंतगड, महादेवगड, नारायणगड, नरसिंहगड, भरतगड, निवतीगड, सिद्धगड, व हळर्ण हे किल्ले बांधले. हा सन १७३८ सालीं कालवश झाला.

दुसऱ्या फोंड सावंतानंतर जयराम सावंत याकडे अधिकारसूत्रें आलीं. यानें सावंताच्या सैन्यांत बरीच वाढ केली आणि विशेष म्हणजे आपलें खतःचें आरमार उभें केलें. सैन्याच्या जोरावर व मराठ्यांच्या सहाय्यानें यानें फिरंग्यांशीं दोन हात करून बतग्राम व सत्तर हा आपला प्रदेश परत घेतला. या वेळीं त्यानें मराठ्यांची अधिसत्ता मान्य करून पेशव्यांची भरपूर मदत मिळवली होती.

पुढें जयराम सावंत यानें बार्देसवर हल्ला केला. ता. २१ फेब्रुवारी स. १७४१ पासून सारा बार्देस प्रांत त्यानें व्यापला होता. त्या प्रांतांतील फक्त रेइजमाग व आग्वाद हे दोन किल्ले तेवढे फिरंग्यांच्या ताब्यांत होते. त्याच सालच्या मे महिन्यांत मार्केज द लौरिसाल हा पोर्तुगीज व्हॉइसरॉय पोर्तुगाल येथून गोव्यांत आला होता. त्यानें येतांनां स्वतःसोबत ताज्या दमाचें शिक्षित सैन्य व भरपूर दारूगोळा आणला होता. त्यांत नवीन पद्धतीच्या ज्या तोफा होत्या त्या औरच होत्या. प्रत्येक तोफेंतून दर मिनिटास वीस बार उडत असत.

व्हाइसरॉय लौरिसाल यानें ता. १३ जून सन १७४१ रोजीं बार्देसवर हल्ला चढवला.

नवीन पद्धतीच्या त्या तोफांनीं त्या प्रसंगीं इतकी भयंकर आग पाखडली कीं त्यामुळें सावंताचें धाबें दणाणलें. तोफा डागणारा कॅप्टन सां. मार्ता हा फ्रेंच इसम होता. त्यानेंहि आपल्या कार्यात मोठा पराक्रम दाखवला. या तोफांच्या जाज्वल्य माऱ्यामुळें सावंतांना बार्देस ताब्यांत ठेवणें अशक्य झालें आणि अशा रीतीनें एका दिवसांतच सारा बार्देस प्रांत फिरंग्यांनीं परत घेतला. (म. गो. स्वाऱ्या — डॉ. पिसुर्लेकर).

अखेरीस ता. ११ सप्टेंबर १७४१ रोजीं सावंतांनीं पोर्तुगीजांशीं तह केला.

पुढें बाजीराव पेशवे निवर्तल्यामुळें सावंत यांचें मराठ्यांकडील बळ कमी झालें. अशा प्रसंगीं फिरंग्यांनीं सावंतावर स्वारी करून सन १७४४ सालीं पुनः डिचोली व सांखळी हे भाग घेतले.

सन १७४६ सालीं हळर्णचा किल्लाहि फिरंग्यांनीं घेतला.

जयराम सावंताच्या मागून सन १७५४ त रामचंद्र सावंत गादीवर आला. याच्या कारकिर्दींत फिरंग्यांचा पेडण्यावर हल्ला झाला आणि निरुपायानें सावंतानें मग फिरंग्यांशीं तह केला. त्या तहानें सांखळी, पेडणें, डिचोली, तेरेखोल व हळर्ण हे भाग पोर्तुगीजांकडे राहिले.

सन १७५५ त रामचंद्र सावंत वारला व खेम सावंत ऊर्फ राजश्री गादीवर आला. हा तडफदार व लढवय्या होता. सन १७५८ सालीं यानें फिरंग्यांवर स्वारी करून पेडणें, डिचोली व सांखळी हे महाल परत घेतले. ते त्यांकडे वीस बावीस वर्षें कायम राहिले.

पुढें ता. २७ ऑगष्ट १७८१ रोजीं पोर्तुगीजांनीं सावंतावर जोराची चढाई करून त्यांकडून सदरील तिन्ही महाल परत काबीज केले.

सन १७८७ सालीं स्वातंत्र्य निदर्शक मोर्चेलें वापरल्यावरून करवीरकर भोंसले यांनीं सावंतांवर हल्ला केला. सावंत यांच्यांत पूर्वीची लढाईची शक्ति न राहिल्यामुळें त्यानें यावेळीं शेजारच्या पोर्तुगिजांकडे मदत मागितली. फिरंग्यांनीं सावंताला मदतीचें अभिवचन देऊन उभयतांमध्यें पुढेंहि सलोखा राहाण्यासाठीं आपण घेतलेले तिन्हीं महाल कायमचे आपणाकडे असावे अशी अट घातली. ती अट निरुपायानें खेम सावंत भोंसले सरदेसाई यांनां मान्य करावी लागली. यासंबंधीं ता. २९ जानेवारी सन १७८८ रोजीं सावंत व फिरंगी यांच्यांत जो तह झाला त्या तहान्वयें पेडणें, डिचोली (बतग्राम) आणि सांखळी (सत्तर) या तिन्ही महालांतील सारा प्रदेश कायमचा फिरंग्यांनां मिळाला.

फिरंगी सरकारनें आपल्या ५ जून १७६३ च्या जाहीरनाम्यानें फोंडें, जांबावली पंचमहाल, काणकोण या प्रदेशांतील लोकांनां त्यांच्या चालीरीतीचें जसें संरक्षण दिलें; त्याचप्रमाणें पोर्तुगीज सरकारनें २७ ऑगस्ट व १५ सप्टेंबर सन १७८१ अशा दोन दिवशीं जाहीरनाम्यानें व दवंडी पिटून पेडणें, डिचोली व सांखळी महालांतील लोकांनां त्यांच्या चालीरीतीचें संरक्षण दिल्याचें जाहीर केलें. (Colecção de Bandas — F. N. Xavier).

अशा रीतीनें नवीन काबिजादींचा सारा प्रदेश पोर्तुगीजांकडे आला. तो प्रदेश घेण्याच्या बाबतींत निरनिराळे देसाई व राणे यांनीं पोर्तुगिजांशीं केलेलें सहकार्य लक्षांत घेण्यासारखें आहे ! (Tentativas dos Portugueses para a Ocupação do Concão – डॉ. पिसुर्लेकर.)

खेम सावंत सरदेसाई सन १८०३ सालीं वारला. त्याच्यामागें रामचंद्र सावंत हा खेम सावंताचा दत्तक पुत्र या नात्यानें अधिकारावर आला. हा अल्पवयी असल्यानें राज्यकारभार रिजंट म्हणून राणी लक्ष्मीबाई पाही. त्यांच्यामागून सन १८०८ सालीं फोंड सावंत हा गादीवर आला. याचा कारभार व्यवस्थित, पण तो चारच वर्षांनीं कालवश झाल्यानें त्याचा वारस म्हणून सन १८१२ साली खेम सावंत उर्फ बापूसाहेब यांच्याकडे राजसूत्रें आलीं. त्या वेळीं त्यांचें वय २० वर्षांचें होतें. त्याच्या अव्यवस्थित कारभाराच्या निमित्यानें स. १८३८ सालापासून सावंतवाडी संस्थानच्या राज्यकारभारांत साम्राज्य सरकारच्या नात्यानें इंग्रजांनीं हस्तक्षेप केला. भारतीय इतर साडेसातशें संस्थानांप्रमाणेंच, पेशवाईनंतर इंग्रज सरकारची अधिसत्ता सावंतवाडकरांनांहि यापूर्वींच मान्य करावी लागली होती; आणि आतां तर प्रत्यक्ष कारभार इंग्रजांकडे गेलेला पाहून सावंतांनां वाईट वाटणें साहजिक आहे.

वाडकर सावंत २

खेम सावंताच्या मागें त्याचा वडील मुलगा या नात्यानें फोंड सावंत ऊर्फ अनासाहेब हा सावंतवाडी संस्थानच्या गादीचा अधिकारी झाला. त्यानें संधि पाहून सन १८४२ सालीं इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें. या लढाईंत फोंड सावंतानें इंग्रजाचे कांहीं लोक मारले. सावंतांचेहि मेले. इंग्रजांच्या नवीन आलेल्या सैन्यानें वाडकरांची फार नुकसानी केली. इंग्रज अधिकारी आउटरम यानें सावंताचा पुरा मोड करून त्यांनां कोंकणांत कुठेंच आश्रय मिळेनासें केलें. इंग्रज सरकारनें त्या वेळीं सावंतांचीं शिरें तोडून आणणारांस हजारों रुपयांचीं बक्षिसेंहि जाहीर केलीं.

अशा आणीबाणीच्या प्रसंगीं सावंत आपल्या मंडळीसह फिरंगी सरकारकडे आले आणि त्यांनीं आश्रय मागितला. फिरंग्यांनीं वाडकर सावंताचा पूर्वापार स्नेह लक्ष्यांत आणून त्याला आश्रयाचें अभिवचन दिलें.

त्या वेळीं गोव्यांत फेरैर पेस्ताम या फिरंगी गव्हर्नरची कारकिर्द चालू होती. त्यानें सावंताला धीर देऊन त्याच्यासह त्याच्या सर्व लोकांची उत्तम बरदास्त ठेवली. सावंताचे लोक एकंदर १६१ असून त्यांत सावंत घराण्यांतील मंडळी वीस होती.

सावंत आपल्या मंडळीसह गोवा सरकारच्या आश्रयास गेला असून त्याला फिरंगी सरकारनें अभय दिलें आहे अशी बातमी लगेच इंग्रजांनां लागली. इंग्रज अधिकारी संतप्त झाले. त्यांनीं मुंबईस कळविलें आणि मुंबई सरकारनें कॅप्टन ऑर्थर नांवाच्या लष्करी अधिकाऱ्याच्या हाताखालीं एक लढाऊ जहाज देऊन त्याला गोव्यांत पाठविलें.

हें इंग्रजी लढाऊ जहाज पणजीस पोंचतांच पणजीच्या पॅलेसवर तोफा रोंखून सावंत मंडळीला आपल्या ताब्यांत देण्याची कॅप्टन ऑर्थर यानें पोर्तुगीज गव्हर्नरकडे मागणी केली. गव्हर्नर पेस्तान यानें ऑर्थरचा योग्य आदर सत्कार केला व त्याला सांगितलें कीं, "पोर्तुगीज निशाणाच्या आश्रयास आलेल्या लढवय्यांनां आपल्या स्वाधीन करणें हें कोणत्याच दृष्टीनें योग्य नसल्यानें तसें करणें शक्य नाहीं. त्यांत पोर्तुगालच्या इभ्रतीस धोका आहे. हें म्हणणें आपणास पटत नसल्यास व तोफांच्या जोरावर वाटेल तें करणें शक्य दिसत असल्यास अवश्य करावें तथापि त्यांच्या केंसालाहि धक्का लागण्यापूर्वीं गोव्यांतील साऱ्या पोर्तुगीजांनां तुम्हांला कैद करावें लागेल. आणि तसें झाल्यास पहिला कैदी मीच होईन हें लक्ष्यांत ठेवा.''

हें उत्तर ऐकून कॅप्टन ऑर्थर आला तसाच आपल्या लोकांसह परत मुंबईला गेला. पोर्तुगीजांवर हल्ला करण्याची इंग्रजांनां ताकद असली; तरी हिंदुस्थानांतील तत्कालीन परिस्थितीमुळें असो अगर युरोपियन राजकारणामुळें असो तसें करण्यास ते धजले नाहींत.

या नंतर मुंबई सरकारच्या हुकुमाप्रमाणें सावंतवाडीहून पोलिटिकल एजंट जेकब स्वतः गोव्यांत आला आणि त्यानें सावंतांनां आपल्या ताब्यांत देण्याबद्दल फिरंगी गव्हर्नरला नाना प्रकारांनीं सांगितलें. प्रयत्नांची शिकस्त केली; पण ती व्यर्थच गेली.

पुढें पांच वर्षांनीं म्हणजे स. १८४७ सालीं फिरंगी सरकारच्याच मध्यस्थीनें त्या लोकांपैकीं खास सावंतांच्या घरच्या लोकांनां इंग्रज सरकारकडून माफी मिळाली आणि इतरांपैकीं कांहींकांनां काळें पाणी पहावेंच लागलें !

फोंड सावंताच्या मागें त्याचा मुलगा रघुनाथ सावंत ऊर्फ बाबासाहेब हा स. १८६९ पासून गादीचा वारस झाला. सन १८९९ सालीं याचें देहावसान झालें. त्याच्या मागून त्याचा चुलतबंधु श्रीराम सावंत ऊर्फ रावसाहेब हे सावंतवाडी संस्थानचे राजे झाले.

श्रीराम सावंत यांच्या मागून त्यांचा पुत्र खेम सावंत ऊर्फ बापूसाहेब यांकडे गादीचा वारसा आला. तथापि अजून प्रत्यक्ष राज्यकारभार इंग्रज सरकारतर्फे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर याकडेच होता. पुढें स. १९१४च्या महायुद्धांत राजे बापूसाहेब प्रत्यक्ष युद्धभूमीवर जाऊन त्यांनीं जी कामगिरी बजावली, तीबद्दल खूष होऊन इंग्रज सरकारनें त्यांनां कॅप्टन केलें आणि युद्धभूमीवरून परत आल्यावर थोड्याच दिवसांनीं सावंतवाडी संस्थानचा प्रत्यक्ष कारभार त्यांच्या हातीं दिला.

राजे बापूसाहेब अत्यंत प्रेमळ, सालस व राजकारणी होते. राज्यकारभार त्यांच्या हातांत आल्यावर संस्थानांत त्यांनीं अनेक सुधारणा केल्या; तथापि दुर्दैवानें त्यांनां अकालींच आकस्मिक मृत्यु आला. पुत्र अल्पवयी असल्यानें रिजंट म्हणून त्यांच्या मागें कांहीं काल कारभार राणी पार्वतीदेवी यांकडे दिला.

तूर्त सावंतवाडी संस्थानच्या गादीवर राजे बापूसाहेब यांचे पुत्र राजे शिवराम सावंत भोंसले सरदेसाई हे असले तरी इतर संस्थानांप्रमाणें आतां हेंहि संस्थान भारतांत विलीन झालें आहे.

वाडकर सावंतांची वंशावळ

१ भाम सावंत ऊर्फ मांग सावंत भोंसले.
२ फोंड सावंत भोंसले.
३ सोम सावंत भोंसले.
४ पाय सावंत भोंसले.
५ खेम सावंत भोंसले.
६ फोंड सावंत भोंसले.
७ खेम सावंत भोंसले. याची कारकीर्द सन १६२७ ते १६४० पर्यंत असून हाच सावंतवाडी गादीचा मूळ संस्थापक होय.
८ सोम सावंत (सन १६४० ते १६४१).
९ लखम सावंत (स. १६४१ ते १६६९).
१० फोंड सावंत (स. १६६९ ते १६७५).
११ खेम सावंत (स. १६७५ ते १७०९).
१२ फोंड सावंत (स. १७०९ ते १७३८).
१३ जयराम सावंत (स. १७३८ ते १७५४).
१४ रामचंद्र सावंत (स. १७५४ ते १७५५).
१५ खेम सावंत (सन १७५५ ते १८०३).
१६ रामचंद्र सावंत (स. १८०३ ते १८०८).
१७ फोंड सावंत (स. १८०८ ते १८१२).
१८ खेम सावंत (सन १८१२ ते १८६७).
१९ फोंड सावंत (स. १८१३ ते १८६९).
२० रघुनाथ सावंत (स. १८६९ ते १८९९).
२१ श्रीराम सावंत भोंसले सरदेसाई (सन १८९९ ते १९१२).
२२ राजे खेम सावंत ऊर्फ बापूसाहेब भोंसले सरदेसाई.
२३ राजे शिवराम सावंत भोंसले सरदेसाई (सध्याचे राजे).

(कोंकणच्या इतिहासाचीं साधनें व सावंतवाडीचा इतिहास यांतील माहितीच्या आधारें प्रस्तुत वंशावळ दिली असून त्यांतील कांहीं तारखांत थोडा फार फरक असणें संभवनीय आहे.)

गोवें दप्तरांतील वाडकरांचीं दोन पत्रें

यांद कलमें अजम अकरम गोवर्णदोर जंजिरे गोवा यांजकडून राजश्री राजेबहादर सरदेसाई यांजकडील विद्यमाने अजम अंतोन दा वेग काब्राल मार्च्याल दे कांप जनरल कोमादात सु॥ समान समानैन.

१ राजश्री राजेबहादर यांचा व राजे करवीरवासी यांचा कलह लागला तदविसीं राजश्री पंतप्रधान यांणी कारकून पुणेहून र॥ बालाजी गणेश यास करवीरवासी यांजकडेस रवाना केला. आण नरसीगड व हेरे त॥ उभये पक्षीचे जाबसाल पुणेत ठराव करून देई परयेत ठेऊन वरकड भरथगड वगैरे ठाणी देखील बंदवान राजेबहादर यांजकडील सोडून द्यावें. त्यास त्यातील र॥ सोद सावत भा॥ व हे वालकर वगैरे दहा बारा अगा ठेवून र॥ सिवराम जिवाजी सबनीस व उसपकर माये गावस व दामे गावस यांस सोडून दिलें भरथगड व नरसिगड व हेरे ता॥ वगैरे ठाणी ठेविली. याचे कारण मोर्च्यालेची अडती धरले मुलें कलम.

२ र॥ सोम सावत भ॥ व हेवालकर वगैरे बंदवान यास करविरास न्हेलें आहेत. ते त्याजकडून सोडून घेऊन पाठवितों असें राजश्री पंतप्रधान यांचे कारकुनाचें बोलणें आहे. सोडून देतील तर पाहावें. आलेवर राजेबहादर गोवर्णदोर यांस कलवितील.

३ मोर्चेलाची अडती करविरवासी यांणीं धरलेमुलें राजश्री पंतप्रधान यांचे कारकून बालाजी गणेश याणे तोड काढली कीं मोर्चेलाचा वगैरे जाबसाल पुणेंत पंतप्रधान सांगतील तैसे राजेबहादर व करविरवासी यांणीं मान्य करावें. तंवपरयेंत फौजसुधा करविरवासी यांणीं जावे. तें यैकोन तूर्त फौज घालवावी म्हणोन. त्याजवरून व अजम अकरम गोवर्णदोर कपिताव जनरल यांही सध्याचे प्रसंगावर नजर द्यावी, असें वकील र॥ विसाजी माहदेव याचे मारफतीनें राजे बहादर यांस सांगोन प॥ व लेहून आलें. वरून मान्य करोन फौज घालविली. पुढां राजे बहादर याचे सदरहू किले व हेरे त॥ वगैरे राहिला. तेव्हां कलह तुटला नाहीं. याचा बुध्विवाद गोवर्णदोर राजे बहादर यांस कोण सांगतात तो कलवा व आण राजे बहादर यांचा अंगिकार करोन प्रसंगीं कुमक केली हे जगप्रसिद्ध जाहालें आहे तो अभिमान पुरा सेवटास न्हेऊन साहित्य करावें कलम.

१ राजश्री राजे बहादर ईस्तादचे आश्रेयांतील असें समजोन संस्थानाचे साहित्य करीत असावें व कांहीं जमाव ईस्तादाचा पेडणेस असावा. म्हणजे प्रसंगीं राजेबहादर यांचे उपयोगी पडेल. कां जें करविरवासी यांचा विश्वास धरितां नये. यास्तव अशास ईस्तादाचा सरदार पेडणेचे जमावात राहील त्यास येकच वोडद (वर्दी) गोवर्णदोर याची असावी कीं राजे बहादर सांगोन पाठवितील ते क्षिणी कुमक करणें म्हणोन यावी कलम.

१ र॥ गोविंदजी जसवंतराव देसाई ता॥ पेडणें हे राजेबहादर यांचे पक्षीं आहेत. त्यास त्याचें वतन र॥ लक्ष्मणराव देसाई ता॥ मजकूर हे ईस्तादाचे आश्रेई राहून त्याजकडून वतनास अटकाव होतो. तर गोविंदराव राजेबहादर यांचे आश्रयांतील तेच इस्तादाचे आश्रेयेंतील

असें समजोन त्याचें वतन त्यास चालवावें येविसी वोडद यावी कलम.

१ तैसेच र॥ सिदबा गण शेणवी सूर्यराव व हिरे प्र॥ देसाई त॥ डिचोली व चंद्राजी राणे देसाई त॥ साखली हे राजे बहादर यांचे पद्री आहेत. याची वतनें त्याचीं त्यास चालवावी. जे ईस्तादाचे आश्रयांत आहेत ते वतन भोगतील आण राजे बहादर यांचे आश्रयात आहेत त्याणी न भोगावी हे ईस्तादास उचीत नाहीं. कां जे हाली ईस्तादाचा व राजे बहादर यांचा अकृत्रीम तरेह दोस्ती होऊन उभयेपक्षी द्वैतभाव राहिलाच नाहीं. तेव्हां राजे बहादर यांचे आश्रयांतील ते ईस्तादाचेच अश्रित आहेत हे दीलात आणोन अजम अकरम गोवर्णदोर याणी त्यांची वतनें त्यास चालवावी हे त्यास विदीत आहे कलम.

१ सदरहु कलमाचा मजकूर अजम अंतोन दा वेग काब्राल मार्च्याल दे कांप यांस कलीत केला आहे. तों अजम अकरम गोवर्णदोर यांस जाहीर करितील. ते दीलात आणोन सदरहूचा जापसाल व्हावा कां जे राजे बहादर याचे मानस कीं सर्व प्रकारें ईस्तादाचे दोस्तीतिरक्त दुसरा अर्थ नाहीं हा निझा असावा. याच विसे गोवर्णदोर यांजकडून कांहींच दिकत नसावावी कलम.

७ येणे प्रमाणें कलमें सात लिहिलीं असेत छ ७ रजेब. (१७-४-१७८८).

२

जयराम सावंत भोंसले व रामचंद्र सावंत भोंसले सरदेसाई प्रांत कुडाळ यांनीं अंतोन फिरेर दे आंद्राद सक्तार्य ईस्ताद जंजिरे गोवा यांस लिहिलेल्या पत्रांतील मुद्दे :—

करारमुद्दे करून द्यावे.

खरजुंवा व पनाळें दोनही गांउ आमचे आम्हास कोटसहित द्यावे.

कलम १

दारु व गोळी व भांडचे गोळे सिवभट याचे मुदतीमधें दर आहे तेणें प्र॥ द्यावे.

कलम १

सिवभटाचे विद्यमाने जो तह जाहाला आहे तो कागद ऐन जिनस आमचा आम्हास द्यावा.

कलम १

हिंदु धर्माचा मुदा बारदेसामधें व्यंकटराउ यांकडून कबूल केला असेल तर जाहाले. न कबूल केला तर आम्हास करून द्यावा.

कलम १

नकद पैके आम्हांस खर्चास द्यावे.

कलम १

तुमचें भांडतें आरमार आहे त्याचे वाटेस आम्हीं जाऊं नये. आमचें भांडतें आरमार आहे त्याचे वाटेस तुम्ही जाऊं नये.

कलम ०

येणेप्रमाणें मुदे करून द्यावे. करार करून लिहिले आहेत.

गोव्यांतील बंडें

गोव्यांतील बंडांच्या इतिहासावर एक स्वतंत्र पुस्तकच लिहितां येण्यासारखें आहे. गोवा सरकारच्या ऐतिहासिक दप्तरखान्यांतील मिलिटरी दप्तर व इतर कागदपत्र यांचा सूक्ष्म अभ्यास करून आणि इतर मार्गांनीं परिश्रमपूर्वक माहिती मिळवून हें कार्य सहज करतां येण्यासारखें आहे. प्रस्तुत प्रकरणांत सविस्तर माहिती देणें शक्य न झाल्यानें सदर बंडांची ओझरतीच माहिती देण्यांत येत आहे.

गोमंतकाच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेलें पहिलें बंड म्हणजे काळू शेणवीं देसाई यांचें होय. हे काळू शेणवीं कोरगांव (पेडणें) येथील असून सध्याच्या कोरगांवकर देसायांचे पूर्वज होत. हें बंड सन १६५४ सालीं झालें.

दुसरें बंड सन १७५० सालीं कांहीं देसाई व राणे यांच्या एकोप्यानें जन्म पावलें.

तिसरें बंड सन १७५५ सालीं राणे लोकांच्या प्रमुखत्वानेंच सुरू झालें.

चौथें बंड सन १७६० सालीं झालें. याचेहि प्रमुख राणेच होते.

पांचवें बंड सन १७६६ सालीं राणे यांच्या पुढाऱ्यांकडून सुरू झालें.

सहावें बंड १७७२त वळवई येथें शिपाई व राणे यांच्या संगनमतानें उद्‌भवलें.

सातवें बंड सन १७८० सालीं राण्यांकडूनच सुरू झालें.

आठवें बंड सन १७८७ सालीं सुरू झालें. या बंडाचा अध्वर्यु पिंतु नांवाचा एक ख्रिस्ती इसम होता. (Conjuração de Pintos —Cunha Rivara).

नववें बंड सन १७९९ सालीं राणे लोकांकडूनच जन्म पावलें.

दहावें बंड सन १८०८ सालीं गांवठणकर राणे देसाई यांकडून सुरू झालें.

अकरावें बंड सन १८१४ सालीं राणे यांकडूनच उद्‌भवलें.

बाराव्या बंडाचा उदय सन १८२२त गत बंडांतील असंतुष्ट लोकांकडून झाला.

तेरावें बंड सन १८२७ सालीं राणे यांकडूनच अस्तित्वांत आलें.

चौदावें बंड सन १८३७ सालीं, पोर्तुगीज व वाडकर यांच्या लढाईत कैद झालेल्यांच्या संबंधी लोकांकडून जन्म पावलें.

पंधरावें बंड सन १८५१त दिपा राणे यांच्या प्रमुखत्वाखालीं सुरू झालें. यांच्या बंडांतील लोकांची शिस्त, कवायिती शिपायांसारखी असल्याचें कांहीं वृद्ध लोक सांगत.

सोळावें बंड सन १८७०त कांहीं निवृत्त शिपाई व राणे यांच्या एकोप्यानें सुरू झालें. याच वर्षी सांखळी भागांतील कुष्टोबा यानें सांगें तालुक्यांतील एका सावंताच्या मदतीनें आपली स्वतंत्र दंगल सुरू केली.

सतरावें बंड सन १८८० सालीं हणमंतराव राणे यांकडून जन्म पावलें.

अठराव्या बंडाचा आरंभ सन १८९५ सालीं राणे लोकांकडूनच झाला. तथापि त्यांनां शिपायांचीहि मदत होती. या बंडाचें नेतृत्व दादा

राणे देसाई अडवईकर यांकडे होतें. गोमंतकांत राण्यांच्या बंडांत हें बंड विशेष प्रसिद्ध आहे. या बंडाच्या वेळींच बतग्रामांत दिव महंमद, अर्जूनराऊत, सदगो देवळी आणि काणकोण, केंपें, सांगें या महालांतून बाबन सावंत, फोंड सावंत, फटो बोरकर अशा लोकांनीं निरनिराळ्या टोळ्या करून पुंडाई चालविली.

एकुणीसवें बंड सन १८९८ सालीं राणे लोकांकडूनच जन्म पावलें.

वीसवें बंड सन १९११ त सुरू झालें. मुख्य बंडाचा प्रमुख यशवंतराव राणे हा होता; तथापि त्यांत मोर्या राणे, हणमंत राणे, हिरबा राणे गुळेलीकर, तातोबा कुमार खंडकर, माणिकराव पर्येकर वगैरे सामील होते. या बंडाच्या कालांत झील सावंत, गोविंद सावंत, बोडको देवळी, संतोबा कुस्तुलो या पुंडांनीं आपापल्या लोकांच्या स्वतंत्र टोळ्या बनवून स्वार्थी वृत्तीनें बराच धुमाकूळ घातला. काणकोण, केंपें, सांगें, या भागांत पहिल्या तिघांनीं लोकांवर फार अत्याचार केला; तर बतग्रामांत शेवटच्या दोघांनीं व इतर पुंडांनीं बराच हैदोस घातला. झीलानें तर रिवण, कोळंब, नेतर्ली इ. सांगें महालांतील गांवांतून निरपराधी लोकांवर अनेक अत्याचार केले!

प्रजासत्ताक राजवटींतील पहिले प्रांताधिपति ना. कौसेरु द कोस्त यांनां झीलासारख्या त्या पुंडांकडून चाललेला लोकांचा छळ पाहून फार संताप आला आणि त्यांनीं स्वतः जातीनिशीं पुढाकार घेऊन, कित्येक वेळां खेड्यापाड्यांतूनहि ससैन्य जाऊन बंड शमविण्याचा प्रयत्न आरंभला. बंडवाल्यांचीं निवासस्थानें अशीं कांहीं जंगलें तोडून, आधुनिक शस्त्रास्त्रांचा उपयोग करून व इतर अनेक बाजूंनीं मेहनत घेऊन त्यांनीं हें वीसवें बंड बंद पाडलें. आणि ता. ५ डिसेंबर सन १९१३ रोजीं खरी शांतता अस्तित्वांत आली. नंतरच्या कालांत कांहीं आणखी तसल्या बंडांचा उद्भव झाला नाहीं.

दीपाजी राणे यांनीं गोव्याच्या प्रांताधिपतींस लिहिलेलें एक पत्र

अजम मेहरबान साहेब येकलाब वैजलाल पन्हासाहेब जनराल विसकोंद दे तोरीस नोवेस गोवेर्णदोर जराल संस्थान इंद दा ईंदिया.

छ दामदौलत दामोबतहू.

अर्जी दिल येखलास दीपाजी राणे सरदेसाई ता। सांखळी सलाम बाझत सलाम येथील कारनें कीं करून दिल अराम केले पाहिजे दरवीक आमा देवाचे निषकलंक मनसुभेचे ठायीं प्रार्थना करून माझी बखेर सर्वण कारतां ती येणे रीती— अनवस्त्र वगैरे बहुतेक प्रकारे तंचाई होऊन आले मध्ये मी माझ कुटुंबसुधा उपोषीत पडोन ते तंचाईचे श्रमाने माझी बायको मरण पावली. ते वेळीं राज्यकर्ते साहेब जुझे पेस्ताद याचे मुदतींत अनेक तरेच्या अर्ज्यो केल्या असता बेपर्वा केली. त्यावरून वासपुसी होणे करितां हा जोग घेतला. नंतर बहुतेक बोलणें अगर पैसावेच करून माझे परिभावार्थ घात घेणेस मसलथी ईछून सरकारास द्रव्याची हाणी केली. मी कांहीं सरकारांवर दुसमानी केली नवती— माझा माहाल सतर गहीर वाटेनें आपद्दारून पैसा घेतात. आणि आलिमंत (Alimento) वगैरे कोणताच आधार जीव रक्षणेस देत नाहीं.

तेव्हां माहाल आणावा, नसलेस माहालाबरोबर माझा प्राण त्यागावा. जिवंत असून अंनावांचून उपयोग काय. हे निश्चयात्मक त्या मध्ये हे राज्यास आ मोहेबाची स्वारी होऊन आली. आणि उभयपक्षी कल्याणाविसी ईछून बंडाईचा प्रसंग बोलणेनें थारणूक करून नूतन लोक ठेविलेंच दरमहा सुमोरें पंधरा हजार असुरफी खर्च सरकारास होता तो दूर केला. आण माझा संतोष केला. कीं माग न्हेऊन आलेवि-सीची मखलासीव सतर महालची कागदपत्रें हुकुमेंत पाहून आमचे आम्हास देतो. व मागा चालले अनवये पालणेस येईल. बादशाहाई पुर्तुकाल येथून निवाडणी आणोन देईं पर्यंत माझे ताबेतील लोकास उपजिवीकेस आलिमेत अचूक दरमहा यावा. असे केलेमध्ये आजपर्यंत मोहेबी आपणेकडून दिल्हे शब्दाची वाट पाहात नेमिले जागेवर आंबेडे कोदाळीस वास्तव्य करीत बसलो. त्या मध्ये मखलासीचा सुगरनुमा कौल दिल्हा. उपजिविकेस आलिमेंत चालविलेचा चालत आहे. त्यामध्यें माझा पुतण्या साहेबास पणजेस गेले प्रसंगीं आमचा माहाल सत्री यास दिजिस्तीर व्हावें म्हणोन बलकाई करण्यांत आली. आणि सतर महाल सोडून देणेस कबूल केले नाहीं. असे साहेबी अगोदरचे बोलणेस प्रतिकूल बोलणे अंगिकारीले होते तर ही माझी खातरी झाहाली. नसते बोलणेतील करुमे आलि-मेंत चालवून कोलनामा पुर्तुकालची निवडणी आणून दिलही त्या पेक्षां बाकीही बोलणे प्रमाणें पुर्तुकालची निवडणी आणऊन देणार. साहेब थोर पदविवान अंतःकरणानें श्रुअघात करणें कदाप चितांत बसणार न्हवे. युक्तिवान थोर, हे ईंदिचे लोक परम घातकी. याच्या दुष्ट बुद्धी ऐकणार न्हवे. प्रजेस प्रतिपालून सुखउतपतींस कवणा रायांकडून कोणतीच तफावत आमचे अकल्याण करणेस व बोलणेस प्रतिकूल होऊन येणार नाहीं. असे होते अजाने बरेपण माझी खात्री साहेबचे चरणाठाई आहे. मी बोलणेस अमान्य न्हेउ. हे ईस्तादावर प्रतिकूल केलेविना येकंदर अभघात करणे हे साहेबाकडून घडून येणार नाहीं. म्हणोनी म्हणोन परंत आक्षेप येतो कीं मिलितारी व आदमिस्त्रातीव हे दोनी आवतोरीदादी गहीरवाखेचा समन म्हणजे बरवेयासीं हे बस प्रेसून साहेबची निषकलंक चिताठांयीं विषाद आणितील तर तीस × × देणार स्वतः गुन्याव पाहाणारे न्हवेते. हिंदु लोकांमध्यें दुसरेस प्रतिकूल करावे. आण आपणाचे साधन करावे असे तरेचे आहेत. ते मनुष्य त्या आवतोरिदादीचे मनुष्याकडा जवल असून साधन परवें ते ते आवतोरिदादीस बुधी देतात. आण ते बुधीनें बखेरया करितात. लघु मजकूर दुरघट करून घालतात. इतकाच मजकूर आहे. ज्या तरेनें माझा लोक व मी ईस्तादावर साहेबी ठेविला तेच ईस्तादावर आहे. कोणतेच तरेनें दांडगाई केली नाहीं. आण येकंदर साहेबाचे चरणाठाईं लक्ष देऊन शबद दिल्ये प्रमाणें प्रतिकूल करणार नाहीं. साहेबास याददस्ती होणेस्तव रेईत खतेली यास दाखल केलें आहे. मी सतर माहालाचा म्हासूल दस्त आमची साहेबी शब्द दिल्हेचा निवडणी होई-पर्यंत आम्हांस देऊं नको व त्याच प्रमाणें

सरकारासही देऊं नको. म्हणोन ताकीद देत असो. त्याच प्रमाणें आताही दिल्हा ती ताकीद साहेबास दाखल होऊन आमचे याददस्ती जरूर निवडणी होणे करितां-आम्ही कांही कोणतेच रीतीवर अतिताई केली असी नाहीं. ज्या रीती हे ईस्तःदाचा पागामेंत खाऊन चाकरी आफिशाल वगैरे सोलदाद करितात त्याच रीती मी व माझा लोक चाकरी करितों. आलफादास चुकवून म्हाल आणणारे याची रखवाली राखून अगर त्याच महाल धरून आवतोरीदादींत पाठविला व पाठवितों व अनेक तरेची उपाधी रक्षणार्थ परमुलखाचे सिमेवर रखवाली करतों. इंग्रजी मुलखांत चोरी करून आलेला मनुष्यास सुधा धरून साहेबाकडे पाठविले असे. याच तरेनें सरकार चाकरींत मी व माझे लोक दक्ष असोन तूर्त कांहीं हे सतर महाली. मेठ व रोदा घालून दोन तीन शेहे लोक माझे जवलचे नजीक गावी ठेवून मज धरणेची युक्ति करितात. व त्रासही देणेचे ईछितात. मी आपणावर अतिताई करितो की काय. ते पाहतात व माझेकडून अतिताई घडली कोलनामा दिल्हे त्यावर प्रतिकूलता माझेकडून घडून आली असे करणेस निमील्य पाहतात. तर येकंदर की त्यावर अतिताई करणार नाहीं. त्याणी माझा प्राण घेणेस जरही युक्ति केल्या तर-हा जीवरक्षणार्थ जितका उपाय होईल तितका करावा. परंत त्यावर अतिताई करणार नाहीं. ही खातरी साहेबी धरावी. येवढा प्रेत्न दुष्ट करणेचा हा अजनेवर साहेबाचे ध्यानी असून होतो असा माझा समज होत नाहीं. मी नेमिले जागेवर आहो. तो जागा सोडून दुसरे जागेवर राहावे तर ही आज्ञा करणेत यावी होती. अशांत मज दिल्हेचा कोलनामा. निस्तेज्य करून घात घेणेची कल्पना खुद साहेब राज्यकर्ते याची जाहाली तर ही केवल अनहीत बादशाई पुर्तुकाल साहेबाचे वचनास हाणी आणणेचे योजिले असले असो, जितल्या अन्य मुलखाची राज्यकर्ते व प्रजाजनास कळले पाहिजे कीं मी हिंदु मराठा वतनदार होछाता शबदावर हाणी न आणितां आज येक वर्ष अधिकच साहेब राज्यकर्ते याचे बलणेस राहिलो. आण तुमी राज्यकर्ते थोर पदविवान क्रिरिस्ताव शबद देऊन व कोल देऊन तो आपणच निस्तेज करून माझा अपघात करणेस ईछिले असे. जगविख्यात होणेस्तव ही माझी बखेर बुलेतीवर विख्यात करणेस लावावी. तसें घडून येत नाही तर ही बखेरची तालीख माझेकडेस ठेविली आहे. ती व हे बखेरीची जाब साहेबाकडून येईल ती येकत्र करून पुर्तुकाल बादशाई परम विश्वासनिधि याजकडून प्रार्थना करणेस ईज्यानेबीं इछिलें आहे येतद्दीसी बखरे महालचा कोमदांत याचे मागा साहेबाकडा प्रत्रीष्ट करीत असो याचे उतरही हिंदु लिहिणेनें आले पाहिजे. साहेबास ईश्वर सरक्षुक करो. फार मोहोबत असो द्यावी हे, किताबत.

ता. २६वी माय सन १८५७ ईस.

रुजू

(दीपाजी राणे यांचें हस्ताक्षर).

पोर्तुगीज राज्यकर्ते १

राजकीय घडामोडींमुळें गतकालीन स्पेन देशाचे जे कांहीं विभाग पडले त्यांतूनच पोर्तुगाल देश निघाला. त्या कालीं पोर्तुगालला विशेष चैतन्य व जोम असल्यानें त्याचें निराळेंच राष्ट्र बनून तें पुढें स्पेन राष्ट्रापासून कायमचें विभक्त राहिलें.

पोर्तुगिजांच्या इतिहासाचे सन ११३९पासून १९१० पर्यंतच्या कालांत आठ खंड पडलेले आहेत.

प्रथम खंड म्हणजे मुलूख संपादनाचा काल. हा इ. सन ११३९ ते १२९७ आहे. यांत पहिला दों आफोंस पासून तिसरा दों आफोंस पर्यंत पांच राजांचा समावेश होतो.

द्वितीय खंड म्हणजे स्वराज्य संघटणेचा काल. हा सन १२९७ पासून सन १३८५ आहे. यांत दों दिनिज पासून दों फेर्नांद पर्यंतच्या चार राजांचा समावेश होतो.

तृतीय खंड म्हणजे शोधांचा काल. हा सन १३८५ पासून १४९८ पर्यंतचा आहे. यांत पहिला दों जुआंव पासून पहिला दों मानुयेल यांच्या कारकिर्दीचा पूर्वार्ध संभवतो.

चतुर्थ खंड म्हणजे वैभवकाल होय. हा सन १४९८ पासून सन १५८० पर्यंतचा आहे. यांत पहिल्या दों मानुयेलच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धापासून दों येंन्हिकची कारकिर्द येते.

पंचम खंड म्हणजे पारतंत्र्यकाल. हा सन १५८० पासून १६८० पर्यंतचा असून यांत तीन फिलीप राजांची कारकिर्द येते.

षष्ठ खंड म्हणजे पोर्तुगालचें स्वातंत्र्य व ब्राझीलचा संपदा काल. सन १६४० पासून १७५० पर्यंतचा हा काल आहे. यांत चौथ्या दों जुआंवपासून पांचव्या दों जुआंव पर्यंतच्या चार राजांच्या कारकिर्दीचा समावेश होतो.

सप्तम खंड म्हणजे सुधारणा काल. स. १७५० ते १८३४ असा हा काल आहे. यांत पहिल्या दों जुझे पासून दुसरी दॉन मारीअ हिच्या कारकिर्दीचा पूर्वार्ध अशा कारकिर्दी येतात.

अष्टम खंड म्हणजे सनदशीर पद्धतीचा काल. हा सन १८५४ ते १९१० पर्यंतचा असून यांत दुसऱ्या दॅान मारीअच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धापासून दुसरा दों मानुयेल याच्या कारकिर्दीची अखेर व प्रजासत्ताकची स्थापना येथपर्यंतच्या इतिहासाचा समावेश होत आहे.

पोर्तुगीज राज्याचा मूळ संस्थापक दों आफोंस येन्हीकिश् या राजापासून प्रजासत्ताकच्या स्थापनेपर्यंत चार घराण्यांतील एकंदर तेहतीस राजे पोर्तुगीज गादीवर आले.

पोर्तुगीज राज्याचा राज्यकारभार चालवणारीं सदर चार घराणीं म्हणजे आफोंसीन, झ्योआनीन, फिलिपीन व ब्रिगान्तीन हीं होत.

पहिलें घराणें आफोंसीन. यांत पहिला दों आफोंस पासून दों फेर्नांद यांचा समावेश होतो. (सन ११४३ ते सन १३८५).

दुसरें घराणें झ्योआनीन. यांत पहिला दों जुआंवपासून कार्देयाल दों येंन्हिक हे राजे येतात. (सन १३८५ ते सन १५८०).

तिसरें घराणें फिलिपीन. यांत पहिला दों फिलिपपासून तिसरा दों फिलिप यांचा अंतर्भाव होतो. (सन १५८० ते सन १६४०).

चौथें राजघराणें ब्रिगान्तीन. यांत चौथा दों जुआंव पासून दुसरा दों मानुयेल या राजांचा समावेश होतो. (सन १६४० ते सन १९१०).

पोर्तुगाल देशाच्या गादीवर अधिष्ठित झालेले राजे पुढील प्रमाणें आहेत.—

१ला राजा, दों आफोंस येन्हीकिश्. हा सन ११२८ सालीं गादीवर आला आणि ५७ वर्षें राज्यकारभार करून सन ११८५ सालीं मृत्यु पावला.

दुसरा राजा, दों सांशु पहिला. याची कारकिर्द सन ११८५ पासून सन १२११ पर्यंत चालली.

३रा राजा, दों आफोंस दुसरा. (सन १२११ ते सन १२२३).

४था राजा, दों सांशु दुसरा. (सन १२२३ ते सन १२४८).

५वा राजा, दों आफोंस तिसरा. (सन १२४८ ते सन १२७९).

६वा राजा, दों दिनिज. (सन १२७९ ते सन १३२५).

७वा राजा, दों आफोंस चौथा. (सन १३२५ पासून स १३५७).

८वा राजा, दों पेद्रु. याची कारकिर्द सन १३५७ ते सन १३६७ पर्यंत चालली.

९वा राजा, दों फेर्नांदु. हा सन १३६७त गादीवर आला व सन १३८३ सालीं मरण पावला.

१०वा राजा, दों जुआंव पहिला. सन १३८३ ते सन १३८५ हीं दोन वर्षें रिजन्सी कारभारांत जाऊन हा दहावा राजा सन १३८५ सालीं गादीवर आला. याची कारकिर्द सन १४३३ पर्यंत चालली.

११वा राजा, दों दुआर्ति. याची कारकिर्द सन १४३३ ते स. १४३८ पर्यंत चालली.

१२वा राजा, दों आफोंस पांचवा. (सन १४३८ ते सन १४८५).

१३वा राजा, दों जुआंव दुसरा. (सन १४८५ ते १४९६).

१४वा राजा, दों मानुयेल पहिला. (सन १४९६ ते स. १५२१).

१५वा राजा, दों जुआंव तिसरा. (सन १५२१ ते स. १५५७).

१६—दों सेबास्तिआंव हा सन १५५७ सालीं गादीवर आला व स. १५७८ सालीं कालवश झाला.

१७—दों येन्हीक. सन १५७८ सालीं हा गादीवर आला आणि सन १५८०त त्याचें देहावसान झालें.

१८—फिलीप पहिला. हा सन १५८०त गादीवर आला आणि स. १५९८त कालवश झाला.

१९—फिलीप दुसरा. याच्या राजवटीस इ. सन १५९८ सालीं सुरवात होऊन ती १६२१ सालीं संपली.

२०—फिलीप तिसरा. याची कारकिर्द सन १६२१ पासून १६४० पर्यंत चालली.

२१—दों जुआंव चौथा. ब्रिगान्तीन घराण्याचा हा पहिला राजा. याच्या राजवटीचा काल स. १६४० पासून १६५६ पर्यंत आहे.

२२—दों आफोंस सहावा. याचा काल सन १६५६ ते १६८३ आहे.

२३—दों पेद्रु दुसरा. सन १६८३ पासून सन १७०६ पर्यंत याच्या राजवटीचा काल आहे.

२४—दों जुआंव पांचवा. (सन १७०६ पासून सन १७५०).

२५वा राजा दों जुझे पहिला. याचा काल सन १७५० ते सन १७७७ आहे.

२६—दॉन मारीअ पहिली. (सन १७७७ ते सन १८१६).

२७—दों जुआंव सहावा. (सन १८२६ पासून सन १८२८).

२८—दों पेद्रु चौथा हा स्वतंत्र ब्राझिलचा पहिला बादशहा झाला. (स. १८२८). दों मिगेल सन १८२८ पासून सन १८३४ पर्यंत यांची कारकिर्द आहे.

२९—डॉन मारीअ दुसरी. (सन १८३४ ते सन १८५३).

३० – दों पेद्रु पांचवा. सन १८५३ पासून सन१८६१ पर्यंत याचा कारभार चालला.

३१—दों लुईज पहिला. याची कारकिर्द सन १८६१ पासून १८८९ पर्यंत चालली.

३२—दों कार्लुश् पहिला. याची राजवट सन १८८९ सालीं सुरू झाली आणि ता. १ फेब्रुवारी सन १९०८ सालीं त्याचा खून झाला. दों कार्लुश् याच्या मागें राज्याधिकार त्याचा वडील मुलगा या नात्यानें दों लुईज दुसरा याकडे यावयाचा; तथापि बापासोबतच त्याचाहि खून झाल्यानें दों कार्लुश् याच्या मागें त्याचा दुसरा मुलगा दों मानुयेल दुसरा हाच त्याचा वारस ठरला.

३३—दों मानुयेल दुसरा. (सन १९०८ ते १९१०). हा बुद्धिमान व शांत स्वभावी होता. तथापि प्रजासत्ताक पक्षाच्या वाढत्या जोरामुळें याला आपला मायदेश सोडून परदेशांत निघून जावें लागलें आणि तेव्हांपासून पोर्तुगाल देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू झाली. पोर्तुगालचा हा अखेरचा राजा सन १९३२ सालीं मरण पावला.

माशादु सांतुस् याच्या प्रमुखत्वाखालीं झालेल्या प्रजासत्ताकवाद्यांच्या क्रांतीनंतर ता. ५ ऑक्टोबर सन १९१० सालीं पोर्तुगाल देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धति जाहीर झाली. या नवीन राज्यपद्धतीचा तात्पुरता अध्यक्ष म्हणून दो. तिओफिलु ब्राग याची नेमणूक झाली. या नंतर पद्धतशीर निवडणुकी होऊन रीतसर अध्यक्ष निवडून आला.

सन १९१० पासून पुढच्या कालांत पोर्तुगीज प्रजासत्ताकच्या अध्यक्षपदावर मानुयेल द आऱ्हियाग, तिओफिलु ब्राग, बेर्नार्दिन माशादु (हा दोनदां निवडून आला), सिदोनियु पाईश्, कांतु इ कास्त्रु, आंतोनियु जुझे द आल्मैद, मानुयेल तेशैर गोमिश् इ. वजनदार गृहस्थ निवडून आले.

पुढें २८ मे सन १९२६च्या क्रांतीनंतर पोर्तुगीज प्रजासत्ताकच्या अध्यक्षपदाची जबाबदारी जनरल कारमोन यांकडे आली.

अध्यक्षस्थानावर आल्यावर जनरल कारमोन यांनीं अर्थमंत्रिपद दो. ओलिव्हैर सालाझार यांकडे सन्मानपूर्वक दिलें आणि त्यांनीं तें फार कुशलतेनें चालवून आपली पात्रता सिद्ध केली.

सन १९२८ सालीं पुनः जनरल कारमोन पोर्तुगीज प्राजकाध्यक्षांच्या जागीं निवडून आले. त्यानां कारभारांत योग्य स्थैर्य आणण्याची फार आवश्यकता भासत होती, आणि त्याच विचारांत असतां डॉ. सालाझार यांचें भरीव कार्य त्यांच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष दिसतच होतें. हळुहळू १९३० साल उगवलें. १९१० पासून १९३० पर्यंतच्या वीस वर्षांच्या कालांत पोर्तुगालांत सोळा लष्करी बंडें झालीं आणि चाळीस प्रधानमंडळें अधिकारावर येऊन गेलीं; तथापि राज्यकारभारांत आवश्यक स्थैर्य दिसलें नाहीं.

सन १९३० सालीं प्राजकाध्यक्ष जनरल कारमोन यांनीं डॉ. सालाझार यांच्या अध्यक्षतेखालीं नवीन प्रधान मंडळ बनविण्याची आपली योजना पुढें मांडली आणि त्याप्रमाणें डॉ. सालाझार यांनीं नूतन प्रधानमंडळाची व्यवस्थित रचना करून पोर्तुगीज सरकारच्या राज्यकारभाराची प्रत्यक्ष धुरा आपल्या हातीं घेतली.

सन १९२६ पासून डॉ. सालाझार यांनीं आपल्या पोर्तुगीज राष्ट्राची कमकुवत बाजू बारकाईनें हेरली आणि ती कुशलतेनें दृढ करीत आणण्याचें कार्य हातीं घेतलें. त्यामुळेंच राज्यकारभाराला स्थैर्य येऊन त्यांची आजपर्यंतची एकतीस वर्षांची कामगिरी पोर्तुगाल राष्ट्राच्या दृष्टीनें यशस्वी ठरली.

विशेषतः पोर्तुगीज राज्याची आर्थिक बाजूच त्या वेळीं खालावली होती व स्थिति चिंताजनक झाली होती.

त्या वेळींच नेमकी अर्थमंत्रिपदाची जबाबदारी डॉ. सालाझार यांनीं स्वीकारून राज्यकारभाराला प्रथम आर्थिक स्थैर्य आणलें आणि त्या नंतरच्या कालांत इतर प्रश्नांकडेहि दूर दृष्टीनें नजर देऊन आपलें पाऊल पुढें टाकण्यास सुरवात केली. त्यांनीं त्या दृष्टीनें केलेली प्रधान मंडळाची रचनाहि ठीक व कौतुकास्पदच ठरली.

डॉ. सालाझार यांचें राज्यकारभारांतील आसन दृढ झाल्यानंतर त्यांनीं आर्थिक प्रश्नासारखाच लष्कराचा प्रश्नहि ठीक सुधारला. योग्य अधिकाऱ्यांची योग्य जागीं योजना, कायदेकानूंची फेरतपासणी व अंमलबजावणी वगैरेमुळें पोर्तुगीज राज्यकारभारांत बरेंच स्थैर्य आलें. त्यांचा दरारा अधिकारी वर्गावर व पोर्तुगालांतील चळवळी जनतेवर बसून पुढच्या कालांत त्यांच्याच मताप्रमाणें राज्यकारभाराचीं चक्रें फिरूं लागलीं. त्यामुळें पोर्तुगालांतील पुनः पुनः उद्‌भवणाऱ्या राजकारणांतील क्रांत्याहि बंद पडल्या.

पोर्तुगीज प्रजासत्ताकचे आजचे अध्यक्ष जनरल क्राव्हैरु लोपिस हे असून प्रधान मंत्रि डॉ. सालाझार हेच आहेत. १९१० ते १९२६ च्या प्रजासत्ताक कारभारानंतर सन १९२६ सालीं अस्तित्वांत आलेल्या नूतन राजवटीचाच कारभार आज ३१ वर्षे सुरू आहे.

पोर्तुगीज राजवटींतील चौदावा राजा दों मानुयेल पहिला याच्या कारकिर्दींत पोर्तुगिजांचा हिंदुस्थानशीं संबंध आला. दों मानुयेलच्या राजवटींत ८ जुलै सन १४९७ रोजीं पोर्तुगालहून हिंदुस्थानकडे व्यापारी जहाजें घेऊन निघालेला व्हास्कु द गाम ता. २७ ऑगस्ट सन १४९८ रोजीं कालीकतजवळ आला. कालीकतचा तत्कालीन राजा झामोरीन यानें त्याचें स्वागत केलें आणि अशा रीतीनें व्यापाराच्या निमित्तानें हिंदुस्थानांत पोर्तुगिजांचा प्रथम प्रवेश झाला.

पुढें ता. १ मार्च सन १५१० रोजीं आफोंस द आल्बुकेर्क यानें गोव्यावर हल्ला करून आदिलशहाचा किल्ला घेतला. गोव्यांतील पोर्तुगीज सत्तेचा हा पहिला श्रीगणेशा होय. त्या वेळीं दोनच दिवसांत त्यानें गोवें शहर हस्तगत केलें होतें. त्याच सालीं ता. २३ मे रोजीं विजापूरकरानें गोवें सोडवून घेतलें; तथापि तिमोजच्या सहाय्यानें आल्बुकेर्क यानें पुनः नेटाचा हल्ला करून आदिलशहाचे लष्करी अधिकारी कॅप्टन रसलखान व पुलातखान यांकडून ता. २५ नोव्हेंबर सन १५१० रोजीं पुनः गोवें घेतलें. आणि राज्यकर्ते या नात्यानें गोव्यावर पोर्तुगिजांची सत्ता सुरू झाली. ती तहत आज ४४७ वर्षे चालू आहे. पुढें सन १५४३ त साष्ट व बार्देस हे प्रांत पोर्तुगिजांकडे आले. त्यांना ४१४ वर्षे झालीं. फोंडें प्रांत सन १७९१ त पोर्तुगिजांकडे आला त्याला १६७ वर्षे झालीं आणि पेडणें, डिचोली, सत्तर हा भाग सन १७८८ सालीं त्यांकडे आला. त्याला आज १७० वर्षे झालीं.

पोर्तुगीज राज्यकर्ते २

पोर्तुगिजांनीं गोवें घेतल्यावर गोव्याचा राज्यकारभार प्रायः व्हिसिरे किंवा गव्हर्नर जनरल यांतर्फे चाले. सल्लागार मंडळाचीहि व्यवस्था होती. त्या मंडळास आरंभीं 'कोंसेल्यु दुश् कापितांइश' असें नांव असून त्यांत लष्करी कॅप्टन, उच्चकुलीन फिरंगी व इतर महत्वाचे लोक असे ठराविक सभासद भाग घेत. पुढें त्या मंडळास 'कोंसेल्यु दु इस्तादु' असें नांव मिळालें आणि १८३७ पासून त्याचें रुपांतर 'कोंसेल्यु दु गोव्हेर्नु' यांत झालें.

सेक्रेतारियु जेराल याच्या खात्यांतून सारा मुलकी कारभार चाले. गव्हर्नर जनरलच्या गैर-हजेरींत आर्चबिशप, सेक्रेतारिय व हायकोर्टाचे चीफजज यांचें कौन्सिल कारभार चालवी. तालुक्यांतील व्यवस्था काम्र आग्रारियकडे होती. पुढें महालांत आदमिनिस्त्रादोर (मामलेदार) नेमण्यांत आले. नवीन काबिजादीचा प्रदेश हातीं आला त्यावेळीं 'इंतेंदेंसिय जराल दश् नोव्हश् कोंकीस्तश्' या कचेरींतून त्या प्रदेशाची वहिवाट चाले.

सन १८६४ च्या सुमारास 'इंतेंदेंसिय जराल' गेलें आणि नव्या काबिजादीचे पेडणें, सांखळी, फोंडें, केंपें, असे चार विभाग पाडून त्यांवरील अधिकाऱ्यांस 'इंतेंदेंत' असें नांव दिलें. पुढें १८८३ च्या सुमारास हेच तालुके केले व त्यांवर मामलेदार नेमले; आणि सांगें व काणकोण हे दोन तालुके नवीन निर्माण झाले. त्यानंतर सत्तर तालुका निराळा करून त्यावर लष्करी अधिकाऱ्याची नेमणूक झाली. सांगें तालुक्यावरहि कांहीं काल लष्करीच अधिकारी होता. पुढें कांही वर्षांनंतर मुर्गांव तालुका बनविण्यांत येऊन गोव्यांतील एकंदर तालुके अकरा करण्यांत आले.

पोर्तुगिजांनां सुरवातीला गोव्याच्या कारभारासाठीं 'कोमुनदादी' या ग्रामसंस्थांचें फार सहाय्य झालें. या संस्थांची व्यवस्था पाहून आल्बुकेर्कनें फार कौतुक केलें. गोवें शहर व त्याच्या भोंवतालचा भाग हस्तगत करतांच आफोंस द आल्बुकेर्क यानें या संस्थांकडून विजापूरकरला मिळत असलेल्या करांपैकीं एक तृतियांश त्यांनां माफ केला व फिरंगी सरकारनें तेथील लोकांनां त्यांच्या चालीरीति बिनधोक चालविण्याची हमी दिली. (Bosq. Hist. भाग १ ला पृ. १९२).

पुनः गोवें आदिलशाहींत गेल्यावर पूर्वी दिलेली हमी गेली. त्यानंतर सन १५१० च्या नोव्हेंबर महिन्यांत आल्बुकेर्कनें गोवें परत घेतांच सदरील ग्रामसंस्थांकडे नवीन करार केला. त्यावेळीं गोवें, चोडण, दिवाडी, जुवें या बेटांतील ग्रामसंस्थांकडून १८ हजार चांदीचीं तांगें म्हणजे २४०० रु. सरकारला मिळत. सासष्टच्या २७३९३ असर्फ्या म्हणजे रु. १२८५२-४-० व बार्देसच्या २८८७१ असर्फ्या म्हणजे रु. १३६८३-८-० मिळत असत.

यानंतरच्या कालांत सरकारनें ग्रामसंस्थांवर नवीन कर बसविले व त्यांच्यांत बदलहि केला; तथापि कारभाराची घडी विशेष अशी बदलली नाहीं.

सन १७७७ सालीं मार्केज द पोंबाल याच्या आज्ञेवरून ग्रामसंस्थांकडे जे नवीन करार केले त्यांनां अनुसरून तिसवाडीच्या ग्रामसंस्थांनां असर्फ्या १५८८३-२-३१ (रुपये ७९४१-१२-०), सासष्टीच्या ग्रामसंस्थांनां असर्फ्या ८६१४९-३-१६ (रुपये ४३०४७-१३-०)

आणि बार्देसच्या ग्रामसंस्थांनां असफर्या ३१५८-२-२३ (रुपये १५७३०-३-९) सरकारला द्याव्या लागत.

पोर्तुगीज पूर्वकालीन ग्रामसंस्थांचा कारभार छोट्या संस्थानांप्रमाणेंच चाले. गांवच्या साऱ्या जमिनीवर ग्रामसंस्थांचीच मालकी होती. राजसत्तेला त्यांकडून ठराविकच वार्षिक खंडणी मिळे. गांवच्या जमिनीच्या उत्तम व कनिष्ट, बागायती व जिरायती असे वर्ग पाडून त्यांवर कायम स्वरूपाचा ठराविकच जमीन धारा बसवला होता. गांवचा न्याय मनसुबाहि ग्रामसंस्थांच्या पंचांकडून गांवांतच निकालांत येत असे. ग्रामसंस्थांचा सारा कारभार त्यांच्या सभा भरून एकमतानें चाले. कांहीं खास जमिनी मक्त्यानें तर कांहीं वार्षिक अगर त्रैवार्षिक लिलांव करून देत असत.

ग्रामसंस्थांचा सारा खर्च वजा जातां नक्की राहिलेल्या फायद्याची किंवा प्रसंगीं येणाऱ्या तुटीची वांटणी गांवकऱ्यांतच होई. ही वांटणी कुठें शेअर्सच्या पद्धतीनें, कुठें पुरुष वर्गास अनुसरून तर कुठें ठराविकच विभागणीनें होई.

ग्रामसंस्थांचें दप्तर कुलकर्ण्याकडे असे. दरसाल मक्तेदारीनें नेमलेल्या वसुलदाराकडून सारा वसूल करण्यांत येई. ग्रामसंस्थांचा महालाचा कारभारहि स्वतंत्रपणेंच चाले. प्रत्येक ग्रामसंस्थेचा एक प्रतिनिधि महाल-मंडळांत असे. गांवचें दप्तर कुलकर्ण्याकडे तसेंच महालाचें दप्तर नाडकर्ण्याकडे असे. सरकारी खंडणीची रकम ग्रामसंस्थांकडून महाल मंडळांत आल्यावर तें मंडळ ती सरकारी खजिन्यांत भरी. महालच्या खर्चासाठीं प्रत्येक ग्रामसंस्था आपल्या मगदुराप्रमाणें ठराविक पैसे देई. या महाल मंडळांनां पोर्तुगीज अमदानींत 'काम्र जॅराल द प्रोव्हींसिअ' असें नांव मिळालें होतें.

या ग्रामसंस्थांचें मूळचें राष्ट्रीय, सामाजिक व धार्मिक स्वरूप पुढें पार बदलून जाऊन त्यांनां केवळ कृषीविषयक व्यवहारी स्वरूप प्राप्त झालें.

गोमंतकीय ग्रामसंस्थांनीं प्राचीन राज्यकर्त्यांकडे जे करार केले होते, त्यांत प्रत्येक गांवानें खुषीनें स्वीकारलेल्या कराला खुशीव्रत असें नांव होतें. पोर्तुगीज अमदानीच्या सुरवातीस हा पूर्वीचाच कर तेवढा राहील असें अभिवचन मिळालें होतें; तथापि सन १५३३ सालीं 'घोडेव्रत' नांवाचा दुसरा नवीन कर सुरू झाला. या करांतून सरकारी घोडदलाचा खर्च चाले. सन १५३९त कुलकर्ण्यांच्या वतनी जमिनीवर 'कुलकर्ण-पापोशी' नांवाचा कर बसला. या नंतर सर्व करांचें एकीकरण होऊन 'फोर' हा एकच सार्वत्रिक कर सुरू झाला.

सन १५१८ सालीं ग्रामसंस्थांकडील जमिनींवर पोर्तुगीज राज्यकर्त्यांनीं 'देसिमुश्' (दशमभाग) नांवाचा कर बसवला. पुढें तो अनेक तक्रारींमुळें बंद झाला व सन १७०२ सालीं पुनः सगळ्याच जमिनींवर 'मैयुश् देसिमुश्' हा उत्पन्नावर शेंकडा पांच टक्के कर बसला. या करासंबंधींहि बऱ्याच तक्रारी करण्यांत आल्यावर तो सन १७०४ सालीं बंद झाला. पुढें सन १७४९ सालीं ग्रामसंस्थांवर 'मैयुश् देसिमुश्' व इतर जमिनींवर 'देसिमुश्' हा कर बसविण्यांत आला. याची आकारणी प्रत्यक्ष उत्पन्नावर होई.

सन १७७७त जुन्या काबिजादींतील जमिनींच्या नक्की उत्पन्नावर शेंकडा अर्धा टक्का असाहि एक निराळाच कर बसविला होता.

सन १८८२ पर्यंत ग्रामसंस्था व इतर यांकडील फोर व जुन्या काबिजादींतील 'देसिमुश्' हेच जमिनीवरील मुख्य कर होते. पुढें सन १८८३ सालीं 'देसिमुश्' हा कर काढून टाकून त्या ऐवजीं 'देसिम प्रेदियाल' (उत्पन्नाचा दहावा हिस्सा) हा कर अस्तित्वांत आला. हा कर खर्च वजा जातां जमिनीच्या नक्की उत्पन्नावर घ्यावा व तो सार्वत्रिक लागू व्हावा असें ठरलें; तथापि पुनः विचार होऊन तो प्रथम जुन्या काबिजादींतच सुरू करावा असें निश्चित झालें व त्याप्रमाणें तिसवाडी, साष्ट व बार्देश या तीन तालुक्यांतून त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

सन १८९८च्या सुमारास पेडणें, सांखळी, केपें व काणकोण या चार महालांतील जमिनीवर 'देसिम प्रेदियाल' कर बसविण्यांत येऊन तेथील मूळचा ग्रामसंस्थांचा 'फोर' हा कर काढून टाकण्यांत आला.

पूर्वीचा 'देसिमुश्' ह्या कराचा वसूल मक्तेदारामार्फत प्रत्यक्ष उत्पन्नांतून होई. ती पद्धत बंद करून हा 'देसिम प्रेदियाल' कर प्रत्यक्ष नाण्यांत घेण्यास सुरवात झाली.

पुढें सन १९१६ सालीं सांगें व फोंडें या महालांनीं 'देसिम प्रेदियाल' हा कर जारी केला आणि तेथील मूळचा 'फोर' दूर केला. तथापि अजून रुपयामागें एक आणा या प्रमाणें तो 'फोर' ग्रामसंस्था वसूल करतातच.

'देसिम प्रेदियाल' हा कर खर्च वजा जातां नक्की उत्पन्नावर शेंकडा दहा टक्के या प्रमाणें आकारून कराबद्दल भरावयाची वार्षिक रक्कम निश्चित होई; तथापि पुढें शेंकडा दहा ऐवजीं तो बारा टक्के या प्रमाणें आकारण्यांत येऊं लागला आणि हल्लीं शेकडा पंधरा प्रमाणें त्याची आकारणी होते.

आकारणीच्या सालीं येणाऱ्या उत्पन्नांच्या अंदाजावरून व त्या सालच्या दरांप्रमाणें 'देसिम प्रेदियाल' कराची रक्कम ठरत असते. सरकारला वाटल्यास दर वीस वर्षांनीं त्याची फेरतपासणी करतां येते.

कराच्या आकारणीविरुद्ध तक्रार करावयाची असल्यास तसा अर्ज वर्षारंभीं जानेवारींतच दिला पाहिजे.

'देसिम प्रेदियाल' या करावर कुठें कुठें म्युनिसिपालटीचा शेंकडा पांच टक्के जादा कर पाहिल्यांदा बसला आणि तो वाढत वाढत कित्येक तालुक्यांत तर आतां पंचवीस टक्क्यांवरहि आला आहे. या म्युनिसिपालट्यांचीं सर्व कामें इतिहासकालांत ग्रामसंस्थाच फार कुशलतेनें करीत असत. आणि अर्थातच त्यावेळीं त्याबद्दल निराळा म्हणून जादा करहि वसूल होत नसे.

'म्युनिसिपालटी' या नांवाची ही निराळी संस्था पोर्तुगीज अंमलाच्या आरंभीं गोव्यांत प्रथम पोर्तुगिजांनींच सुरू केली. पहिल्याप्रथम आल्बुकेर्क यानें 'सेनाद द गोअ' या नांवानें ही संस्था सन १५१० च्या सुमारास जुनें गोवें येथें स्थापन केली. हीच आजची पणजीची म्युनिसिपालटी होय. या नंतरच्या कालांत क्रमाक्रमानें इतर महालांतील म्युनिसिपालट्यांचा जन्म झाला.

पोर्तुगीज अंमलाच्या आरंभीं पोर्तुगीज सरकारनें तिसवाडी, साष्ट व बार्देस या प्रदेशांचा करवसुलाचा मक्ता एक लाख करुझाद (२५ हजार रु.) या रकमेस तिमोजला दिला होता.

त्यानंतरच्या कालांत मल्हारराव नांवाच्या इसमानें पंचवीस हजार असर्फ्यांस कांहीं भागाचा मक्ता घेतला होता असा उल्लेख मिळतो.

न्यायखात्याप्रमाणें पोर्तुगीज सरकारचें जमाबंदी खातेंहि पूर्वीपासूनच स्वतंत्र असे. आरंभीं सन १५१७त या खात्यावर 'व्हॅदोर द फाझेंद' या नांवाचा मुख्याधिकारी असे. पुढच्या कालांत मक्ता न देतां याच अधिकाऱ्याकडून वसुलाचेंहि काम होऊं लागलें. सरकारी उत्पन्नाच्या सर्व प्रकरणांवर या व्हॅदोरचे अधिकार होते.

पुढें सन १६१५ सालीं 'कोंसेल्यु द फाझेंद' या मंडळाची स्थापना होऊन जमाबंदी खात्याची सर्व व्यवस्था त्याकडे आली. या मंडळांत सदर व्हॅदोर, हायकोर्टचे अध्यक्ष व इस्क्रिव्हांव जेराल द फाझेंद असे सभासद असून मंडळाचे अध्यक्ष ना. गव्हर्नर जनरल असत. सन १७७९ त या मंडळांत फरक होऊन त्याला 'इयुंत जराल द फाझेंद' असें नांव मिळालें. या वेळीं त्यांत 'प्रोकुरादोर जराल द कोरोअ' या अधिकाऱ्याचाहि समावेश होता. सन १७७४ त व्हॅदोरची जागा कमी होऊन इतर सभासदांचेंच मंडळ राहिलें व तशी व्यवस्था सन १८३५पर्यंत टिकली.

सन १७६९ सालीं 'इस्क्रिव्हांव द इयुंत' म्हणून जो एक नवीन अधिकारी नेमला होता तो, एक हिशेबनीस व चार कामगार अशा इसमांची 'कोंतादोरीअ जेराल' नांवाची एक कचेरी सन १८३६ च्या सुमारास सुरू झाली. आरंभीं या कचेरीकडे एकंदर हिशेबाची तपासणी व नोंदकाम असे. पुढें या कचेरीचे अधिकार व व्याप वाढत जाऊन त्यांतूनच जमाबंदी खात्याच्या कचेरीचा उदय झाला.

सन १८८८ सालीं सदर कोंतादोरीअ रद्द होऊन त्या ऐवजीं 'रेपार्तिसांव द फाझेंद प्रोव्हिंसियाल' या नांवाची कचेरी उदय पावली. या कचेरीच्या मुख्याधिकाऱ्यास 'इंस्पेक्तोर द फाझेंद' म्हणत.

या नंतरच्या कालांत सबंध गोमंतकांत जमाबंदी खात्याची ही एकच कचेरी गैरसोयीची वाटल्यानें सन १८७९ त तिसवाडी, बार्देस, साष्ट, पेडणें, सांखळी, फोंडें व केपें या तालुक्यांतून सदर कचेरीच्या हुकमतीखालीं तालुका कचेऱ्या उघडल्या. पुढें सन १८८३ त सांगें व काणकोण येथेंहि त्या सुरू केल्या. आणि पणजीच्या मुख्य कचेरीस 'रेपार्तिसांव सुपेरियोर द फाझेंद' असें नांव मिळालें.

सन १९०१ पासून गोव्याच्या जमाबंदीची व्यवस्था पोर्तुगाल सरकारकडे गेल्यानें बांकु नासियोनालमध्येंहि कांहीं काल पैशांचा व्यवहार होऊं लागला.

सन १९१० पासून प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू झाली व थोड्याच कालांत प्रांतिक स्वायत्तता मिळाली त्यावेळीं जमाबंदी खात्याची पुनर्घटना होऊन 'दिरेक्सांव दुश् सेर्व्हिसुस् द फाझेंद' ही जमाबंदी खात्याची हल्लीची मुख्य कचेरी अस्तित्वांत आली. तेव्हांपासून जमाखर्चाच्या बाबीहि निश्चित झाल्या. त्यांच्या कायदेशीरपणाबद्दल व योग्यायोग्यतेबद्दलचा निर्णय देण्याचा अधिकार आणि प्रसंगीं तपासणी इ. कामासाठीं 'आउदितोरीअ फिस्काल' ही कचेरीहि जन्म पावली.

पुढें कांहीं कालानें म्हणजे सन १९२६ त सदर आउदितोरीअ बंद झाली.

इतिहासकालीन हिंदु राजकारणी

वसंत माधव— हे सारस्वत असून श्री शांतादुर्गेचे महाजन असावेत असें वाटतें. चौदाव्या शतकांतील प्रमुख राजकारणी लोकांत ह्यांची बरीच प्रसिद्धी होती. मुसलमानांच्या तावडींतून गोमंतक मुक्त करून विजयनगर साम्राज्यांत सामील करण्यास विजयनगरचे शूर प्रधान माधव मंत्री यांनां ज्यांनीं सहाय्य केलें त्यांत यांची कामगिरी मोठी आहे. विजयनगर साम्राज्याचे गोमंतकांतील पहिले प्रतिहस्त (व्हाइसरॉय) म्हणून यांची नेमणूक झाली होती. यांची कारकिर्द सन १३७९ पासून १३८७ पर्यंत चालली.

माइन् शेणै वागळे— विजयनगर साम्राज्याचे गोव्यांतील हे दुसरे प्रतिहस्त असून त्यांचा कारभार सन १४०३ पासून १४०७ पर्यंत चालला. राजकारणांतील यांचा दर्जा, बुद्धि व कौशल्य और होतें. विजयनगर सम्राटाचे माधव मंत्री यांनां फार मानीत. गोमंतकावर विजयनगरची सत्ता प्रस्थापित करण्यांत यांची राजकारणी कुशलता फार महत्वाची आहे. बांदिवडें येथील श्रीनागेश देवालयापुढील सन १४१३ सालच्या शिलालेखांत 'पुरुसु सेणवैया सुतु माइं सेणवैया' असा उल्लेख आहे तेच हे माईन् पुरसो शेणै. हे सारस्वत असून श्रीमंगेशाचे महाजन होते.

तिमय्या नाईक ऊर्फ तिमोज— हे विजयनगरचे सरदार असून राजकारणी डावपेंच खेळण्यांत मोठे चतुर होते. सन १५१० त गोवा बेटांत पोर्तुगिजांचा प्रवेश होण्यास कारणीभूत होणारा प्रमुख राजकारणी हिंदु म्हटला म्हणजे तिमोज हाच होय. सोळाव्या शतकांतील पोर्तुगीज ग्रंथकारांनीं तिमोजच्या राजकारणाची योग्यता फार वाखाणली आहे. हे विजयनगरचे सरदार असले; तरी त्यांचे कित्येक नातलग व इष्टमित्र गोव्यांत होते. पुढें फिरंग्यांचा अधिकार मिळून त्यांचें वास्तव्यहि गोव्यांत झालें. गोवें घेण्याच्या बाबतींत यांनीं आल्बुकेर्केला फार मोठें सहाय्य केलें होतें. हे जातीनें मराठे असावेत असें दिसतें. अधिकारानिमित्त जरी ते होनावर येथें होते; तरी त्यांचें मूळ घर गोव्यांतच असावें.

म्हाळ पै ऊर्फ म्हाड पै— हे गृहस्थ चांगले नामांकित व राजकारणी पुरुष होते. हे म्हाळसेचे महाजन व सारस्वत असून गांवचे एक प्रमुख म्हणून गणले जात. कोंकणाख्यानांत उल्लेख आलेले आणि 'म्हाळपैचें कांड' 'म्हाळपैक जोर संग्रामांक पेज' अशा ज्या कोंकणी म्हणी अजून लोकांच्या तोंडीं आहेत तेच हे म्हाळ पै. गोवें घेण्याच्या प्रसंगीं फिरंग्यांनां ज्या राजकारणी लोकांनीं सहाय्य केलें त्यांत यांचाहि समावेश आहे. "पोर्तुगिजांनीं गोवें घेतल्यावर म्हाड पै आपल्या कुटुंबासह कोचीस जाऊन राहिला." (— बहुगुण कामत वाघ). "फिरंग्यांनीं गोवें घेतल्यानंतर थोड्याच कालांत जो अनुभव आला त्यामुळें म्हाडपै प्रभृति हिंदु पुढाऱ्यांनी आदिशहाशीं पुनः मैत्री जोडण्याची तयारी चालविली आणि त्यासाठींच त्यांनीं गोवें सोडलें.

कृष्ण शेणवीं— हे तिसवाडींतील एक प्रमुख सारस्वत होत. यांकडूनच गोव्यांतील उत्पन्नांची माहिती वगैरे आल्बुकेर्केला मिळून त्याला गोव्याचें महत्व कळून आलें. हे कुशल राजकारणी होते; यांचें राजकारण फिरंग्यांनां बरेंच फायदेशीर झालें. स. १५१२ सालीं फिरंगी सरकारनें त्यांनां हिंदु सैन्याचा कॅप्टन नेमलें.

आदिलशहा व पोर्तुगीज यांच्यांत मियालखाना-संबंधींचें राजकारण यांतर्फेंच झालें होतें. आणि त्यासाठीं विजापूरला गेले असतां पुढें त्यांनां आदिलशहानें कैदेंतहि टाकलें. 'हे मोठे लढवय्येहि होते' असें पोर्तुगीज इतिहासकार लिहितात.

दादाजी कृष्ण शेणवीं— हा कृष्ण शेणवी यांचा मुलगा असून बापाच्या मागें त्याचे सर्व अधिकार याकडे आले होते. हाहि राज-कारणांत हुशार होता. सन १५४८ पर्यंत हा अधिकारावर होता.

आझू नाईक— हा दुभाषा असून सन १६१३ सालीं एका महत्वाच्या राजकारणासाठीं याला उत्तरेकडे पाठविलें होतें. हा सारस्वत होता.

कृष्ण शेणै— हाहि सारस्वत फिरंग्यांचा दुभाषाच असून त्याला सन १५४६ त एका राजकारणासाठीं फिरंगी सरकारनें विजापूरला पाठविलें होतें.

रामोजी शेणवीं कोठारी— पोर्तुगीज कागदपत्रांत ठळकपणें झळकणारे हे राजकारणी स. १६४[illegible] पासून सन १६७४ पर्यंतच्या कालांत फिरंगी सरकारच्या फार उपयोगीं आले. फिरंग्यां-चे वकील म्हणून हे विजापूर, मोंगल, शिवाजी वगैरेंच्या दरबारांत गेले होते. हे जातीनें सारस्वत असून धडाडीचे होते. यांचें घराणें केळशीचें असून कुळदेवता श्रीशांतादुर्गा होय. ख्रिस्ती-करणाच्या वेळीं कोठारी सहकुटुंब डिचोली येथें गेले व तेथेंच स्थायिक झाले. यानंतर सरकारनें त्यांनां धार्मिक व इतर खास सवलती देऊन पुनः गोवें येथें येण्यास सांगितलें. हे सन १६७४ नंतर वारले.

रघुनाथ शेणवीं कोठारी— आपल्या वडिलांच्या मागें हा रामोजी शेणवीं यांचा थोरला मुलगा अधिकारावर आला. यांनां आपले वकील म्हणून सन १६७८ त फिरंग्यांनीं श्रीशिवाजीकडे पाठविलें होतें.

नारायण शेणवीं— हे फिरंगी सरकारचे दुभाषी होते. फोंडें किल्ल्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांकडे कांहीं राजकारणासाठीं सन १६८१ सालीं यांनां फिरंग्यांनीं पाठविलें होतें.

रामकृष्ण नाईक वरवे— हे फिरंग्यांचे वकील म्हणून सन १६८४ सालीं रायगडच्या दरबारांत छत्रपति संभाजी यांकडे गेले होते. यांनीं फिरंग्यांतर्फे मराठ्यांकडे चांगली वकिली केली. यानंतरच्या कालांत राजे राजाराम छत्र-पति यांचे प्रधान रावजी शामराज यांसोबतहि तहाच्या वाटाघाटीसाठीं यांनां फिरंग्यांनीं मराठ्यांकडे पाठविलें होतें. हे चित्पावन ब्राह्मण होते.

हरी शेणवीं बोरकर— सन १६९९ सालीं फिरंगी व वाडकर यांच्यांत तह घडवून आणण्यासाठीं हे वाडकर भोंसल्यांकडे राजकारण करण्यास गेले होते. हे बोलण्यांत चतुर होते. हे सारस्वत असून त्यांची कुलदेवी श्रीशांतादुर्गा होय.

रामकृष्ण शेणवीं घोडेकर— हे कुंभारजुवें येथील सारस्वत वैष्णवपंथी ब्राह्मण श्री रामनाथाचे महाजन होते. सन १७०० च्या सुमारास हे विशेष प्रसिद्धीस आले. हिंदूंतर्फे फिरंगी सरकारांत यांनीं अनेक प्रसंगीं फार महत्वाची कामगिरी करून आणीबाणीच्या वेळीं हिंदूंनां बरेंच सहाय्य दिलें. पोर्तुगीज दरबारांत त्यांचें चांगले वजन होतें. हे बोलण्यांत मोठे चतुर व राजकारणीहि होते. यांची कामगिरी बहुतांशी जनतेला फायदेशीर झाली आहे. सन

१७३३ त जुलैच्या ११ तारखेस अधिकाऱ्यांकडून त्यांचा विश्वासघातानें अंत झाला. प्रसिद्ध ' रामा पोर्तुगेज ' ते हेच.

बक्षीबहाद्दर जीवबादादा केरकर— केरी (पेडणें) येथें सन १७४० सालीं गौड सारस्वत घराण्यांत यांचा जन्म झाला. हे बुद्धिमान, राजकारणी व चांगले लढवय्ये होते. महादजी शिंदे यांस ग्वाल्हेरच्या गादीवर बसविण्यास श्रीमंत नानासाहेब पेशव्यांकडे यांनीं कुशलतेचें राजकारण केलें. पेशवे सरकारांत त्या वेळीं त्यांचें चांगलें वजन होतें. महादजी शिंद्यांचे हे प्रधानमंत्रि व सरसेनापति होते. यांनीं अनेक लढाया मारून त्यांत यश मिळविलें. म्हैसूरचा वाघ म्हणून प्रसिद्ध असलेल्या टिपू सुलतानास यांनीं जर्जर करून सोडलें. सन १७९५ च्या खर्ड्याच्या लढाईंत तर यांनीं चांगलें यश मिळविलें. ग्वाल्हेर दरबारांत अनेक गोमंतकीयांनां यांनींच आश्रय दिला. वयाच्या ५६ व्या वर्षीं म्हणजे ६ जानेवारी १७९६ रोजीं यांनीं देह ठेवला.

रामचंद्र मल्हार सुखठणकर— ख्रिस्तीकरणाच्या वेळीं केळोशी येथून हें सारस्वत घराणें गोव्याबाहेर गेलें. मल्हारबाबा सुखठणकर या बुद्धिमान गृहस्थांचे रामचंद्रबाबा हे वडिल चिरंजीव. नैसर्गिक बुद्धिचातुर्यानें यांनीं आपली वर्णी पेशवे दरबारांत लावून ते श्रीमंत बाजीराव पेशव्यांचे आवडते झाले. हे मोठे राजकारणी होते त्यामुळें अल्पवयी नानासाहेब पेशव्यांनां राजकारणांत यांचें फार मोठें सहाय्य झालें. त्या वेळीं पेशवे सरकारच्या मुख्य प्रधानाची कामगिरी यांनीं मोठ्या कुशलतेनें व मुत्सद्देगिरीनें बजावली. ता. ४ ऑक्टोबर १७५७ त हे कालवश झाले.

लखबादादा लाड— चिखली (बार्देस) येथील गौड सारस्वत लाड घराण्यांत यांचा जन्म झाला. हे जात्याच हुशार होते. हे बक्षीबहाद्दर जीवबादादांच्या समकालीन असून प्रख्यात मुत्सद्दी अशी त्यांची प्रसिद्धी होती. शिंदे सरकारच्या तोफखान्याचे हे मुख्याधिकारी होते. हे शूर व लढवय्ये असल्यानें अनेक लढाया मारून त्यांत त्यांनीं चांगलें यश मिळविलें. आग्र्याच्या वेढ्यांत यांनीं मोठी मर्दमुकी दाखवून दरबारची शाबासकी मिळवली. ता. २७ जानेवारी १८०३ रोजीं ते वारले.

बहुगुण कामत वाघ— यांचा जन्म रायबंदर येथील सारस्वत घराण्यांत झाला. हे बहुश्रुत व बहुभाषाप्रवीण असून फिरंगी सरकारचे दुभाषा होते. फिरंगी व मराठे तसेच वाडकर भोंसले यांच्या राजकारणांत अनेक वेळां भाग घेऊन यांनीं आपली मुत्सद्देगिरी प्रगट केली आहे. त्यावेळीं दुभाषाचा दर्जा मोठा होता. सन १७१९ पासून १७५१ पर्यंतच्या कालांत हे पोर्तुगीज सरकारच्या दुभाषाच्या अधिकारावर होते.

हे अधिकारावर येण्यापूर्वीं पुढील हिंदु गोवा सरकारच्या दुभाषाच्या जागीं येऊन गेलेः— आझ्र नाईक (सन १६१० ते १६२६), कृष्ण शेणै (सन १६४८ ते १६५८), नारायण शेणवी (१६५८–१६८१), विठोजी शेणवी भेंडे (१६६७–१७१४) फारशी दुभाषा म्हणून १६९१ त परशुराम शेणै व १७३६ त रामचंद्र कामत वाघ यांची नेमणूक झाली होती. रामकृष्ण शेणै व कुष्टां शेणै यांचीहि नेमणूक दुभाषांच्या जागीं झाल्याचें १५ ऑक्टोबर १७४५ च्या एका पत्रावरून कळतें. (Agentes da D. Portuguesa — डॉ. पिसुर्लेकर)

अनंत कामत वाघ— बहुगुण कामत यांच्यानंतर अनंत कामत हे दुभाषाच्या अधिकारावर आले. यांचा काल स. १७५२ ते १७९३ आहे. हे वयातीत असल्यानें त्यांचा सहाय्यक म्हणून त्यांचा बंधु सदाशिव कामत यांची नेमणूक केली होती. यांकडूनहि फिरंगी सरकारचें राजकारण ठीक झालें.

बहुगुण सदाशिव कामत वाघ— अनंत कामत यांच्या मागें हे दुभाषाच्या अधिकारावर आले. त्यावेळीं जवळच्या एतद्देशीय राज्यकर्त्यांशीं पुनः पुनः राजकीय प्रश्नासाठीं दुभाषालाहि जावें लागत असल्यानें दुभाषी हे राजकारणी असें ठरूनच गेलें होतें. यांनीं आपला अधिकार १७९४ पासून १८०७ पर्यंत चालविला.

सखाराम नारायण वाघ— सन १८०७ ते १८४४ पर्यंत हे दुभाषाच्या अधिकारावर होते. हे मुत्सद्दी व बहुभाषाप्रवीण होते. यांनां पोर्तुगीज, लॅटीन, फ्रेंच, इंग्रजी, संस्कृत व मराठी भाषा चांगल्या बोलतां येत. जवळ जवळ एक शतकपर्यंत दुभाषाचा अधिकार वाघ घराण्याकडे असल्यानें तत्कालीन गोमंतकीय त्या घराण्याला 'लिंगिस्ताद' (Lingua do Estado) घराणें म्हणत.

विठोजी शेणवी धुमे— यांचें घराणें मुळचें कुठ्ठाळचें; ख्रिस्तीकरणाच्यावेळीं तें कुंभारजुवें येथें आलें. हे सारस्वत असून त्यांचा देव श्री मंगेश होय. हे बुद्धिमान व चांगले राजकारणी होते. वाडकर भोंसले, मराठे वगैरेंकडे यांनीं फिरंग्यांतर्फे कुशलतेचें राजकारण केलें.

पांडुरंग विठोजी धुमे— यांचीहि पोर्तुगिजांच्या हिताची राजकारणी कामगिरी फिरंगी कागदपत्रांत नमूद आहे.

नारायण विठ्ठल धुमे— विठ्ठलरावांचे हे दुसरे चिरंजीवहि पेशव्यांच्या दरबारांत फिरंग्यांचे वकील म्हणून बरींच वर्षें होते. यांनींच कुशलतेनें स. १७७९ चा फिरंगी व पेशवे यांचा तह घडवून आणला.

पुंडलीक शेणवी वर्दे वालावलीकर— हे सारस्वत असून यांचें घराणें मूळचें केळोशीचें व कुलदेवी श्रीशांतादुर्गा होय. ख्रिस्तीकरणप्रसंगीं यांचे पूर्वज वालावलीला जाऊन राहिले; पुढें वाडकरांचे वकील म्हणून हे फिरंग्यांकडे आले व जुवें येथें स्थायिक झाले.

गोरक्षराव वालावलीकर— पुंडलीक शेणवी यांचे हे चिरंजीव. हे फिरंग्यांच्या शिपाई पलटणीचे कॅप्टन असून पेशव्यांच्या दरबारांत फिरंग्यांचे वकील होते. हे मोठे बुद्धिमान व राजकारणी होते. यांनां पालखीचा व छत्रीचा मान होता.

विठ्ठलराव वालावलीकर— हे गोरक्षरावांचे चिरंजीव असून बापाप्रमाणेंच बरींच वर्षें कॅप्टनच्या व कमांडरच्याहि हुद्यावर होते. फिरंग्यांचे वकील म्हणून हे पेशव्यांच्या दरबारांतहि होते. राजकारणांत हे फार कुशल होते. २३ जून १८०८ रोजीं ७८ व्या वर्षी पुणें येथें ते वारले.

लक्ष्मीनारायण विठ्ठलराव— बापामागें हे १८११ पर्यंत पेशवे दरबारांत फिरंग्यांचे वकील होते. हेहि मोठे राजकारणी होते. इतिहासकालांत रावांचें घराणें मोठें राजकारणी म्हणून प्रसिद्ध होतें. मुंबई, डिचोली व सांगें येथील राव वालावलीकर यांचेच वंशज होत.